(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)

पृ.शी.: मुंबई चित्रपटसृष्टी असोसिएशन ऑफ सिने अँड टेलिव्हिजन आर्ट डायरेक्टर आणि कॉस्च्युम डिझायनर या नोंदीणीकृत कामगार संघटनेमध्ये अवैधरित्या त्यांच्या कामकाजात अडथळा निर्माण करुन हस्तक्षेप करणे

मु.शी.: मुंबई चित्रपटसृष्टी असोसिएशन ऑफ सिने अँड टेलिव्हिजन आर्ट डायरेक्टर आणि कॉस्च्युम डिझायनर या नोंदीणीकृत कामगार संघटनेमध्ये अवैधरित्या त्यांच्या कामकाजात अडथळा निर्माण करुन हस्तक्षेप करणे या संबंधी सर्वश्री नानाभाऊ पटोले, पृथ्वीराज चव्हाण, शिरीष चौधरी, लहू कानडे, संजय जगताप, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. भारती लव्हेकर, श्री. अमित साटम, ॲड. आशिष शेलार श्री. अतुल भातखळकर, ॲड. राहुल नार्वेकर, श्री. कालीदास कोळंबकर, श्रीमती सरोज अहिरे वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत

ॲड.अशोक पवार (शिरुर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई चित्रपटसृष्टी असोसिएशन ऑफ सिने अँड टेलिव्हिजन आर्ट डायरेक्टर आणि कॉस्च्युम डिझायनर (ACTADCD) ही नोंदणीकृत कामगार संघटना गत ५८ वर्षापासून कार्यरत असून सिनेसृष्टीतील कामगार सभासद आणि निर्मात्यांमध्ये सुसंवाद वाढविणे, त्यांच्या समस्या सोडविणे व आकस्मिक काळात वैद्यकीय व अन्य मदत मिळवून देण्याचे काम ही संघटना करते, मात्र या संघटनेला फिल्म सेटींग ॲण्ड

ॲड.अशोक पवार....

अलाईड मजदूर युनियन (Allied Mazdur Union) तसेच फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज (FWICE) या दोन संघटनांकडून विनाकारण त्रास देवून अवैधरित्या त्यांच्या कामकाजात अडथळा निर्माण करुन हस्तक्षेप करणे, या दोन्ही संघटनांवर सारख्याच व्यक्ती विराजमान असून कामगारांच्या समस्यांच्या नावाखाली लाखो रुपयांचा गैरव्यवहार तसेच खंडणी जमा करण्याचे काम या दोन्ही संघटनांचे पदाधिकारी करीत असणे, उपरोक्त दोन्ही संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या जाचाला कंटाळून ACTADCD चे ज्येष्ठ सभासद श्री.राजेंद्र सापते यांनी आत्महत्या करणे व त्यांच्या सुसाईड नोटमध्ये या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना यासाठी जबाबदार ठरविणे, तरीही या प्रकरणी कोणतीही फौजदारी कारवाई अद्यापपर्यंत न होणे, अलाईड मजदूर युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी जवळजवळ ३१ कोटी रुपयांचा सभासद निधीचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये तक्रार नोंदवूनही यासंदर्भात अद्याप कोणतीही कारवाई न होणे, परिणामी त्यांचे धाडस अधिकच वाढून आता उपरोक्त दोन्ही संघटनांची वाकडी नजर ही ACTADCD संघटनेकडे वळली असून या संघटनेवर गुंडांमार्फत अनधिकृत कब्जा करण्याच्या उद्देशाने एक बनावट कार्यकारणी मंडळ स्थापन करुन बनावट लेटरहेड, मानचिन्हे व ओळखपत्रे छापून त्यांची बँक खाती सिल करण्यासंदर्भात बँकांना पत्र देणे व आश्चर्याची बाब म्हणजे बँक ऑफ महाराष्ट्र व एक्सिस बँकेने चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे उपरोक्त संघटनांचा हस्तक्षेप वैध ठरवून गत ६ महिन्यापासून ACTADCD संघटनेच्या बँकेचे व्यवहार रोखून ठेवणे, परिणामी या संघटनेचे सभासद अनुज्ञेय असलेल्या मदतीपासून वंचित असणे, या प्रकरणी आंबोली पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करुनही अद्यापपर्यत उपरोक्त दोन्ही संघटनांवर कोणतीही कारवाई न होणे, या प्रकरणाची गंभीर दखल घेवून मा.गृहमंत्री महोदयांनी दिनांक ७ जुलै, २०२१ रोजी बैठक घेऊन SIT लावून दोषींवर कडक कारवाई करण्याचे आदेश देऊनही अद्याप कोणतीही कारवाई न होणे, सदरहू प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेवून ACTADCD च्या कार्यालयात अनधिकृत प्रवेश करुन कामकाजात हस्तक्षेप करणाऱ्या उपरोक्त दोन्ही संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना त्वरीत अटक करुन कारवाई

ॲड.अशोक पवार....

करणे बाबत तसेच बँकेचे व्यवहार पुन्हा सुरु करण्यासंदर्भात तातडीने आदेश देण्याची आवश्यकता, उपरोक्त दोन्ही संघटनांमधील गैरव्यवहारासंदर्भात तेथे प्रशासकाची नेमणूक करुन आर्थिक गुन्हे शाखेकडून सखोल चौकशी व दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच श्री.राजेंद्र सापते यांच्या आत्महत्येमुळे त्यांचे कुटुंब आर्थिक संकटात सापडले असून त्यांना मदत देवून उपरोक्त संपूर्ण प्रकरणी शासनाने अतिशय गांभीर्याने व तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

अप्रसंगित प्रत

ॲड. अशोक पवार : अध्यक्ष महोदय, मुंबई चित्रपटसृष्टी असोसिएशन ऑफ सिने अँड टेलिव्हिजन आर्ट डायरेक्टर आणि कॉस्च्युम डिझायनर ही नोंदीणीकृत कामगार संघटना गत ५८ वर्षांपासून कार्यरत असून सिनेसृष्टीतील कामगार सभासद आणि निर्मात्यांमध्ये सुसंवाद वाढविणे तसेच विविध समस्येबाबत सभासदांचे प्रतिनिधीत्व करुन त्यांच्या समस्या सोडविण्याचे काम ही संघटना करते. तेथील एक पदाधिकारी श्री. सापते यांच्याकडून काही लाख रुपयांची खंडणी मागणे, त्यांना धमकी देणे, फिल्म इंडस्ट्रीमध्ये काम करु न देण्याची भूमिका, त्यांची काही कामे बंद करणे त्यांना मानसिक त्रास देणे अशा धमक्यांना प्रत्यक्ष रुप देऊन हा त्रास सहन न झाल्यामुळे त्यांनी सुसाईड नोटमध्ये लिहिले आहे की, तेथील काही संघटनांनी त्यांना त्रास दिला तर त्या संदर्भात काही प्रश्न निर्माण झाले आहेत. ते असे काही आहेत की, अशा एका चांगल्या संघटनेच्या सभासदांना वेठीस धरणाऱ्या आणि त्यांच्या कार्यालयामध्ये अनाधिकृतपणे प्रवेश करणाऱ्यांवर शासन काही कारवाई करणार आहे काय ? त्याचबरोबर मुंबई चित्रपटसृष्टी असोसिएशन ऑफ सिने अँड टेलिव्हिजन आर्ट डायरेक्टर आणि कॉस्च्युम डिझायनर या संघटनेची जी खाती बंद केलेली आहेत ती सुरु करण्यासाठी परवानगी देणार आहे काय आणि ते किती दिवसात करणार आहे ? ज्या दुसऱ्या संघटनेले अपहार केला आहे त्याच्या पोटी कारवाई केली आहे त्याला काही मर्यादित वेळेत सरकार कारवाई करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, हेखरे आहे की, मुंबई चित्रपटसृष्टी असोसिएशन ऑफ सिने अँड टेलिव्हिजन आर्ट डायरेक्टर आणि कॉस्च्युम डिझायनर ही नोंदणीकृत कामगार संघटना ५८ वर्षापासून या क्षेत्रात काम करीत आहे. दुर्दैवाने फिल्म सेटींग ॲन्ड अलाईड मजदूर युनियन आणि फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडीया सिने एम्लाईज या दोन्ही संघनेमध्ये वाद सुरु आहे. यामध्ये सन्माननीय सदस्यांनी श्री. सापते यांनी आत्महत्या केल्याचा उल्लेख केला आहे. ते या युनियनचे सभासद होते. यानंतर या तीन युनियमध्ये आणि यांच्यामध्ये भांडणे सुरु झाली. दरम्यान हा वाद पोलिसांपर्यंत जाऊन न्यायालयात आणि त्यातून अनेक घटना घडल्या. किती संघटनेचे किती पदाधिकारी व्हावेत यासाठी श्रमिक संघ अनिधियम, १९२६

श्री. हसन मुश्रीफ....

मध्ये अशी कोणतीही तरतूद नाही. त्याशिवाय कलम २८१ प्रमाणे एखाद्या संघटनेतील प्रॉपर्टी अकाऊंटचा वाद मिटवायचा असेल तर त्याच्या वादाची सुनावणी घेऊन कामगार विभाग त्यांना संमती देते. मग त्यांना इंडस्ट्रियल न्यायालयात जाऊन याचा निकाल लावून घ्यावा लागतो. श्री. रंगराव चौगुले हे मुंबई चित्रपटसृष्टी असोसिएशन ऑफ सिने अँड टेलिव्हिजन आर्ट डायरेक्टर आणि कॉस्च्युम डिझायनर या संस्थेचे सभासद आहेत यांनी संमंती पत्र घेतलेले आहे आणि अजून ते न्यायालयात गेलेले नाहीत. त्यामुळे हा संपूर्ण वाद आता न्यायालयात आहे. श्री. सापते यांची आत्महत्या झाल्यानंतर तत्कालीन माननीय कामगार मंत्री आणि सध्याचे माननीय गृह मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी त्याबद्दल दिनांक ७ जुलै, २०२१ रोजी बैठक घेतली होती. त्यांनी एक एसओपी आणि काही निर्देश दिलेले होते. किमान वेतन अधिनियम, १९४८ मध्ये कोणत्याही प्रतीच्या कामगारांचे वेतन कामगार संघटनेमार्फत देणे हे बेकायदेशीर आहे. बँक खात्यामध्ये ते पैसे अदा केले पाहिजे, असे दिलेले आहे. तसेच नंतर सिने कामगार कर्मचाऱ्यांना ओळखपत्र दिले पाहिजेत. सदर कामगाराकरिता विहित नमुन्यातील हजेरी पगारपत्र अद्यायावत ठेवणे अत्यावश्यक आहे. त्यानंतर सेटवर ढवळाढवळ करण्याचा कुणीही प्रयत्न करायचा नाही. तसे केलयास त्याची पोलिसामध्ये तक्रार द्यायची. सदर कामगार संघटनेने कोणतीही घटना घडल्यानंतर तात्काळ तक्रार करावी, अशा प्रकारचे आदेश अप्पर कामगार आयुक्तांनी काढलेले होते. हा वाद मिटवायचा असेल तर तो न्यालयातच मिटवावा लागेल अशी परिस्थिती आहे.

ॲड. अशोक पवार : अध्यक्ष महोदय, श्री न्यायालयीन बाबी ठीक आहेत परंतु तिथे काही संघटनांचे गुंड येतात आणि त्रास देतात. तर तो त्रास बंद करण्यासाठी सरकार काही कारणार आहे काय ? सापते यांचे कुटुंब आर्थिक अडचणीत सापडलेले आहेत. तर त्यांना शासनाकडून काही मदत होऊ शकते काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, श्री. सापते यांचे आत्महत्या प्रकरण, दिंडोशी पोलीस स्टेशनमध्ये श्री. सल्लाउद्दीन असांरी नावाच्या एका व्यक्तीने खंडणी

श्री. हसन मुश्रीफ....

बाबत फिर्याद केली, तसेच मालवणी पोलीस स्टेशनमध्ये खंडणी आणि गोंधळाचा एक गुन्हा नोंद झालेला आहे. अशा तीन ते चार तक्रारी यापूर्वी झालेल्या आहेत. त्यासाठी गृह विभागाला सांगून त्याची कार्यवाही सुरु आहे. तेथील आरोपी जामीनवर सुटलेले आहेत तर गृह विभागाने यामध्ये लक्ष घालावे, अशी माझी विनंती आहे.

श्री. राम सातपुते : अध्यक्ष महोदय, मुंबई चित्रपटसृष्टी असोसिएशन ऑफ सिने अँड टेलिव्हिजन आर्ट डायरेक्टर आणि कॉस्च्युम डिझायनर या संघटनेची जे पदाधिकारी किंवा जबाबदार व्यक्ती असतीत तर त्यांनी सन २०१८ नंतर निवडणूक घेण्यात आलेली नाही. त्यामुळे याठिकाणी गुंडगिरीचे प्रकार वाढलेले आहेत. आपल्याला माझी विनंती आहे की, मुंबई चित्रपटसृष्टी असोसिएशन ऑफ सिने अँड टेलिव्हिजन आर्ट डायरेक्टर आणि कॉस्च्युम डिझायनर या विषयामध्ये आपल्या दालनात आपण बैठक लावून याबाबत निर्णय घ्यावा, तो आपण घेणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय,हा विषय न्यायालयाने सोडवायचा आहे, हे मघाशीच सांगितले आहे.याबाबत मी यापूर्वी बैठक घेतलेली होती. सन्माननीय सदस्यांच्य प्रमाणे या तीन्ही संघटनांची पुन्हा एकदा बैठक घेऊन त्यामध्ये काही तोडगा काढता येईल काय ते बघू.

माहितीच्या मुद्याबाबत

श्री. सुनिल शेळके : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. मागच्या पाच दिवसापासून मी माझ्या मतदारसंघातील पवना धरण प्रकल्पांचा विषय मांडण्यासाठी लक्षवेधी सूचना लावण्यासाठी आपल्याकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. काल आपण लक्षवेधी सूचना घेतली होते त्यामुळे मी सकाळी ९.०० पासून दुपारी ३.०० वाजेपर्यंत सभागृहामध्ये उपस्थित राहिलो. अधिकाऱ्यांकडून ब्रिफिंग न मिळाल्यामुळे माननीय मंत्र्यांनी लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याचीविनंती केली होती. परंतु आज सुद्धा लक्षवेधी सूचना लावण्यात आली. यामध्ये अधिकारी जाणीवपूर्वक चुकीचे काम करीत आहेत. मागच्या ४० ते ४५ वर्षापासूनचा हा प्रश्न आहे. माझी लक्षवेधी सूचना घेण्यासाठी मी सातत्याने सांगत आहे. संपूर्ण प्रकरण मी अधिकाऱ्यांकडे दिले आहे. आज सभागृहामध्ये जास्त सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत तर निदान आज तरी माझ्या प्रश्न घेण्यात यावा. आपण सभागृहात लक्षवेधी सूचना घेत नाही याचा अर्थ विषय संपला असे होत नाही. अध्यक्ष महोदय, उद्या पुन्हा सन २०११ ची पुनरावृत्ती होईल. आज आपण जाणीवपूर्वक धरणग्रस्तांचा प्रश्न घेत नाहीत. मी चार दिवसांपासून माझा प्रश्न घेण्यासाठी विनंती करीत आहेत.

उपाध्यक्ष : याबाबत आपण एक स्वतंत्र बैठक घेण्यात येईल.

पृ.शी.: अनेक धर्मादाय रुग्णालयामध्ये मनमानी पद्धतीने कारभार सुरु असणे

मु.शी.: अनेक धर्मादाय रुग्णालयामध्ये मनमानी पद्धतीने कारभार सुरु असणे या संबंधी ॲड. अशोक पवार, श्री.राम सातपुते वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड.अशोक पवार (शिरुर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाच्या कलम ४१ कक मध्ये धर्मादाय रुग्णालयाने गरीब व निर्धन रुग्णांना मोफत तसेच सवलतीच्या दरात उपचार करण्याची तरतूद असनूही राज्यातील अनेक धर्मादाय रुग्णालयामध्ये मनमानी पद्धतीने कारभार सुरु असुन गरीब रुग्णांना १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेतून उपचार करण्यास ही रुग्णालये टाळाटाळ करत असणे, या रुग्णालयांना शासनामार्फत अनेक सूट व सवलती व माफक दरात जागा देण्यात आल्या असुन महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियमातील तरतूदीनुसार गरीब सर्वसामान्य कष्टकरी जनतेला आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणे या रुग्णालयांवर बंधनकारक असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी न होणे, ही रुग्णालये गरीब रुग्णांकडून अवाजवी फी वसूल करणे, धर्मादाय रुग्णालयांमध्ये १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणेची आवश्यकता असणे, या तरतुदीची अंमलबजावणी करताना या रुग्णांलयाच्या दर्शनी भागात जनसंपर्क अधिकारी यांचे नाव, मोबाईल नंबर, समितीचा बोर्ड, १० टक्के राखीव खाटा व शिल्लक आयपीएफ निधीबाबतचा तपशिल लावुन वेबसाईटवर देखील जागेची व निधीची उपलब्धता दर्शविण्याची आवश्यकता, संबंधित हॉस्पिटलचे जनसंपर्क अधिकारी सायंकाळी ६.०० नंतर तसेच रविवार व इतर सुट्यांच्या दिवशी फोन देखील न उचलणे, त्यामुळे रुग्णांना होणारा

ॲड.अशोक पवार...

त्रास तसेच गंभीर रुग्णांना मदत न होणे तर काहींना प्राण गमवावा लागणे, पैशाअभावी उपचार न होणे, परंतु याबाबत संबंधित रुग्णालयांकडून कार्यवाही न होणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, अधिनियमातील तरतूदींची प्रभावी अंमलबजावणी होण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

ॲड. अशोक पवार : अध्यक्ष महोदय, १० टक्के गरीब व निर्धन रुग्णांना दिले जाणारे उपचार व वैद्यकीय मदतीचा विषय आहे. या विषयावर गेल्या अनेक वर्षांपासून चर्चा केली जात आहे. तसेच अनेक जण मदतीची अपेक्षा करीत आहेत. मागील अधिवेशनामध्ये माननीय मंत्री श्रीमती आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली २५ आमदारांची कमिटी तयार केली असून या कमिटीमधून हे काम सुरु आहे. आज सदनात माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ बसले आहेत. त्यांनी देखील या योजनेत चांगले काम केले आहे. या रुग्णालयांकडून लोकांना अतिशय वाईट अनुभव येत आहेत. या रुग्णालयांना शासनाकडून सर्व प्रकारची मदत दिली जाते. त्यांना माफक भाड्याने अब्जावधी रुपयांची जमीन दिली जाते. सरकारच्या मोक्याच्या जमिनी अनेक रुग्णालयांना दिलेल्या आहेत. इतरही अनेक सवलती रुग्णालयांना दिल्या जातात. मात्र रुग्णालयांमध्ये रुग्ण गेल्यानंतर त्यांना कोणत्याही सवलती, मदत मिळत नाहीत. शासनाने काही एकर, हेक्टरमध्ये जमिनी दिल्या आहेत. मात्र पीआरओचे कार्यालय१० बाय १० फूट एवढेच असते. (अडथळा) काल २-३ सदस्यांनी सविस्तर भाषण केले तेव्हा आम्ही विरोध केला नाही. रुग्णांना जेव्हा रात्री रुग्णालयात जाण्याची वेळ येते तेव्हा तेथे पीआरओ नसतो, कोणी फोन उचलत नाही व पैसे भरल्याशिवाय त्यांना ॲडमिशन मिळत नाही. कायदा असे सांगतो की, गरीब व निर्धन यांना सवलतीच्या दराने उपचार मिळाले पाहिजेत. जोपर्यंत पैसे भरत नाही तोपर्यंत त्यांना रुग्णालयांत प्रवेश दिला जात नाही. राज्याची माहिती घेतली तर गरीब व निर्धन रुग्णांवर जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२१ म्हणजे एक वर्षात २३४ कोटी रु. खर्च झालेला आहे. ही रक्कम कमी नाही.

अध्यक्ष महोदय, माझे काही प्रश्न आहेत. यात सुधारणा करायची असेल तर पब्लिक ट्रस्ट ॲडमिनिस्ट्रेशन फंड करिता स्वतंत्र अधिकारी नेमणार काय ? उच्च न्यायालयाचा स्टे आहे किंवा नाही हे आम्हाला समजले पाहिजे. शिल्लक रक्कम पब्लिक ट्रस्ट ॲडमिनिस्ट्रेशन फंड मधून खर्च करणार काय ? तसेच उपजिल्हाधिकारी संवर्गातील एखादा अधिकारी ही व्यवस्था पाहण्यासाठी जिल्ह्यांमध्ये नियुक्त करणार काय ? रुग्णालयात तक्रार नोंद वही ठेवण्यास शासन रुग्णालयांना भाग पाडणार

ॲड. अशोक पवार...

काय? एका रुग्णालयात हार्टचे बायपास करायचे असेल तर ५ लाख रुपये खर्च येतो व दुसऱ्या रुग्णालयात ३ लाख रु. खर्च येतो. यामध्ये एकवाक्यता असली पाहिजे. ३ लाख करा किंवा ५ लाख करा. यामध्ये एकवाक्यता नाही म्हणून खर्च वाढवून दाखवला जातो काय ? पूर्वी आपण २ टक्के रक्कम आयपीएफ करिता खर्च करीत होतो. तो वाढवून ५ टक्के करणार काय ? तसेच प्रत्येक रुग्णलयात ओपीडी असते. मात्र ओपीडीचे बिल घेतले जाते. त्यांना या योजनेचा फायदा मिळत नाही. ओपीडीचे बिल देखील सरकार माफ करणार काय ? मला माननीय मंत्री यांच्याकडून सकारात्मक उत्तराची अपेक्षा आहे.

श्रीमती आदिती तटकरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. अशोक पवार यांनी काही प्रश्न मांडले आहेत. निर्धन व दुर्बल घटकांना मोफत किंवा सवलतीच्या दराने उपचार मिळावेत, याकरिता माननीय न्यायालयाच्या माध्यमातून ही योजना मंजूर झालेली आहे. या योजनेची तंतोतंत अंमलबजावणी करण्यासाठी धर्मदाय व खाजगी रुग्णालयाच्या तपासणीकरिता तदर्थ समिती आहे. या तदर्थ समितीला मर्यादित अधिकार आहेत. ही तदर्थ समिती नियमित समिती करावी या करिता प्रस्ताव सदनात लवकरच आणला जाणार आहे. जेणेकरुन समितीला अधिकाधिक अधिकार मिळतील.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी ३-४ प्रश्न विचारले आहेत. २ टक्के निधी राखीव ४ टक्के करावा असा समितीच्या माध्यमातून विचाराधीन आहे. जेणेकरुन गरीब रुग्णांना अधिकाधिक उपचार मिळतील. सध्या अतिशय कमी दंड आकारणी केली जाते. काही वर्षांपूवी ही रक्कम ठरवली होती. आता दंड आकारणी एक लाख रु. करावी असे विचाराधीन आहे. यामुळे रुग्णलये किंवा त्यांचे मॅनेजमेंट यांच्यावर धाक बसेल. सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, कोव्हिड कालावधीत काही खाजगी रुग्णालयांनी कोव्हिडचे उपचार चांगल्या प्रकारे दिलेले आहेत. दीड –दोन

श्रीमती आदिती तटकरे .....

वर्षांचा हा कालावधी सर्वांसाठी आव्हानात्मक होता. शासकीय रुग्णालये तर आहेतच मात्र खाजगी रुग्णलयांनी देखील कोव्हिड रुग्णालयात रुपांतरित केले होते. त्यांनी चांगली सुविधा दिलेली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ज्यांनी हा प्रश्न विचारला ते तदर्थ समितीचे सदस्य आहेत. या समितीमधील सर्वच सन्माननीय सदस्यांनी असे सूचित केले आहे की, तदर्थ समितीमध्ये जे सदस्य असतील त्यांचे कॉंटेक्ट नंबर सह नाव रुग्णलयाच्या फलकावर असले पाहिजे. ही सूचना रुग्णलयांना दिलेली आहे. सध्या तदर्थ समितीमध्ये जे सदस्य आहेत त्यांचे नाव व संपक्र क्रमांक ९० टक्के रुग्णलयातील फलकावर लावण्यात आहे. एखादा रुग्ण तेथे गेला त्याच्यावर उपचार होत नसतील, अन्याय होत असेल तर तदर्थ समितीचे सदस्य जे विधानसभा सदस्य आहेत त्यांना ते संपर्क करु शकतात. धर्मदाय व खाजगी रुग्णालयाचे बुकलेट अपडेट नव्हते. यामध्ये ५० ते ६० नवीन रुग्णलयांचा समावेश नव्हता. तो करुन आपण हे बुकलेट अपडेट केलेले आहे. जे काही वेगवेगळ्या आजारांवरील उपचार असतात त्याकरिता एकच रक्कम असावी असे त्यांनी सांगितले. हृदयरोगावरील सर्जरीकरिता एका रुग्णलयात वेगळी रक्कम व दुसऱ्या रुग्णलयात वेगळी रक्कम असते. या संबंधी काही तरी एक ब्लॅंकेट रक्कम असली तर योग्य प्रकारे उपचार करता येतील. या बाबत सूचना निश्चितपणे देण्यात येतील. काही रुग्णलयात सोशल वर्कर २४ तास उपलब्ध नसतात अशी तक्रार आलेली आहे. ६ वाजेपर्यंत काही असतात तर काही ८ वाजेपर्यंत असतात. सोशल वर्कर रुग्णलयाकडून नियुक्त केले जातात २४ तास सोशल वर्कर असावेत, अशा सूचना या पूर्वी दिल्या आहेत. मात्र त्याची अंमलबजावणी येत्या ३ महिन्यात केली जाईल. येथे माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ आहेत. या योजनेत त्यांनी बरेच काम केलेले आहे.

श्रीमती आदिती तटकरे....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सातपुते यांनी काही वेळा प्रश्न उपस्थित केले असून ते सोडवण्याचा प्रयत्न केलेला आहे. मधील कालावधीमध्ये त्यांनी सह्याद्री रुग्णलयाबाबत तक्रार केली होती. या रुग्णलयाची चौकशी करुन कारवाई अंतिम टप्प्यात आहे. या व्यतिरिक्त आणखी २-३ रुग्णलयाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या. या संबंधी अंतिम कारवाई केली जात आहे. जास्तीत जास्त खाजगी रुग्णलयात कशा प्रकारे उपचार मिळतील या करिता विभाग म्हणून व तदर्थ समिती म्हणून आम्ही प्रयत्नशील आहोत. ही समिती नियमित झाली तर अधिकार जास्त मिळू शकतील. डॉक्टरांची टीम, तज्ज्ञ समिती जेव्हा एखाद्या विभागात उदा.पुणे विभागात भेट देण्याकरिता गेली किंवा सर्व्हेकरिता गेली व तेथे जर अधिकारी नसतील तर त्यांच्यावर देखील कारवाई करण्याचे काम विभागाकडून होत आहे. आपल्या माध्यमातून माहिती देते. सन्माननीय सदस्यांनी ज्या बाबींचा उल्लेख केला आहे त्यावर विभागाच्या व समितीच्या माध्यमातून काम केले जात आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.राम कदम : अध्यक्ष महोदय, माझे सहकारी मित्र सन्माननीय सदस्य श्री.अशोक पवार यांनी अतिशय गंभीर मुद्दा पोटतिडिकीने उपस्थित केला आहे. माननीय मंत्री महोदया श्रीमती आदिती तटकरे यांनी त्याला अतिशय सकारात्मक उत्तर दिले. हे उत्तर देत असताना खाजगी रुग्णालयांमध्ये जो २ टक्क्यांचा कोटा आहे, तो ४ टक्क्यांपर्यंत करण्याचा त्यांचा जो मानस आहे, त्याबाबत त्या निश्चितपणे अभिनंदनास पात्र आहेत.

अध्यक्ष महोदय, राजकारणाच्या पलीकडे जाऊन चर्चा करीत असताना हा विषय महाराष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने, लोकांच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. माननीय श्री.हसन मुश्रीफ सभागृहात उपस्थित आहेत. माननीय श्री.एकनाथ शिंदे देखील सभागृहात उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गिरीश महाजन देखील सभागृहात उपस्थित आहेत. अनेक आमदारांचे आपण अभिनंदन केले पाहिजे अशा पध्दतीने ते मानवतेसाठी आरोग्य क्षेत्रात काम करीत आहेत.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.हसन मुश्रीफ यांचे रुग्ण कोल्हापूरहून मुंबईमध्ये येतात मी स्वत: पाहतो. मी देखील या क्षेत्रामध्ये गेली १२ वर्षे मोठे काम करण्याचा प्रयत्न करीत आहे. सन्माननीय सदस्य श्री.गिरीश महाजन यांचे देखील जामनेर येथून, तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून रुग्ण येतात. या सर्वांकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन हा अडचणीच्या काळात देव माणसासारखी ही माणसे आमच्यासाठी उभी राहिली, असा असतो.

अध्यक्ष महोदय, माननीय श्रीमती आदिती तटकरे आपला मुद्दा खरा आहे. आपण अतिशय सकारात्मक बोलता. परंतु, या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.अशोक पवार बोलले किंवा सभागृहाचे ज्येष्ठ नेते श्री.भास्कर जाधव यांना देखील माहीत आहे की, वास्तवात जेव्हा आम्ही हॉस्पिटलमध्ये जातो मग ते लिलावती असेल, हिंदुजा असेल तेथे गरिबाला खरेच प्रवेश मिळतो काय, खरेच गरिबाला कागदावर दिल्यानुसार २ टक्क्यांतून प्रवेश मिळतो का, तर त्यांना प्रवेश मिळत नाही.

श्री.राम कदम ...

अध्यक्ष महोदय, हिरानंदानी हॉस्पिटल माझ्या मतदारसंघाच्या शेजारी आहे. त्या ठिकाणी सैन्यातील सेवानिवृत्त अधिकारी डॉ.चॅटर्जी हे सी.ई.ओ. आहेत. ते अतिशय चांगले, भले आहेत. आम्ही त्यांना भेटलो तर त्या हॉस्पिटलमध्ये आम्हाला रुग्णांकरिता प्रवेश मिळतो. त्यांचे कौतुक आहे, अभिनंदन आहे. हिंदू महासभा असेल तेथे श्री.वैभव देवगिरीकर चांगले काम करीत आहेत. त्या ठिकाणी गरिबांना प्रवेश मिळतो. परंतु, हिंदुजा, लिलावतीमध्ये मिळतो काय?

अध्यक्ष महोदय, मला आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंतीपूर्वक सांगावयाचे आहे की, सर्व आमदारांच्या तक्रारी आहेत. आपण हे काम पूण्याकरिता करीत आहोत. आपण जेव्हा त्यांना एका वेगळ्या अर्थाने मी दमबाजी हा शब्द प्रयोग वापरतो. जोपर्यंत त्याला आपण धाक दाखवत नाही, तोपर्यंत तो हॉस्पिटलचा सी.ई.ओ. गरिबांना दाखल करुन घेण्यास तयार होत नाही.

अध्यक्ष महोदय, आपला नियम काय सांगतो तर, त्याला आधी दाखल केले पाहिजे. परंतु, हॉस्पिटलचा सोशलवर्कर सांगतो की, हे पेपर आणा, ते पेपर आणा. अहो रुग्णाला हार्टअटॅक आला आहे, १५ मिनिटांत ट्रिटमेंट सुरु केली नाही तर ती मरेल. तो मुलगा माझी आई मरेल म्हणून रडत आहे आणि त्यावेळेस त्या हॉस्पिटलवाले सांगतात की, २ लाख रुपये भरा. परंतु, त्याचे वडील कोठे तरी शिपाई म्हणून काम करीत असतात. त्यांनी ते २ लाख कसे आणायचे?

अध्यक्ष महोदय, हा प्रश्न राजकारणाच्या पलीकडे, विचारांच्या पलीकडे, गटांच्या पलीकडचा आहे. मंत्री महोदयांनी याबाबतीत त्या प्रमुख हॉस्पिटलचे काही लोक व ज्या ज्या आमदारांना या विषयात रस आहे, त्या आमदारांना बोलावून एक बैठक घेऊन जर कायदा करण्याची आवश्यकता असेल तर कायदा देखील केला पाहिजे, तो करतील काय? निदान एक बैठक तरी ताबडतोब बोलवावी, ते त्यांच्या हातात आहे, कक्षेत आहे.

श्री.राम कदम ...

अध्यक्ष महोदय, आपण येथे सरकार म्हणून बसलो आहे, कायदा करायला बसलो आहे. मी मेडिकल क्षेत्रात काम करतो. सर्वजण करीत असतील. मी १२ वर्षे लोकसेवेचे एक व्रत घेतले म्हणून माझ्याकडे अनेक लोकांचा स्टाफ आहे जो फक्त हेच काम करतो की, गोरगरीब कोठूनही आला तर त्याला मतदारसंघ, जात-धर्म विचारला जात नाही. त्याला हॉस्पिटलमध्ये नेऊन त्याची ट्रिटमेंट केली जाते. खाजगी हॉस्पिटलची काय स्थिती आहे, २५ टक्के कट होता, आता ४० टक्के कट आहे. डॉक्टर तुम्हाला ज्या चाचण्या करायला सांगतात, लॅबमध्ये पाठवतात त्यात ४० टक्के कट डॉक्टरला द्यावा लागतो कारण त्याने रिर्पोट काढण्याबाबत लिहिले आहे, हे खरे आहे काय?

अध्यक्ष महोदय, उघडपणे बोलता येत नाही परंतु, हे खरे आहे. ज्या हॉस्पिटल, नर्सिंगहोममध्ये दाखल केले जाते तेथे देखील ३० टक्क्यांपासून ४० टक्क्यांपर्यंत कट आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात कट असेल तर.. कट म्हणजे किकबॅक द्यावा लागतो. कारण मी या रुग्णाला तुमच्या हॉस्पिटलमध्ये पाठविले आहे. त्याचे जे बिल होईल त्यातील ३० टक्के, ४० टक्के पैसे त्या डॉक्टरला कमिशन म्हणून द्यावे लागतात. सर्व डॉक्टर करतात असे म्हणणे माझे नाही. डॉक्टरांना देवदूताप्रमाणे मानले जाते....

उपाध्यक्ष : सन्माननीय सदस्य आपण प्रश्न विचारावेत. या लक्षवेधी सूचनेवर अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. हा महत्वाचा विषय आहे. परंतु, आपण आपले म्हणणे थोडक्यात मांडल्यास प्रत्येक सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी मिळू शकेल.

श्री.राम कदम : अध्यक्ष महोदय, मला केवळ २ मिनिटे बोलू द्या. हा केवळ माझ्याच जिव्हाळ्याच नाही तर सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. जे डॉक्टर ३० टक्के ४० टक्के घेत नसतील त्यांना आम्ही देवदूताप्रमाणे मानतो. परंतु, जे डॉक्टर घेत आहेत, त्या बाबतीत आपण सरकार म्हणून काही करणार आहात काय, हा माझा दुसरा प्रश्न आहे.

श्री.राम कदम ...

अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात आलेले आहेत. कुठल्याही पक्षाचे आमदार त्यांच्याकडे गेले तर ते सकारात्मकतेने काम करतात. त्याबाबतीत सर्वच आमदार त्यांचे तोंडावर व पाठीमागे देखील कौतुक करतात. मला विनंतीपूर्वक सांगावयाचे आहे की, पूर्वी माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या कालखंडात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष ज्या पध्दतीने काम करीत होता.. रात्री, बेरात्री कोणत्याही पक्षातील आमदार गेला, आमदार नसेल तर कोणीही कार्यकर्ता आला तर त्याला मदत मिळत होती. खरेच तुम्ही एकदा तपासून पहा.

उपाध्यक्ष : सन्माननीय सदस्य आपण प्रश्न विचारावा.

श्री.राम कदम : अध्यक्ष महोदय, माझा अखेरचा प्रश्न आहे. मी यामध्ये कोणतेही राजकारण आणत नाही. मानवतेच्या दृष्टिकोनातून पूर्वी जसा मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष होता त्याहीपेक्षा आणखी चांगला आपल्या माध्यमातून, माननीय श्री.अजित पवार यांच्या माध्यमातून तो सुरु व्हावा, अशी या महाराष्ट्रातील जनतेची अपेक्षा आहे, ती पूर्ण होईल काय?

श्रीमती आदिती तटकरे : अध्यक्ष महोदय, मी सुरुवातीलाच आपल्या माध्यमातून माहिती दिली की, या योजनेंतर्गत जास्तीत जास्त मोफत अथवा सवलतीच्या दरात उपचार मिळावेत, या संदर्भामध्ये आपण ज्या २-३ महत्वपूर्ण कारवाई करीत आहोत त्या म्हणजे २ टक्क्यांवरुन ४ टक्के अशी आपण वाढत करीत आहोत किंवा दंड आकारणी वाढवत आहोत. या व्यतिरिक्त सन्माननीय सदस्यांना माहीत असेल की, जेव्हा एखादा रुग्ण हॉस्पिटलमध्ये नेतो, त्यावेळेस त्याच्या सोबत तहसीलदारांचा दाखला किंवा पिवळे किंवा केशरी रेशनकार्ड असणे बंधनकारक असते.

अध्यक्ष महोदय, मी आपल्याला माहिती देऊ इच्छिते की, मधल्या दोन वर्षांच्या कालावधीत आम्ही या तदर्थ समितीच्या किमान ४ किंवा ५ बैठका घेतल्या असतील. आतापर्यंत एवढ्या बैठका झाल्या नसतील. दर ३ महिन्यांच्या कालावधीत

श्रीमती आदिती तटकरे ....

आम्ही या तदर्थ समितीच्या बैठका घेतो. जेणेकरुन जास्तीत जास्त सदस्य आपापल्या विभागातील प्रश्न मांडू शकतील. आम्ही मधल्या कालावधीत मुंबईतील सर्व हॉस्पिटलचीसुध्दा बैठक घेतली होती. कारण आपण ज्या रुग्णालयांचा उल्लेख केला, त्यापैकी १-२ रुग्णालयांच्या तक्रारी आमच्या सर्वांकडेच प्राप्त होत्या. त्या बैठकीस माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ, माननीय राज्यमंत्री श्री.दत्तात्रय भरणे तसेच विधानसभेचे काही सन्माननीय सदस्य देखील उपस्थित होते. या व्यतिरिक्त आपण सूचित केल्याप्रमाणे या संदर्भातील बैठक संबंधित आमदारांच्या उपस्थितीत या रुग्णालयाच्या एचओडी समवेत लावण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, एकदा तहसीलदारांचा दाखला किंवा रेशनकार्ड त्या रुग्णालयाला दिल्यानंतर त्यांनी त्यांच्या उत्पन्नाची फेरचौकशी करु नये, या संदर्भातील सूचनासुध्दा आम्ही त्या रुग्णालयांना दिलेल्या आहेत. त्यामुळे आपण सांगितल्याप्रमाणे ती बैठक घेऊ. तसेच आपण सूचित केल्याप्रमाणे अत्याधुनीक पध्दतीचा मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, अधिक ॲडव्हान्स पध्दतीचा करता येईल का, यासाठी देखील आम्ही विभागाच्या माध्यमातून लवकरात लवकर प्रस्तावित करु.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, या विषयावर अतिशय सकारात्मक चर्चा होत आहे. त्यामुळे मी त्या चर्चेत जाऊ इच्छित नाही. सन्मानीय सदस्य श्री.राम कदम यांनी कट प्रॅक्टिसबाबत सांगितले. तुमच्या पॅथॉलॉजीमध्ये जर मी रुग्णाला रेफर केला की, यांच्याकडे जाऊन तुमची रक्त तपासणी, युरिन तपासणी वगैरे करावी. तर त्याचे जे बिल होते त्यातील ३० ते ४० टक्के डॉक्टरांना मिळतात ही वस्तुस्थिती आहे. परंतु, तसे सर्व ठिकाणी होत नाही.

अध्यक्ष महोदय, आपल्या सरकारकडून आपले जे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे, त्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एक माणूस कायमचा असतो. तो सकाळी ९.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत येणाऱ्या रुग्णांच्या रक्ताचे, युरिनचे सॅम्पल घेतो. त्यानंतर तो शासनाच्या पॅथॉलॉजीमध्ये जातो. ती प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी आहे व त्याचा रिपोर्ट दुसऱ्या दिवशी रुग्णाला देतो. हे माझ्यासारख्या माणसांना देखील

श्री.भास्कर जाधव ...

गेल्या २ महिन्यांपर्यंत माहिती नव्हते. याकरिता सर्वसामान्य माणसाचा जर आर्थिक भूर्दंड कमी करावयाचा असेल तर या संदर्भात अधिक जनजागृती होण्याची आवश्यकता आहे. बऱ्याच जणांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह दिसत आहे. हे बऱ्याच जणांना खरेच माहिती नाही की, सरकारी खर्चाने या सर्व चाचण्या होतात. याबाबत अधिक जनजागृती होण्याच्यादृष्टीने मंत्री महोदय सरकार म्हणून प्रयत्न करतील काय?

श्रीमती आदिती तटकरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सर्वांना जी नवीन माहिती दिलेली आहे, त्या संदर्भात त्यांनी सूचित केल्याप्रमाणे आरोग्य विभागासोबत या संदर्भात योग्य पध्दतीने को-ऑर्डिनेशन करुन ही योजना किंवा हा लाभ जास्तीत जास्त रुग्णांपर्यंत किंवा दुर्गम भागातील नागरिकांपर्यत कशा पध्दतीने पोहोचविता येईल, याकरिता जनजागृती देखील करण्यात येईल.

उपाध्यक्ष : सन्मानीय सदस्य श्री.राम सातपुते आपण थोडक्यात प्रश्न विचारावेत.

नंतर श्री.शिंदे....

श्री.राम सातपुते : अध्यक्ष महोदय, सूचना लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यासाठी मी मागील अधिवेशनापासून प्रयत्न करीत आहे.

अध्यक्ष महोदय, पुणे येथील सह्याद्री हॉस्पिटलने कसायाला लाजवेल असा धंदा सुरु केला आहे. त्यांची मी ६ महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री महोदय व मंत्री महोदयांना तक्रार केली आहे. माझ्या मतदारसंघातील एक रुग्ण सह्याद्री हॉस्पिटलच्या वाईट धोरणामुळे दगावला आहे. या हॉस्पिटलमधील समाजसेवकाचे कार्यालय तळ मजल्यावर असल्याने ते कोणालाही माहिती होत नाही. सदरहू हॉस्पिटलच्या संदर्भात मी मंत्री महोदयांना तक्रार केली असून त्यासंदर्भातील कार्यवाही अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात आले आहे. सदरहू प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे ? मंत्री महोदय हे सचिव, आरोग्य व धर्मादाय आयुक्त यांची याप्रकरणी बैठक घेतली काय ? धर्मादाय आयुक्त यांना मी सह्याद्री हॉस्पिटलची सुनावणी घेण्यात यावी, याकरिता पत्र दिले होते. धर्मादाय आयुक्त कार्यालयामध्ये सदरहू हॉस्पिटलचे एजंट आहेत. रुबी हॉल, संचेती, दिनानाथ मंगेशकर या रुग्णालयांमध्ये गोरगरीबांवर केव्हा उपचार करण्यात येतात ? आम्हाला साडे तीन लाख लोकांनी निवडून दिले आहे. आम्ही जनतेचे प्रतिनिधी आहोत. माझ्या मतदारसंघातील रुग्णावर सदरहू हॉस्पिटलने उपचार न केल्यामुळे त्याचा मृत्यू झाला आहे. मतदारसंघातील लोकांना आम्ही न्याय देऊ शकलो नाही तर आमचा या सभागृहामध्ये बसण्याचा काही उपयोग नाही. मी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सह्याद्री हॉस्पिटलवर कोणती कारवाई केली, यासंदर्भात मंत्री महोदय गोलगोल उत्तर देत आहेत. उक्त तक्रारीच्या संदर्भात कोणती कारवाई केली व करण्यात येणार, याची मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

श्रीमती अदिती तटकरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांना सांगू इच्छिते की, मी सुरुवातीच्या उल्लेखामध्ये आपल्या विषयाच्या संदर्भात उल्लेख केला आहे. तदर्थ समितीच्या माध्यमातून विविध कामे करीत असताना किंवा उपाययोजना किंवा योजना सर्वांपर्यंत पोहचविण्यात येतात. शासनाला मागील दोन अडीच वर्षांच्या कोविड कालावधीत शासकीय रुग्णालयांप्रमाणे खाजगी

श्रीमती अदिती तटकरे...

रुग्णालयांनी कोविड उपचाराची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. अनेक खाजगी रुग्णालये १०० टक्के कोविड उपचाराची सुविधा देत होते. सन्माननीय सदस्य यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात एक स्वतंत्र अधिकारी नियुक्त करुन आयुक्त, धर्मादाय, पुणे यांच्या माध्यमातून चौकशी करुन कारवाई सुरु केली आहे. सदरहू कारवाई एक महिन्यात पूर्ण करण्यात येईल व त्याबाबत सन्माननीय सदस्य यांना अवगत केले जाईल.

असुधारित प्रत

उपाध्यक्ष : लक्षवेधी सूचना क्रमांक ३ व ४ थोडा वेळ राखून ठेवण्यात येत आहे.

लक्षवेधी सूचनेबाबत..

श्री.विकास ठाकरे : अध्यक्ष महोदय, मला एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा मांडावयाचा आहे. एका विभागाचा घोटाळा काढल्यानंतर तेथील श्री.अजय आंबेकर नावाचा अधिकारी स्वेच्छानिवृत्ती घेऊन फरार झाला आहे. या विषयाच्या संदर्भात मागील १५ दिवसांपासून मी लक्षवेधी सूचना लावण्यासाठी प्रयत्न करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मी आपली काल ही भेट घेतली आहे. शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान अधिकारी करीत आहेत. त्यासंदर्भातील लक्षवेधी सूचना आपण स्वीकृत करीत नाहीत. मुख्यमंत्री महोदयांकडे सदरहू खाते असल्याने मी त्यांच्या विरोधात पत्रकार परिषद घ्यावी काय ? नाशिक जिल्ह्यातील आमदार महोदयांच्या लक्षवेधी सूचनांना प्राधान्य देण्यात येत आहे. शासनाचे नुकसान होत असलेल्या विषयांकडे आपण लक्ष दिले पाहिजे. या विषयाच्या संदर्भात आपण आपल्या कक्षामध्ये बैठक घ्यावी व संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

उपाध्यक्ष : माझ्या दालनामध्ये बैठक घेण्यात येईल.

पृ. शी. : महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे सर्व कामकाज प्रशासकिय मंडळाचे अध्यक्ष यांचेकडून एकाधिकारशाही पध्दतीने सुरू असणे

मु. शी. : महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे सर्व कामकाज प्रशासकिय मंडळाचे अध्यक्ष यांचेकडून एकाधिकारशाही पध्दतीने सुरू असणे या संबंधी श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्य सह.बँक ही महाराष्ट्रातील सह. कर्ज पुरवठा यंत्रणेतील शिखर (ॲपेक्स) बँक असणे, या शिखर संस्थेच्या माध्यमातून राज्यातील सह.साखर कारखाने, सुतगिरण्या व जिल्हा मध्यवर्ती बँकांना अल्प व मध्यम मुदतीच्या कर्जांचे वाटप करण्यात येणे, बँकेच्या कामकाजामध्ये झालेल्या अनियमिततेमुळे रिझर्व्ह बँकेच्या सुचनेनुसार शासनाच्या सहकार विभागाने दिनांक ७ मे, २०११ रोजी बँकेचे तत्कालिन संचालक मंडळ बरखास्त करून बँकेवर प्रशासकीय मंडळाची नियुक्ती करणे, यावेळी वेळोवेळी सुधारणा करून प्रशासकांची निवड करणे, दिनांक १९ एप्रिल, २०१८ रोजी तत्कालीन प्रशासक मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांनी राजीनामा दिलेनंतर सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी बँकेच्या प्रशासकीय मंडळाच्या अध्यक्षपदी विद्याधर अनास्कर तर सदस्य पदी श्री.भेंडे व श्री.महागावकर यांची नियुक्ती करणे, परंतू प्रशासकीय मंडळातील सदस्यांनी राजीनामा दिल्याने महाराष्ट्र

श्री. प्रकाश आबिटकर...

राज्य सह. बँकेचे सर्व कामकाज प्रशासकिय मंडळाचे अध्यक्ष यांचेकडून एकाधिकारशाही पध्दतीने सुरू असणे, प्रत्यक्षात बँकेच्या माध्यमातून अडचणीत आलेल्या सह.साखर कारखाने सुतगिरण्या व जिल्हा माध्यमिक बँकांना कर्जपुरवठा करण्याबाबत निर्णय होणे अपेक्षीत असताना, प्रशासक यांचेकडून कोणत्याही प्रकारचे कामकाज न होणे, सध्या बँकेची आर्थिक परिस्थिती सुधारत असुन या सर्व बाबी विचारात घेता राज्यशासनाने सदरील संस्थेची निवडणूक प्रक्रिया जाहीर होईपर्यंत बँकेवर राज्य शासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची तात्पुरती नियुक्ती करुन महाराष्ट्र राज्य सह.बँकेची निवडणुक कार्यक्रम जाहीर करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

श्री.बाळासाहेब पाटील (सहकार मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेवर प्रशासक नियुक्त करण्यात आला असून त्यांचे काम थांबवून आता लोकनियुक्त संचालक मंडळ नियुक्त करण्याच्या उद्देशने उक्त लक्षवेधी सूचना मी मांडली आहे.

अध्यक्ष महोदय, सदरहू बँकेत सन २०११ मध्ये थोडीशी अनियमितता झाली. त्यामुळे त्यावर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. आता त्यास १० वर्षांपेक्षा अधिक कालावधी झाला आहे. या कालावधीत वेगवेगळ्या पद्धतीचे नियम व मॉनेटरींगच्या माध्यमातून उत्तम कामकाज केल्याने उक्त बँक ३५० कोटी रुपये नफ्यात आली आहे. परंतु सदरहू कामकाज एका व्यक्तीची खाजगी मालमत्ता असल्यासारखे सुरु आहे. याकडे सर्व सभागृहाचे दुर्लक्ष होत आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनातून असे दिसून येत आहे की, मंत्री महोदयांनी ज्या मुद्याकडे लक्ष द्यावयास पाहिजे होते त्याकडे लक्ष दिले नाही.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेवर किती वर्षे प्रशासक ठेवण्यात येणार आहे ? त्यांना अधिकार व मानधनही देण्यात येत आहे. अलिकडील काळामध्ये त्यांची कोणत्या तरी मंडळावर नियुक्ती केल्याचे समजले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेवर राज्य शासनाचे नियंत्रण आहे की बीओटी तत्वावरील खाजगी इन्स्टीट्यूटचे असल्यासारखे काम करणाऱ्या व्यक्तीचे नियंत्रण आहे ? आयसीआयसीआय, आयडीबीआय या बँकाप्रमाणे काम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक स्थापन करण्यात आलेली नाही. त्यामध्ये अनियमितता झाली ठिक आहे. अनेक वेळा आपण सरकार म्हणून कर्जमाफी देतो, अनेक काही बाबी करीत असतो. त्या समाजाच्या हितासाठी करतो. आता प्रशासकाचे राज्य ठेवावयाचे असेल तर उद्या सरकारही प्रशासकाकडे द्यावे लागेल. सन्माननीय मंत्री हे उक्त प्रशासकाला तत्काळ थांबवून निवडणूक घेण्याचा निर्णय जाहीर करतील काय ? उक्त प्रशासकाला कोणत्या स्वरुपाच्या सुविधा देण्यात येत आहेत, कशासाठी देण्यात येत आहेत, तो काय आपला जावई आहे काय, कशासाठी त्यांना या बँकेत ठेवले पाहिजे ?

श्री.प्रकाश आबिटकर...

अध्यक्ष महोदय, सदरहू बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरु करणार नाही तोपर्यंत बँकेवर राज्य शासनाचे कोणते नियंत्रण आहे ? आम्हाला प्रशासकाकडे जाण्याची आवश्यकता नाही, आम्ही मंत्री महोदय, सचिव, उप सचिव यांचेकडे आमच्या कामासाठी जाऊ. त्यांच्या माध्यमातून नियंत्रण राहिले तर ठीक आहे. कोणत्या तरी एखाद्या घटनेचा फायदा घेऊन कोणी खाजगी बँके प्रमाणे महाराष्ट्र राज्य सहकारी बँक चालवित असेल तर त्याला आपण थांबविले पाहिजे, ही सभागृहाची जबाबदारी आहे. मंत्री महोदय आजच्या आज प्रशासकाला थांबवतील काय, त्याला किती मानधन देण्यात येते, कोणत्या सेवा व सुविधा देण्यात येत आहे, त्यांना कोणते अधिकार दिले आहेत ? माझ्याकडे सन २०१९ चा शासन निर्णय आहे. त्यामध्ये प्रशासकाने किती कालावधी काम करावे, याबाबत स्पष्ट नमूद आहे. अनेक वेळा प्रशासकाला कायमस्वरुपी रहावे असे वाटते, त्यावर निर्बंध आणण्यासंदर्भातही शासन निर्णयात स्पष्ट केले आहे. या बँकेची निवडणूक घेण्यासाठी मतदार यादी तयार करणे व निवडणूक लावण्यासाठी काहीच कार्यवाही करण्यात आली नाही. प्रशासक म्हणतात मी बँक चांगली चालविली आहे. त्यांनी दुसऱ्या बँका चालवाव्या ही बँक चालविण्यासाठी आम्ही सर्व आहोत. मंत्री महोदयांनी माझ्या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे द्यावीत. गोलगोल उत्तर देऊ नये. एका व्यक्तीला हे इन्स्टीट्यू चालविण्यासाठी देणार असाल तर ते कदापि चालणार नाही. राज्यातील सहकार विभागाची संरचना आहे त्या पद्धतीने याप्रकरणी निर्णय घ्यावा. आता प्रशासकाकडे व्यक्तीगत पातळीवर त्यांच्याकडे अप्रोच होणाऱ्या व्यक्तीला ते सहकार्य करीत असतील तरी आम्ही हे सर्व कशासाठी करावयाचे ? कोणत्याही परिस्थितीत उक्त प्रशासकाला थांबविण्यासाठी निर्णय घेण्यात येईल काय, बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरु करण्यासाठी काय करण्यात येणार आहे, सहकार विभाग त्याच्यावर जावई असल्यासारखा कुर्बान का झाला आहे ?

श्री.बाळासाहेब ऊर्फ शामराव पाटील : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक राज्यातील सर्व जिल्हा बँकांची शिखर बँक आहे. या बँकेच्या माध्यमातून जिल्हा बँक, सहकारी सूत गिरणी व सहकारी साखर कारखाना यांना पत पुरवठा करण्यात येतो. या बँकेबाबत नाबार्ड मार्फत घेण्यात आलेल्या वैधानिक तपासणी अहवालानुसार प्रशासकाची नियुक्ती दिनांक ७ मे, २०११ रोजी करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य यांनी या बँकेच्या निवडणुकीचा मुद्दा उपस्थित केला आहे. संचालक मंडळाच्या निवडणुकीबाबत श्री.जगोबा तुलशीराम खेडकर यांनी रिट याचिका क्र.२७४७/२०१५ नागपूर खंडपीठात दाखल केली आहे. संचालक मंडळ सदस्यांची संख्या २१ पर्यंत सीमीत करण्याबाबत त्यांचा आक्षेप होता. माननीय उच्च न्यायालयाने निवडणूक न घेण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानंतर अशाच आशयाच्या १२ याचिका माननीय मुंबई उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहेत.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब पाटील.....

त्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची निवडणूक होऊ शकली नाही. बँकेचा एकंदर आढावा घेतला किंवा आलेख पाहिला तर सातत्याने बँकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. दिनांक ३१.०३.२०१९, ३१.०३.२०२१ व ३१.०३.२०२२ मध्ये ठेवीसह गुंतवणुकीमध्ये वाढ झालेली आहे. सन २०१९ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला २५१ कोटी रुपयांचा नफा झालेला आहे. यावर्षी त्यात वाढ होऊन ३६७ कोटी रुपये एवढा नफा झालेला आहे. या बँकेचे लेखापरीक्षण वेळोवेळी करण्यात आले असून त्याचे अहवाल देखील व्यवस्थित आहेत. या बँकेच्या माध्यमातून सर्व संस्थांना विशेषत: सहकारी कारखाने यांना न्याय देण्याचे काम सुरू आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रशासकाला किती मानधन द्यावे, याबाबतचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. याबाबत काही निकष आहेत. मानधनाबाबतची सर्व माहिती पटलावर ठेवण्यात येईल. एका व्यक्तीच्या हातामध्ये सत्ता दिली वगैरे असे कोणतेही काम होत नाही. एकंदरीतच या बँकेच्या माध्यमातून सर्वांना न्याय देण्याचे काम सुरू आहे.

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय, हे गोल-गोल उत्तर देत आहेत. परंतु असे उत्तर आम्हाला अपेक्षित नाही. ही लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये चर्चेला आणण्यासाठी सातत्याने मी गेली १५ दिवस धावपळ करीत आहे. या बँकेतील गोंधळ काराभारासंदर्भात जर एखाद्या व्यक्तीने सन २०१५ ला माननीय न्यायालयामध्ये याचिका जर दाखल केली असली तर आता सन २०२२ चालू आहे. माननीय न्यायालयाच्या एका आदेशाने एका प्रशासकाला संपूर्ण महाराष्ट्राचा कारभार करण्याचे अधिकार देणार आहात काय ? दर पाच वर्षानंतर सरकार देखील बदलते. या प्रकरणामध्ये १२ वर्षापासून एकाच व्यक्तीला कारभार पाहण्याचे अधिकार देत असाल तर ही खाजगी बँक असण्याचा प्रकार झालेला आहे. सहकार मंत्री म्हणून निवडणूक घेण्याची आपली जबाबदारी आहे. असे असताना आपण काय निर्णय घेतला आहे ? सन २०१९ नंतरच्या पत्रानंतर आपण काय कार्यवाही केली आहे, याचे उत्तर देण्यात यावे. आपण काहीही न करता एका व्यक्तीला खाजगी संस्था

श्री.प्रकाश आबिटकर.....

असल्यासारखे बँक वापरायला देऊन त्यास वेगळे आधार देत असाल तर ते अतिशय चुकीचे आहे, घातक आहे. मला तर आश्चर्य वाटते की, माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस व माननीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे या तिन्हीही मुख्यमंत्री महोदयांनी या विषयाकडे गांभीर्याने पाहिलेले नाही. एखाद्या व्यक्तीच्या हातात असा कारभार देत असाल तर उद्या सरकार देखील याच पद्धतीने चालविण्यासाठी द्यावे लागेल. माझी आपणास विनंती आहे की, सदर प्रकरणी कायद्यानुसार ठोस भूमिका आणि निर्णय घेणे आवश्यक आहे आणि तसा निर्णय आपण घ्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, प्रशासकाचा कालावधी किती वर्षाचा असतो ? प्रशासक केवळ सहा महिने किंवा एक वर्षापर्यत असू शकतो. सन २०१९ च्या शासन निर्णयाबाबत आपण काय सांगितले आहे. सदर प्रकरणी प्रशासकाने काय केले आहे, हे त्यांना विचारण्यात यावे. याबाबत तुम्ही विचारणार किंवा बोलणार नाहीत, स्वत:ची मालमत्ता असल्यासारखी त्यांना वापरायला द्यायला लागला आहात, असे असताना आम्ही फक्त पाहत बसायचे काय? आपल्याकडे लोकशाही आहे. या राज्याचा कारभार ज्या पद्धतीने चालायला पाहिजे त्या पद्धतीने चालवायचे सोडून खाजगी बँकिंगसारखे कारभार होत आहे. असा कारभार होता कामा नये. महाराष्ट्र राज्य सहाकरी बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरु करण्यासाठी आपण स्पष्टपणे आदेशित केले तर खऱ्या अर्थाने या लक्षेवेधी सूचनेचा उपयोग होईल. माननीय इंदिरा गांधीच्या काळामध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले होते. माझी विनंती आहे की, तुम्ही सुद्धा या खाजगीकरण झालेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्याच्या दृष्टीने निर्णय घेऊन तसे उत्तर देण्यात यावे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य उक्त प्रकरणी बरेच तापलेले दिसत आहेत. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न मी ऐकून घेतलेला आहे. आपण आपण सरकारचे उत्तर शांत ऐकावे.

श्री.अजित पवार.....

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री होते तेव्हा म्हणजे दिनांक ७ मे २०११ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेवर भारतीय रिझर्व्ह बँकेने कलम ११ अंतर्गत कारवाई करत बँकेचे संचालक मंडळ बरखास्त केले. तेव्हा सुरूवातीच्या काळामध्ये श्री. सुधीर कुमार गोयल आणि डॉ. सुधीर श्रीवास्तव या दोन भारतीय प्रशासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली. काही काळ कामकाज केल्यानंतर डॉ. श्रीवास्तव यांनी सांगितले की एकाच वेळी मला वित्त विभाग आणि बँकेचा कारभार सांभाळता येणार नाही, सध्या बँकेची परिस्थिती सुधारलेली आहे, त्यामुळे मला बँकेच्या जबाबदारीतून मुक्त करा, अशी विनंती केली होती. त्यांच्या विनंतीनुसार तत्कालीन सरकारने त्यांना बँकेच्या जबाबदारीतून मुक्त केले. वित्त विभागाचे सेवानिवृत्त अधिकारी श्री.व्ही.के.अग्रवाल व महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे अपर मुख्य सचिव श्री. सहानी यांची महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेसाठी प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आली. त्या बँकेचे त्यांनी बराच काळ काम पाहिले आहे. नंतरच्या काळामध्ये माननीय श्री. देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर त्यांनी नाबार्डचे सेवानिवृत्त मुख्य महाप्रबंधक श्री. सुखदेवे यांची सदर बँकेवर प्रशासक म्हणून नेमणूक केली. श्री.अशोक मगदूम, सेवानिवृत्त जनरल मॅनेजर, बँक ऑफ महाराष्ट्र, श्री. कुमार तांबे, डेप्युटी जनरल मॅनेजर, बँक ऑफ इंडिया अशी बँकिंग क्षेत्रामध्ये अतिशय नावाजलेल्या परंतु सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तींना या बँकेवर प्रशासक म्हणून नेमण्यात आले. सन २०१७ पर्यंत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक म्हणून या सर्व अधिकारी वर्गाने अतिशय चांगले काम केलेले आहे. त्यानंतर माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा सन २०१७ मध्ये श्री.विद्याधर अनासकर, श्री. अविनाश महागावकर आणि श्री. संजय भेंडे या तिघांची प्रशासक म्हणून नेमणूक केली होती.

अध्यक्ष महोदय, कुठल्याही बँकेमध्ये यदाकदाचित निवडून आलेल्या संचालक मंडळाने काही चुकीच्या गोष्टी केल्या आणि त्यामुळे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार संबंधित बँकेवर प्रशासक नेमण्याचा सर्वस्वी अधिकार हा त्या

श्री.अजित पवार.....

राज्याचे माननीय मुख्यमंत्री आणि त्या राज्याचे सहकार मंत्री यांचा असतो. याच पद्धतीने वेळोवेळी माननीय मुख्यमंत्री आणि सहकार मंत्री यांनी निर्णय घेतलेले आहेत. माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या काळात श्री. विद्याधर अनासकर हे प्रशासक म्हणून काम करीत होते. सन २०१९ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार सत्तेमध्ये आले. जरी सरकार बदलले होते तरी श्री. विद्याधर अनासकर यांनाच प्रशासक म्हणून नियमित करण्यात आले. हा निर्णय राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि सहकार मंत्री माननीय श्री. बाळासाहेब पाटील यांनी घेतलेला आहे. सदर निर्णय हा नियमाप्रमाणे घेण्यात आलेला आहे. माझे एवढेच म्हणणे आहे की, निवडणूक घ्यायची असेल तर राज्य सरकारची निश्चितपणे तयारी आहे. परंतु श्री.जगोबा तुळशीराम खेडकर यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक संचालक मंडळ निवडणुकीबाबत उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे एक रिट याचिका दाखल केलेली आहे. पूर्वी या बँकेचे संचालक मंडळ ६५ जणांचे होते. त्यानंतर सहकार विभागाचे काही नियम बदलले, कायदे करण्यात आले. यामध्ये संचालक संख्या २५ पर्यंत मर्यादित करण्याबद्दलचे आदेश काढले गेले. उक्त आदेशानुसार किंवा संचालकांची संख्या कमी केल्यामुळे सर्व जिल्ह्यांना प्रतिनिधित्व मिळत नाही किंवा असे काही मुद्दे पुढे आले. त्यामुळे श्री. खेडकर यांनी बॅकेच्या पोटनियम दुरुस्तीला आव्हान दिलेले आहे. सन २०१५ ला माननीय न्यायालयाने आपल्या आदेशाद्वारे संचालक मंडळ निवडणूक घोषित न करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. सदर आदेश अद्यापपर्यंत कायम आहेत. सदर याचिका माननीय उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडे वर्ग करण्यात आली. सदर याचिकेसोबतच श्री. खेडकर यांच्या व्यतिरिक्त इतर १२ याचिकांची संयुक्तरीत्या सुनावणी घेण्यात येत आहे. सदर स्थगिती व ही बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रिया घेता येत नाही. तरी देखील सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश आबिटकर हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. याबाबत मला त्यांना एवढेच सांगावयाचे आहे की, आम्ही देखील सहकारातून पुढे आलेले कार्यकर्ते आहोत. सन्माननीय

सदस्य श्री. प्रकाश आबिटकर यांना कोणते कर्ज घ्यावयाचे असेल परंतु तेथील प्रशासक काही अडचणी

श्री.अजित पवार.....

निर्माण करीत असतील तर त्यांनी रीतसर सर्व कागदप्रत्रांची पूर्तता करुन माननीय सहकार मंत्री श्री.बाळासाहेब पाटील यांना सांगावे, किंवा मला सांगावे. निश्चितपणे त्यांच्या प्रकरणामध्ये लक्ष घातले जाईल.

अध्यक्ष महोदय, आज रोजीला एकंदरीत बँकेचे कामकाज पाहिले तर दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत अंदाजे ढोबळ नफा हा ७०० कोटी रुपयांपर्यत जाईल. निव्वळ नफा हा ४०० कोटी रुपयांपर्यंत जाईल. सहकारी साखर कारखान्यांना थकहमी वगैरे द्यायची नाही, असे सरकारने धोरण निश्चित केलेले आहे. सुतगिरण्या, अर्बन को-ऑप. बँक, जिल्हा बँक, साखर कारखाने यापैकी कोणत्याही संस्थांना त्यांनी कागदपत्रांची पूर्तता असेल तरच कर्ज पुरवठा दिला गेला पाहिजे. सदर प्रशासकांना मी सुद्धा अनेक वर्षापासून ओळखतो, सदर प्रशासक हे आमची नातेवाईक किंवा नात्यागोत्यातील व्यक्ती नाहीत. त्यांना कोणत्या पक्षाचाही शिक्का देखील नाही. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी देखील त्यांच्या काळामध्ये संबंधितास काम करण्याची संधी दिली होती. आमच्या महाविकास आघाडी सरकारने देखील त्यांनाच काम करण्याची संधी दिलेली आहे. पुनश्च मी सांगतो की, माननीय आमदार महोदयांच कुठले काही प्रकरण असेल आणि ते रीतसर असेल, कुठे काही अडचण येत असेल तर निश्चितपणे त्यांना सहकार्य केले जाईल.

अध्यक्ष महोदय, माझ्या माहितीप्रमाणे माननीय सहकार मंत्री दोन महिन्यातून एकदा तरी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचा आढावा घेत असतात, अशी मला माहिती आहे. तो त्यांचा अधिकार आहे. आढावा बैठकीसाठी सहकार आयुक्त, संबंधित बँकेचे प्रशासक, व्यवस्थापकीय संचालक, सहकार विभागाचे प्रधान सचिव श्री.अनुप कुमार अशा सर्व अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन आवश्यक निर्णय घेत असतात.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

श्री. अजित पवार .....

महाराष्ट्रातील सहकार चळवळ टिकविण्याकरिता राज्य सहकारी बँकेचे मोठे योगदान आहे. मध्यंतरी त्या बँकेला बदनाम करण्याचा प्रयत्न झाला होता. काही बाबतीत अनियमिततेबाबत सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश आबिटकर यांनी उल्लेख केला होता. काही वेळेस निर्णय घ्यावे लागतात. अनेकदा राज्याचे प्रमुख आदेश देत असतात. त्या आदेशाचे पालन तेथील प्रशासकाला करावे लागते. आता तेथे अतिशय बारकाईने रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नाबार्ड, सहकार विभागाचे लक्ष आहे. सध्याचे बँकेचे कामकाज पाहिले तर तेथील ठेवी, गुंतवणूक, येणे कर्ज, एनपीए, नफा, भागभांडवल, पर्याप्तता आणि लेखा परीक्षण वर्ग हे सर्व अतिशय चांगले आहे. त्यामुळे सध्या तरी राज्य सरकारने सदर व्यक्तीला प्रशासक पदावर नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

असुधारित प्रत

पृ.शी. : दिनांक १३ सप्टेबर, २०१९ रोजी नगर विकास विभागाच्या अधिसूचनेनुसार भूखंडाचे नुतनीकरण व हस्तांतरणाकरिता लागणारे भूभाटक कमी करणेबाबत

मु.शी. : दिनांक १३ सप्टेबर, २०१९ रोजी नगर विकास विभागाच्या अधिसूचनेनुसार भूखंडाचे नुतनीकरण व हस्तांतरणाकरिता लागणारे भूभाटक कमी करणे यासंबंधी सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्षनेता) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडांचे नुतनीकरण, हस्तांतरणाबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-चार-ब दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ नगरविकास विभाग यांच्या अधिसूचनेनुसार भुखंडांचे नूतनीकरण व हस्तांतरण करण्याबाबत लागणारे "भूभाटक" हे ०.०२% वरून ८% केल्यामुळे भुखंडधारकांना प्रचंड भुर्दंड पडून विकासकांना अडचण निर्माण झाली असणे, दिनांक २५ मार्च, २०२१ रोजी नागपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत संबंधित विषयावर चर्चा होणे व सभागृहाने एकमताने ठराव क्र.६६ पारित करुन, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासनाचे दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या अधिसूचनेतील "महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम २०१९, च्या तरतुदीबाबत फेरविचार करण्याबाबत

श्री. देवेंद्र फडणवीस ....

शासनाकडे परत पाठविण्यात यावा, असा निर्णय घेण्यात येणे, नागपूर महानगरपालिका सभागृहाने एकमताने ठराव करुन घेतलेल्या उपरोक्त अधिसूचनेबाबत शासनाने फेरविचार करुन निर्णय घेण्याची आवश्यकता, हा प्रश्न राज्यातील सर्वच महानगरपालिकांमध्ये तयार होणे, महापालिकेच्या भोगवटादार मध्यमवर्गीय असल्याने त्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागणे, याकरिता या निर्णयाचा पुनर्विचार करुन नविन निर्णय घेण्याची आवश्यकता व जोपर्यंत नवीन निर्णय होत नाही तोपर्यंत सदर निर्णय स्थगित ठेवून भोगवटादारांकडून हमी पत्र घेऊन दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ पूर्वीच्या तरतूदी प्रमाणे ०.०२% इतकेच भूभाटक वसूल करण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. एकनाथ शिंदे (नगर विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने जळगाव महानगरपालिकेचा विषय आला आहे. तेथील गाळ्यांच्या नुतनीकरणास माननीय उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. त्यावेळेस असा प्रश्न समोर आला की, ज्यांच्याकडे ३०-३० वर्षापासून गाळे आहेत त्यांचे नुतनीकरण करुन देता आले नाही तर म्युनिसिपल गाळे कोणी घेणार नाही. त्यावेळेस यातून वेगळ्या प्रकारे मार्ग काढण्याचा प्रयत्न केला होता व यातील तरतुदी बदलण्यात आल्या होत्या. या तरतुदी जळगाव येथील म्युनिसिपलच्या छोट्या दुकानदारांना मदत करण्याकरिता बदलल्या होत्या. परंतु त्या तरतुदी त्या दुकानदारांच्या अंगलट आलेल्या आहेत. यापेक्षा जे निवासी किंवा धर्मदाय गाळे आहेत, ज्यांच्याकडे महानगरपालिकेचे भूखंड आहेत यांच्यावर ०.०२ टक्क्यांवरुन थेट ८ ठक्के भूभाटक केले आहे. मी मुख्यमंत्री असतानाच हा बदल झालेला आहे. परंतु हा निर्णय पूर्णपणे चुकलेला आहे. त्यावेळेस ही बाब लक्षात आली नाही. हा निर्णय जरी दुकानदारांकरिता घेतला असला तरीही तो सर्वांकरिता लागू होईल. हा निर्णय तेव्हा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याच्या दोन दिवसांपूर्वी घेण्यात आला होता. आता त्यामुळे अनेक अडचणी तयार झाल्या आहेत. या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिले आहे. मी यानिमित्ताने दोन विनंती मंत्री महोदयांना करणार आहे. ०.०२ टक्क्यांवरुन थेट ८ ठक्के भूभाटक हे जास्त होत आहे. निवासी भूखंडाकरिता ते ०.०२ टक्के ठेवले पाहिजे. परंतु व्यवसायिकांना हे भूभाटक कमी केले जाईल, असे म्हटले आहे. परंतु ते देखील १ टक्क्यांच्या आत असले पाहिजे. त्यात अधिक वाढ असू नये. अन्यथा त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात भार येत आहे. त्यामुळे हे भूभाटक कमी करावे. तसेच मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेमध्ये जे सुचविले आहे, त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा. मागील दोन वर्षापासून सर्व व्यवहार बंद आहेत. मी अनेकांशी चर्चा केली आहे. त्यांनी असे सांगितले की, त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्र घ्यावे. सरकार जो निर्णय घेईल तो त्यांना मान्य असेल, याबाबतचे प्रतिज्ञापत्र देण्यास ते तयार आहेत व जुन्या पद्धतीने त्यांचे नुतनीकरण करुन द्यावे, असे त्यांनी सांगितले आहे. तसेच सरकार जो निर्णय घेईल त्यानुसार पैसे भरण्यासाठी लोक तयार आहेत. मी विनंती करतो की, सदर निर्णय आता स्थगित करावा. तसेच जुन्या प्रमाणे लोकांचे प्रतिज्ञापत्र

श्री. देवेंद्र फडणवीस ....

घेऊन त्यांचे नुतनीकरण करुन द्यावे. मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेच्या उत्तरातील शेवटच्या परिच्छेदात जे सुचविले आहे त्याप्रमाणे याची फोड करुन निर्णय घ्यावा. तो निर्णय घेताना व्यावसायिक गाळे, भूखंडाकरिता कमीत कमी भूभाटक ठेवावे, अशी मी विनंती करतो.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण आणि त्याचे दर याबाबत लक्षवेधी सूचना मांडली आहे. त्यांनी मला एक पत्र दिले होते. तसेच मला काही शिष्टमंडळे भेटली होती. त्यांची मागणी अशी होती की, महानगरपालिका, नगरपालिका येथील गाळेधारक, निवासी वापरामध्ये दिलेल्या जागाकरिता दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी भूभाटक ०.०२ टक्क्यांवरुन ८ टक्के करण्याचा निर्णय घेतला होता. यात दरामध्ये मोठी वाढ झाली आहे. खरे सांगावयाचे तर ०.०२ टक्के दर अतिशय कमी आहे. शेवटी महानगरपालिका, नगरपालिकांच्या मिळकती, गाळे, औद्योगिक वापराच्या इमारती, जागा यांना हे भाडे अतिशय कमी होते. महानगरपालिका, नगरपालिका हद्दीतील नागरिकांना मुलभूत सोयी सुविधा देण्यासाठी हा निर्णय तेव्हा घेण्यात आला होता. शेवटी यातून महसूल मिळाला पाहिजे, हा दृष्टीकोन ठेवण्यात आला होता. परंतु ८ टक्क्यांनुसार कॅलक्युलेशन केले तर ही रक्कम मोठी होत होती. त्यामुळे अनेकांच्या मनात असंतोष होता. लोकांनी यासाठी विरोधी केला होता. महानगरपालिका, नगरपालिकेच्या मिळकती, भाडेधारक, गाळेधारक हे मध्यमवर्गीय लोक आहेत. त्यामुळे याचा निश्चितपणे विचार केला पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी माझ्याकडे पत्र दिले होते. तसेच काही सन्माननीय सदस्यांनीही माझी याबाबत भेट घेतली होती. जळगाव, नाशिक, पुणे, नागपूर, सांगली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी याभागातील शिष्टमंडळांनी माझ्याशी याबाबत चर्चा केली होती. या प्रकरणात ही रक्कम कमी केली पाहिजे, असे शासनाचेही मत झाले होते. नगर विकास विभागाचे प्रधान सचिव आणि संबंधित अधिकाऱ्यांचीही मी याबाबत बैठक घेतली आहे. यातील रक्कम कमी केली पाहिजे, असे मत तयार झाले. यातील व्याज

श्री. एकनाथ शिंदे .....

दरदेखील दरमाहा २ टक्के होता. तो १ टक्का करण्याबाबत चर्चा झालेली आहे. भाडेपट्टयांच्या नुतनीकरणासाठी १० वर्षाची कमाल मर्यादा होती. ती देखील वाढली पाहिजे, याबाबतही चर्चा झाली आहे. आपणास असा निर्णय घेता येईल की, निवासी वापर करणाऱ्यांना २ टक्के आणि व्यावसायिक व औद्योगिक वापर करणाऱ्यांना ३ टक्के दर ठेवला तर अधिकची रक्कम वाढणार नाही. यात ८ टक्क्यांवरुन थेट २ टक्के दर करण्यात येत आहेत. तसेच व्याजाची रक्कम, नुतनीकरणाचा कालावधी सांस्कृतिक, शैक्षणिक आणि निवासी यासाठी वेगळा दर करता येईल. तसेच व्यापारी आणि औद्योगिक वापरासाठी वेगळे दर ठेवता येतील. मला वाटते याबाबतचा निर्णय करता येईल. सध्या नुतनीकरणाचे विषय प्रलंबित आहेत, हे सर्व मार्गी लागतील.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी अतिशय चांगली सूचना केली आहे. परंतु माझी विनंती आहे की, २ टक्के आणि ३ टक्के ऐजवी १ टक्का आणि २ टक्के असा बदल करावा. याचे कारण तेथे जागेचे क्षेत्रफळ कमी आहे. परंतु जागेच्या किंमती वाढलेल्या आहेत. तसेच हा दर जागेच्या किंमतीच्या आधारे आकारण्यात येत असतो. त्यामुळे मी विनंती करतो की, यात १ टक्का आणि २ टक्के असा बदल करावा.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, राज्यातील काही नगरपालिका, नगरपरिषदांची परिस्थिती आपणास माहित आहे. शासनाला त्या नगरपालिकांना नेहमीच मदत करावी लागत असते. मला वाटते की, शासनाच्या महसुलाचाही विचार केला पाहिजे. मला असे वाटते की, हे दर निश्चित करण्यासाठी एक समिती गठीत करता येईल. यात काही सन्माननीय सदस्यांचा समावेश करता येईल. रेडीरेकनर आणि बाजारमुल्याच्या आधारे हे दर किती करणे शक्य होईल, तसेच ते लोकांना परवडेल किंवा नाही, हे पाहता येईल. महानगरपालिका आणि नगरपालिकांचे उत्पन्न देखील वाढेल, असा निर्णय करता येईल. हा निर्णय होईपर्यंत यासाठी स्थगिती दिली जाईल.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिले आहे. ते आम्हाला मान्य आहे. यासाठी एक समिती गठीत करावी. तोपर्यंत स्थगिती द्यावी. तसेच लोकांची प्रतिज्ञापत्र देण्याची तयारी आहे. राज्य सरकार जो निर्णय घेईल तो त्यांना मान्य असेल. हे केले तर नुतनीकरणदेखील थांबणार नाही. याबाबतची घोषणा मंत्री महोदयांनी करावी, अशी मी विनंती करतो.

श्री. एकनाथ शिंदे : तशा प्रकारे प्रतिज्ञापत्र देऊन रक्कम भरावी. जेवढे दर ठरतील तेवढी रक्कम वळती करता येईल व उर्वरित रक्कम त्यांना भरता येईल.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, हे स्थगित केल्यानंतर जुना नियम लागू होतो. जुन्या नियमानुसार ते रक्कम भरतील. त्यानंतर जो निर्णय सरकार घेईल त्यातील फरक भरण्याबाबत ते प्रतिज्ञापत्र देतील. त्यामुळे तो पैसा महानगरपालिकेला मिळेल.

श्री. एकनाथ शिंदे : ठीक आहे. याचा अर्थ महानगरपालिकांचा महसूल थांबणार नाही. त्यामुळे तोपर्यंत जुन्या नियमानुसार पैसे भरुन घेता येतील आणि पुढील निर्णय झाल्यानंतर लोकांनी फरक भरावा.

यानंतर श्री. चौधरी...

पृ.शी.: द्राक्ष व डाळिंब बागांना प्लास्टिक आच्छादन व शेडनेटसाठी अनुदान देणेबाबत.

मु.शी.: द्राक्ष व डाळिंब बागांना प्लास्टिक आच्छादन व शेडनेटसाठी अनुदान देणेबाबत श्री.अनिल बाबर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अनिल बाबर (खानापूर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सांगली जिल्हयात द्राक्ष व डाळिंब पिकांचे मोठया प्रमाणात लागवड होत असून शेतकऱ्यांनी जिल्हयात नवनवीन आधुनिक प्रयोग करुन निर्यातक्षम द्राक्षे व डाळींब पिकवलेली असणे, परंतु सातत्याने अवेळी पाऊस व अतिवृष्टी, गारपीट यामुळे शेती धोक्यात आलेली असणे, वारंवार होणाऱ्या शेती नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडणे, यावर ठोस उपाययोजना आखण्याकरिता शासनाने द्राक्ष व डाळिंब पिकांच्या उर्जितावस्था व संरक्षण मिळण्याकरिता बागेवरती प्लास्टीक आच्छादन करणे व शेटनेटसाठी अनुदान देण्याची आवश्यकता असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी संबंधित मंत्रीमहोदयांकडे पत्रव्यवहार, बैठका घेतल्या असतानाही तसेच विविध आयुधांव्दारे विधानसभा सभागृहात शासनाचे लक्ष वेधूनही अदयाप शासन स्तरावर कोणतीच ठोस कार्यवाही न होणे, परिणामी शेतकरी वर्गामध्ये प्रचंड असंतोष पसरणे, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाचे प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.दादाजी भुसे (कृषी मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षेवधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री.अनिल बाबर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये मान्य केले आहे की, सदर पिकांसाठी प्लास्टिक आच्छादनाची गरज आहे. मंत्री महोदयांनी यासंदर्भात अनेक बैठका घेतल्या व या विषयात काय करता येईल याची कृषी विद्यापिठांकडून माहिती देखील घेतली आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी यासंदर्भातील पहिली बैठक ऑक्टोबर, २०२० मध्ये घेतली. माझ्याकडे सदर बैठकीचे इतिवृत्त देखील आहेत. त्या बैठकीमध्ये असे ठरले होते की, दोन महिन्यांच्या आत आपण केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवायचा. परंतु आता सन २०२२ सुरु आहे. सुमारे दोन वर्षांचा कालावधी उलटून देखील माझ्या माहितीप्रमाणे अद्याप केंद्र सरकारकडे याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही. तसेच मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे की, नाशिक व सोलापूर जिल्हयाचा समावेश झाला आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, हे क्लस्टर तयार करण्यात आले आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांपासून राज्यभर सर्वांना याचा फायदा मिळावा अशी माझी मागणी आहे. शासनाने ५० टक्के अनुदान द्यावे, अशी आमची मागणी होती. त्यावर मंत्री महोदयांनी सुचविले होते की, राज्य सरकार २५ टक्के अनुदान देईल व केंद्र सरकारकडून २५ टक्के अनुदानाची आपण मागणी करु. असे करताना विभागाच्या अधिकाऱ्यांनी असे भासवले होते की, या योजनेसाठी किमान १ हजार ते १ हजार ५०० कोटी रुपये लागतील. परंतु तसे नाही. कारण पॉली कव्हर करण्यासाठी अगोदरच्या बागा काढून नवीन बागा कोणी लावणार नाही. दरवर्षी सुमारे ५ हजार हेक्टर नवीन बागा लावल्या जातील व त्यासाठी सुमारे २५० ते ३०० कोटी रुपये तरतूद करावी लागेल, असे मला वाटते. प्रति हेक्टर २५ हजार रुपये याप्रमाणे ४०० ते ५०० कोटी रुपये नुकसानभरपाई दिली जाते. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत एक महिन्याच्या आत याबाबत निर्णय घ्यावा व द्राक्ष आणि डाळिंब बागांना आच्छादित करण्यासाठी शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान द्यावे, अशी माझी मागणी आहे. मंत्री महोदय एक महिन्याच्या आत सदर निर्णय करतील का ?

श्री.दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनिल बाबर यांनी अतिशय महत्त्वाच्या विषयावर ही लक्षवेधी सूचना आणलेली आहे.

श्री.दादाजी भुसे.....

अध्यक्ष महोदय, वातावरणामध्ये बदल होऊन अचानक गारपिट, अवकाळी पाऊस अशा नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांच्या अनेक पिकांचे नुकसान होते. आपण देखील द्राक्ष आणि डाळिंब बागा असलेल्या भागाचे प्रतिनिधीत्व करता. आपल्याला माहिती आहे की, द्राक्षांचा दर ठरुन उद्या द्राक्ष काढली जाणार अशी परिस्थिती असताना अचानक रात्री गारपिट होते किंवा अवकाळी पाऊस पडतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाताशी आलेल्या पिकाचे होत्याचे नव्हते होते.

अध्यक्ष महोदय, राज्यभरामध्ये द्राक्ष बागांखाली १ लाख २० हजार हेक्टर व डाळिंब बागांखालील क्षेत्र १ लाख ६६ हजार हेक्टर एवढे आहे. आपल्याला माहिती आहे की, या फळांच्या निर्यातीतून देशाला मोठा महसूल मिळतो तसेच अनेकांना रोजगारही उपलब्ध होतो. सन्माननीय सदस्य श्री.अनिल बाबर हे या विषयाबाबत वारंवार पाठपुरावा करीत आहेत. अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी बागांना प्लास्टिक आच्छादन करण्याचा हा विषय आहे. त्यासाठी अँगलचे स्ट्रक्चर तयार करावे लागते. वातावरणामध्ये बदल होऊन आपल्या पिकाला धोका असल्याचे लक्षात आल्यानंतर ताबडतोब आच्छादन कसे करता येईल, त्याची उंची किती असली पाहिजे, प्लास्टिकची जाडी किती असली पाहिजे, ते किती वेळ ठेवता येईल, इत्यादी बाबींचा अभ्यास करण्यासाठी राहुरी कृषी विद्यापिठाला सूचना देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने त्यांनी एक समिती गठीत केली होती. सदर समितीने आपला अहवाल देखील सादर केला आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनिल बाबर यांना मी सांगू इच्छितो की, या विषयाबाबत आपण केंद्र सरकारकडे पाठपुरावा करीत आहोत. केंद्र सरकारने योजनेचा काही वाटा उचलल्यास आणखी सोपे होईल. अर्थात, ही राज्य सरकारची जबाबदारी आहेच परंतु संयुक्तरित्या योजना राबविल्यास शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दिलासा देता येईल.

अध्यक्ष महोदय, काही शेतकऱ्यांनी तसेच द्राक्ष बागायतदार संघानेही याचे प्रयोग केलेले आहेत. किती फुटांवर प्लास्टिक आच्छादन केले पाहिजे,

श्री.दादाजी भुसे.....

कोणते प्लास्टिक फिजिबल होईल, इत्यादी मुद्दयांच्या अनुषंगाने त्यांचा अभ्यास सुरु आहे. शासन पातळीवरुन देखील प्रायोगिक तत्त्वावर ही योजना सुरु करण्याचा निर्णय आपण घेऊ. त्यातून मिळणाऱ्या राज्यव्यापी परिणामांच्या आधारे पुढील कार्यवाही केली जाईल.

श्री.अनिल बाबर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, राहुरी कृषी विद्यापिठाला यासंदर्भात अभ्यास करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. माझी विद्यापिठाबद्दल काहीही तक्रार नाही. परंतु मी सांगू इच्छितो की, केंद्र सरकारने पुण्याजवळ मांजरी द्राक्ष बाग संशोधन केंद्र उभारलेले आहे. त्या ठिकाणी या विषयावर गेल्या दहा वर्षांपासून संशोधन सुरु आहे. किती जाडीच्या प्लास्टिकचा वापर करावा किंवा इतर सर्व बाबींचा डेटा त्यांच्याकडे तयार आहे. मी पुन्हा सांगू इच्छितो की, मला विद्यापिठाबद्दल कोणताही राग नाही परंतु विद्यापिठाने यासंदर्भात कोणतेही स्वतंत्र संशोधन केलेले नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, मांजरी, पुणे येथील संशोधन केंद्राने केलेल्या संशोधनाचा डेटा विचारात घ्यावा. मंत्री महोदयांसोबत झालेल्या बैठकांमध्ये देखील त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते व कशा पध्दतीचे आच्छादन केले पाहिजे याबाबत त्यांनी आपल्याला माहिती दिली होती. त्यामुळे माझी विनंती आहे की, नवीन काही करण्यापेक्षा त्यांच्याकडून शास्त्रीय माहिती घ्यावी.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, आपण यावर्षी प्रायोगिक तत्त्वावर यावर्षी ही योजना सुरु करु. परंतु या योजनेसाठी खूप जास्त खर्च येणार नाही, असे मला वाटते. आर्थिक बोजा किती पडेल हे पाहण्यासाठी मंत्री महोदय योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरु करण्याचे सांगत आहेत. परंतु या योजनेमुळे सुमारे २५० ते ३०० कोटी रुपयांपर्यंतच बोजा पडेल. कारण प्लास्टिक आच्छादनासाठी अनुदान मिळत आहे म्हणून कोणी नवीन बागा लावणार नाही. नवीन बागा लावण्यासाठी मोठा खर्च येतो. असलेल्या बागा वाचविण्यासाठी आपण प्रयत्न करावेत. यापुढे संरक्षित शेती करायची आहे, असे सरकारचेच धोरण आहे.

श्री.अनिल बाबर.....

दुसरा मुद्दा असा की, आता विमा संरक्षण राहिलेले नाही. त्यामुळे शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. तरी सदर निर्णय किती दिवसांमध्ये घेण्यात येईल, हे मंत्री महोदयांनी सभागृहाला सांगावे.

श्री.दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, यासंदर्भात नेमण्यात आलेल्या समितीमध्ये मांजरी, पुणे येथील राष्ट्रीय संशोधन केंद्रातील तज्ञांचाही समावेश होता. म्हणजेच त्यांनी केलेल्या संशोधनाचा देखील यामध्ये विचार झालेला आहे, आपण त्यांचे मार्गदर्शन घेतलेले आहे.

अध्यक्ष महोदय, ही वस्तुस्थिती आहे की शेतकरी लाखो रुपये खर्च करुन अतिशय कष्टाने या बागा उभ्या करतात. परंतु नैसर्गिक आपत्तीमुळे क्षणात त्यांच्या पिकाचे होत्याचे नव्हते होते. आपण सर्वांनीच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची आवश्यकता आहे. प्लास्टिक आच्छादन करण्यासाठी प्रती एकर चार ते साडे चार लाख रुपये खर्च येतो असा प्रायोगिक अंदाज आहे. त्यामुळे यावर्षी आपण प्रायोगिक तत्त्वावर १००-१०० हेक्टरवर प्रयोग करुन पाहू. त्यातून येणाऱ्या आउटपूटच्या आधारे या योजनेची राज्यव्यापी अंमलबजावणी केली जाईल.

श्री.अनिल बाबर : अध्यक्ष महोदय, मी स्वत: माझ्या शेतामध्ये आच्छादन केलेले आहे. मी ते अनुदानासाठी केलेले नाही. माझ्या बागेचा अभ्यास करुन निर्णय घ्यावा असेही माझे म्हणणे नाही. मला एवढेच सांगायचे आहे की, यातील फायदे-तोटे मी पाहिले आहेत. त्यामुळे एखादा क्लस्टर उभा करण्यास हरकत नाही, अशी माझी विनंती आहे. याबाबत लवकर निर्णय घेतला तर चांगला उपयोग होईल कारण प्रत्येक पिकाचा हंगाम ठरलेला असतो.

अध्यक्ष महोदय, दुसरा मुद्दा डाळिंब बागांचा आहे. डाळिंब बागांना प्लास्टिक आच्छादन करण्यासाठी फारसा खर्च येत नाही. साध्या शेडनेटने देखील आच्छादित करता येते. माझ्या मतदारसंघातील आटपाडी येथे तसे प्रयोग करण्यात आलेले आहेत. माननीय श्री.शरद पवार यांनी देखील अशा बागांची पाहणी केली आहे.

श्री.अनिल बाबर.....

द्राक्ष बागा व डाळिंब बागांना मिळून वर्षाला सुमारे ५०० कोटी रुपये अनुदानाची तरतूद केली तर दोन्ही पिके संरक्षित होतील. आता आपण नवीन पध्दतीनुसार शेती केली पाहिजे. ऊस पिकाला देखील काही मर्यादा आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, शासन याबाबत तातडीने निर्णय घेईल का ?

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, मी हा विषय सकारात्मकच घेत आहे. डाळिंबाच्या बाबतीत अनेक शेतकऱ्यांनी स्वत:हून प्रयोग केलेले आहेत आणि अनुदान मिळण्यासाठी त्यांनी हे केलेले नाही. परंतु संरक्षित शेती निर्माण करणे, हा आपल्यासमोरचा महत्त्वाकांक्षी विषय आहे. परंतु आपल्याला माहिती आहे की, नवीन योजना आणताना त्याचा आर्थिक भार किती येणार, हे सर्व तपासावे लागते. कारण सरकार म्हणून नुसते आश्वासन देण्यात काही अर्थ राहणार नाही. म्हणून चालू वर्षात आपण हे काम प्रायोगिक तत्त्वावर करु. पाहिजे तर त्याचे काही क्षेत्र आपण वाढवू. लॉटरी टाईपच्या माध्यमातून आपण जाऊ. कारण मालेगांवला द्राक्षांच्या बाबतीत आमच्या एका शेतकऱ्याने प्रयोग केला होता. परंतु वाऱ्याची दिशा आणि जो पाऊस पडणार आहे, तो द्राक्षपिकाच्या मुळापर्यंत गेला तर त्याचे दुष्परिणाम होत असतात. म्हणून पाण्याचा निचरा होणे वगैरे, या सर्व गोष्टींचा आपल्याला त्यात समावेश करावा लागणार आहे. आपण हे व्यक्तीगत पातळीवर केलेले आहे. आपला अनुभव आम्ही निश्चितपणे मार्गदर्शन म्हणून घेऊ आणि संगणकीकृत लॉटरी पध्दतीने यामध्ये निवड करु. लॉटरी काढलेल्या शेतकऱ्यांसाठी हे काम प्रायोगिक तत्त्वावर आपण करु. पुढील वर्षापासून यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद करुन शेतकऱ्यांना पाठबळ देण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. द्राक्षांच्या बाबतीत आपल्याला माहिती आहे की, आपल्या भागामध्ये असेल किंवा नाशिक जिल्ह्यात असेल, काही अर्ली द्राक्षे घेणारे द्राक्ष उत्पादक बांधव आहेत. म्हणून मागील काळात या द्राक्ष बागांना विम्याचे कवच मिळाले पाहिजे याकरिता एक बारमाही योजना आपण लागू केली आहे.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी माननीय कृषीमंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचतात, याबद्दल प्रथम मी त्यांचे अभिनंदन करते. हा जरी डाळिंबाचा विषय असला तरी आमच्या नाशिक जिल्ह्याचे कृषीमंत्री हे पालकमंत्री आहेत. नाशिक जिल्ह्यात पॉलीहाऊस, शेडनेट यांच्या माध्यमातून ऑर्किड फूल, सिमला मिरची, अचारी मिरची किंवा ज्वेलरी मिरची पिकविली जाते. संपूर्ण संगणकीकृत पध्दतीने ही शेती केली जाते. पण केंद्र

श्रीमती मनिषा चौधरी..

शासनाच्या समूह विकास कार्यक्रमांतर्गत याची नोंद झालेली नाही. म्हणून मी मंत्री महोदयांना विनंती करते की, या शेतकऱ्यांना जेव्हा वातावरणात बदल होतो, अतिवृष्टी होते त्यावेळी जिल्हाधिकारी यांच्याकडून त्यासंबंधीची नोंद घेतली जात नाही. कारण त्यांना अनुदान देण्याची तरतूद नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान देण्यासाठी शासन विचार करील काय, हा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, पूर्वी आपण जी फुले आयात करीत होतो ती फुले आपण आता स्वदेशात पिकवितो आणि त्यामुळे अशा शेतकऱ्यांना आपण प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. यासाठी लागणारा खर्च खूप जास्त येतो. कारण त्याचे बि-बियाणे परदेशातून आणावे लागते. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना आपण ५० टक्के अनुदान देणार आहात काय, आणि कमी शेतीमध्ये जास्तीत जास्त उत्पन्न घेण्यासाठी तरुण पिढींना आपण प्रोत्साहन देणार आहात काय ?

अध्यक्ष महोदय, मी आपल्याला सांगू इच्छिते की, मास्टरच्या पदव्या घेतलेले आणि लंडनहून शिक्षण घेऊन आलेले अनेक तरुण आज अशा प्रकारची शेती करीत आहेत. त्यामुळे अशा तरुणांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. याबाबत सकारात्मक विचार करुन आपण सिमला मिरची, अचारी मिरची किंवा ज्वेलरी मिरची पिकविण्यासाठी लागणाऱ्या शेडनेटकरिता शासन ५० टक्के अनुदान देणार आहे काय? तसेच पॉलीहाऊस, शेडनेट यांच्या माध्यमातून ऑर्किड फूल लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना आपण प्रोत्साहन देण्यासाठी हे कराल, अशी मला खात्री आहे. कारण माननीय कृषीमंत्र्यांना याची आवड आहे. ते तिकडच्या शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेती कशा पध्दतीने केली जाते, हे ते स्वत: बघतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे दु:ख काय आहे, हे मंत्री महोदयांना माहिती आहे. त्यामुळे आमच्या पालघर जिल्ह्यामध्ये आदिवासी बहूल भागामध्ये या सिमला मिरचीचे अशा पध्दतीने उत्पादन घेतले जाते. म्हणून मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आमच्या शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले आहे, त्या नुकसान भरपाई देण्याबरोबरच या पध्दतीच्या शेतीकरिता शासनाने अनुदान देण्यासाठी सकारात्मक विचार करावा.

श्री. दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्या प्रकल्पाला मी स्वत: जाऊन भेट दिली आहे. त्याची पाहणी केली आहे. आमच्या ग्रामीण भागातील शेतकरी अतिशय नाविन्यपूर्ण प्रयोग करुन तेथे यशस्वीपणे शेती करीत आहेत. मी त्या सर्व शेतकरी बांधवांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्रातील अशा ५ हजार शेतकऱ्यांचा रिसोर्सेस बँक म्हणून आम्ही डाटा गोळा केला आहे. या शेतकरी बांधवांचे मार्गदर्शन इतरही शेतकरी बांधवाना दिले जात आहे. विद्यापीठाचे काम संशोधन करण्याचे व ते शेताच्या बांधापर्यंत पोहोचवायचे आहे. ते काम तर होतच राहील. परंतु नाविन्यपूर्ण उपक्रम आणि विविध प्रयोग करणाऱ्या शेतकरी बांधवांचे मार्गदर्शन घेऊन आम्ही इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत आहोत. हा प्रकल्प अतिशय नाविन्यपूर्ण आहे आणि मी स्वत: त्या प्रकल्पाला भेट दिली आहे. महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री माननीय श्री. उद्धवजी ठाकरे यांची जी संकल्पना आहे की, "विकेल ते पिकेल", म्हणजे ज्या वाणांना बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात मागणी आहे ते वाण शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पिकवावे की जेणेकरुन शेतकऱ्यांना २ पैसे जास्त मिळतील आणि त्यांची प्रगती साध्य होऊ शकेल. म्हणून या संदर्भात कृषी विभागाच्या माध्यमातून अनेक योजना गठीत करण्यात आल्या आहेत आणि त्याचे दृष्य परिणाम येणाऱ्या वर्षभरात दिसून येतील. आपण काही सूचना केल्या आहेत की, लाखो आणि करोडो रुपयांचे कर्ज घेऊन अशा प्रकारचे प्रकल्प जे शेतकरी उभे करतात. मात्र कधी कधी नैसर्गिक आपत्तीमुळे त्यांचे नुकसान होते. त्यामुळे अशा परिस्थितीत त्यांनाही सरकारने पाठबळ दिले पाहिजे, याचा आम्ही सकारात्मक विचार करीत आहोत.

श्री. हिरामण खोसकर : अध्यक्ष महोदय, माननीय कृषीमंत्री यांनी जो विषय मार्गी लावण्याचा प्रयत्न केला, त्याबद्दल मी शेतकऱ्यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो. नाशिक जिल्ह्यातील आपल्या दिंडोरी मतदार संघातून सुमारे ८० टक्के द्राक्षे निर्यात केली जातात. परंतु गेल्या २ दिवसांच्या पावसामुळे तेथील शेतकऱ्यांची अशी परिस्थिती झाली आहे की, जी द्राक्षे १०० रुपये किलोने विकली जात होती ती आज १० आणि २० रुपयांनी कोणी घेत नाही. म्हणून मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आपण जो प्रयोग करु पाहत आहात, तो लवकरात लवकर मार्गी लावला तर

श्री. हिरामण खोसकर..

शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. दरवर्षी हजारो एकर जमिनीवरील द्राक्ष पिकाचे अशा पध्दतीने नुकसान होत असल्यामुळे शेतकरी अडचणीत आलेला आहे. म्हणून माझी विनंती आहे की, आपण याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा.

अध्यक्ष महोदय, आपण आज ५ हजार हेक्टरपर्यंत निर्णय घेतला आहे. परंतु तो आपण १० हजार हेक्टरपर्यंत करावा, अशी माझी विनंती आहे. तसेच नाशिक जिल्ह्यातील पश्चिम भागातील इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, पेठ, दिंडोरी या ठिकाणी भात पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. भात काढल्यानंतर तेथे वेली, कारली, दोडकी, ढोबळी मिरची ही पीके घेतली जातात. परंतु त्या पिकांवर मोठ्या प्रमाणात व्हायरस आला आहे. त्या जिराईत शेतकऱ्यांच्या बाबतीत शासन काही तरी विचार करील काय आणि त्यांना शासन मदत करील काय,अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

श्री. दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी नाशिक जिल्ह्यातील पश्चिम भागातील जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, द्राक्ष बागायतदारांसंबंधी मी ऑलरेडी उत्तर दिलेले आहे. संरक्षित शेतीला आपल्याला मोठ्या प्रमाणात चालना कशी देता येईल, त्या शेतकऱ्यांना पाठबळ कसे देता येईल, त्या दृष्टीकोनातून कृषी विभागाच्या माध्यमातून अनेक योजनांचा पाठपुरावा केला जातो आणि त्यातील अनेक योजनांची अंमलबजावणी केली जाते. आपल्या भागात काही आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून अनेक शेतकरी बांधवांनी पॉलीहाऊस, शेडनेट उभे केले आहेत आणि ते आणखी मोठ्या प्रमाणात कसे उभे करता येतील त्या दृष्टीने कामकाज केले जाईल.

श्री. अनिल बाबर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी लक्ष घालून सविस्तर उत्तर दिलेले आहे. शासनावर यासंबंधी किती आर्थिक बोजा येईल अशी शंका त्यांच्या मनामध्ये आहे. येत्या २ महिन्यात माननीय उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री यांच्यासमवेत चर्चा करुन यासंबंधी लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल काय ?

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करुन यासाठी किती आर्थिक बाबीची गरज आहे आणि यामध्ये जास्तीत जास्त निधी मिळावा यासाठी विनंती केली जाईल.

असुधारित प्रत

पृ.शी.: गोवंशहत्या घटनेची पुनरावृत्ती होत असताना पोलिसच गुन्हेगारांना पाठीशी घालत आहेत

मु.शी.: गोवंशहत्या घटनेची पुनरावृत्ती होत असताना पोलिसच गुन्हेगारांना पाठीशी घालत आहेत या संबंधी श्री.भास्कर जाधवविधानसभा सदस्य यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. भास्कर जाधव (गुहागर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रत्नागिरी जिल्हयातील बोरज (ता. खेड) येथे गोवंशातील दोन पाळीव जनावरांची घृणास्पद हत्या झाल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२२ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, या घटनेमुळे तणावसदृश स्थिती निर्माण होणे, अशाच प्रकारची घटना माहे जानेवारी, २०१९ मध्ये याच भागातील लोटे (ता. खेड) येथे उघडकीस येवून गंभीर परिस्थिती निर्माण होणे, हे कृत्य करणाऱ्यांना अटक करण्यात यावी या मागणीसाठी दिनांक २६ जानेवारी, २०१९ रोजी नागरिक शांतपणे आंदोलन करीत असताना पोलिसांनी केलेल्या बेछूट लाठीहल्ल्यामुळे आंदोलक संतप्त होणे, आंदोलकांच्या भावनांचा उद्रेक होवून जाळपोळ होवून दंगलसदृश स्थिती निर्माण होणे, यामध्ये कित्येकजण जखमी होणे, आंदोलनामुळे संपूर्ण मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग कित्येक तास बंद होणे, सदर घटनेप्रकरणी पोलिसांकडून झालेली तकलादू कारवाई, परिणामी असे कृत्य करणाऱ्यांवर कोणतीही जरब नसल्याने पुन्हा तीन वर्षानंतर गोवंशहत्येच्या घटनेची पुनरावृत्ती होणे, सदर घटना घडून एक महिना उलटला तरी हे कृत्य करणाऱ्या गुन्हेगारांना पकडण्यात पोलिसांना आलेले अपयश, त्यामुळे पोलिसच गुन्हेगारांना पाठिशी घालण्याचे काम करीत असल्याची नागरिकांमध्ये निर्माण झालेली भावना, परिणामी नागरिकांमध्ये असलेली प्रचंड चीड आणि संतापाची भावना, या भावनांचा कधीही उद्रेक होण्याची शक्यता, ही गंभीर बाब

श्री. भास्कर जाधव....

लक्षात घेवून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.”

श्री.शंभुराज देसाई (गृह(ग्रामीण)राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सदरची लक्षवेधी सूचना फक्त आणायची म्हणून आणलेली नाही. सुरुवातीलाच मी कबूल करतो की, ही लक्षवेधी सूचना टाकत असताना उरलेल्या तीन घटना या आमच्याकडूनच त्यामध्ये टाकायच्या राहिलेल्या आहेत. त्यामुळे माननीय मंत्र्यांनी आमच्या लक्षवेधी सूचनेच्या ड्राफ्टप्रमाणे आम्हाला उत्तर दिलेले आहे. परंतु मी आपल्याला एवढेच सांगतो की, अशा पद्धतीने गोवंश हत्येचे प्रकरण माझ्या मतदारसंघामध्ये मागच्या दोन वर्षात पाच वेळा झाले आहे. दिनांक २६ जानेवारी, २०१९ रोजी खेड येथे जी घटना घडली त्याचा उल्लेख माननीय मंत्र्यांच्या निवेदनामध्ये आहे त्यामुळे मी आता परत त्याचा उल्लेख करीत नाही. ही घटना घडल्यानंतर लोकांनी कायदा व सुव्यवस्था बिघडवली, कायदा हातामध्ये घेतला असे शासकीय उत्तर आले होते. या विषयामध्ये आता फार काही बोलून उपयोग नाही. कारण न्यायालयामध्ये चार्जशिट गेलेली आहे हे ही मला माहीत आहे. परंतु वस्तुस्थिती आपल्या डोळयासमोर यावी म्हणून मी सांगत आहे. दिनांक २६ जानेवारी, २०२१ रोजी घटना घडली त्यापूर्वी दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी सर्व ग्रामस्थांनी पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना लक्षात आणून दिले होते की, या ठिकाणी सातत्याने गोवंश हत्येचा प्रकार होतो. परंतु जिल्ह्याच्या पोलीस प्रमुखांनी किंवा डीवायएसपींनी तिथे कुठेही भेट दिली नाही. चार दिवसानंतर प्रजासत्ताक दिन आहे त्यामुळे इथे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता आहे म्हणून त्यांनी तिथे भेट देऊन काळजी घ्यायला पाहिजे होती. परंतु त्यांनी तिथे हलगर्जीपण दाखवला आहे. आपल्याच निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, तिथे दिनांक २६ जानेवारी, २०१९ रोजी पुन्हा गोहत्येचा प्रकार झाला. त्यातून दंगल उसळली. तर मी आपल्याला सांगू इच्छितो की, त्यातून दंगल उसळली नाही. यासाठी लोकांनी जाब विचारला कारण सकाळी प्रजासत्ताक दिन होता. माननीय मंत्र्यांनी याबाबत दखल घ्यावी. तेथील तहसिलदार श्री. अमोल कदम आणि तेथील पीआय श्री.अनिल गंभीर हे तिथे रात्री २.०० नंतर पोहोचले आणि त्यांनी ते वातावरण शांत केले. लोक झेंडा वंदनासाठी निघाले आणि तेवढयात श्री. नांदेडकर नावाचे एक डीवायएसपी खेड वरु उलट आहे. तेव्हा लोक उलट आपल्या घरी जात होते. त्याला असे वाटते की, जमाव उलट दिशेने जात आहे त्याअर्थी कुठेतरी हल्ला करायला जात

श्री. भास्कर जाधव...

असेल. तेव्हा त्याने मागचा पुढचा विचार न करता तेथील अधिकाऱ्यांकडून माहिती न घेता त्याने डायरेक्ट लाठीचार्ज सुरु केला. मग त्यातून पुढचा प्रकार झाला. लोक झेंडावंदनसाठी जात होते हे आपण पुन्हा खात्री करुन घ्या. तरी देखील हा प्रकार घडला.

अध्यक्ष महोदय, अजून एका घटनेचा तर उल्लेखच झाला नाही. तो म्हणजे माझ्या चिपळूण मतदारसंघापासून ३ किमी अंतरावर कामता येथे तोच प्रकार झाला. तिथेही चार गुरांची हत्या झाली. आज बोरज या ठिकाणचे उत्तर देण्यात आलेले आहे. तिथही गोवंश हत्या झाली. त्यानंतर पुन्हा खेडमध्ये चिंचघर ७०० ते ८०० किलो मांस आता १५ दिवसांपूर्वी मिळाले. ही पाचवी घटना आहे. या पाच घटना सातत्याने घडत आहेत. या ठिकाणी कोकरे महाराजांच्या येथील जनावरे होती असे एका घटनेत सांगितले आहे. त्याचे आरोपी पकडण्यात आले म्हणून सांगितले परंतु कोकरे महाराजांच्या इथून जी जनावरे आली तिथे गोशाळा आहे. ती जनावरे इथे कशी आली आणि हत्या करणाऱ्या लोकांच्या हाती कशी लागली याचाही आपण तपास केलेला नाही. आपणसांगत आहात की, तिथे पोलिसांचे फिरती पथक ठेवण्यात आले आहे. लोटे एमआयडीसीमध्ये असणाऱ्याा पोलीस स्टेशच्या दोन्ही बाजूला २०० मीटरवर या सर्व घटना घडल्या आहेत. त्यामुळे इथे कायदा आणि सुव्यवस्था बिघडू शकते, जातीयवाद इथे उफाळून येऊ शकतो तसेच दोन धर्मामध्ये तेढ निर्माण होऊ शकते. तसे भविष्यात होऊ नये याची काळजी घेण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे. त्यासाठी मी ही लक्षवेधी सूचना आणलेली आहे आणि आपण ती सभागृहामध्ये मांडू दिली त्याबद्दल आपले धन्यवाद ! तसेच माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना सुद्धा मी धन्यवाद देतो की त्यांनी याबाबत पुढाकार घेतला.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांना माझे दोनच प्रश्न आहेत. ती जनावरे इथे कशी आली, कोणत्या मार्गाने, कोणत्या प्रकारे आली आणि हत्या करणाऱ्या लोकांच्या हाती कशी लागली याची चौकशी झाली पाहिजे. कारण पुन्हा पुन्हा तेथील जनावरे येतात अशा संशय आहे. दुसरी बाब अशी आहे की,अशा घटना पुन्हा होणार नाहीत याची दखल घेण्यासाठी आजुबाजूला असणाऱ्या पोलीस चौकीला स्वतंत्रपणे काय काळजी घेण्यासाठी सांगणार आहात ? यामध्ये सापडणारे आरोपी हे सातत्याने

श्री. भास्कर जाधव....

मुंब्रा येथून येतात. हे आम्हाला कळत आहे. इथे येऊन हे आरोपी सामाजिक वातावरण बिघडवत असतील तर आपण त्यांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी काय उपाययोजना करणार आहात ?

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून तीन महत्त्वाचे प्रश्न विचारलेले आहेत. दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी जो गुन्हा घडला त्यामध्ये ४ आरोपींना अटक केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव हे म्हणत आहेत त्याप्रमाणे यातील दोन आरोपी मुंब्रा आणि दोन आरोपी भिवंडी येथील आहेत. १ ते १.५ वर्षापूर्वी याच अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी एक लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केलेली होती. त्यावेळी आपण कडक कारवाई करण्याचे निर्देश दिलेले होते.

अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की या परिसरामध्ये सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेमध्ये उल्लेख केलेले दोन आणि अधिकचे एकूण तीन गुन्हे घडलेले आहेत. ही लक्षवेधी सूचना रात्री १.३० वाजता आमच्याकडे आली. त्यामुळे मला आज उशिर झाला त्यामुळे दिलगिरी व्यक्त करतो. कारण अधिकाऱ्यांना बोलावून सकाळी ६.०० वाजेपासून मी त्यांच्याकडून ब्रिफिंग घेत आहे. आज विधानसभा सभागृहात दोन आणि विधान परिषद सभागृहात एक अशा गृह विभागाच्या एकूण तीन लक्षवेधी सूचना आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांना मी विनंती करेल किंवा त्यांच्या निदर्शनास आणून देईल की, हा गुन्हा रजिस्ट्रर क्रमांक ६६/२०२२ फेब्रुवारी महिन्यातील आहे. यामध्य एक आरोपी आणि ७०० किलो मांस पोलिसांना पाठलाग करुन गस्तीदरम्यान पकडले आहे. आपण म्हणता की, पोलिसांना वरवर गस्त घालायला सांगितली हे बरोबरच आहे. परंतु तीन गुन्ह्यापैकी एका गुन्ह्यातील आरोपी हा पोलिसांनी संशय आल्यानंतर रात्र गस्तीच्या दरम्यान पकडला आहे. तयाच्याकडून ७०० किलो मांस जप्त करुन त्यातील तीन आरोपींना अटक देखील केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांच्या मताशी मी सहमत आहे की,लोटे ता. खेड या गावात मुक्ती धाम नावाची गोशाळा आहे. तिथे श्री. विठ्ठल

श्री. शंभुराज देसाई...

कोकरे नावाचे गृहस्थ आहे ते ही गोशाळा चालवितात. परत परत तेथीलच जनावरे कशी काय चोराला जातात, या प्रश्नाच्या खोलवर जाणे गरजेचे आहे. कारण तिथून चोरी होते तर त्या गोशाळेला कंपाऊंड नाही काय, गोशाळेचे नियम न पाळता ती चालवली जाते काय किंवा यामध्ये आण्खी काय वेगळे षडयंत्र आहे ? सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी जी शंका व्यक्त केली आहे त्याबाबत जिल्ह्यातील स्थानिक गुप्तचर विभागाच्या पोलिसांना सांगून याची निश्चितपणे चौकशी केली जाईल. याच्या खोलात जाऊन यामध्ये काही षडयंत्र असेल तर याच्या मुळात कोण आहे हे सुद्धा लवकरात लवकर शोधून काढले जाईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी तिसरा प्रश्न असा विचारला की, फक्त गस्ती नाही त्या त्या परिसरामध्ये पाच गुन्हे घडणे हे सुद्धा गंभीर विषय आहे त्यामुळे जिल्हा पोलीस अधिक्षकांना आजच सभागृहाचे पहिले सत्र संपल्यानंतर मी स्वत: दूरध्वनीवरून संदेश देतो की कोणत्याही परिस्थितीमध्ये अशा प्रकारचे गुन्हे थांबविण्यासाठी जे करावे लागेल ते करावे. या सर्व मोहिमेवर जिल्हा पोलीस अधिक्षकांनी मॉनिटरिंग करावे. कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये जर अशा प्रकारे सतत गोवंशाची हत्या किंवा चोरीचे प्रकार घडत असतील तर तेथील पोलीस प्रभारी अधिकाऱ्यांना त्यासाठी जबाबदार धरले जाईल.

श्री. मंगलप्रभात लोढा : अध्यक्ष महोदय, आपल्या मार्फत माननीय मंत्र्यांना विनंती आहे की, या प्रकरणामध्ये जे पाच सांगितले आरोपी असतील त्यांचे नाव सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावेत. माननीय माजी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे सरकार असताना त्यावेळी ॲनिमल वेलफेअर बोर्डचे गठन केले होते. या बोर्डाचे इन्स्पेक्टर हे गोरक्षक एनजीओप्रमाणे काम करतात. ती सर्व रचना आता नाही. माननीय संसदीय कार्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत परंतु आता माननीय पशुसंवर्धन मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाही. दुसरा प्रश्न असा आहे की, आपण परत ॲनिमल वेलफेअर बोर्डचे गठन करणार काय ?

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. मंगलप्रभात लोढा.....

ॲनिमल वेलफेअर बोर्डचे पुन्हा गठन केले जाणार काय ? पूर्ण देशात जेथे गोशाळा आहेत तेथे सरकार १०० किंवा२०० रु. प्रति प्राणी या प्रमाणे अनुदान दिले जाते. मात्र आपल्याकडे असे अनुदान दिले जात नाही. एकाच गोशाळेतून घटना कशी घडत आहे हे आपण विचारु असे आता सांगितले आहे. अनेक ठिकाणी लोकांकडून मिळणारे अनुदान एकत्रित करुन गोशाळा चालवली जाते. माझे ३ प्रश्न आहेत. १) आरोपीचे नाव काय ? २) ॲनिमल वेलफेअर बोर्डचे गठन सरकार लगेच करणार काय ? ३) गोशाळाअनुदान योजना देशात सुरु आहे, तशी योजना राज्यात सुरु करणार काय ?

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, पहिला प्रश्न गृह विभागाशी संबंधित आहे. त्याचे मी उत्तर देतो. दि. १७/१/२०२२ रोजी गुन्हा घडला आहे. भा.दं.सं. कलम ४२९ तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ (अ), ५७ब), व ५(९) प्रमाणे गु.र.क्र. ३२/२०२२ दाखल करण्यात आला आहे. आरोपी क्र. १, मोहम्मद समीर मोहम्मद नजीम शेख, वय २७, मुंद्रा आसीफ ऊर्फ बटन मोहम्मद आरिफ कुरेशी, राहणार ट्रॉंबे, आरोपी क्र.३ शाहरुख कुरेशी राहणार भिवंडी, आरोपी क्र. ४ फिरोज जिब्रा, राहणार निजामपूर,भिवंडी अशी या आरोपींची नावे आहेत. पशुसंवर्धन विभागाशी संबंधित दोन प्रश्न आहेत. सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या माननीय पशुसंवर्धन मंत्री यांच्या निदर्शनास आणून दिल्या जातील.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मी एकच सुधारणा करतो. ही गोशाळा असून मागील सरकारमधील माननीय मंत्री श्री. एकनाथ खडसे यांनी त्याकरिता एक कोटी रुपये शासनाकडून मिळवून दिले होत. आपण निधी दिला आहे, गोशाळा उभी करण्यास मदत केलेली आहे हे मला सांगायचे आहे.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, आरोपी गोवंश हत्या करण्यासाठी तेथे गेले होते. आरोपी मोहम्मद, आसिफ ,शाहरुख व फिरोज यांचे तेथील गावाशी काय संबंध होता, याची माहिती पोलिसांनी घेतली पाहिजे. गोवंश हत्येच्या कारणास्तव ते गेले असतील तर आपण प्राणी संरक्षण कायद्यानुसार त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. मात्र ते योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी उल्लेख केला त्याप्रमाणे दोन धर्मांमध्ये तेढ निर्माण करणे हा त्या मागील हेतू आहे. या बाबत तपास करुन ते कलम जर अशा प्रकारे लावले असेल तर ते बदलले जाणार काय ? गोशाळा मालकांचा शोध घेतला असता मुक्तीधाम गोशाळा, लोटे येथील मालक श्री.विठ्ठल कोकरे महाराज यांची ही गोशाळा असल्याचे आढळून आले आहे. तेथूनच जनावराची चोरी का होते, यामागे षडयंत्र आहे काय, हे पाहिले जाणार आहे. इकडचे ४ आरोपी पकडले म्हणून त्यांचे ४ जण पकडायचे असे केले जाणार आहे काय ? हे योग्य आहे काय ? आपल्याला आरोपी सापडले आहेत. घरची गाय असते ती सायंकाळी घरी आली नाही की, माणूस बाहेर शोधायला जातो. गोशाळेत २०० ते ५०० गायी असतात. त्यांना कोठे शोधायचे. त्यांना संभाळणाऱ्या एका माणसाकडे किती गायी देतात हे ठरलेले नसते. यामुळे या गायी चोरणे सोपे असते. असे लोक तेथील गायी चोरतात. आपला हेतू विठ्ठल कोकरे महाराजांना फसवायचे किंवा षडयंत्र शाबित करायचे, किंवा त्यांच्याच गायी कशा चोरी जातात असे करणे योग्य होणार नाही. म्हणून गोवंश हत्येच्या निमित्ताने मुंब्रा, ट्रॉम्बेहून आरोपी तिकडे गेले आहेत. त्यांच्यावर प्राणी संरक्षक कायदा सोडून भारतीय दंड संहिता अन्वये जे गुन्हे लागू असतील ते लागू करणार काय ?

श्री. शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर देतो. जे ४ आरोपी आहेत त्यांचा स्थानिक लोटे परिसरामध्ये रहिवास नाही. ते मुंबईमधील ट्रॉंबे, मुंब्रा येथील रहिवासी असून तेथे कसे गेले याचा शोध घेतला जाईल. पहिल्यांदाच ते तेथे गेले आहेत काय, पूर्वीच्या काही प्रकरणात ते आरोपी आहेत काय किंवा त्यांच्या

श्री. शंभुराज देसाई .....

जवळचे कोणी आहे, काही रॅकेट आहे काय या दृष्टीने तपास केला जाईल. खोलवर माहिती घेतली जाईल. काही षडयंत्र असेल, सातत्याने मुंबई, मुंब्रा, ट्रॉंबे मधून कोकणात जाऊन असे प्रकार घडत असतील तर ते तपासून घेतले जाईल. अधिक कडक कलम लावण्याची वेळ आली तर तपासून योग्य ती कारवाई केली जाईल. लोटे गोशाळेचा उल्लेख या करिता केला की, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सांगितले की, तेथूनच सातत्याने जनावरांची चोरी होत आहे. एकाच गोशाळेतून चोरी होत असेल तर तेथे सुरक्षिततेच्या उपाययोजना आहेत काय, तेथील कोणी चोरी करणाऱ्यांना सामील आहे काय याचा विचार करावा लागेल. आम्ही गोशाळा चालकांवर संशय घेत आहे असे नाही. यांचे ४ आरोपी पकडले म्हणून त्यांचे ४ पकडा असा उद्देश पोलीस व गृह विभागाचा नाही. एकाच ठिकाणी चोरी होत आहे. बाजारपेठेत एकच दुकान ३-४ वेळा फोडले जात असेल तर आपण त्याची खोलवर चौकशी करतो. त्यानुसार या बाबत खोलवर जाऊ. दोन्ही जाती धर्मांमध्ये भेदभाव करण्याची आवश्यकता नाही. या संबंधी मुळाशी कोण आहे, हे शोधून काढणे पोलिसांचे काम असून ते तातडीने केले जाईल.

पृ. शी. : राज्यातील पोलीस कर्मचारी /अधिकाऱ्यांच्या विविध समस्या सोडवणे

मु. शी. : राज्यातीलपोलीस कर्मचारी /अधिकाऱ्यांच्या विविध समस्या सोडवणे या संबंधी श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पोलिसांच्या कामाचे तास जास्त असल्याने कामाचा ताण असणे, इतर कर्मचाऱ्यांना कामाचा आठवडा पाच दिवसाचा असणे, पोलिसांचा कामाचा आठवडा सात दिवसाचा असणे, पोलीस खात्याच्या अनेक जमिनी असून देखील पोलिसांच्या राहत्या घराचा तसेच पोलिस वसाहतीचा प्रश्न सातत्याने निर्माण होत असणे, अनेक पोलीस कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय मोडकळीस आलेल्या पोलिस वसाहतीमध्ये निवास करत असणे, त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणे, पोलिसांना चांगली सुविधा पुरवणाऱ्या कॅशलेस हॉस्पिटल (Cashless Hospitals) ची संख्या कमी असल्याने पोलिस कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे, पोलिसांना हक्काच्या रजा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून न मिळणे, किरकोळ रजांची संख्या वर्षाला १२ वरुन २० करण्याची मागणी पोलीस कर्मचाऱ्यांकडून होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.शंभुराज देसाई (गृह (ग्रामीण) राज्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. *

उपाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री. रोहित पवार : अध्यक्ष महोदय, आपल्या जीवनात सुरक्षा निर्माण करण्याकरिता पोलिसांचा वाटा अतिशय मोठा आहे. त्यांना काही जण मामा म्हणतात, काही साहेब म्हणतात तर महिलांना मॅडम म्हणतात. पोलीस कर्मचाऱ्यांविषयी ही लक्षवेधी सूचना मांडली आहे. लहानपणीपासून पोलीस व त्यांच्या गणवेशाचा आदर मला व राज्यातील प्रत्येक व्यक्तीला आहेच. काही वर्षांपासून कदाचित राजकीय फायदा घेण्याकरिता किंवा दुसऱ्या काही कारणांमुळे काही जण पोलिसांची बदनामी करीत असल्याचे आपण पाहिले आहे. ठराविक लोक कामचुकार असतील त्यांच्याबाबत मी बोलणार नाही. अशा राहकीय वक्तव्यामुळे कष्टकरी पोलीस कर्मचाऱ्यांची बदनामी होत आहे असे मला वाटते. कोरोना काळात राज्यातील २६५ पेक्षा जास्त पोलीस कर्मचारी हुतात्मा झाले. म्हणजे २ लाख ११ हजार पोलीस कर्मचारी पैकी २७ हजार १६७ महिला कर्मचारी असून २५ टक्कयांपेक्षा जास्त म्हणजे ४२ हजार ४०४ अधिकारी व कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण झाली. त्यांना कोणतीही अडचण आली तरी कधीही ते आंदोलन, काम बंद करीत नाहीत. अशा व्यक्तींचे महत्त्वाचे प्रश्न मी मांडणार आहे.

अध्यक्ष महोदय, पोलिसांना चांगली आरोग्य सुविधा पुरवणाऱ्या कॅशलेस रुग्णालयांची संख्या वाढवता येईल काय अशी मी विचारणा केली होती. उत्तरात असे नमूद केले आहे की, अशी ४४७ रुग्णालये आहेत जेथे कॅशलेस सुविधा दिली जाते. महात्मा फुले जीवनदायी योजनेंतर्गत हजार पेक्षा अधिक रुग्णालये आहेत. ४४७ रुग्णालयांपुरते मर्यादित न ठेवता आणखी रुग्णालये वाढवता येतील काय ? निवृत्तीनंतर वाढलेल्या वयामुळे पोलिसांना आरोग्य सुविधांची गरज पडते. त्यामुळे निवृत्तीनंतर देखील राज्यातील पोलिसांना आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी मेडीक्लेम सुविधा देता येईल काय ? आपल्या सरकारने काही महिन्यांपूर्वी माझ्या मतदारसंघात पोलिसांची राहण्याची सोय व्हावी या करिता घरे दिली आहेत. या करिता मी आभार व्यक्त करतो.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.रोहित पवार ...

परंतु, ज्या घरात ते राहत होते ते अतिशय वाईट परिस्थितीत होते. ते एक खोलीचे घर असायचे. त्यामध्ये हे सर्व पोलीस अधिकारी रहायचे. आपल्या कुटुंबाला सुरक्षा देण्याकरिता हे पोलीस स्वत:च्या कुटुंबाची पर्वा न करता १८-१८ तास काम करीत असतात.

अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवदेनामध्ये २ लाख ११ हजार पोलिसांपैकी फक्त ७३ हजार पोलिसांना आपण घरे देऊ शकल्याबाबत नमूद केले आहे. याचा अर्थ केवळ ४० टक्के लोकांना आपण घरे देऊ शकलो. मुंबई, पुणे या शहरांमध्ये तर १५०-१५० चौ.फुटांच्या घरात हे पोलीस राहतात. ६० टक्के व पोलीस अधिकारी व कर्मचारी घरापासून वंचित आहेत. मला मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, पुढच्या काही वर्षांमध्ये या सर्वांना घरे देण्यासाठी काय योजना करता येईल, त्याकरिता आपण काही टारगेट निश्चित करणार आहात काय?

अध्यक्ष महोदय, आदरणीय श्री.पवार साहेबांनी देखील या बाबतीत काही महिन्यांपूर्वी बैठक घेतली होती. त्यामध्ये देखील याबाबतीतील चर्चा झाली. त्यामुळे या सर्व लोकांना चांगली घरे मिळावीत, यासाठी आपल्याला काय करता येईल, त्यासाठी आपण पुढच्या काही वर्षामध्ये टारगेट निश्चित करणार आहात काय?

अध्यक्ष महोदय, शेवटचा प्रश्न मला येथे मांडावयाचा आहे. इतर सरकारी कर्मचाऱ्यांना आपण आठवड्यामध्ये ५ दिवस कामावर बोलावतो. पोलिसांच्या बाबतीत आपण तसे लगेचच करु शकणार नाही, याचा अंदाज मला आहे. पोलीस भरती झाल्यानंतर, मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ आल्यानंतर कदाचित याबाबतीत आपण निर्णय घेऊ शकतो. पोलिसांना आता किरकोळ रजा १२ आहेत. त्या येणाऱ्या काळात २० कशा करता येतील, असा प्रश्न मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना करु इच्छितो. धन्यवाद.

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रोहित पवार यांनी ज्या विषयावर लक्षवेधी सूचना केली आहे, त्यामध्ये आमच्या पोलिसांच्या संदर्भात

श्री.शंभूराज देसाई ...

असणाऱ्या सुविधा व पोलिसांवरील कामाचा ताण, अशा दोन वेगवेगळ्या मुद्दयांचा त्यांनी उल्लेख केलेला आहे. यामध्ये प्रथम मला हे सांगावे लागेल की, गृह विभागाच्यावतीने महिला कर्मचाऱ्यांना ८ तासच ड्युटी द्यावी, अशा पध्दतीचा आदेश दि.२७.१.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

अध्यक्ष महोदय, गृह विभागाने १२ दिवसांच्या रजा २० दिवस करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिलेली आहे. फक्त माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री व मंत्रिमंडळापुढे त्याचे सादरीकरण करुन त्यांची मान्यता घेणे बाकी आहे. परंतु, तो निर्णय देखील लवकरात लवकर केला जाईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रोहित पवार यांनी कॅशलेस हॉस्पिटल सुविधेबाबतचा मुद्दा मांडला. पूर्ण राज्यातील ३४७ दवाखाने याकरिता आपण शॉर्टलिस्ट केलेले आहेत. एकूण सर्व परिस्थिती पाहता, विभागाचे असे मत आहे की, हे पुरेसे आहेत. असे निदर्शनास आले की, दवाखाने कमी पडत आहेत किंवा उपचार वेळेत मिळत नाहीत, तर निश्चितपणे आपल्याला याबाबतीत सकारात्मक विचार करता येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रोहित पवार असे म्हणाले की, पोलिसांच्या निवासस्थानांची परिस्थिती खराब आहे, मोठ्या प्रमाणात निवासस्थानांचे बांधकाम करणे गरजेचे आहे. मी या ठिकाणी आवर्जून सांगेन की, महाविकास आघाडी सरकार येण्याआधीचे सन २०१८-२०१९ चे शेवटचे बजेट होते त्यामध्ये साधारणत: ४०० कोटी रुपयांची तरतूद ही पोलिसांच्या घराकरिता होती.

अध्यक्ष महोदय, आमच्या सन २०२१-२०२२ अर्थसंकल्पामध्ये माननीय वित्त मंत्री तसेच माननीय मुख्यमंत्री या दोघांनी पोलिसांना चांगली घरे असली पाहिजेत याकरिता ४४७ कोटी वरुन ७३७ कोटी रुपयांची तरतूद पोलिसांच्या हाऊसिंगकरिता केली. यावर्षी आपण ८०२ कोटी अधिक इतर खर्चांकरिता मिळून पोलीस गृहनिर्माणकरिता १०२९ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केलेली आहे.

श्री.शंभूराज देसाई ...

अध्यक्ष महोदय, या ३ वर्षांमध्ये पाहिले तर, ४००-४५० कोटी रुपयांवरुन जवळपास १ हजार कोटी रुपये इतकी तरतूद आपण पोलीस हाऊसिंगकरिता केलेली आहे. माझ्याकडे याबाबतची आकडेवारी आहे.

उपाध्यक्ष : सभागृहाच्या कामकाजाची वेळ सकाळी १०.५० पर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, यामध्ये काम सुरु असलेली निवासस्थाने ७२०५ आहेत. निविदा प्रसिध्द प्रकल्पांची संख्या १२३५ आहे. निविदास्तरावरील सेवा निवासस्थानांची संख्या २७२७ आहे. याचाच अर्थ या २ वर्षांमध्ये माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री या दोघांनी पोलीस हाऊसिंगकरिता पुरेशी तरतूद उपलब्ध करुन दिल्याने पोलिसांकरिता निश्चितपणाने लवकरात लवकर पुरेशी निवासस्थाने करण्याचा प्रयत्न राहणार आहे.

श्री.रोहित पवार : अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांचे आभार व्यक्त करतो की, त्यांनी सरकारच्या मदतीने पोलिसांच्या घराचा प्रश्न सोडविण्याकरिता एक चांगला असा प्लॅन केलेला आहे. फक्त किरकोळ रजेच्या बाबतीत मला मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की, ती १२ दिवसांवरुन २० दिवस करण्याबाबतचा विषय आपण नजिकच्या कॅबिनेटमध्ये विचारार्थ घेणार आहात काय?

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.रोहित पवार यांना मघाशी सांगितले आहे की, हे गृह विभागाने तत्वत: मान्य केलेले आहे. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय गृह मंत्री देखील याबाबत सहमत आहेत. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांची मान्यता घेऊन लवकरात लवकर यावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

श्रीमती सीमा हिरे : अध्यक्ष महोदय, मी या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने एक प्रश्न विचारु इच्छिते. आपल्याला ज्या प्रमाणे पोलीस वसाहतींची आवश्यकता आहे,

श्रीमती सीमा हिरे...

त्याच प्रमाणे अनेक पोलीस स्टेशन्स ४०-४० वर्षे जुनी झालेली आहेत. तेथे दिवसभर पोलीस, अनेक लोक, तक्रारदार यांना तेथे थांबावे लागते. त्यामुळे जी पोलीस स्टेशन्स जुनी झाली आहेत, ती नवीन करणे आवश्यक आहे, ती आपण नवीन करणार काय?

अध्यक्ष महोदय, पोलीस वसाहतीमध्ये पाण्याची लाईन, ड्रेनेजची लाईन अशी जी देखभालीची कामे असतात ती गृह विभागामार्फत केली जातात. परंतु, तेथील इतर कामे समजा नगरसेवकांना तेथे बेंचची व्यवस्था, खेळण्यांची व्यवस्था करायची असेल तर त्याकरिता गृह विभागाची परवानगी घ्यावी लागते. त्या नगरसेवकांशी जमत नसेल तर मुद्दाम परवानगी टाळली जाते किंवा लवकर देत नाही. त्यामुळे अशा काही गोष्टी म्हणजे देखभाल व गार्डनमधील छोटी-मोठी कामे महानगरपालिकेकडून करता आली तर, आपण ती करु देणार काय?

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सीमा हिरे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, ज्या पोलीस वसाहती एखाद्या नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रात आहेत तेथील, नगरपालिका, महानगरपालिकेच्या निधीतून किंवा नगरसेवकांच्या स्थानिक विकास निधीतून जर त्यांना तेथे सुशोभीकरण, बाग-बगिचा, पाण्याची योजना अशा काही सुविधा द्यायच्या असतील, तर तो कुठल्या पक्षाचा आहे, त्याचे जमत आहे की नाही, असा कोणताही विचार न करता आमदार निधीतून होणाऱ्या योजनासारख्या योजना जर नगरसेवक निधीतून पोलिसांकरिता होत असतील तर त्याला देखील विशेष बाब म्हणून मान्यता दिली जाईल.

श्री.सुनील टिंगरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रोहित पवार यांच्या प्रश्नाला अनुसरुन माझा एक प्रश्न आहे. माझ्या मतदारसंघामध्ये वडगाव-शिंदे गावामध्ये पोलीस मेगा सिटी नावाचा एक प्रकल्प सुरु आहे. जवळपास १०० एकरामध्ये पोलिसांसाठी घरे अशा पध्दतीने तो प्रकल्प ७-८ वर्षांपूर्वी लाँच केला गेला.

श्री.सुनील टिंगरे...

अध्यक्ष महोदय, जवळपास १५ हजार घरांचा हा प्रकल्प आहे. पहिल्या टप्प्यामध्ये पोलिसांकरिता ८ हजार घरे उपलब्ध करुन देणार, असे सांगण्यात येत होते. बिलीमोरिया नावाच्या कंपनीने त्या ठिकाणी काम सुरु केले. परंतु, ८ वर्षे झाली. आजतागायत त्यांना कोणतेही घर दिलेले नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या प्रकल्पाला सरकारकडून कुठल्या प्रकारची सूट दिलेली आहे किंवा त्याला काही सुविधा दिल्या आहेत काय, ती घरे फक्त पोलिसांसाठी केली आहेत, हे स्पष्ट झाले तर बरे होईल.

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, या संदर्भातील माहिती घ्यावी लागेल. हा विषय या लक्षवेधी सूचनेच्या विषयाच्या स्कोपच्या बाहेरचा विषय आहे. या विषयाचा लक्षवेधी सूचनेत उल्लेख नव्हता. तरी देखील सन्माननीय सदस्यांकडून ते ठिकाण, तेथे कोणाकडून काम सुरु आहे याची सविस्तर माहिती घेतली जाईल व ती माहिती घेतल्यानंतर सकारात्मक दृष्टिकोन ठेवून योग्य तो विचार लवकरात लवकर केला जाईल.

डॉ.भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, सर्वप्रथम मी मंत्री महोदयांचे ८ तासांच्या ड्युटीच्या निर्णयाबाबत अभिनंदन करते. परंतु, सदरहू ८ तासांची ड्युटी महिला पोलीस अंमलदारांना प्रायोगिक तत्वावर दिलेली आहे.

नंतर श्री.शिंदे ...

डॉ.भारती लव्हेकर...

सदरहू सुविधा प्रायोगिक तत्वावर न ठेवता कायम स्वरुपी देणे आवश्यक असल्याने ती देण्यात यावी, कारण याचे चांगले परिणाम दिसून आले आहेत. त्यामुळे हा निर्णय घेण्यात यईल काय ? महिलांसाठी ३० टक्के आरक्षण असून पोलीस दलामध्ये १० ते ११ टक्के महिला पोलीस आहेत. हे प्रमाण कमी असल्याने ठरलेल्या प्रमाणानुसार भरती का करण्यात येत नाही व ती करण्यात येईल काय ? कारागृहामध्ये सर्वसाधारणपणे पुरुष व महिला कैदी यांचे स्वतंत्र बॅरेक असतात. महिला पोलिसांना पुरुष बॅरेकमध्ये सेवा देण्यात येऊ नये, तेथील पुरुष पोलिसांना माहिती आहे की तेथे वखवखलेल्या नजरा असतात म्हणून ते महिला पोलिसांना खूप मदत करतात. महिला पोलिसांची सेवा महिला कैदी यांचे बॅरेकसाठी व पुरुष पोलीस यांची सेवा पुरुष कैदी बॅरेकमध्ये उपलब्ध करुन देण्याकरिता कायदेशीर तरतूद मानवी दृष्टीकोनातून करण्यात येईल काय ?

श्री.शंभूराज देसाई : सन्माननीय सदस्या डॉ.भारती लव्हेकर यांनी ३ प्रश्न उपस्थित केले आहेत. महिला पोलिसांची ८ तास सेवा प्रायोगिक तत्वावर सुरु केल्यानंतर त्याचे चांगले परिणाम दिसून येत आहेत, ही सेवा कामयस्वरुपी देण्याकरिता पुढील निर्णय सकारात्मक घेण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, पोलीस भरती करीत असताना महिला पोलीस उमेदवारांसाठी नियमानुसार आरक्षण ठेवण्यात आले आहे. आता पहिल्या टप्प्यातील पोलीस भरतीची जाहिरात काढण्यात आली असून त्यामध्ये महिला पोलिसांसाठी आरक्षित जागा निश्चित केल्या आहेत. त्या या भरतीमध्ये पुरेपूर भरण्याचा प्रयत्न करण्यात येईल. कारागृहामध्ये महिला व पुरुष कैदी यांचे स्वतंत्र बॅरेक असतात हे बरोबर आहे. महिला कैदी यांच्या बॅरेकमध्ये महिला पोलीस यांची सेवा देण्याची पद्धत आहे, आदेश नाहीत. पुरुष कैदी बॅरेकमध्ये महिला पोलिसांची सेवा उपलब्ध करुन देऊ नये यासंदर्भात महासंचालक (जेल) यांचेशी चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री.बालाजी कल्याणकर : अध्यक्ष महोदय, माझ्या नांदेड मतदारसंघामध्ये पोलीस वस्ती मोठ्या प्रमाणात असून तिला ५० वर्षे झाली आहेत व ती मोडकळीस आली आहे. तेथील ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर येत आहे, त्यामुळे तेथे राहणे मुश्कील झाले आहे. पोलिसांनी खूप चांगले काम केले आहे. राज्य सरकारने पोलिसांना घरे देण्याचा निर्णय आज घेतला आहे. माझ्या मतदारसंघातील पोलिसांना घरे देण्याकरिता मंत्री महोदय विचार करतील काय ?

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी उपस्थित केलेल्या विषयाचा प्रस्ताव महासंचालक (हाऊसिंग) यांचेकडे प्राप्त झाला असेल तर त्यावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल व प्रस्ताव प्राप्त झाला नसेल तर तातडीने तो पोलीस अधीक्षक यांचेकडून मागवून त्यावर यावर्षी सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.कालिदास कोळंबकर : अध्यक्ष महोदय, श्री.दवे, आयुक्त यांनी पोलिसांना ५०० चौ.फुटाची घरे ३० लाख रुपयांमध्ये देण्यात यावी, असा प्रस्ताव शासनास पाठविला आहे. उक्त प्रस्तावाच्या संदर्भात कोणता व केव्हा निर्णय घेण्यात येईल ? मागील सरकारमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणी ४ दिवसांमध्ये निर्णय जाहीर करतो, असे सांगितले होते, परंतु दोन दिवसांनी आचारसंहिता लागल्यामुळे तो निर्णय झाला नाही. मुंबईतील पोलीस हाऊसिंगच्या प्रस्तावाचा शासन विचार का करीत नाही ? पोलीस सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना २० लाख रुपये रक्कम मिळते. त्यानंतर त्यांना त्यांच्या वसाहतीतून निघून झोपड्यांमध्ये जाऊन रहावे लागते. उक्त पोलीस हाऊसिंगच्या संदर्भात आपण निर्णय जाहीर करावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, शासकीय कर्मचारी यांना हक्काची घरे मिळाली पाहिजे या अनुषंगाने पोलीस दलातील इमारतींना ४ एफएसआय देऊन १ एफएसआयमध्ये बांधकाम करावे, १ एफएसआय विकासकाला व २ एफएसआय

श्री.रविंद्र वायकर...

पोलिसांना देण्यात यावा. या अनुषंगाने ज्यांची सेवा पोलीस दलामध्ये ३० वर्षे झाली आहे त्यांना बांधकामाच्या किंमतीमध्ये घरे देण्याचा निर्णय मागील वेळी घेण्यात येणार होता. त्याबाबत मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री.रविंद्र वायकर व कालिदास कोळंबकर यांनी उपस्थित केलेले प्रश्न या लक्षवेधी सूचनेच्या कक्षेच्या बाहेरील आहेत. त्यासंदर्भात माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

असुधारित प्रत

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

उप सचिव **:** अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते १९४ या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपाध्यक्ष: निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक १ ते १९४ ही निवेदने कृपया छापावीत.)

असुधारित प्रत

उपाध्यक्ष : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी १०.५७ ते ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत

(स्थगितीनंतर)

(अध्यक्षस्थापनी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.संजय शिरसाट)

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

वणी (जि.यवतमाळ) पंचायतसमिती अंतर्गत शिक्षकांचे नियमबाहय समायोजन केल्याबाबत

(१) * **४३८६९ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) येथील पंचायतसमिती अंतर्गत काही केंद्रात अतिरिक्त शिक्षक असून केंद्रातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असतांना गटशिक्षणाधिकारी यांनी शासनाचे नियम डावलून शिक्षकांचे नियमबाहय समायोजन करण्यात आले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमबाहय समायोजन करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड : (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे दिले आहे व दुसऱ्या व तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर "प्रश्न उद्भवत नाही". असे एवढे संक्षिप्त स्वरुपात दिले आहे. परंतु तेथील वस्तुस्थिती वेगळी आहे. या प्रश्नांच्या अनुषंगाने सर्व माहिती माझ्याकडे आहे. वणी येथे गरज नसताना देखील अनेक शिक्षकांचे समायोजन करण्यात आलेले आहे.

ता.प्र.क्र. ४३८६९.....

प्रा.वर्षा गायकवाड.....

अध्यक्ष महोदय, चिलई शाळेतील शिक्षकांचे समायोजन नेळापूर येथील शाळेमध्ये करण्यात आले आहे. अन्य एका शाळेतील एका शिक्षिकेचे समायोजन ढाकोरी येथील शाळेमध्ये करण्यात आले आहे. विशेष बाब म्हणजे समाजशास्त्र विषयाची शिक्षिका ढाकोरी येथे अतिरिक्त असताना देखील अन्य शाळेतील महिला शिक्षिकेचे त्या शाळेमध्ये समायोजन करण्यात आले आहे. अशा अनेक ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने शिक्षकांचे समायोजन करण्यात आलेले आहे. याबाबतची तक्रारी शिक्षण संघटनेनेच दिली होती. त्यानंतर मी गट विकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केली व त्या अनुषंगाने चर्चा देखील केली. त्यानंतर संबंधित शिक्षकांचे समायोजन रद्द करण्यात आले.

अध्यक्ष महोदय, पंचायत समिती, वणी येथे शिक्षकांची एकूण ५२३ पदे आहेत. त्यापैकी ४२० पदे भरण्यात आलेली आहेत. जवळपास २५ टक्के पदे रिक्त आहेत. वणी येथील पंचायत समितीचे कार्यक्षेत्र खूप मोठे आहे. यानिमित्ताने मंत्री महोदयांना माझे फक्त दोन प्रश्न आहेत. वणी, झरी जामणी व महागाव या पंचायत समिती कार्यक्षेत्रातील शिक्षकांची रिक्त पदे भरणार आहात काय? ज्या अधिकाऱ्यांनी नियमबाह्य पद्धतीने समायोजन, प्रतिनियुक्ती व बदल्या केलेल्या त्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन कारवाई करणार आहात काय?

प्रा.वर्षा गायकवाड : संच मान्यतेनुसार सन २०१८-१९ मध्ये चार शिक्षक अतिरिक्त ठरले होते. त्यामुळे सन २०१७ च्या शासन निर्णयानुसार संबंधित शिक्षकांचे समायोजन करण्यात आले. काही शाळेतील विद्यार्थी संख्या जास्त असल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने गट शिक्षणाधिकारी आणि गट विकास अधिकारी यांनी त्या शाळेमध्ये सदर शिक्षकांचे समायोजन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आपला दुसरा प्रश्न हा पहिल्या प्रश्नांशी निगडीत आहे. शिक्षकांची पदे भरण्यात आली तर त्या शिक्षकांना इतर ठिकाणी पाठविण्याची कोणतीही आवश्यकता नाही.

ता.प्र.क्र. ४३८६९.....

प्रा.वर्षा गायकवाड.....

अध्यक्ष महोदय, आज आढावा घेताना संबंधित सर्व अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत की, पुढील एका महिन्यामध्ये ज्या शाळेमध्ये शिक्षकाचे पद रिक्त आहे, अशा सर्व शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात यावे.

श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार : अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न असा आहे की, जे शहरामध्ये राहणारे शिक्षक आहेत, त्यांना त्यांच्या घराजवळच्या शाळेमध्ये समायोजित केले आहे. अन्य शिक्षकांना मात्र शहरापासून जवळपास ३०-४० कि.मी. अंतरावरील शाळेमध्ये समायोजित करण्यात आले आहे. अशा प्रकारचे समायोजन चुकीच्या पद्धतीने करण्यात आलेले आहे. ज्या अधिकाऱ्यांनी समायोजनाची व प्रतिनिक्तीवर पाठविण्याची कार्यवाही केली त्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन योग्य ती कारवाई करणार आहात काय?

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, मला महिली मिळाल्यानुसार ज्या शाळेमध्ये अतिरिक्त विद्यार्थी होते, त्या शाळेमध्ये शिक्षकांची आवश्यकता होती म्हणून त्या शिक्षकांची तेथे तात्पुरत्या स्वरुपाची नियुक्ती करण्यात आली होती. त्या शिक्षकांच समायोजन करण्यात आले नाही. तेथील अतिरिक्त विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे शिक्षण मिळावे, या दृष्टीने संबंधित गट विकास अधिकारी यांनी त्या शिक्षकांची नियुक्ती केली होती. तरी देखील सन्माननीय सदस्यांच्या मागणीनुसार उक्त प्रकरणाची चौकशी करण्याबाबत उप संचालक, शिक्षण यांना सूचना देण्यात येतील.

श्री.सुभाष धोटे : अध्यक्ष महोदय, शिक्षकांच्या बदल्यासंदर्भात ग्रामविकास व शिक्षण विभागाने एक धोरण निश्चित केलेले आहे. त्या धोरणामध्ये अवघड क्षेत्र व सरळ क्षेत्र अशा प्रकारचे ७ नॉर्म्स देण्यात आलेले आहेत. चंद्रपूर जिल्ह परिषदमध्ये अवघड क्षेत्र आहे. त्या क्षेत्राला शिक्षाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सरळ क्षत्रे म्हणून जाहीर केले आहे. या निर्णयामुळे त्या भागातील शिक्षकांवर अन्याय

ता.प्र.क्र. ४३८६९.....

श्री.सुभाष धोटे.....

झालेला आहे. त्यामुळे उक्त प्रकरणी चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश देणार आहात काय?

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न यवतमाळ जिल्ह्यासाठी होता. परंतु सन्माननीय सदस्यांनी चंद्रपूर येथील प्रश्न उपस्थित केलेला आहे. तरी देखील ही बाब तपासून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

असुधारित प्रत

आष्टी (जि.बीड) येथील नवीन बस स्थानकाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(२) * ४३८४८ श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) येथील नवीन बस स्थानकाचे काम गत दोन वर्षांपासून बंद असल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जुन्या बस स्थानकातील स्वच्छतागृह जमीनदोस्त केल्यामुळे महिलांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन बस स्थानकाचे बांधकाम बंद असण्याची कारणे काय आहेत तसेच सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

ॲड. अनिल परब : (१), (२), (३), व (४) सदर बस स्थानकाचे बांधकाम डिसेंबर, २०१९ ला सुरु करण्यात आले. मात्र कोवीडमुळे बांधकाम बंद होते. सध्यस्थितीत जोत्याचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर बांधकाम हे सदयाच्या बस स्थानकाच्या पाठीमागील बाजूस सुरु असून बसस्थानकाची विदयमान इमारत पाडण्यात आलेली नसुन सदर बसस्थानकामधुन वाहतुक सुरु आहे.

कोरोना काळात बस स्थानकावरील फिरते स्वच्छतागृह नगर पालिकेने काढुन घेतले असल्याने सदर रेडीमेड स्वच्छतागृह पुन्हा बस स्थानकावर ठेवण्यासाठी कार्यवाही सुरु आहे.

श्री.बाळासाहेब आजबे : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये आष्टी आणि कडा या दोन बसस्थानाकाची कामे मंजूर आहेत. तरी देखील कडा येथील बस स्थानकाचे काम अद्याप सुरु करण्यात आलेले नाही. आष्टी बस स्थानकाचे काम तीन वर्षापूर्वी सुरु केले होते. परंतु अद्याप ते काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे तेथील लोकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. नवीन बस स्थानकाचे काम करावयाचे असल्यामुळे जुने बसस्थानकातील टॉयलेट व बाथरुम पाडण्यात आले आहे. तीन वर्षापासून संबंधित

ता.प्र.क्र. ४३८४८.....

ॲड.अनिल परब.....

कंत्राटदार काम करण्यास तयार नाही. याबाबत माननीय परिवहन मंत्री ॲड.अनिल परब यांच्याकडे पत्रव्यवहार देखील केलेला आहे. उक्त बसस्थानाकाचे काम केव्हा सुरु करुन ते केव्हा पूर्ण करणार आहात, याबाबतची माहिती देण्यात यावी.

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, मागील तीन वर्षापूर्वी आष्टी येथे नवीन बसस्थानक बांधण्याची कार्यवाही सुरु केली होती. परंतु पहिल्या वर्षामध्ये उक्त बांधकामास नगरपंचायतीने परवानगी दिलेली नाही. म्हणून सदर बांधकाम पहिल्या वर्षामध्ये प्रत्यक्षात सुरु झाले नव्हते. परंतु ते दुसऱ्या वर्षामध्ये सुरु झाले होते. मध्यंतरी कोरोनाचे संकट आल्यामुळे ते काम अद्याप पूर्ण झालेले नाही. परंतु माननीय श्री.अजित पवार यांनी उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून उक्त कामाची सुरुवात केलेली आहे. संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्याशी चर्चा करुन सदर काम सुरु करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे उक्त कामाची सुरुवात करुन सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

श्री.नारायण कुचे : अध्यक्ष महोदय, सन १९९२ मध्ये माझ्या बदनापूर तालुक्याची निर्मिती झालेली आहे. परंतु अद्याप त्या ठिकाणी बसस्थानकाची व्यवस्था करण्यात आलेली नाही. याबाबत मागील सरकार मधील परिवहन मंत्री माननीय श्री.दिवाकर रावते यांच्याकडे देखील बैठक घेऊन पाठपुरावा केलेला आहे. तरी देखील माझ्या तालुक्यातील बसस्थानकाचा प्रश्न मार्गी लागला नाही.

अध्यक्ष महोदय, बदनापूर हे शहर राष्ट्रीय महामार्गावर असून या तालुक्यामध्ये एकूण १०० गावे आहेत. माझ्या मतदारसंघामध्ये एकूण ९२ ग्रामपंचायती आहेत. बदनापूर येथील बसस्थानक बांधण्यासाठी परिवहन विभागाने जागेसह मान्यता दिली तर मी माझा आमदार निधी उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. त्यामुळे तेथील बसस्थानकासाठी आपण जागा उपलब्ध करुन त्यास मान्यता देणार आहात काय?

ता.प्र.क्र. ४३८४८.....

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचे जनतेप्रती असलेली तळमळ मी समजू शकतो. परंतु याबाबतीतले प्रश्न एकमेकामध्ये गुंतलेले असल्यामुळे उक्त प्रकरणी संबधित अधिकारी व आपल्यासमवेत एक वेगळी बैठक घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री.शेखर निकम : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील चिपळूण शहर हे मध्यवर्ती ठिकाण आहे. तेथील बसस्थानक मागील तीन वर्षांपासून बंद आहे. त्या ठिकाणी थांबण्यासाठी देखील जागा नाही. त्यामुळे चिपळूण येथील बसस्थानकाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मी विनंती करतो.

ॲड.अनिल परब : मागील दोन वर्षांपूर्वी सुरु झालेल्या बसस्थानकांची कामे कोरोनामुळे अर्धवट अवस्थेमध्ये आहेत. राज्यातील ३९ बसस्थानकांची कामे ७० ते ८० टक्के पूर्ण झालेली आहेत. १६ कामे ५० ते ६० टक्के पूर्ण झालली आहेत. २१ कामे दरवाढ न केल्यामुळे ती बंद करण्यात आलेली आहेत. वरील सर्व कामे प्राधान्याने हाती घेतलेली आहेत. राज्यातील अनेक बसस्थानके खराब होत आहेत. त्यामुळे बसस्थानक बांधकामाबाबत बीओटी धोरण आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. ग्राहकांना चांगली सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. बीओटी तत्त्वावर बसस्थानके उभारण्यासंदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांची अभिप्राय घेऊन शासन योग्य तो निर्णय येईल. चिपळूण येथील बसस्थानकाचे काम लवकरात लवकर सुरु करुन ते पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

जळगाव जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांच्या शिधापत्रिकांवर बारा अंकी बारकोड नसल्यामुळे धान्याचा लाभ मिळत नसल्याबाबत

(३) * ४२५८१ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील सुमारे तीन हजार शिधापत्रिका धारकांच्या शिधापत्रिकांवर बारा अंकी बारकोड क्रमांक नसल्यामुळे धान्याचा लाभ मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राधान्य कुटुंब गट व अंत्योदय योजनेत समाविष्ट असलेल्या जळगाव शहरातील शिधा पत्रिका धारकांना त्यांच्या शिधापत्रिकेवर बारा अंकी बारकोडचा शिक्का तहसील कार्यालयातून देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन शिधापत्रिका काढणे व त्यावर बारा अंकी बारकोड क्रमांक टाकून देण्यासाठी दलालांकडून ग्राहकांची आर्थिक फसवणूक होत असल्याच्या तक्रारी तसेच दुकानदार बारकोड असलेल्या शिधा पत्रिका धारकांनाही धान्याचा लाभ नाकारत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ : (१) हे खरे नाही.
(२) तहसिल स्तरावर शिधापत्रिकेची डाटा एंट्री शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली (RCMS) मध्ये करुन ती संगणकीकृत झाल्यावर शिधापत्रिकेस संगणक प्रणालीद्वारे बारा अंकी विशिष्ट क्रमांक दिला जातो.
(३) हे खरे नाही.

ता.प्र.क्र. ४२५८१ ....
श्री. छगन भुजबळ.....
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. शिरीष चौधरी : जळगाव जिल्ह्यातील सुमारे तीन हजार शिधापत्रिका धारकांच्या शिधापत्रिकांवर बारा अंकी बारकोड क्रमांक नसल्यामुळे धान्याचा लाभ मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय, असल्यास त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, हे मंत्री महोदयांनी सांगावे, अशी मी विनंती करतो.

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, १२ अंकी हा एक क्रमांक असतो. तो बारकोड नाही. मध्यंतरी ३ हजार रेशनकार्ड केवळ शोभेसाठी आहेत. परंतु त्यांना धान्य मिळत नाही, अशी बातमी आली होती. ३ हजार कार्ड असले तरी ते कार्ड प्राधान्य क्रमांकामध्ये येत असतील. म्हणजेच ग्रामीण भागासाठी ४४ हजार रुपये उत्पन्न मर्यादा आणि शहरी भागासाठी ५९ हजार रुपये उत्पन्न मर्यादेत आणि ते प्राधान्यक्रमामध्ये येत असतील तर त्या रेशनकार्डधारकांना धान्य दिले जाते. तसेच ते अंत्योदयमध्ये असतील तरीही त्यांना धान्य दिले जाते. केशरी रेशन कार्ड हे एक लाख रुपयांपर्यंच्या उत्पन्नधारकासाठी असते. परंतु शहरी भागामध्ये जर ५९ हजार रुपयांपेक्षा अधिकचे उत्पन्न असेल तर त्या रेशनकार्डधारकाला लाभ मिळत नाही. ते केवळ कार्ड असते. ते रेशनकार्ड प्राधान्यक्रमामध्ये येत नाही. परंतु जर शहरी भागामध्ये ५९ हजार रुपयांच्या उत्पन्न मर्यादेतील तर त्यावर प्राधान्य म्हणून शिक्का मारला जातो. त्या व्यक्तींना धान्य मिळत असते. यामुळे यात गैरसमज असा आहे की, जरी केशरी रेशनकार्ड असले तरी धान्य मिळत नाही. केशरी रेशनकार्ड असेल आणि ग्रामीण भागामध्ये ४४ हजार रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असेल तर त्या केशरी रेशनकार्डधारकाला धान्य उपलब्ध करुन दिले जात नाही. शहरी भागामध्ये ही उत्पन्न मर्यादा ५९ हजार रुपये इतकी आहे. दुसरे असे की, जेव्हा कोरोना काळ सुरु होता तेव्हा जे प्राधान्यक्रमामध्ये नव्हते, त्यांच्यासाठी काहीतरी उपाययोजना केली पाहिजे

ता.प्र. क्र. ४२५८१ ...
श्री. छगन भुजबळ.....
असे शासनाने ठरविले होते. त्यावेळेस जवळपास ६५० ते ७०० कोटी रुपये खर्च करुन २० रुपये, २२ रुपये किलोने धान्य खरेदी करुन ते ८ रुपये, १२ रुपये किलोने जे लोक प्राधान्यामध्ये येत नव्हते त्यांना दिले आहे. त्यांनतर ही योजना बंद केली आहे. परंतु आता लोकांना वाटत आहे की, पूर्वी धान्य मिळत होते आणि आता ते का मिळत नाही. मी सांगू इच्छितो की, कोरोना काळात जनतेसाठी तात्पुरती योजना तयार केली होती. राज्य शासनाने यासाठी निधी दिला होता. त्यातून मिळालेले धान्य एक तृतियांश इतक्या कमी भावामध्ये वितरित केले आहे. यामुळे हा गैरसमज आहे. तसेच या रेशनकार्डमध्ये परिपूर्ण माहिती नसेल तर या कारणामुळे त्या रेशनकार्डवर प्राधान्यक्रमाचा शिक्का मारुन ती त्या प्रणालीमध्ये येत नाहीत. ई-पॉस मशिनमध्ये त्यांचा समावेश होत नाही. म्हणून त्या रेशनकार्डधारकास धान्य मिळत नाही. अशा प्रकारे यात गैरसमज आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी ग्राहकांची आर्थिक फसवणूक झाली आहे काय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये हे खरे नाही, असे म्हटले आहे. मी सांगू इच्छितो की, जळगाव सिंधी कॉलनी येथील श्रीमती जागृती ललित सोनी यांनी तक्रार दिली आहे. रामेश्वर कॉलनीतील कारभारी विठोबा गव्हाणे, हमाल यांना अनेक वर्षापासून धान्य मिळत होते. परंतु आता १२ अंकी क्रमांकाचा शिक्का नसल्यामुळे ते तहसिल कार्यालयातील श्री. तडवी यांच्याकडे गेले होते. त्या तडवी यांनी त्या हमाल असलेल्या गव्हाणे यांना परत पाठविले. त्यानंतर तेथील दलाल त्यांच्याकडे ३ हजार रुपयांची मागणी करुन सांगातत की, आपण जर ३ हजार रुपये दिले तर त्यांच्या रेशनकार्डवर शिक्का मारून दिला जाईल. त्यानंतर हरी विठ्ठलनगर येथील एक विधवा महिला रंजना सुभाष दांडगे यांनादेखील अशाच प्रकारची अडचण आली होती. त्यांनी १२ क्रमांकाचा शिक्का रेशनकार्डवर मारुन देऊ असे त्यांना सांगितले होते. परंतु त्या तेथे गेल्यानंतर त्यांनाही परत पाठविले. श्री. साईनाथ किशोर पाटील यांनीही तहसिलदारांकडे तक्रार केली की, के.पी. पाटील यांचे रेशनधान्य दुकान कायमबंद असते. तसेच तेथून धान्य दिले जात नाही १२ क्रमांकाचा शिक्काही

ता.प्र. क्र. ४२५८१ ...
श्री. देवेंद्र फडणवीस.....
मारुन दिला जात नाही. अशा प्रकारची अनेक नावे माझ्याकडे आहेत. दिव्य मराठी या वाहिनीने या प्रकरणावर एक स्टोरी तयार केली आहे. जे पात्र लोक असूनही त्यांच्या रेशनकार्डवर १२ अंकी शिक्का मारला जात नाही. दुर्दैवाने दलालास पैसे दिले तर त्याच रेशनकार्डवर तो शिक्का मारुन देत असतो. म्हणून मी मंत्री महोदयांना दोन प्रश्न विचारु इच्छितो. मंत्री महोदयांकडे चुकीची माहिती दिलेली आहे. मी आता ज्यांनी तक्रारी केल्या आहेत त्यांची नावे वाचून दाखविली आहेत. तरीही ही माहिती मंत्री महोदयांनी तपासावी व ज्यांनी चुकीची माहिती दिली त्यांच्यावर कारवाई करावी. दुसरे असे की, जेवढे पात्र रेशनकार्डधारक आहेत, त्यांची नावे विभागाकडे असतात. त्या प्रत्येक रेशनकार्डावर पुढील १५ दिवसांमध्ये एक कॅम्प घेऊन शिक्का मारण्यात येईल, अशा प्रकारचा निर्णय केला तर दलालांचा सुळसुळाट बंद होईल आणि जे पात्र आहेत त्यांना धान्य मिळेल. याबाबत मंत्री महोदय आदेश देणार आहेत काय ?

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, तक्रारीमध्ये बारकोड क्रमांक नसल्यामुळे रेशनकार्डधारकांना धान्य नाकारले जात आहे काय, या प्रश्नाचे उत्तर खरे नाही, असे दिले आहे. आपल्याकडे बारकोड नसतो. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे जर अशा तक्रारी असतील तर त्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. मी जाहीर करतो की, पुढील १५ दिवसांमध्ये अशा प्रकारे जे लोक प्राधान्य क्रमामध्ये येतात परंतु अशा काही कारणामुळे त्यांना धान्य देण्याचे कोणी नाकारित असेल तर त्यांच्यावर गंभीर कारवाई केली जाईल. पुढील १५ ते २० दिवसांमध्ये ज्यांना धान्य मिळत नाही, त्यांनी विभागाचे पुरवठा निरीक्षक, तहसिलदार, महाफुड प्रणाली येथे तक्रार करावी. अशा प्रकरणाबाबत तात्काळ निर्णय घेतले जातील.

श्री. ज्ञानराज चौगुले : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, केशरी शिधापत्रिकाधारकांना धान्य दिले जात नाही. आता रोजगार हमी योजनेच्या

ता.प्र. क्र. ४२५८१ ...
श्री. ज्ञानराज चौगुले.....
कामावरील रोजगाराचेही किमान उत्पन्न हे ४४ हजार रुपयांपेक्षा जास्त होऊ शकते. त्यामुळे उपत्पन्नाची मर्यादा मंत्री महोदयांनी वाढविली पाहिजे. असे केले तर अतिरिक्त शिधापत्रिकाधारक निर्माण होतील व केशरी शिधापत्रिकाधारकांनाही धान्य मिळू शकेल. मंत्री महोदय त्यामुळे उत्पन्नाचा स्तर वाढविणार आहेत काय ?

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, याबाबत काही गैरसमज आहेत. ४४ हजार रुपये आणि ५९ हजार रुपयांची उत्पन्न मर्यादा का केली आहे, हे मी सांगू इच्छितो. केंद्र सरकारने अन्नधान्याचा जो कोटा दिला आहे तो अंत्योदयमध्ये ३५ किलो, इतर प्राधान्यामध्ये प्रत्येकी ५ किलो असा दिला आहे. हा कोटा कुठे संपतो, याचाविचार केल्यानंतर ४४ हजार आणि ५९ हजार रुपयांच्या मर्यादेत राज्याकडे असलेला धान्याचा कोटा जो केंद्र सरकारने दिलेला असतो तो संपतो. त्यामुळे ही मर्यादा निश्चित केली आहे. पुढील काळात केंद्र सरकारने अन्नधान्याचा कोटा वाढवून दिला तर या उत्पन्न मर्यादेत वाढ करता येईल. परंतु सध्या जो कोटा मिळतो त्याच्या अंतर्गत हे धान्य वाटप करता येते.

श्रीमती मेघना दिपक साकोरे-बोर्डीकर : अध्यक्ष महोदय, मी या प्रश्नाच्या स्कोपच्या बाहेरील प्रश्न विचारणार आहे. जिंतूर तालुक्यातील राजेगाव येथे १७० शिधापत्रिकाधारक आहेत. माहे डिसेंबर महिन्यामध्ये ३० शिधापत्रिकाधारकांनी धान्य घेतले व उर्वरित १४० शिधापत्रिकाधारकांनी कमी धान्य आल्यामुळे ते घेतले नाही.

यानंतर श्री. चौधरी...

ता.प्र.क्र.४२५८१.....

श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर.....

सदर ठिकाणी कमी धान्य मिळत असल्यामुळे दुसरीकडून धान्य देण्यात यावे यासाठी संबंधितांनी जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसिलदार यांच्याकडे दाद मागितली. तरीही डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी असे तीन महिने या शिधापत्रिकाधारकांना दाद देण्यात आली नाही. हे १४० शिधापत्रिकाधारक हटकर, धनगर व दलित समाजाचे होते. अशा वेळी एका महिन्याच्या आत पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी तहसिलदारांची असते, परंतु या प्रकरणी तहसिलदारांनी कार्यवाही केली नाही. त्यामुळे हे शिधापत्रिकाधारक तीन महिने धान्य मिळण्यापासून वंचित राहिले. माझा प्रश्न असा आहे की, सदर शिधापत्रिकाधारकांना तहसिलदार व प्रांताधिकारी यांच्याकडून तीन महिन्यांचा फूड अलाऊन्स देणार का ?

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, शिधापत्रिकाधारक कोणत्या समाजाचा आहे हा मुद्दा येत नाही. तो दलित असो, हटकर असो किंवा कोणीही असो तो मुद्दा नसतो तर त्याचे उत्पन्न विचारात घेतले जाते.

अध्यक्ष महोदय, काही शिधापत्रिकाधारकांवर अन्याय झाल्याचे सन्माननीय सदस्यांनी नमूद केले. या अन्यायाविरोधात तक्रार करुन देखील त्यांना न्याय मिळाला नाही. मी सांगू इच्छितो की, याबाबत माहिती घेऊन त्वरित कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती नमिता मुंदडा : अध्यक्ष महोदय, गेल्या दोन वर्षांपासून बीड जिल्हयामध्ये एकही शिधापत्रिका वितरित करण्यात आलेली नाही. अनेक नवीन नोंदणी केलेल्या कुटुंबांनी प्रयत्न करुनही शिधापत्रिका मिळालेल्या नाहीत, शेवटी त्यांनी तो प्रयत्न सोडला आहे. परंतु शिधापत्रिका नसल्यामुळे त्यांना विविध योजनांचा लाभ घेता येत नाही. सरकारी रुग्णालयात उपचारांसाठी, स्वस्त धान्य दुकानातून धान्य घेण्यासाठी शिधापत्रिका असणे गरजेचे आहे. मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये कोरोनाचे कारण दिले.

ता.प्र.क्र.४२५८१.....

श्रीमती नमिता मुंदडा.....

परंतु याबाबत काहीतरी पर्याय काढणे आवश्यक आहे. मंत्री महोदयांनी सांगावे की, यासाठी काय व्यवस्था करण्यात येईल व कधीपर्यंत शिधापत्रिका देण्यात येतील ?

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, यासंदर्भात आम्ही आढावा घेतला असता असे दिसून आले की, प्राधान्य क्रमांकाचे शिधापत्रिकाधारक देखील गेल्या तीन-तीन चार-चार वर्षांपासून धान्य घेण्यासाठी आले नाहीत. त्यामुळे धान्य शिल्लक राहते. राज्यातील काही जिल्हयांना इष्टांक वाढवून देण्याबाबत आम्ही अलिकडेच आदेश पारित केले आहेत. त्यामध्ये बीड जिल्हयाचा देखील समावेश आहे. मी सांगितल्याप्रमाणे ५९ हजार आणि ४४ हजार रुपये उत्पन्न मर्यादेमध्ये बसणाऱ्या व्यक्तींची माहिती सादर केल्यास त्यांना ताबडतोब नवीन शिधापत्रिका देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

श्री.अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, माझ्या औसा विधानसभा मतदारसंघामध्ये २५ ते ३० स्वस्त धान्य दुकाने वेगवेगळया कारणांमुळे बंद आहेत. या स्वस्त धान्य दुकानांच्या अंतर्गत येणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना इतर गावांच्या स्वस्त धान्य दुकानांशी जोडण्यात आले आहे. त्यामुळे त्या लोकांना धान्य आणण्यासाठी ये-जा करण्याचा खूप त्रास होत आहे. माझा प्रश्न आहे की, सदर बंद असलेली स्वस्त धान्य दुकाने कधी सुरु केली जातील ?

अध्यक्ष महोदय, माझ्या विधानसभा मतदारसंघामध्ये सन २००० मध्ये शिधापत्रिका वाटप करण्यात आल्या आहेत. गेल्या २२ वर्षांपासून नव्याने शिधापत्रिका देण्यात आलेल्या नाहीत. काही कुटुंबांच्या शिधापत्रिका विभक्त करायच्या आहेत, काही शिधापत्रिका हरवल्या आहेत, काही जीर्ण झाल्या आहेत तर काही फाटल्या आहेत. तरी लोकांना नव्याने शिधापत्रिका देण्यासाठी कार्यक्रम राबविण्यात येईल का ?

ता.प्र.क्र.४२५८१.....

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, ज्यांच्या शिधापत्रिका हरवल्या आहेत किंवा खराब झाल्या आहेत त्यांनी नवीन शिधापत्रिका घेण्यासाठी अर्ज दाखल करावेत. एक महिन्याच्या आत त्यांना शिधापत्रिका देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

श्री.संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, भुसावळ, जि.जळगाव येथील तहसिल कार्यालयामध्ये या प्रश्नाच्या अनुषंगाने मी स्वत: गेलो होतो. भुसावळ तालुक्याच्या प्रश्नांविषयी वेगळी बैठक घेण्याबाबत मी मागील अधिवेशनामध्ये देखील मंत्री महोदयांना विनंती केली होती परंतु अद्याप त्यांनी बैठक घेतलेली नाही.

अध्यक्ष महोदय, ई-प्रणाली सुरु केल्यानंतर डाटा एन्ट्री करण्याचे काम खासगी ऑपरेटर्सकडे देण्यात आले होते. त्यांनी पूर्वीच्या सर्व शिधापत्रिका रद्द करुन नव्याने एन्ट्रीज केल्या. असे करताना त्यांना वाटले त्यांची एन्ट्री केली व काहींची केली नाही. त्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. तहसिल कार्यालय या खासगी ऑपरेटर्सला पैसे देत नाहीत. त्यामुळे ऑपरेटर्स सर्वसामान्य लोकांची अडवणूक करतात व पैसे द्या तरच आम्ही एन्ट्री करुन देतो, असे सांगतात. हे मी भुसावळ येथील तहसिल कार्यालयामध्ये जाऊन स्वत: व्हेरिफाय केले आहे. मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, आपण या बाबीची चौकशी करुन कारवाई करणार का ?

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. तसेच त्यांनी नमूद केल्याप्रमाणे वेगवेगळया प्रश्नांबाबत ताबडतोब बैठक घेण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अभिमन्यू पवार यांनी सांगितले होते की, त्यांच्या मतदारसंघातील काही स्वस्त धान्य दुकाने बंद आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, माल चोरीच्या किंवा इतर तक्रारी किंवा आपापसातील वाद व त्यातून न्यायप्रविष्ठ झालेल्या बाबी यामुळे काही दुकाने बंद असतात. अशी दुकाने परत सुरु करायची असतील तर अगोदरच्या दुकानदाराची काही चूक नसल्यास त्यालाच

ता.प्र.क्र.४२५८१.....

श्री.छगन भुजबळ.....

परवाना दिला जातो किंवा नवीन जाहीरनामा काढून सर्व प्रक्रिया करावी लागते. नवीन जाहीरनामा काढल्यानंतर दिव्यांग, महिला, ग्रामसभा, इत्यादी सर्व बाबी येतात. या सर्वांचा विचार करुन ती दुकाने ताबडतोब चालू करण्यात येतील.

असुधारित प्रत

राज्यातील जिल्हा परिषद शाळा, आश्रम शाळा, वसतिगृह व खाजगी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

(४) * ४२८०८ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थिनींवर लैगिंक अत्याचाराच्या घटना होत असताना यास आळा घालता यावा या उद्देशाने शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला होता परंतु शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषद शाळा, आश्रम शाळा, वसतिगृह व खाजगी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे प्राधान्याने बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड : (१) व (२) मा. उच्च न्यायालयाच्या निदेशांनुसार खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये आवश्यकतेनुसार सीसीटीव्ही बसविण्याच्या सूचना या विभागाच्या दिनांक ०७ एप्रिल, २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. तसेच याकरीता शासनाकडून अनुदान देण्यात येणार नाही, ही बाब स्पष्ट करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

असंपादित प्रत

ता.प्र.क्र.४२८०८.....

श्री.संग्राम थोपटे : अध्यक्ष महोदय, सदर प्रश्नाच्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी दिलेले उत्तरच चुकीचे आहे. हा अतिशय गंभीर प्रश्न असून यासंदर्भातील पुण्यातील कालची घटना ताजी आहे. तेथील पोलिसांनी २४ तासांमध्ये आरोपी पकडला. परंतु राज्यातील विविध शाळांमध्ये अशा प्रकारचे असंख्य गुन्हे घडत असतात. मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये म्हटले आहे की, माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे खासगी व्यवस्थापनाच्या शाळांना सूचना देण्यात आल्या आहेत. आम्ही राज्यातील जिल्हा परिषद शाळा, आश्रमशाळा, वसतीगृहे व खासगी शाळांचा प्रश्न विचारला होता. परंतु मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये मात्र केवळ खासगी शाळांना हे निर्देश लागू करण्याबाबत नमूद केलेले आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, सदर प्रश्न राखून ठेवावा. कारण या प्रश्नाच्या उत्तरामध्ये राज्यातील विद्यार्थ्यांप्रती गांभिर्यपूर्वक विचार केल्याचे दिसत नाही. मंत्री महोदयांच्या उत्तराने आमचे समाधान होत नाही. त्यामुळे सदर प्रश्न राखून ठेवण्यात यावा.

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. यामध्ये आपण आणखी काही गोष्टी करु शकतो. मी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार खासगी व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमांच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक अशा सर्व शाळांसाठी सीसीटीव्ही लावण्यात यावेत असे निर्देश देऊन त्याची जबाबदारी देखील निश्चित केली होती. सन्माननीय सदस्यांचा मुद्दा आहे की, जिल्हा परिषद किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविले पाहिजेत. मी शालेय शिक्षण मंत्री या नात्याने आश्वासित करते की याबाबत धोरण निश्चित करण्यात येईल. त्यानुसार जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये देखील सीसीटीव्ही कॅमेरे लावले जातील. सध्या किती सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत त्याची आकडेवारी माझ्याकडे आहे. सदर आकडेवारी मी पटलावर ठेवते. शासकीय शाळा असोत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा असोत किंवा खासगी व्यवस्थापनाच्या शाळा असोत येणाऱ्या काळात या सर्वांबाबत कडक धोरण

ता.प्र.क्र.४२८०८.....

प्रा.वर्षा गायकवाड.....

अवलंबिले जाईल. खासगी संस्थांच्या संदर्भात तर मी मघाशी नमूद केल्याप्रमाणे आपण शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. येणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी केली पाहिजे, अशा सूचना आपण देऊ. तसेच शासकीय शाळांमध्ये कसे सीसीटीव्ही बसविता येतील याचाही आपण विचार करु. आता आमच्या विभागासाठी जिल्हा नियोजन समितीमधून अतिरिक्त ५ टक्के निधीची तरतूद करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त लोकसहभाग, सी.एस.आर., आमदार फंड, खासदार फंड, ग्रामविकास विभागाकडून काही निधी घेता येऊ शकतो. या सर्व बाबींचा विचार करुन प्राधान्याने सीसीटीव्ही बसविण्याचे काम करु.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संग्राम थोपटे यांनी विनंती केली की, सदर प्रश्न राखून ठेवण्यात यावा. परंतु मंत्री महोदयांनी उत्तराद्वारे त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केल्याचे आम्ही सर्वजण पाहत आहोत. मंत्री महोदयांनी सांगितले की, खासगी शाळांनासुध्दा खासदार फंड, आमदार फंड यांच्या माध्यमातून... परंतु विना अनुदानित शाळांना आमदार फंड, खासदार फंड अशा कशातूनही मदत करता येत नाही. म्हणजे ज्यांना आपण एकही पैसा शासकीय अनुदान देत नाहीत त्यांच्यावरच सातत्याने आपण बंधने घालतो. या प्रश्नाच्या उत्तरामध्ये देखील नमूद केलेले आहे की, खासगी व्यवस्थापनाच्या शाळांना शासन निर्णयाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. खासगी विना अनुदानित शाळांना सर्व सरकारी नियम, धोरणे, बंधने घालण्यात येणार असतील तर त्यांना अनुदान देऊन त्यांच्याकडून अंमलबजावणीची अपेक्षा करणार का ? कारण त्यांना आमदार किंवा खासदार फंडातून पैसे देता येत नाहीत.

यानंतर श्री.धुमाळे.....

ता.प्र.क्र.४२८०८...

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांचा काही तरी गैरसमज झाला, असे मला वाटते. कारण दिनांक ७ एप्रिल २०१६ रोजीचा जो शासन निर्णय आहे तो खाजगी शाळांच्या सर्व माध्यमांच्या संदर्भातील आहे. त्यानुसार आपण राज्यातील सर्व माध्यमांच्या खाजगी शाळांना त्यांनी सीसीटीव्ही कॅमेरे स्वत:च्या खर्चातून लावावेत, असे म्हटले आहे. उत्तरामध्ये ते दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, दुसरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. संग्राम थोपटे यांनी विचारलेला प्रश्न जिल्हा परिषदा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या बाबतीत होता. त्यांनी खाजगी शाळांच्या बाबतीत प्रश्न विचारला नाही. त्याबाबत मी सांगू इच्छिते की, ज्या जिल्हा परिषदांच्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आहेत त्यांच्या बाबतीत येणाऱ्या काळात धोरण निश्चित करुन त्या कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध निधीच्या माध्यमातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी आमची प्राथमिकता राहील व हे सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जातील.

श्री. जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदया मघापासून उत्तर देत आहेत. परंतु सन्माननीय सदस्य श्री. संग्राम थोपटे यांनी आणि मी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर मिळत नाही. आता मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये खाजगी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासंबंधी आदेश देण्यात आले आहेत आणि त्यासंबंधी परिपत्रक काढले आहे. पण माझा प्रश्न असा आहे की, उच्च न्यायालयाने फक्त खाजगी शाळांमध्येच हे कॅमेरे बसवावेत असे सांगितले आहे काय आणि सरकारी शाळांमध्ये असे कॅमेरे बसवू नका, असे काही सांगितले आहे काय, हा स्पेसिफिक प्रश्न आहे. सरकारी शाळा असतील किंवा जिल्हा परिषदेच्या शाळा असतील, त्यासाठी मंत्री महोदय म्हणतात की, आमदार निधीतून किंवा इकडून तिकडून निधी घेऊन हे काम करु. माझा प्रश्न आहे की, शासन या सर्व शाळांना सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी निधी उपलब्ध करुन किती दिवसात उच्च

ता.प्र.क्र.४२८०८...

न्यायालयाच्या निर्देशाचे पालन करेल, याचे स्पेसिफिक उत्तर द्यावे, अन्यथा हा प्रश्न राखून ठेवावा.

प्रा. देवयानी फरांदे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. परंतु त्यामुळे आमचे समाधान झाले नाही. आता मंत्री महोदयांनी सांगितले आहे की याबाबत धोरण ठरविणार आहोत. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, धोरण ठरविण्याचे काम आपले आहे. जिल्हा परिषदेच्या शाळा असतील किंवा शासनाच्या आश्रमशाळा असतील त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात लैंगिक अत्याचाराच्या घटना घडत आहेत. हा प्रश्न त्याच अनुषंगाने आला आहे. आपल्याकडून अशी अपेक्षा आहे की, अशा घटना घडत असताना जिल्हा परिषदेच्या शाळा असतील, आश्रमशाळा असतील किंवा शासनाची मुलींची वसतिगृहे असतील, अशा ठिकाणी शासन सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार आहे काय आणि बसविणार असेल तर ते किती दिवसात बसविल याबाबतची घोषणा त्यांनी सभागृहात करणे अपेक्षित आहे.

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयकुमार गोरे आणि सन्माननीय सदस्या प्रा. देवयानी फरांदे यांच्या प्रश्नांना एकत्रित उत्तर देते की, आम्ही याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे की असे सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जातील. येणाऱ्या वर्षापासून आम्ही ते काम करु. फक्त मला आपल्याला वस्तुस्थिती निदर्शनास आणावयाची होती.

अध्यक्ष महोदय, राज्यात शासकीय शाळा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा ६५,६८६ इतक्या आहेत. यापैकी १६०० शाळांमध्ये अगोदरच असे कॅमेरे बसविलेले आहेत. उरलेल्या शाळांच्या बाबतीत आम्ही पूर्णपणे तयारी केलेली आहे की, त्या ठिकाणी विद्यार्थ्यांची संख्या किती आहे, विद्यार्थीनींची संख्या किती आहे. त्यामुळे येणाऱ्या वर्षभरात आम्ही जास्तीत जास्त निधी डीपीडीसीच्या माध्यमातून घेतला जाईल, ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून घेतला जाईल, आमदार, खासदार यांच्या स्थानिक निधीतून तसेच लोकसहभागातून घेतला जाईल. तसेच

ता.प्र.क्र.४२८०८...

सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाच्या मंत्र्यांना जास्तीचा निधी कसा दिला जाईल, या दृष्टीने प्रयत्न केले जातील.

श्री. जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, या शाळांमध्ये कधी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जातील. अजून किती मुलींवर अत्याचार झाल्यानंतर मंत्री महोदया जागे होणार आहेत. अजून किती वाट आपण बघता. त्यामुळे आज या सभागृहात किती दिवसात हे सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जातील, या संदर्भातील ठोस उत्तर अपेक्षित आहे. अजून किती मुलींवर अत्याचार व्हावा, अशी शासनाची अपेक्षा आहे. त्यामुळे आता तातडीने याबाबतचा निर्णय जाहीर करावा आणि किती दिवसात हे कॅमेरे बसविले जातील हे मंत्री महोदयांनी सांगावे.

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सभागृहाची जी भावना आहे तीच आमची सुध्दा भावना आहे. म्हणून मी सांगू इच्छिते की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मग ती जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत यापैकी कोणत्याही ठिकाणची शाळा असो, त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदेच्या जवळपास ६५ हजार शाळा आहेत. त्यामुळे निर्णय घेत असताना ज्या ठिकाणी जास्त संख्येने विद्यार्थी आहेत, त्या ठिकाणी प्राथमिकता दिली जाईल. अशा तऱ्हेने टप्प्याटप्प्याने या शाळा घेण्याचा आमचा प्रयत्न राहील आणि या वर्षभरामध्ये जास्तीत जास्त शाळांचा त्यामध्ये समावेश असेल आणि या वर्षभरामध्ये सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा आमचा प्रयत्न राहील.

श्रीमती सुलभा खोडके : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आपण दिनांक ७ एप्रिल २०१६ रोजीचा जो शासन निर्णय केला तो फक्त खाजगी शाळांच्या बाबतीत आहे. परंतु आपण कालची पुण्याची घटना बघावी. रोजच अशा घटना घडत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात अशा घटना घडत आहेत. म्हणून शासनाच्या शाळा, आश्रमशाळा आणि वसतिगृहांमध्ये अशा अनेक घटना घडतात. महिला मंत्री म्हणून आपल्याला या संदर्भात न्याय द्यायचा असेल तर आपण सीसीटीव्ही कॅमेरे

ता.प्र.क्र.४२८०८...

बसविण्याची गरज आहे. वर्षभरात आपण काही शाळांच्या बाबतीत हे करणार आहात. पण आपण असा अन्याय करु नका. आपण महिला मंत्री म्हणून निर्णय घ्या. एका वर्षभरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार आहात काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, मी उत्तरामध्ये ते स्पष्ट केले आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती सुलभा खोडके म्हणतात त्यानुसार आम्ही देखील विचार करीत आहोत. पण फक्त कॅमेरे लावून चालणार नाही. कारण पुण्याच्या शाळेमध्ये कॅमेरे होते. परंतु त्याची हार्डडीस्क नव्हती. त्यामुळे ते कॅमेरे चालू सुध्दा असले पाहिजेत आणि ते सुरळीतपणे बघितले गेले पाहिजेत. त्याचे प्रत्येक महिन्यात मॉनिटरींग सुध्दा झाले पाहिजे आणि म्हणून आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे ज्या शाळांच्या बाबतीत हा शासन निर्णय आहे. म्हणजे खाजगी शाळांना हे वर्ष सुरू होण्यापूर्वी सांगितले जाईल आणि सन्माननीय सदस्य श्री. संग्राम थोपटे यांनी विचारल्यानुसार ज्या शासकीय शाळा आहेत त्यांच्या बाबतीत येणाऱ्या वर्षभरामध्ये आमचा प्रयत्न राहील की, टप्प्याटप्प्याने का होईना, पण सुरूवात करुन आम्ही शासकीय शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवू.

नाशिक परिक्षेत्रात वाहतूक पोलिसांकडून हेल्मेट सक्तीच्या नावाखाली दंड आकारणी होत असल्याबाबत

(५) * ४३१३० श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय गृह मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक परिक्षेत्रात पोलिस आयुक्त यांनी वाहतूक शाखेला वसुली करिता उद्दिष्ट दिले असल्याने येथील वाहतूक पोलिसांकडून हेल्मेट सक्तीच्या नावाखाली दंड वसुली करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग १ च्या अनुषंगाने स्थानिक प्रवासी घटना नाशिकहून मुंबईकडे प्रवास करणारे प्रवासी यांनी वेळोवेळी केलेल्या तक्रारींनुसार तसेच "व्दारका चौक" येथील अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून कोणती कार्यवाही/उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंभुराज देसाई (श्री.दिलीप वळसे-पाटील यांचेकरिता) : (१) हे खरे नाही.

(२) व्दारका चौकात अवैध प्रवासी वाहतूकीला आळा घालण्यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ कलम ६६(१)/१९२ अन्वये जानेवारी, २०२१ ते डिसेंबर, २०२१ या कालावधीमध्ये अवैध प्रवासी वाहतूक करणारे ३५ वाहनांवर मा.मोटार वाहन न्यायालयात खटला पाठविण्यात आलेला असून मा.न्यायालयाने कसुरदार वाहनधारकांना रु.६३,४००/- दंड केलेला आहे. तसेच क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांवर एकूण १५८ केसेस मध्ये रु.३३,८००/- दंडात्मक कारवाई केली असून वाहतूक विभागाचे अधिकारी/ कर्मचारी यांना अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांवर मोटार वाहन कायदा १९८८ अन्वये कारवाई करण्याबाबत पोलीस आयुक्त, नाशिक यांचेकडून आदेश देण्यात आलेले आहेत.(३) प्रश्न उद्भवत नाही.

ता.प्र.क्र. ४३१३०...

श्री. प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी हेल्मेटच्या सक्तीबद्दल केलेल्या कारवाईचा प्रश्न विचारला आहे. पण विभागाने दिलेले उत्तर अवैध वाहतुकीबद्दल दिले आहे. माझा प्रश्न असा आहे की, हेल्मेट सक्ती असेल किंवा इतर मोटरसायकल स्वार असतील त्यांच्या बाबतीत पोलिसांना मूळात कारवाई करण्याबाबत किती अधिकार आहे. याबाबत आयपीसी किंवा सीपीसी कायदा काय म्हणतो, याची स्पष्टता या उत्तरातून यायला हवी होती. ज्या ज्या लोकांनी अशा चुकीच्या पध्दतीने पैसे गोळा केले असतील, त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी होती. पण या प्रश्नाचे उत्तर चुकले आहे. म्हणून त्या प्रश्नाचे उत्तर दुरुस्त केले पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, नाशिकच्या या प्रश्नाच्या निमित्ताने मंत्री महोदयांनी संपूर्ण राज्याला आणि सभागृहाला संबोधित करावे की, अशा पध्दतीने जे पांढरे बगळे उभे राहिले असतात, ते वाहतुकीचे नियमन कमी करतात आणि दंडाच्या निमित्ताने हप्ता जास्त वसूल करतात, त्या सर्व लोकांवर कारवाई करण्यासाठी शासन निर्णय, नियम आणि आयपीसी किंवा सीपीसी काय म्हणते आणि त्यानुसार आपण कोणती कारवाई केली पाहिजे, अशा पध्दतीचे उत्तर या निमित्ताने दिले तर संपूर्ण महाराष्ट्रात चांगला मेसेज जाईल. कारण रस्त्यावर ट्राफिक नियमन करण्यापेक्षा हप्ता वसुली करणारे अशा प्रकारचे जे पोलीस असतात त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी... नाशिकचे हे निमित्त आहे. कायद्याप्रमाणे त्यांना पैसे घेताच येत नाहीत. तरी सुध्दा जे घेतात, ते नाशिकच्या मुद्याच्या अनुषंगाने ज्यांनी चुकीच्या पध्दतीने काम केले, त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय, हा माझा पहिला प्रश्न आहे आणि दुसरा प्रश्न असा आहे की, याच अनुषंगाने लॉकडाऊनच्या कालावधीत कोल्हापूर जिल्ह्यातील माझ्या मतदार संघामध्ये दोनशे, पाचशे, हजार, दोन हजार, तीन हजार, पाच हजार अशा पध्दतीचा दंड मोटरसायकल स्वारांकडून वसूल केला आहे. याबाबत चौकशीचे आदेश देऊन संबंधितांवर तात्काळ कारवाई करणार आहात काय ?

ता.प्र.क्र. ४३१३०...

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शांताराम मोरे यांनी हा प्रश्न विचारला व त्याला अनुसरुन सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश आबिटकर यांनी या ठिकाणी काही इतर प्रश्न उपस्थित केले. मी त्यांना सांगू इच्छितो की, या प्रश्नातील उत्तराला दुरुस्त करण्याची आवश्यकता नाही. कारण पहिल्या प्रश्नाच्या भागात पोलीस आयुक्तांच्या कार्यक्षेत्रामध्ये वाहतूक पोलिसांनी हेल्मेट सक्तीविरोधात दंड वसूल केला काय, असा प्रश्न विचारला आहे आणि द्वारका चौक येथील अवैध प्रवाशी वाहतुकीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी कोणत्या उपाययोजना केल्या हे दुसऱ्या भागात दिलेले आहे. अध्यक्ष महोदय, हेल्मेट सक्तीचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे आणि राज्य सरकारने देखील घेतला आहे. तसेच याबाबत मागे सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा हेल्मेट सक्तीचे करण्यासंबंधी कठोर उपाययोजना करण्याबाबत सर्व राज्यांना निर्देश दिले होते.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४३१३०....

श्री. शंभुराज देसाई.....

या प्रश्नातील पहिल्या भागामध्ये नाशिकमध्ये १८ जानेवारी ते १८ मार्च या कालावधी विना हेल्मेट असणाऱ्या ८ हजार ४७२ लोकांकडून ४२ लाख ३६ हजार रुपयांचा दंड नियमानुसार वसुल केलेला आहे. पहिल्यावेळेस विना हेल्मेट आढळून आल्यास ५०० रुपये दंड आणि तीच व्यक्ती दुसऱ्यांना विना हेल्मेट आढळून आली तर १००० रुपये दंड अशा प्रकारचा दंड वसूल करण्याची नियमामध्ये तरतूद आहे. ही दंडाची रक्कम सरकारी खजिन्यामध्ये जमा होते.

ॲड.श्री. आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. माझ्या किंवा इतर कोणत्याही सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघात हायववेर अशा प्रकारची अवैध वसुली मोठया प्रमाणात होत आहे. हे मी देखील वारंवार पकडलेले आहे. माननीय मंत्र्यांना माझी विनंती आहे की, आपल्याला काय कारवाई करायची ती आपण करा. परंतु पोलीस डयुटीवर जाताना रिकाम्या खिशाने जातात आणि संध्याकाळी ४ ते ५ हजार रुपये घरी जातात. ही वस्तुस्थिती आहे आणि अशा प्रकारची अवस्था संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आहे. आपल्याला हे थांबवायचे असेल तर ज्या ठिकाणी आपले चेकपोस्ट बनवाल तिथे सीसीटीव्ही सक्तीचे करा. त्याप्रमाणे सीसीटीव्ही असल्याशिवाय कोणत्याही प्रकारची वसुली करता येत नाही, अशा प्रकारची तरतूद करा. दुसरे असे की, आपण प्रत्येक ट्राफिक पोलिसाला मोबाईल द्या आणि मग त्या चालकाची विना हेल्मेट फोटो काढून त्याला पावता पाठवा. आता सिग्नल तोडल्यावर ज्या प्रकारे कारवाई तशी आपण करा. परंतु प्रत्यक्षात वारंवार जशी बसची तपासणी होते आणि खिशात जास्त पैसे मिळाले तर कंडक्टरवर कारवाई होते. परंतु महाराष्ट्रामध्ये सामान्य माणसाची लूट थांबवायची असेल तर अशा प्रकारचा निर्णय घेणे आवश्यक आहे, तो निर्णय आपण घेणार काय ?

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.श्री. आशिष जैस्वाल यांनी दोन प्रश्न विचारले आहेत. पहिले म्हणजे त्यांनी सांगितले की, अशा प्रकारे दंड वसूल न करता त्याच्या मोबाईलवर किंवा अकाऊंटवर दंडाची पाठवावी.

ता.प्र.क्र. ४३१३०....

श्री. शंभुराज देसाई....

त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, आता आपण हायववेर अशी पद्धत सुरु केलेली आहे. ओव्हर स्पीड किंवा चुकीच्या साईडने वाहने चालवली तर ते वाहन ॲटोमॅटीक पोलिसांच्या कॅमेरामध्ये येते आणि मग त्या वाहन मालकाकडे तो दंड पाठविला जातो. मोठया शहरामध्ये बऱ्याच ठिकाणी ट्राफिक नियंत्रणासाठी चौकाचौकात पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले आहेत. बऱ्याच वेळा काही ठिकाणी बाजारपेठ किंवा वन वे असतो तिथे ट्राफिक नियंत्रण करण्यासाठी पोलिसांना उभे राहावे लागते. त्यामुळे वाहतुकीला शिस्त लागवी या दृष्टीनेच पोलिसांनी काम केले पाहिजे हा आमचा प्रयत्न राहिल. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश आबिटकर किंवा सन्माननीय सदस्य ॲड.श्री. आशिष जैस्वाल यांनी स्पेसिफिक तक्रार दिली तर ती तपासून घेतली जाईल. मग त्यामध्ये काही तथ्य आढळले तर संबंधितावर कारवाई केली जाईल.

प्रा. देवयानी फरांदे : अध्यक्ष महोदय, नाशिक द्वारकातून अवैधरित्या होणाऱ्या वाहतूकीला आळा घालण्यासाठी सदरचा प्रश्न उपस्थित केला आहे. हा चौक माझ्या मतदारसंघामध्ये येतो आणि हे खरे आहे की, तिथे मोठया प्रमाणात अवैध वाहतूक सुरु असते. या ठिकाणी आपण काय कारवाई केली हे उत्तरामध्ये दिलेले आहे. परंतु ती कारवाई समाधानकारक नाही. त्या ठिकाणी अशाप्रकारे अवैध पद्धतीने वाहतूक करणारे जे गाडयांचे मालक आणि स्थानिक वाहतूक पोलीस यांच्यामध्ये संगणमत आहे. एखाद्या नवीन व्यक्तीला त्या व्यवसायामध्ये उतरायचे असेल तर त्याला परवानगी दिली जात नाही आणि त्याच्यावर दादागिरी केली जाते, त्याच्यावर हमले केले जातात.सदर विषयाच्या बाबतीत गाडयांचे मालक आणि स्थानिक वाहतूक पोलीस यांच्यामध्ये संगणमत याबाबत मी माननीय मंत्र्यांनापुरावे देते. ही अवैध वाहतूक थांबविण्यासाठी आपण काही ऑनलाईन प्रक्रिया राबविणार आहात काय आणि आपल्या दालनात माझ्यासह सदरविषयाच्या बाबतीत वाहतूक संघटनेची बैठक लावणार काय ? आणि ती बैठक किती दिवसात लावणार आहात ?

ता.प्र.क्र. ४३१३०....

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या प्रा. देवयानी फरांदे यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहेत्याबाबत मी सांगू इच्छितो की, त्यांच्याकडे जर काही स्पेसिफिक तक्रार किंवा काही पुरावे असतील आपल्या पत्रासोबत ते माझ्याकडे द्यावेत. त्याची वरिष्ठ अधिकाऱ्याकडून चौकशी केली जाईल. मी स्वत: तक्रारीचा फॉलोअप घेऊन त्याची चौकशी करेल. त्या चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर योग्य तो निर्णय घेतला जाईल. सन्माननीय सदस्यांनी बैठक घेणार काय असा प्रश्न विचारला आहे तर मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांच्या विषयासंदर्भात लवकरच माझ्या दालनात अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित केली जाईल.

श्री. समीर कुणावार : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न जरी नाशिक जिल्ह्याचा असेल तरी तो वाहतूक पोलिसांचा प्रश्न आहे. माझ्या मतदारसंघात जांब हायवेवर ट्राफिक पोलीस असतात. तिथे पोलीस मदत केंद्र असे लिहिलेले आहे. पोलिसांनी वाहतुकीला मदत करणे असा याचा अर्थ होतो परंतु याचा अर्थ उलट काढलेला आहे की, पोलिसांना मदत होत आहे. हे ट्राफिक पोलिस महिन्याच्या शेवटी लाखो रुपये कमवितात. आम्ही जेव्हा त्यांना विचारतो की, आपण असे का करता तर तेव्हा खाजगीमध्ये सांगतात की, आम्हाला टार्गेट आहे. माझा प्रश्न असा आहे की, वर्षाच्या शेवटी किती दंड वसूल करावा यासाठी आपण वाहतूक विभागाला असे काही टार्गेट दिलेले आहे काय ? जांबयेथे हायवेवकर असणाऱ्या पोलीस चौकीच्या ठिकाणी रात्रंदिवस सर्रास वसुली केली जाते ही आपण थांबवणार काय ?

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, मोघम स्वरुपाची तक्रार आणि मोघम स्वरुपाने असे टार्गेट दिलेले आहे आणि पोलीस वसुली करतात या बोलण्यामध्ये काहीही तथ्य नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती देवयांनी फरांदे म्हणाल्या मी माझ्याकडे पुरावे आहेत तर त्या पुराव्यासोबत आपले पत्र द्या मी चौकशी करतो असे त्यांना सांगितले. मग आता कुणीही उठायचे आणि पोलिसांद्दल अशा प्रकारे पुरावा

ता.प्र.क्र. ४३१३०....

श्री. शंभुराज देसाई....

नसताना बोलत असेल त्यामध्ये तथ्य नाही. पुरावा असेल तर आपण जरुर माझ्याकडे द्या याची निश्चितपणे चौकशी केली जाईल.

तालिका सभाध्यक्ष (श्री. संजय शिरसाट) : मंत्री महोदय, आताजे प्रकरण सुरु आहे ते पूर्ण महाराष्ट्रात आहे. परंतु आता आपण सभागृहात फक्त ट्राफिक कॉन्स्टेबल बद्दलची चर्चा करीत आहोत. परंतु आपण त्याच्या मुळाकडे कधी जात नाही. यासाठी ट्राफिक कॉन्स्टेबल जबाबदार नसतात. तेथील पीआय किंवा त्या सर्कलच्याअधिकाऱ्यांना आपण कधीच पाहत नाही. बदल्या कशा होतात हे लोकांना माहीत नाही काय ? मी मुद्दाम आपल्याला सांगतो की, या बदल्यांच्या बाबत मी एक उदाहरण सांगतो. गडचिरोली येथे एका व्यक्तीने ऑपरेशनमध्ये काम केले तेव्हा शासनाने त्याचा सत्कार केला. तेव्हा त्याने त्याच्या पसंदीने पोस्टिंग मागितली तर त्याला ती दिली नाही. तसेच नवी मुंबई येथे जानेवारी महिन्यापासून मार्च महिन्यापर्यंत एक जागा खाली होती. तिथे तडजोड झाली आणि दुसरे एक व्यक्ती तिथे येऊन बसला. हे सर्व प्रकार घडल्यानंतर जो माणूस पैसे देतो. तो वसूल करतो. हे मी जबाबदारीने सांगतो. त्यामुळे आपण या छोटया ट्राफिक कॉन्स्टेबल ला पकडण्यापेक्षा बदल्यांच्या सर्कलकडे आपण लक्ष द्यावे. असे अनेक उदाहरणे माझ्यासमोर आहेत. कारण अनेक जणांनी माझ्याकडे देखील तक्रारी केल्या आहेत. यासाठी ट्राफिक कॉन्स्टेबल कारणीभूत नाही. ट्राफिक कॉन्स्टेबल चा बॅच नंबर बघून त्याचे नाव विचारायचे आणि मग माननीय गृह मंत्र्यांकडे त्याची तक्रारी करायची. यामुळे काही होत नाही. जो मूळ कल्प्रिट आहे त्याकडे आपण लक्ष द्यावे, ही आपल्याला विनंती आहे.

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, आपण ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याची गांभीर्याने दखल घेतली जाईल.

मौजे मांडवे खुर्द (ता.जामनेर, जि.जळगांव) येथे सार्वजनिक पाणी पुरवठा अंतर्गत उद्भव विहिर व पाईप लाईनच्या कामाबाबत

(६) * **४१६६९ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मांडवे खुर्द (ता.जामनेर, जि.जळगांव) येथे ग्रामपंचायतीच्या मालकीचे सार्वजनिक पाणी पुरवठा अंतर्गत उद्भव विहिर व पाईप लाईन टाकण्याचे काम सन २०१७-२०१८ दरम्यान करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंदाज पत्रकातील काही मंजुर कामांच्या परिमाणात बदल झाला असल्याने त्याचा सविस्तर प्रस्ताव कारणांसह कार्यकारी अभियंता यांना उपअभियंता यांनी सादर करुन मान्यता न घेतल्याने मुळ रक्कम रु. २,६२,२४०/- नियमबाह्यरित्या प्रदान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी असणाऱ्या व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बदल झालेल्या परिमाणानुसार सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून सक्षम अधिकारी यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यानंतर श्रीमती करंदीकर.....

ता.प्र.क्र. ४१६६९...

श्री. संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना उत्तरात बदल करायचा आहे काय ?

श्री. गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, त्याची काही आवश्यकता नाही. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, हे खरे नाही. बदल झालेल्या परिमाणानुसार प्रस्ताव तयार झाला असून मंजुरी घेतली आहे. ऑडिटचा रिपोर्ट माझ्याकडे आहे. मी जबाबदारीने सांगत आहे. हा प्रश्न वर्तमानपत्रातील बातमीवरुन विचारलेला नाही. मागील अधिवेशनात आम्हाला ऑडिटचे पुस्तके दिले होते. त्यामधील ऑडिटच्या परिच्छेदावरूनहा प्रश्न विचारला आहे. पॅरा क्र. ३.३६५ मध्ये ऑडिटरने स्पष्टपणे नोंदवले आहे. की, मान्यता न घेता, निमबाह्य पैसे दिले. तरी देखील उत्तरात असे नमूद केले आहे की, मान्यता घेतली आहे. असत्य उत्तर देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय ? नियम १९७ अन्वये पूर्ण झालेल्या कामांची नोंदवही नमुना क्रमांक ६९ मध्ये ठेवलेली नाही, हे खरे आहे काय, पाणी पुरवठा व स्वच्छाता टंचाई दि. ३.२.१९९९ नुसार बाब क्र. प्रा. ई. नुसार पावसाळा सुरु झाल्यानंतर पाईप व पंपींग मशीन काढून घ्यावे अशी सूचना असताना त्याची नोंद करण्यात आली नाही, हे खरे आहे काय ?

श्री. गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, मौजे, मांडवे खुर्द (ता. जामनेर, जि. जळगाव) येथील पाण्याच्या प्रश्नाबाबत सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली आहे. दि. २१.३.२०१७ रोजी विधान परिषदेचे सन्माननीय सदस्य यांच्या निधीतून या गावात एकूण १४ लाख ६७ हजार ७६० रु. या कामाकरिता मंजूर केले होते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे, काम सुरु असताना ४ मीटर नंतर कठीण खडक लागल्यामुळे, कामामध्ये बदल करण्यात आला. ही योजना पूर्ण करण्यात आली आहे. योजना पूर्ण केल्यानंतर ती ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्यात आली. आज देखील या गावात २४ तास पिण्याचे पाणी सुरु आहे. सन्माननीय

ता.प्र.क्र. ४१६६९...

श्री. गुलाबराव पाटील ....

सदस्यांनी सांगितेले ते सत्य आहे. या कामात बदल केला आहे. तसेच ब्रिफिंग घेत असताना आम्ही माहिती घेतो. आपल्या सारखे सदस्य प्रश्न विचारतील तेव्हा काही चूक राहता कामा नये. लेखापरिक्षणा बाबत पूर्तता केल्याची विभागाची माहिती माझ्याकडे आहे. तरी आपण सांगितल्याप्रमाणे काही चूक झाली असेल व माझ्याकडे खोटी माहिती दिली असेल तर हयगय केली जाणार नाही अशी मी खात्री देतो. कामामध्ये बदल केला असून त्या करिता कार्यकारी अभियंता यांच्याकडून मान्यता घेतली आहे. या ठिकाणी काम पूर्ण झालेले आहे. आज या गावाला १०० टक्के पाणी मिळत आहे.

श्री. संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, काम पूर्ण झाले आहे, पाणी मिळत असेल, किंवा कामात बदल झाला असेल या बाबत मला काही म्हणायचे नाही. ऑडिटमध्ये पॅरा आलेला आहे. असे असताना अधिकारी उत्तर देतात की, मान्यता घेतलेली आहे. एक तर ऑडिटमध्ये खोटे आले असेल.

श्री. गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, आक्षेपाची पूर्णपणे पूर्तता केलेली आहे. पॅरा आला ते मान्य आहे. आपले म्हणणे योग्य आहे. त्या नंतर विभागाकडून पूर्णपणे पूर्तता करण्यात आलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे पंपींग मशिनरीचे टंचाईच्या वेळी काम केले जाते. या करिता स्थानिक विभागाकडून मंजुरी घेतलेली आहे. आपले म्हणणे योग्य आहे.

श्री. मंगेश चव्हाण : अध्यक्ष महोदय, माननीय गृह मंत्री यांनी मागील प्रश्नाला जे उत्तर दिले त्याला माझी हरकत आहे.तो विषय महत्त्वाचा आहे.....

तालिका सभाध्यक्ष (श्री. संजय शिरसाट) : तो विषय आता आपल्याला घेता येणार नाही.

गोंदिया व नाशिक जिल्हयात मार्केटींग फेडरेशनकडे मिलर्सची सुरक्षा ठेव जमा असूनही मोबदला मिळाला नसल्याबाबत

(७) * ४३६८२ श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया व नाशिक जिल्हयात मार्केटिंग फेडरेशन व महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ यांचेकडून सन २००८-०९ ते २०२०-२०२१ पर्यंत मार्केटिंग फेडरेशनकडे मीलर्सची सुरक्षा ठेव जमा करण्यात आलेली आहे परंतू बहुतांश मिलर्सना सन २०१७-१८ ते २०२०-२१ भरडाईचा मोबदला देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने भरडाई करणा-या मिलर्सनी बारदान परत न केल्यास प्रती बारदान ३४.०० रुपये नग वसूल करण्याबाबत आदेशित केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या सदर आदेशात जुन्या की नवीन बारदानाची वसुली करण्यात यावी याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग ३ मधील निर्देश स्पष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच सन २००८-०९ ते २०२०-२०२१ पर्यंत मार्केटिंग फेडरेशनकडे मीलर्सची सुरक्षा ठेव जमा करण्यात आलेली असूनही मोबदला न देण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ : (१) हे अंशत: खरे आहे.

मार्केटिंग फेडरेशनमार्फत हंगाम 2008-09 ते 2019-20 (खरीप व रब्बी) तसेच पणन हंगाम 2020-21 (खरीप) मधील धान भरडाई खर्चाच्या रक्कमा मिलर्सना अदा करण्यात आलेल्या आहेत. पणन हंगाम 2020-21 (रब्बी) मधील धान भरडाई

ता. प्र.क्र. ४३६८२....
श्री. छगन भुजबळ ....
खर्चाची रक्कम अदा करणे बाकी आहे.

महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळामार्फत ज्या मिलर्सने NEML या पोर्टलवर गिरणीमध्ये आवक धान, शासकीय पुरवठा गोदामात जावक तांदळाच्या नोंदी घेतल्या आहेत, अशा मिलर्सना मोबदला देण्यात येत आहे. पणन हंगाम 2008-09 ते 2016-17 मधील भरडाई देयके अदा करण्यात आली आहे. पणन हंगाम 2017-18 ते 2020-21 मधील एकूण रु.56.61 कोटी भरडाई खर्चाच्या रकमेपैकी रु.32.18 कोटी अदा करण्यात आले असून रु.24.43 कोटी इतकी रक्कम मिलर्सनी नोंदी पूर्ण न केल्याने अदा करणे बाकी आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

मिलर्सने जुना बारदाना परत न केल्यास रु.34/प्रति नग याप्रमाणे रक्कम वसुल करणेबाबत शासनाने स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) हंगाम 2008-09 ते 2020-21 मध्ये धान भरडाईचे अंतिम हिशोब करण्यात आलेल्या सर्व संबंधीत मिलर्सना मार्केटिंग फेडरेशनमार्फत अनामत रक्कमा व देय भरडाई मोबदला प्रदान करण्यात आलेला आहे.

(५) मिलर्सकडून जुना बारदाना परत न मिळाल्यास वसूली करण्याबाबत शासनाने निर्देश दिलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. कृष्णा गजबे : अध्यक्ष महोदय, गोंदिया, गडचिरोली व नाशिक जिल्ह्यात मार्केटींग फेडरेशन आहे. राज्यात आदिवासी विकास महामंडळ यांच्याकडून सन २००८-०९ व स २०२०-२१ पर्यंत मार्केटींग फेडरेशनकडे मिलर्सची सुरक्षा ठेव जमा करण्यात आली आहे. मात्र बहुतांश मिलर्सला सन २०१७-१८ ते सन २०२०-२१ या भरडाईचा मोबदला देण्यात आलेला नाही. हे खरे आहे काय ?२) शासनाच्या आदेशानुसार, या मिलर्सकडून भरडाई करणाऱ्यांनी बारदान परत न केल्यामुळे त्यांच्याकडून ३४ रु. प्रमाणे वसुली करण्याचे आदेश दिले आहेत काय ? जुने

ता. प्र.क्र. ४३६८२....
श्री. कृष्णा गजबे....

बारदानाची वसुली करण्याबात स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत काय ? असल्यास या बाबत शासनाला काही चौकशी केली तर काय निदर्शनास आले ? तसेच या बाबत कोणती कारवाई केली ?

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, स्पष्ट सांगण्यात आले आहे की, जुने बारदान मिलर्सकडून परत घ्यायचे आहे. त्यांनी जर ते परत केले नाही तर त्याकरिता प्रत्येक बारदानासाठी ३४ रु दंड किंवा वसुली लावण्यात यावी. सन २००८-०९ ते सन २०२०-२१ पर्यंत मार्केटींग फेडरेशन व आदिवासी विकास मंडळ यांच्याकडून त्यांना मोबदला किंवा पैसे मिळाले नाहीत. उत्तरात असे नमूद केले आहे की, मार्केटींग फेडरेशन मार्फत हंगाम सन २००८ -०९ ते सन २०१९-२० यामधील खरीप व रब्बी हंगामाचे पैसे दिलेले आहेत. पणन हंगाम सन २०२०-२१ मध्ये खरिपाचे पैसे दिले आहेत. यामुळे त्यांचा प्रश्न येत नाही. रब्बीचे पैसे राहिले असून ते ताबडतोब देण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, महाराष्ट्र आदिवासी विकास महामंडळातर्फे जे काही पैसे द्यायचे आहेत ते त्यांनी सन २०१६-१७ पर्यंत सर्व दिलेले आहेत. प्रश्न सन २००८ पासून विचारलेला आहे. सन २०१७-१८ ते २०२०-२१ मध्ये त्यांना ५६ कोटी रुपये देणे होते त्यापैकी ३२ कोटी रु. देण्यात आले आहेत व मिलर्सने नोंदी पूर्ण न केल्यामुळे २४.४३ कोटी रु. अदा करणे बाकी आहे. मिलर्सकडे एकदा धान दिल्यानंतर त्याची भरडाई केल्यानंतर तांदूळ गोदामामध्ये पोहचवायचा आहे. या बाबत प्रणालीवर त्यांनी माहिती दिली पाहिजे. msp.neml. ही प्रणाली आहे. या अन्वये जेवढे धान आले व एवढा तांदूळ परत केला हे त्या प्रणालीत असते. काहींनी प्रणालीत नोंदी दिल्या नसतील तर त्यांच्याकडून त्या पूर्ण करण्यात येतील. काही लोकांनी जर बारदान परत दिला नसेल तर त्याचा हिशोब लावून त्यांचे पैसे लवकरात लवकर देण्यात येतील.

ता. प्र.क्र. ४३६८२....

डॉ. देवराव होळी : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री चांगले उत्तर देत आहेत. मार्केटींग फेडरेशन व टीडीसीच्या मार्फत भरडाई करण्यासाठी भंडारा, गोंदिया, गडचिरोलीचे धान दिले जात आहे. मार्केटींग फेडरेशन गडचिरोली व टीडीसी यांच्या मार्फत गडचिरोलीमध्ये मिलर्स आहेत. त्या मिलर्सला भरडाईसाठी देणार आहे काय ? या पूर्वी त्यांना दिले जात होते. जुन्या मिलर्सकडे काही बॅकलॉग आहे. भंडारा, गोंदिया जिल्ह्यामध्ये न देता गडचिरोलीच्या मिलर्सला मिलिंग करण्यासाठी धान, टीडीसी व मार्केटींग फेडरेशन कडून दिला जाईल काय ?

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, ज्या मिलर्सचा रेकॉर्ड किलअर आहे, ज्यांनी सर्व अटी पूर्ण केल्या आहेत व जर ते गडचिरोलीमधील भरडाईचे काम पूर्ण करु शकत असतील तर ते काम त्यांनाच देण्यात येईल.

श्री. हरिष पिंपळे : अध्यक्ष महोदय, सन २०१६-२०१७, सन २०१८-१९ व सन २०२०-२१ मधील बारदान न दिल्यामुळे पैसे थांबवलेले आहेत. प्रति ३४ रुपये बारदान या प्रमाणे वसुली केली जाणार आहे. कोणत्या वर्षापासून हे बारदान राहिले आहेत ? त्या बारदानांची संख्या किती आहे, ते बारदान उंदराने कातरले असतील तरी शासन ते परत घेऊन त्याचे पैसे देणार आहे काय ?

यानंतर श्रीमती गिरप...

ता.प्र.क्र.४३६८२...

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, बारदाने कोणाकडे किती आहेत, त्याची माहिती मी पटलावर ठेवेन. त्यांचे जे पैसे आहेत ते त्यांनी दिले तर, त्यांचे भरडाईचे सर्व पैसेही देण्यात येतील, नाहीपेक्षा त्यांच्या अनामत रक्कमेतून देखील ते कापले जातील. त्यामध्ये त्यांनी सहकार्य केले पाहिजे. त्यांनी एक तर प्रणालीमध्ये या सर्व नोंदी नमूद कराव्यात व सरकारला जे जुने बारदान परत करावयाचे आहे ते परत केले पाहिजे. त्यांचे सर्व देणे ताबडतोब देण्यात येईल.

तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट): प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

.....

असुधारित प्रत

पृ.शी. / मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.शंभूराज देसाई (वित्त राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील अहवाल व प्रकाशन सभागृहासमोर ठेवतो : -

(क) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन अहवाल,

(ख) "लिंगभाव अर्थसंकल्प विवरणपत्र (Gender Budget Statement) व बाल अर्थसंकल्प विवरणपत्र (Child Budget Statement) २०२२-२०२३" हे प्रकाशन

तालिका सभाध्यक्ष : अहवाल व प्रकाशन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे. सदरहू अहवाल व प्रकाशन विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

.....

श्री.संजय बनसोडे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचे सन २०१३-२०१४, २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो. सदरहू अहवाल विधानसभेच्या पटलावर ठेवण्यास झालेल्या विलंबाची कारणे सोबत जोडली आहेत.

तालिका सभाध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

.....

असुधारित प्रत

पृ.शी./मु.शी.: विधेयकांना संमती व अधिसंमती

तालिका सभाध्यक्ष : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी प्रधान सचिव वाचून दाखवतील.

प्रधान सचिव : (अ) खालील विधेयके विधानपरिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केली. : -

1) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 1 - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, 2022

2) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 3 - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, 2022

3) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 4 - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, 2022

4) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 5 - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2022

5) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 6 - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, 2022

6) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 10 - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2022

7) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 13 - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) विधेयक, 2022.

8) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 14 - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, 2022

प्रधान सचिव ....

9) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 15 - महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ विधेयक, 2022

(ब) खालील विधेयके विधानपरिषदेने कोणत्याही शिफारशी शिवाय परत केली:-

1) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 7 - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, 2022

2) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 9 - महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, 2022

3) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 11 - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, 2022

4) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 12 - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, 2022

(क) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली :-

1) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 1 - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, 2022

2) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 3 - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, 2022

3) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 4 - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, 2022

4) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 5 - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2022

प्रधान सचिव ...

5) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 6 - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, 2022

6) सन 2022 चे विधानसभा विधेयक क्रमांक 7 - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, 2022

.....

असुधारित प्रत

माहितीचा मुद्दा

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, एका अतिशय महत्वाच्या विषयाकडे मी आपले लक्ष वेधतो. माननीय ॲड.अनिल परब सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांना हे सांगू इच्छितो की, आम्ही एस.टी. विषयावर मांडलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेबाबत आपण निवेदन करणार असे म्हणाला होता. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे आपण त्या विषयावर निवेदन करावे, ही माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सामान्य माणसाला मुंबई शहरामध्ये कसा त्रास दिला जातो याची गोष्ट मी अगदी थोडक्यात सांगतो. प्लॉट नं. ८०६, सीटीएस नं. ५११०, दादर टि.टी. या भूखंडावर ३३ (७) अंतर्गत जुन्या इमारतीचा पुनर्विकास भावी होम्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धीरज व विनित शाह यांनी केला. म्हाडाची परवानगी, जागा बीएमसीच्या इस्टेट विभागाची, इस्टेटला प्रिमियम भरला नाही. म्हाडाला जो ११३७ चौ.मीटर एरिया द्यावयाचा होता तो म्हाडाला दिला नाही. अशा पध्दतीने २६ कोटी ८५ लाख रुपयांचा सरकार, बीएमसी व म्हाडाला मिळण्याचा हक्क होता, तो दिलाच नाही.

अध्यक्ष महोदय, उलट स्थानिक नागरिक ओ.सी. घेण्याकरिता गेले असता, ओ.सी. दिली नाही. डिम्ड कन्व्हीनिअन्स घेतला तर स्थानिक नागरिकांनी डिम्ड कन्व्हीनिअन्स घेतला म्हणून पोलीस आता स्थानिक नागरिकांना बोलावू लागले आहेत. ज्यांनी २६ कोटी रुपये बुडवले तो बाजूला राहिला व स्थानिक नागरिकांनी डिम्ड कन्व्हीनिअन्स का घेतला, म्हणून नागरिकांना बोलवायला लागले. अशा पध्दतीने सामान्य नागरिकांना त्या ठिकाणी त्रास दिला जात आहे. पैसे लुटणाऱ्या धीरज व विनित शाह यांना संरक्षण मिळत आहे, त्यावर तातडीने कारवाई करावी, अशी माझी विनंती आहे.

.....

माहितीचा मुद्दा

श्री.महेश लांडगे : अध्यक्ष महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास एक बाब आणून देत आहे. राज्य शासनाने याची ताबडतोब दखल घ्यावी.

अध्यक्ष महोदय, युक्रेन व रशियामध्ये युध्दजन्य परिस्थिती असल्यामुळे आपल्या महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थी तेथून महाराष्ट्रात परत आले. त्यांचे शैक्षणिक वर्षाचे नुकसान टाळण्यासाठी काही नियम शिथिल करुन आपल्या देशातील, राज्यातील वैद्यकीय महाविद्यालये असतील किंवा जी इंजिनिअरिंगची महाविद्यालये असतील त्यामध्ये या विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक वर्ष पूर्ण करता यावे, याबाबत शासनाने दखल घ्यावी.

अध्यक्ष महोदय, माझ्या शहरामध्ये ३४ विद्यार्थी युक्रेनमधून आलेले आहेत. त्याच प्रमाणे वेगवेगळ्या जिल्ह्यातील, तालुक्यातील विविध गावातील अनेक विद्यार्थी महाराष्ट्रात परत आलेले आहेत. राज्यातील वैद्यकीय तसेच इंजिनिअरिंग कॉलेजेसमध्ये या विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक वर्ष पूर्ण करता यावे याबाबत शासनाने दखल घ्यावी.

.....

माहितीचा मुद्दा

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, कोल्हापूर शहरामध्ये या राज्याच्या मंत्रिमंडळात असणाऱ्या एका मंत्री महोदयांचे समाजजीवनात जे जे काही असले पाहिजे ते सर्व आहे. आनंद आहे. शाळा आहे, कॉलेज आहे, हॉटेल आहे सर्व आहे. त्याचा ३० कोटी रुपयांचा घरफाळा भरणे प्रलंबित आहे. दिनांक ३१ मार्चचे टारगेट ठेऊन महानगरपालिकेचे आयुक्त ३० रुपये बाकी राहणाऱ्यांना, ३०० रुपये बाकी राहणाऱ्यांना रोज नोटिसेस, दंड सर्व सुरु आहे. मात्र ज्यांचे ३० कोटी यायचे आहेत, त्यांचे बाकी बांधकाम परवाने नाही वगैरे विषय मी आता कोर्टातच घेऊन जाणार आहे. परंतु, या ३० कोटी रुपये एवढ्या मोठ्या रक्कमेच्या घरफाळ्याच्या विषयामध्ये महानगरपालिका आयुक्तांनी काही ना काही कारवाई केली पाहिजे. त्याची माहिती कोल्हापूरच्या नागरिकांना दिली पाहिजे.

.....

यानंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.दीपक चव्हाण)

प्रा.डॉ.अशोक उईके : अध्यक्ष महोदय, मागासवर्गीयअधिकारी व कर्मचारी यांच्या पदोन्नती संदर्भात शासनाच्या उदासीन व विरोधी भूमिकेबाबतचा माझा माहितीचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांच्या पदोन्नतीच्या संदर्भात निर्णय दिला होता. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी शासन निर्णय निर्गमीत करुन दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी ३३ टक्के आरक्षित जागा राखून ठेवल्या होत्या. या सरकारने दिनांक ७ मे, २०२१ रोजी शासन निर्णय निर्गमीत करुन मागासवर्गीयांचे आरक्षण पूर्णत: बंद केले आहे. उक्त शासन निर्णय रद्द करण्याच्या अनुषंगाने शासनास निवेदन करण्यासाठी आदेश द्यावेत, अशी माझी विनंती आहे.

श्री.राम कदम : अध्यक्ष महोदय, माझा माहितीची मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, सरकारच्या वतीने शिक्षण मंत्री महोदया यांनी भगवद् गीता शाळेत शिकविण्याकरिता रोखलेले आहे, नकार दिला आहे. मी आपणास ही भगवद् गीता भेट देतो आपण ती सरकारला द्यावी. ती शिक्षण मंत्री महोदया आणि या सरकारने वाचावी. हा धार्मिक ग्रंथ आहे यादृष्टीने पाहण्याऐवजी हा युनिव्हर्सल ग्रंथ आहे, यादृष्टीकोनातून याकडे पाहण्याची आवश्यकता आहे. देशातील लहानातील लहान न्यायपालिका व सर्वोच्च न्यायपालिकेचे कामकाज भगवद् गीतेची साक्ष घेऊन सुरु करण्यात येते. तरी देखील या राज्यातील तीन पक्षाचे सरकार भगवद् गीतेच्या शिक्षणाला विरोध का करीत आहे ? देशातील इतर राज्यांमध्ये भगवद् गीता शिकविली जाते. परंतु आपल्या राज्यात विरोध करण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे उपस्थित आहेत. या सरकारमधील दोन पक्ष यास विरोध करतील मान्य आहे. परंतु शिवसेना पक्षाने पुढकार घेऊन भगवद् गीतेचे समर्थन केले पाहिजे व ती शाळांशाळांमधून शिकविली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

पृ.शी. /मु.शी. : पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती प्रतिभा धानोरकर (समिती सदस्य) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा अकरावा, बारावा, तेरावा व चौदावा अहवाल सभागृहाला सादर करते.

तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण): : राज समितीचा अकरावा, बारावा, तेरावा व चौदावा अहवाल सभागृहाला सादर करण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

असुधारित प्रत

पृ.शी./मु.शी. : स्थगन प्रस्तावाच्या सूचना

तालिका सभाध्यक्ष : आज शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

असुधारित प्रत

पृ.शी./मु.शी : विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री.दीपक केसरकर (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

(१) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी श्री.अर्णब गोस्वामी, संपादक, वृत्त निवेदक व कार्यक्रम सूत्र संचालक, रिपब्लिक टिव्ही वृत्तवाहिनी यांचेविरुद्ध दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

(२) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी हिंदी सिने अभिनेत्री कंगना राणावत यांचेविरुद्ध दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम १८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : अध्यक्ष महोदय, हक्क भंग समिती राज्याच्या विधिमंडळाच्या समित्यांपैकी महत्त्वाची समिती आहे. सन्माननीय सदस्य श्री.दीपक केसरकर हे अतिशय कार्यक्षम आमदार आहेत व उक्त समितीचे समिती प्रमुख म्हणून काम करतात. सदरहू समितीने प्रत्येक अधिवशेनामध्ये उक्त प्रलंबित प्रकरणी सभागृहास मुदतवाढ मागणे हे अकार्यक्षमतेचे द्योतक होते. या समितीने सरकारच्या ५ वर्षांच्या कार्यकाळामध्ये हक्क भंगाच्या प्रलंबित प्रकरणांचा अहवाल सादर केला नाही तर तो व्यपगत होतो. हक्क भंग सभागृहाने स्वीकारल्यानंतर त्यावरील निर्णय समितीने वेगाने दिला पाहिजे. त्यासाठी नेहमी मुदतवाढ मागू नये. टांगती तलवार ठेवण्यात काय अर्थ आहे ? समिती प्रमुख यांना आज समितीने मुदतवाढ दिली तरी आज अधिवेशनाचा अंतिम दिवस असून या प्रकरणी समितीला अंतिम मुदतवाढ द्यावी. पुढील अधिवेशनामध्ये प्रलंबित प्रकरणांचा अहवाल सादर करण्यात यावा, या दृष्टीने आश्वस्त करुन समिती प्रमुख मुदतवाढ घ्यावी. अन्यथा ही मुदतवाढ घेणे सभागृहाच्या प्रतिष्ठेला साजेसे होणार नाही.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

श्री.दीपक केसरकर : अध्यक्ष महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, समितीकडील एक प्रकरण माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये गेले होते. समितीच्या एका प्रकरणात ११ व दुसऱ्या प्रकरणामध्ये ३ बैठका झाल्या असल्या तरी या तांत्रिक मुद्यामुळे काही मुद्दे महाधिक्ता यांचेशी रेफर करावे लागतात. त्यामुळे या प्रकरणी अहवाल सादर करण्यास विलंब होत असला तरी पुढील अधिवेशनापुर्वी दोन्ही प्रकरणांवर निर्णय घेण्यात येईल, असे मी आश्वासीत करतो.

तालिका सभाध्यक्ष : या प्रकरणी पुढील अधिवेशनामध्ये मुदत मागण्याची वेळ येऊ देऊ नये.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

.....

श्रीमती देवयानी फरांदे : अध्यक्ष महोदय, अध्यक्ष महोदय, माझा माहितीची मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात नाशिक येथे बुधवारी पीव्हीआर चित्रपटगृहामध्ये महिला एकमेकींची ओळख पटावी याकरिता गळ्यात भगवा स्कार्फ घालून "द काश्मिर फाईल" हा चित्रपट पाहण्यासाठी गेल्या होत्या. सदरहू चित्रपटगृहातील सुरक्षा रक्षकाने त्या स्कार्फ जमा करण्यास सांगितले, ज्या महिला स्कार्फ देत नव्हत्या त्यांचे स्कार्फ खेचण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्याने सांगितले की, आम्हाला वरुन आदेश मिळाले आहेत.

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये भगवे गमजे घालून काही सन्माननीय सदस्य बसलेले आहेत. या सरकारला भगव्याच्या बाबतीत एवढा राग असण्याचे कारण काय आहे ? सभागृहामध्ये संसदीय कार्य मंत्री महोदय उपस्थित आहे. सदरहू चित्रपटगृहातील सुरक्षा रक्षक यांचेवर सदरहू प्रकरणी कारवाई करण्यात यावी. पीव्हीआर चित्रपटगृहाच्या मालकास वरुन कोणी आदेश दिला ? तो आदेश सरकारने दिला असेल तर याबाबत खुलासा करावा अन्यथा पीव्हीआर चित्रपटगृहाच्या मालकावर कारवाई करावी.

तालिका सभाध्यक्ष : आपण सन्माननीय सदस्य यांना पॉईंट ऑफ इन्फर्मेशन मांडण्यास संधी दिली आहे. प्रत्येक मुद्यावर मंत्री महोदयांना उत्तर देण्यास सांगणे योग्य होणार नाही.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, हा छत्रपती शिवाजी महाराजांचा भगवा आहे. याप्रकरणी चौकशी करण्याचे आदेश देऊन संबंधितांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यास सांगावे. अशी आयपीसीमध्ये तरतूद आहे.

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, यासंदर्भात कारवाई करण्यास गृह मंत्री महोदयांना ताबडतोब कळविण्यात येईल.

श्रीमती नमिता मुंदडा : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये सौंदाणा या गावात काही दिवसांपूर्वी ३०० एकर ऊस एमएसईबीच्या कारणामुळे जळाला आहे. त्याचा पंचनामा करण्यास एमएसईबीच्या कनिष्ठ अभियंता यांना पाठविण्यात आले होते. त्यांनी पंचनाम्यात सांगितले आहे की, कंडक्टर ब्रेक व स्पार्क झाल्यामुळे अशी घटना घडली आहे. अशा प्रकारच्या घटना लातूर जिल्ह्यातील सुरडी, होळ, कोद्री अशा अनेक गावात घडत आहेत. अतिवृष्टी किंवा दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते त्याबद्दल आपण काही करु शकत नाही. परंतु शेतकऱ्यांचा एमएसईबीच्या तारांमुळे ऊस जळत आहे. त्या जुन्या झाल्या, काही पडल्या आहेत, त्यामुळे अशा घटना घडत आहेत. शासनाने याची नोंद गांभीर्याने घ्यावी.

असुधारित प्रत

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, आज अधिवेशनाचा सभागृहातील शेवटचा दिवस आहे. सर्वच सन्माननीय सदस्य अनेक आयुधांच्या माध्यमांतून आपआपल्या मतदारसंघातील प्रश्न मांडण्याचा प्रयत्न करीत असतात. यासर्व धावपळीमध्ये एखादा महत्त्वाचा विषय दुर्लक्षीत होतो.

अध्यक्ष महोदय, गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नांकडे आपण सर्व मंडळी कमालीचे दुर्लक्ष करीत आहोत. माझ्या मतदारसंघामध्ये व जिल्ह्यात एकूण ५ ते ५,५०० गिरणी कामगार आहेत. त्यांनी अनेक मोर्चे, आंदोलने केली. त्यानंतर सरकारचे निर्णय घेतले. यासर्व गोष्टी झाल्यानंतर देखील प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी करण्यास कमालीची दिरंगाई झाल्यामुळे त्यांच्या मनात प्रचंड असंतोष आहे.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.प्रकाश आबिटकर.....

त्यामुळे याबाबत माननीय मंत्री महोदयांनी तत्काळ बैठक घ्यावी.

अध्यक्ष महोदय, जवळपास १ लाख ७५ इतके नोंदणी गिरणी कामगार आहेत. याकामगारांपैकी काही कामगारांच्या सदनिका दुरुस्ती करण्याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी म्हाडाच्या अधिकाऱ्यांना सूचना देऊन देखील अद्याप त्याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. शहरातील आणि कोनगावमधील सर्व गिरणी कामगारांना न्याय देण्यासाठी मंत्री महोदयांनी निर्णय घ्यावा, अशी विनंती आहे.

असुधारित प्रत

ॲड. राहुल नार्वेकर : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. राज्य सरकारने माहे जानेवारी २०२१ पर्यंत कोविड प्रतिबंधात्मक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३ लाख ८ हजार नागरिकांविरोधात केसेस दाखल केलेल्या आहेत. याच महिन्यामध्ये राज्य सरकारकडून अशी घोषणा करण्यात आली होती की, या ३ लाख ८ हजार केसेस मागे घेण्यात येतील. पण अद्याप सदर केसेस मागे घेण्याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही केली गेलेली नाही. त्यामुळे सामान्य जनतेमध्ये अत्यंत संतापाची भावना आहे. कृपया राज्य शासनाने आज सभागृहाचे कामकाज संस्थगित होण्यापूर्वी या संदर्भातील निवेदन करावे, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. कांदिवली पूर्व विधानसभेतील हनुमान नगरमधील त्रिमूर्ती चाळीतील पोषण आहार योजनेच्या माध्यमातून तांदूळ वितरीत करण्यात आला आहे. परंतु त्या तांदळामध्ये चक्क प्लास्टिकचे दाणे हे तांदूळ म्हणून वितरित केले गेले आहेत. यासंदर्भातीत मी आपल्याला आजची बातमी दाखवित आहे. उपनगराचे सन्माननीय पालकमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. सदर प्रकरणाची चौकशी करुन संबंधित कंत्राटदारावर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, त्याचबरोबर माझ्याकडे शिक्षण विभागाचे दिनांक १४.०३.२०२२ रोजीचे परिपत्रक आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, आपल्याला जो पोषण आहार द्यायचा आहे त्याची व्यवस्था आपल्याकडे नसल्यामुळे तो उसनवारीने घेण्यात यावा . ही गंभीर बाब आहे. त्यामुळे उक्त दोन्ही प्रकरणी मंत्री महोदयांनी निवेदन करावे, असे आपण आदेश द्यावेत, अशी माझी आपणास विनंती करतो.

तालिका सभाध्यक्ष : उक्त प्रकरणी शासनाने निवेदन करावे.

श्री.कृष्णा गजबे : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये बाल संगोपन योजनेंतर्गत विधवा, निराधार, कुमारी माता यांच्या मुलांच्या संगोपनासाठी शासनाकडून वेळोवेळी मानधन/अनुदान दिले जाते. सन २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या वर्षांमध्ये गडचिरोली जिल्ह्यामध्ये ७६ लाख १६ हजार ४५० एवढ्या लाभार्थ्यांसाठी अनुदान आले होते. पण तत्कालीन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी सदर योजनेंतर्गत प्राप्त झालेले अनुदान शासनास परत केले. तरी याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत

श्री. श्यामसुंदर शिंदे : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. दोन वर्षापूर्वी हेडकॉन्स्टेबल श्री.शिवाजी शिंदे हे वर्दीमध्ये बंदोबस्तासाठी जात असताना श्री.तुळजाराम ठाकूर या गुंडाने त्यांच्यावर तलवारीने वार करून खाली पाडले व डोक्यात दगड घालून त्यांचा निघृणपणे खून केला. परंतु अद्याप संबंधित गुंडाला अटक झालेली नाही. पुढील सहा महिन्यांमध्ये तरी त्याला अटक केले जाईल काय ?

अध्यक्ष महोदय, श्रीमती सृष्टी गायकवाड नावाच्या मुलीला एका गुंडाने अहमदाबादला पळवून नेले आहे. त्याला पकडण्यात आले असून पोक्सोअंतर्गत अटक करण्यात आली आहे. सदर गुंड त्याच्या नातेवाईकांना त्रास देतो. त्याला नांदेड जिल्ह्याच्या बाहेर तडीपार करण्यात येणार आहे काय ?

असुधारित प्रत

श्रीमती श्वेता महाले : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. माझ्या मतदारसंघामध्ये दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ रोजी ऊर्जा मंत्री महोदय दौऱ्यावर आले होते. त्या दरम्यान शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची वीज जोडणी कापण्यात आली. सन्माननीय ऊर्जा मंत्री यांचे लक्ष वेधण्यासाठी त्या ठिकाणी लोकशाही मार्गाने शेतकऱ्यांनी त्यांना काळे झेंडे दाखल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांवर सरकारने गुन्हे दाखल केले आहेत. सदर गुन्हे सरकार मागे घेणार आहे काय ?

असुधारित प्रत

श्री.अमित साटम : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. माझ्या मतदारसंघातील मतदार पद्मश्री पुरस्कार प्राप्त आणि सुप्रसिद्ध गायक श्री.सोनू निगम यांची अशी तक्रार आहे की, मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री. इकबाल सिंह चहल यांचे नातेवाईक श्री.राजिंदर हे त्यांना फ्री शो करण्यासाठी धमकी देत आहेत. अन्यथा त्यांच्याही घरावर नोटिस पाठवून तिकडे तोडक कार्यवाही करण्यात येईल, अशा प्रकारची ते धमकी देत आहेत. त्यामुळे सदर प्रकरणाची सरकारने नोंद घेऊन श्री.राजिंदर आणि श्री.इकबाल सिंह चहल यांच्यावर कार्यवाही करावी.

असुधारित प्रत

डॉ.भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. माझ्या वर्सोवा मतदारसंघातील वि.रा.देसाई रोड येथील फर्म रिपब्लिक रोडवरील CTS क्रमांक ८४४/१ अंबोली गाव अंधेरी पश्चिम येथील सदरील भूखंडावर अनधिकृतपणे प्रचंड मोठ्या प्रमाणावर डंम्पिग होत आहे. डंम्पिग करणाऱ्या ट्रक्समुळे वाहतुकीचा प्रश्न निर्माण होतो आहे, रस्ते खराब होत आहेत, रात्रंदिवस डंम्पिगच्या आवाजामुळे, धुळीमुळे स्थानिक नागरिकांना त्रास होत आहे. याबाबत अनेक तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर MRTP Act, १९६६ कलम ५२/४३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तरीही अनधिकृत डंम्पिग राजरोसपणे सुरू आहे. कोणाच्या आशीर्वादाने होत आहे, पोलीस काय करीत आहेत, मुंबई महानगरपालिका काय करते आहे, हेच कळत नाही. सदर ठिकाणचे अनधिकृत डंम्पिग तातडीने थांबविण्यात यावे, अशी मी विनंती करते.

असुधारित प्रत

ॲड.आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. या अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे. मागील अधिवेशन नागपूर येथे होणार होते, परंतु ते दुर्दैवाने झाले नाही. हेही अधिवेशन नागपूरला झाले नाही. विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस देण्यासंदर्भात मागील अधिवेशनामध्ये माननीय उप मुख्यमंत्री यांनी सांगितले होते की, आम्ही मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करून बोनसचा प्रश्न लवकर निकाली काढू. या अधिवेशनातही तशाच पद्धतीचे आश्वासन देण्यात आलेले आहे. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. उद्या आम्ही मतदारसंघात जाणार आहोत. शासनाने बोनसचे पैसे थेट शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये टाकण्याचा निर्णय घेतला होता, तो लवकरात लवकर घ्यावा आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मी विनंती करतो.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष जैस्वाल यांनी जो मुद्दा मांडला, तो याकरिता महत्त्वाचा आहे की, सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी हाच मुद्दा पहिल्या दिवशी मांडला होता. त्याही वेळेस सरकारने सांगितले होते की, बोनस संदर्भातील निर्णय घोषित करण्यात येईल. आज अधिवेशन संपते आहे, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर आणि कोकणातील धान उत्पादक शेतकरी आपल्याकडे नजर लावून बसले आहेत. माझी आपल्यामार्फत सरकारला विनंती आहे की, या सभागृहाचे कामकाज संपण्याच्या आत सरकारने या संदर्भातील घोषणा केली पाहिजे आणि ती करावी, अशी मी विनंती करतो.

तालिका सभाध्यक्ष : माननीय विरोधी पक्षनेता यांना सांगू इच्छितो की, माननीय उप मुख्यमंत्री यांनी संबंधित शेतकऱ्यांना बोनस देण्यात येईल, असे सांगितले होते. शेतकऱ्यांना मदत कशी करता येईल, या दृष्टीने आम्ही प्रयत्न करु, असे देखील सांगितले होते.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. यासंदर्भात विदर्भाच्या विषयावर चर्चा करताना अधिक सविस्तरपणे चर्चा करणार आहे. परंतु धान उत्पादन शेतकऱ्यांना बोनस देण्याबाबत शासनाची नियत दिसत नाही. हा टाईमपास करण्याचा प्रकार आहे. दोन लक्ष कोटी रुपये पगार दिल्यानंतर निर्णय करण्यासाठी काय लागते, फक्त एक कागद लागतो. आर्थिक पाहणी अहवाल काढून त्यामध्ये विदर्भामध्ये किती जमीन आहे तेवढे पाहायचे आणि त्यानुसार बोनस जाहीर करायाचा आहे. सन २०१३ पासून देण्यात आलेल्या बोनसचा कागद माझ्याजवळ आहे. सन २०११ मध्ये बोनस देण्याबाबत निर्णय घेण्यात आला व ते बोनस सन २०१३ पासून दिले जात आहे. मागील काळामध्ये जेवढे मुख्यमंत्री झाले त्यांना काय अक्कल नव्हती काय ? आता कोरोनाच्या काळामध्ये आपली अक्कल एकदम एवढी वाढली आहे की, यामध्ये चोरी होत असल्याचे आपल्या लक्षात आले.

तालिका सभाध्यक्ष : माननीय उप मुख्यमंत्री यांनी याबाबत उत्तर दिलेले आहे तरीही शासनाने याबाबतची नोंद घ्यावी, अशी मी सूचना करतो.

श्री.अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. जळगावमध्ये एक विद्यार्थिनी रिक्षातून शाळेत जात असताना तोल जाऊन खाली पडली आणि तिचा दुर्दैवी अंत झाला. अनेक विद्यार्थी, विद्यार्थिनींना खेडेगावातून, पाड्यातून, वाड्यातून, वस्तीमधून शाळेत जाण्यासाठी ५-६ किलोमीटर प्रवास करावा लागत आहे. याबाबत सरकारच्या संवेदना जाग्या होणार आहेत की नाहीत. सरकार एसटी संपावर कधी लक्ष घालणार आहे? एसटीमुळे हे सर्व प्रकार घडत आहेत. एसटी नसल्यामुळे विद्यार्थ्यांची अवहेलना होत आहे. त्यामुळे शासनाने याकडे विशेष लक्ष द्यावे, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत

श्री.किशोर पाटील : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. पुढील तीन महिन्यांपर्यंत शेतकऱ्यांची वीज खंडित केली जाणार नाही, पाणीपुरवठा योजनांची वीज खंडित केली जाणार नाही, असे शासनाने आश्वासित केले होते. परंतु आजही शेकडो शेतकऱ्यांची वीज तोडली जात असल्याचे आम्हाला शेकडो फोन येत आहेत. पाणीपुरवठा योजनेची वीज खंडित केल्यामुळे सर्व गाव परेशान होत आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, वीज तोडणीमुळे ग्राम पंचायतीचे सरपंच आणि ग्रामसेवक अडचणीत आलेले आहेत. हा निर्णय राज्य शासनाचा आहे की केंद्र शासनाचा मला माहीत नाही. यापूर्वी सर्व बँक खाती राष्ट्रीयीकृत बँकेत होती, नंतर सदर खाते महाराष्ट्र बँकेमध्ये उघडण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या आणि आता ICICI बँकेमध्ये खाते उघडण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. यामध्ये कोणताही व्यवहार सरपंच आणि ग्रामसेवक करू शकत नाहीत. मी आज पुन्हा मंत्री महोदयांना आणि ऊर्जा मंत्री महोदयांना विनंती करतो की, आपण दिलेले आदेश अजूनही पारित झालेले नाहीत किंवा त्यावर कार्यवाही होत नाही. ही बाब आपण लक्षात द्यावी.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. सुनिल कांबळे : अध्यक्ष महोदय, महाशिवरात्रीच्या दिवशी पुणे येथे एका संस्थेने शिवलिंगाची पुजा आयोजित केली होती. पोलिसांनी त्या संस्थेला सूचना केल्या की, तेथे भगवे झेंडे, स्टेज, स्पीकर लावू नये. वाहतूक पोलिसांकडून आणि महानगरपालिकेकडून स्टेजसाठी त्या संस्थेने परवानगी घेतली होती. असे असताना तेथे कोणत्याही प्रकारची दंगल किंवा तणाव नसताना पोलिसांनी संबंधित मंडळाच्या २५ ते २६ लोकांना बोलावून रात्री घरातून उचलून नेले आणि कलम २९५ अन्वये त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. यबाबत शासनाने खुलासा करावा, अशी मी विनंती करतो.

तालिका सभाध्यक्ष : शासनाने याबाबत नोंद घ्यावी.

असुधारित प्रत

श्री. बळवंत वानखेडे : अध्यक्ष महोदय, मागील २३ तारखेपासून बार्टी, पुणे येथे पीएच.डी. आणि एमफीलचे विद्यार्थी फिलॉसॉपीकरिता उपोषणास बसले आहेत. तसेच ५०९ विद्यार्थ्यांपैकी ४०० विद्यार्थ्यांना फिलॉसॉपी देण्यात आली असून १०९ विद्यार्थ्यांना ती देण्यात आली नाही. म्हणून ते बार्टी संस्थेसमोर येथे उपोषणाला बसलेले आहेत. मी विनंती करतो की, १०९ विद्यार्थ्यांना सन २००८ प्रमाणे फिलॉसॉपी देण्यात यावी. याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. तसेच दिनांक १ मार्च, २०२२ रोजी माननीय मंत्री श्री. धनंजय मुंडे यांनी ट्वीट केले होते की, सदरहू विद्यार्थ्यांना फिलॉसॉपी प्रमाणपत्र दिले जातील. परंतु अद्यापपर्यंत ते देण्यात आलेले नाही. मी विनंती करतो की, सरसकट विद्यार्थ्यांना फिलॉसॉपी प्रमाणपत्र देण्यात यावेत.

तालिका सभाध्यक्ष : शासनाने याबाबत नोंद घ्यावी.

असुधारित प्रत

श्री. प्रताप अडसड : अध्यक्ष महोदय, मी शासनाला विनंती करु इच्छितो. नवीन निवडून आलेल्या आमदारांना मतदारसंघात काम करीत असताना प्रशासकीय स्तरावर कोणते अधिकार आहेत, याची माहिती दिली पाहिजे. याचे कारण असे की, माझ्या मतदारसंघात लाभार्थ्यांना आकस्मिक निधीच्या लाभाचे चेकवाटप माजी आमदारांच्या हस्ते जबरदस्तीने करुन घेण्यात आले होते. तसेच मागील वेळेस मी आकस्मिक लाभ निधीचे चेक वाटप करण्याबाबत तहसिलदार यांना बोललो होतो. तेव्हा त्यांनी सांगितले की, या चेकचे वाटप शासकीय अधिकाऱ्यांच्या हस्ते केले जातात. ते लोकप्रतिनिधीच्या हस्ते करता येत नाही. मी तेथे उपस्थित असताना तहसलिदारांनी त्यांच्या हस्ते तेथे चेकचे वाटप केले होते. याबाबत मी हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. याबाबत काय कार्यवाही केली आहे, हे मला समजले नाही. याबाबत माहिती द्यावी, अशी मी विनंती करतो.

तालिका सभाध्यक्ष : शासनाने याबाबत नोंद घ्यावी.

असुधारित प्रत

श्री. संजय केळकर : अध्यक्ष महोदय, मागील दोन दिवसापासून घरेलू महिला कामगारांचे धरणे आंदोलन चालू होते. तेथे हजारो घरेलू महिला कामगार उपस्थित होत्या. मी आणि सन्माननीय सदस्य श्री. किसन कथोरे हे तेथील महिला आंदोलनकर्त्यांच्या भेटीला गेलो होतो. घरेलू कामगार महिला ह्या वंचित, दुर्लक्षित, कष्टकरी आहेत. त्यांच्या काही मागण्या आहेत. पहिल मागणी अशी आहे की, किमान वेतनाच्या परिशिष्टमध्ये त्यांचा समावेश झाला पाहिजे. घरेलू कामगाराबाबत माननीय न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत की, त्रिपक्षीय मंडळाची निर्मिती केली पाहिजे. त्या मंडळाची निर्मिती करावी, अशी मी शासनाला विनंती करतो. कामगार कल्याण कायदा असून कामगार हक्क कायदा नाही. या कायद्याचाही त्यामध्ये समावेश करावा आणि कामगारांना निवृत्तीनंतर पेन्शन लागू करावी, अशी मी विनंती करतो.

तालिका सभाध्यक्ष : शासनाने याबाबत नोंद घ्यावी.

असुधारित प्रत

श्री. चिंतामण वनगा : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात गुजरात सीमा ते मनोहर सीमेलगत अवैध धंदे सुरु आहेत. तेथे बायोडिझेल, गुटखा तस्करी मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यावर शासन लवकरात लवकर आळा घालणार आहे काय ?

असुधारित प्रत

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, मी अतिशय महत्त्वाच्या विषयासंदर्भात माहितीचा मुद्दा मांडणार आहे. या सभागृहातील सदस्य आणि राजापूर मतदारसंघाचे आमदार सन्माननीय श्री. राजन साळवी यांना दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी ९ वाजून ३० मिनिटांनी मो.क्र. ९२६५४४०५७६ वर एक फोन करुन त्यांना धमकी देण्यात आली की, "रिफायनरी का काम मत रोकना, बुरा हो जाएगा. चल, फोन रख." अशा गलिच्छ भाषेत त्यांना शिविगाळ करण्यात आली होती. याबाबत त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली होती. त्यानंतरही सन्माननीय सदस्य श्री. राजन साळवी यांना दिनांक ११ जानेवारी, २०२२ रोजी रात्री २२ वाजून १४ मिनिटांनी मो.क्र. ९५५४६५७५५५ वरुन फोन आला आणि "राजन, रिफायनरी में हमारा पैसा लगा है. अपोज मत करना. नहीं तो तुझे और तेरे परिवार को ठोक देवे" अशा प्रकारची धमकी त्यांना देण्यात आली आहे. याबाबत रत्नागिरी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य श्री. राजन साळवी यांनी मतदारसंघातील नाणार येथील रिफायनरी प्रकल्पासाठी जनतेसोबत विरोध दर्शविला आहे. ज्यांचे कोणाचे पैसे गुंतले असतील आणि जे परराज्यातील असतील अशा व्यक्तींपैकी काही लोकांनी त्यांना धमकी दिली आहे काय ? या सदनातील सदस्यांच्या हक्काचे आणि अधिकारांचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. सन्माननीय सदस्य श्री. राजन साळवी हे मतदारसंघात रात्री २ ते ३ वाजेपर्यंत फिरत असतात. ते जनतेची सेवा करीत असतात. त्यांना देण्यात आलेल्या सुरक्षेमध्ये वाढ करण्यात यावी. भविष्यात त्यांच्या जिवाला धोका होणार नाही, याची काळजी राज्य सरकारने घ्यावी व याबाबत माननीय गृह मंत्र्यांनी उत्तर द्यावे, अशी मी विनंती करतो.

श्री. शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन साळवी यांनी याबाबतची तक्रार माझ्याकडे दिली होती. हा प्रकार घडल्यानंतर त्यांना अधिकचा एक सुरक्षारक्षक उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यांच्या निवासस्थानीही सुरक्षा रक्षक नियुक्त केला आहे. तसेच या दोन्ही क्रमांकाची तपासणी सायबर सेलच्या माध्यमातून केली जात आहे. या प्रकरणामागे कोण आहे, हे तातडीने शोधून काढावे, असे आदेश आज दिले जातील. तसेच त्यांच्यासाठी अधिकची सुरक्षा वाढविण्याची आवश्यकता असेल तर ती वाढविण्याबाबत योग्यतो निर्णय घेतला जाईल.

श्री. संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, माननीय परिवहन मंत्री ॲड. अनिल परब सभागृहात उपस्थित आहेत. माझी एम एच १९ सी झेड ५१३० ही इनोव्हा कार परस्पर माननीय परिवहन मंत्र्यांच्या नावे करण्यात आली आहे.

ॲड. अनिल परब : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रकरण अतिशय गंभीर आहे. मी याबाबत कडक कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच त्यांच्या वाहनांची कागदपत्रे त्यांच्या नावे करण्याबाबतची सूचना दिलेली आहे.

असुधारित प्रत

श्रीमती माधुरी मिसाळ : अध्यक्ष महोदय, माननीय पर्यटन मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. सर्व मंत्री महोदयांच्या शासकीय बंगल्यास गड किल्ल्यांची नावे देण्यात आली आहेत. मी यानिमित्ताने एक सूचना करु इच्छिते की, ज्या मंत्री महोदयांच्या बंगल्यास ज्या गड किल्ल्याचे नाव दिले आहे, तो किल्ला त्या त्या मंत्री महोदयांनी दत्तक घ्यावा व त्याची देखभाल करावी. दत्तक गाव योजनेनुसार मंत्री महोदयांनी किल्ले दत्तक घ्यावेत.

धन्यवाद !

असुधारित प्रत

श्री. उदयसिंग राजपूत : अध्यक्ष महोदय, आता सन्माननीय सदस्य श्री. किशोर अप्पा पाटील यांनी माहिती दिली आहे. माननीय ऊर्जा मंत्र्यानी सांगितले की, वीज कट केली जाणार नाही. माझ्या वैजापूर मतदारसंघामध्ये पोखरी व इतर दोन ते तीन गावे आहेत.त्या गावातील पाणी पुरवठ्याची वीज कट केली आहे. त्यामुळे याची दखल ऊर्जा मंत्री महोदयांनी घ्यावी. दुसरे असे की, वैजापूर आणि गंगापूर येथे एक ते दीड महिन्यांपासून ट्रान्सफॉर्मर फेल झाले आहेत. शेतकऱ्यांना ट्रान्सफॉर्मर मिळत नाहीत. याची दखल शासनाने घ्यावी, अशी मी विंनती करतो.

असुधारित प्रत

श्री. टेकचंद सावरकर : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात अनेक रेशन दुकान आहेत. या रेशन दुकानास बाहेर गावातील रेशन दुकान जोडण्यात आले आहेत. प्रत्येक गावामध्ये जेथे रेशन दुकान मंजूर आहे तेथेच धान्य वाटप केले पाहिजे, असे शासनाचे धोरण आहे. या धोरणानुसारच प्रत्येक गावामध्ये रेशन वाटपाची कार्यवाही व्हावी. दुसरे असे की, नागपूर जिल्ह्यातील कामठी येथे धानाचे शेतकरी आहेत. तेथे धानाचे मोठ्याप्रमाणात उत्पादन होत असते. परंतु राज्य सरकारने धानाच्या शेतकऱ्यांकरिता बोनस जाहीर केला नाही. शासनाने शेतकऱ्यांकरिता बोनस जाहीर करावा, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.चौधरी.....

असुधारित प्रत

श्री.भिमराव तापकीर : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये खडकवासला हा किल्ला आहे. या किल्ल्यावर भगवा ध्वज उभारण्यात यावा यासाठी मी गेल्या अधिवेशनापासून प्रयत्न करीत आहे. त्यासाठी १ कोटी रुपयांची तरतूद देखील करण्यात आली आहे. परंतु ध्वज उभारण्यासाठी पर्यटन विभाग व वन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. अनेक दिवसांपासून प्रयत्न करुनही सदर ना हरकत प्रमाणपत्र अद्याप मिळालेले नाही. तरी माझी याद्वारे विनंती आहे की, तात्काळ ना हरकत प्रमाणपत्र देऊन भगवा ध्वज उभारण्यात यावा.

असुधारित प्रत

श्री.नारायण कुचे : अध्यक्ष महोदय, पाणी पुरवठा विभागाचे माननीय मंत्री श्री.गुलाबराव पाटील या ठिकाणी उपस्थित आहेत. मी या विषयाबाबत त्यांच्याशी चर्चा देखील केली आहे की, शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरींचा लाभ घेण्यासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र घ्यावे लागते. परंतु यासंदर्भातील सर्वेक्षण चुकीच्या पध्दतीने झालेले आहे. हा संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे. मंत्री महोदयांनी याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, ही विनंती आहे.

असुधारित प्रत

कॅप्टन आर. तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, मैं महाराष्ट्र के किसानों की आत्महत्या के बारे में अपनी बात कहना चाहता हूं. महाराष्ट्र में किसानों को कृषि के लिए बिजली मुफ्त में मिलनी चाहिए. तमिलनाडु, तेलंगाना और आंध्रप्रदेश में किसानों के लिए बिजली मुफ्त में मिलती है. कर्नाटक में केवल १० प्रतिशत बिजली का बिल लिया जाता है और बाकी कि बिजली मुफ्त में दी जाती है. महाराष्ट्र में किसानों को बिजली मुफ्त में क्यों नहीं दी जाती? महाराष्ट्र में किसानों को बिजली मुफ्त में मिलेगी तो किसानों की आत्महत्याओं की संख्या कम होगी.

असुधारित प्रत

श्री.समीर कुणावार : अध्यक्ष महोदय, गेल्या चार वर्षांपासून मनोरा आमदार निवासाचे काम रखडलेले आहे. त्यामुळे १८० आमदार इतरत्र हॉटेलमध्ये राहतात. तसेच १२०० ते १३०० किलोमीटर अंतरावरील आमच्या मतदारसंघातील लोक विविध कामांसाठी मुंबईला येत असतात, अनेक रुग्ण उपचारांसाठी येत असतात. या सर्वांची अतिशय गैरसोय होत आहे. माझी सरकारला आपल्या माध्यमातून विनंती आहे की, गेल्या चार वर्षांपासून आमदार निवासाचे काम का रखडले आहे याबाबत मंत्री महोदयांनी निवेदन करावे. तसेच कधीपर्यंत हे काम पूर्ण होईल ते सरकारने सांगावे.

असुधारित प्रत

श्री.ज्ञानराज चौगुले : अध्यक्ष महोदय, मी गेल्या १२ वर्षांपासून या सभागृहाचा सदस्य म्हणून काम करीत आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांच्या विजेच्या संदर्भातील प्रश्न निर्माण होतो. पूर्वीच्या सरकारमधील ऊर्जामंत्री माननीय श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या काळात मी एक मुद्दा उपस्थित केला होता की, पुरेशा दाबाने वीज उपलब्ध होत नसल्यामुळे ६३ केव्ही चे ट्रान्सफॉर्मर्स जळाल्यानंतर त्याजागी १०० केव्हीचे ट्रान्सफॉर्मर्स देण्यात यावेत. तत्कालीन ऊर्जामंत्री माननीय श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी उत्तर दिले होते की, ६३ केव्ही चे ट्रान्सफॉर्मर्स जळाल्यानंतर त्याजागी १०० केव्हीचे ट्रान्सफॉर्मर्स देण्यात येतील. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, या सरकारच्या काळात तरी ६३ केव्ही चे ट्रान्सफॉर्मर्स जळाल्यानंतर त्याजागी १०० केव्हीचे ट्रान्सफॉर्मर्स देण्यात यावेत.

असुधारित प्रत

डॉ.देवराव होळी : अध्यक्ष महोदय, आदिवासी बहुल चंद्रपूर जिल्हयातील मौजा कुसबी, ता.जिवती येथील आनंदराव मेश्राम यांनी २४ आदिवासींची ६३.६२ हेक्टर जमीन माणिकगड सिमेंटस, स्थानिक प्रशासकीय अधिकारी हाताशी धरुन १९८५ पासून ताब्यात घेतली आहे. यामुळे तेथील आदिवासी समाजावर खूप मोठा अन्याय झालेला आहे. कंपनीने कोणालाही विश्वासात न घेता आणि कोणताही मोबदला न देता बेकायदेशीररित्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने हे कृत्य केले आहे. तरी या प्रकरणी तहसिलदार व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्यावर योग्य ती कारवाई करावी व आदिवासींना न्याय द्यावा.

असुधारित प्रत

श्रीमती नमिता मुंदडा : अध्यक्ष महोदय, काही दिवसांपूर्वी अंबाजोगाई तालुक्यातील डोंगरपिंपळा या गावामध्ये एका ८ वर्षीय मुलीवर बलात्कार झाला. सदर मुलगी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालय, अंबाजोगाई येथे भरती आहे. अशा घटनांमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत असून प्रत्येक महिन्यात, आठवडयात या घटना घडत आहेत. त्यामुळे यासंदर्भात सरकारने आपले धोरण स्पष्ट करावे.

असुधारित प्रत

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, विद्यार्थ्यांमध्ये मोठया प्रमाणात ड्रग्सचे व्यसन वाढत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या विकासासाठी भारतीय तत्त्वज्ञान, मूल्य शिक्षण, आसने, गुरुचे महत्त्व व व्यवसाय प्रशिक्षण शाळांमध्ये सुरु केले पाहिजे. तरुण विद्यार्थ्यांमध्ये मधुमेहाचे प्रमाण देखील वाढले आहे. त्यामुळे सरकारने माझ्या सूचनेची नोंद घेऊन येत्या शैक्षणिक वर्षापासून अभ्यासक्रमामध्ये उपरोक्त बाबींचा अंतर्भाव करावा, ही विनंती आहे.

असुधारित प्रत

डॉ.भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, माझ्या वर्सोवा मतदारसंघातील रुनवाल नावाच्या इमारतीमध्ये मुंबई महानगरपालिकेच्या वतीने कार पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु तेथे कार पार्किंग सोडून इतर अनधिकृत धंदे सुरु आहेत. त्यामध्ये एक मोठे गॅरेज सुरु करण्यात आले असून कार, बाईक यांची विक्री केली जात आहे. तसेच चोरीच्या गाडया देखील तेथे आणून ठेवल्या जातात. गाडयांच्या स्पेअर पार्टची बदली केली जाते. त्या ठिकाणी मद्यपी-गर्दुल्ले, ड्रग्स सेवन करणारे देखील बसतात. त्यामुळे याबाबत पोलिसांनी कारवाई करावी व मुंबई महानगरपालिकेनेही याची दखल घ्यावी, ही माझी विनंती आहे.

असुधारित प्रत

डॉ.किरण लहामटे : अध्यक्ष महोदय, उन्हाळयाचे दिवस सुरु आहेत. अशा परिस्थितीत खेडयातील पिण्याच्या पाण्याच्या योजनांचे वीज कनेक्शन्स् तोडले जात आहेत. माझ्या मतदारसंघातील ब्राम्हणवाडा व इतर काही गावांची कनेक्शन्स् तोडली आहेत. त्यामुळे माझी सरकारला विनंती आहे की, उन्हाळयात पिण्याच्या पाण्याच्या योजनांचे कनेक्शन्स् तोडले जाऊ नये.

असुधारित प्रत

श्री.लहु कानडे : अध्यक्ष महोदय, माझ्या श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील गोदावरी नदीच्या पूर रेषेतील गावांच्या गावठाणांसाठी वीस वर्षांपूर्वी जागा संपादित करण्यात आली परंतु अधिकाऱ्यांनी सदर जागेचे प्लॉटस् पाडून लोकांना वाटप केले नाही. त्यापैकी ज्या लोकांना आता घरकुले मंजूर झाली आहेत त्यांच्या नावे जागा नसल्यामुळे अशी ६५० घरकुले रद्द होत आहेत. त्यामुळे सदर प्लॉटस् गोर-गरीब लोकांच्या नावे करण्यासाठी प्रशासनाला तात्काळ आदेश द्यावेत, ही विनंती आहे.

असुधारित प्रत

श्री.अतुल सावे : अध्यक्ष महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी संभाजीनगरसाठी १ हजार ६८० कोटी रुपयांची पाण्याची योजना सुरु केली होती. सदर योजनेचे भूमिपूजन होऊन दोन वर्षे झाले आहेत परंतु पुढील काहीही कार्यवाही होत नाही. त्यामुळे पाणी पुरवठा मंत्र्यांनी याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करावी, ही विनंती आहे.

असुधारित प्रत

पृ.शी. : डॉ.पी.ए.इनामदार विद्यापीठ, पुणे विधेयक.

L. C. BILL NO. III OF 2022

(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT, INCORPORATION AND REGULATION OF DR. P.A. INAMDAR UNIVERSITY, PUNE FOR THE DEVELOPMENT AND ADVANCEMENT OF HIGHER EDUCATION IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न पुन: प्रस्तुत झाला.)

श्री.उदय सामंत : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस यांनी या विधेयकावर आपले विचार व्यक्त करताना मार्गदर्शन आणि काही सूचनाही केल्या.

अध्यक्ष महोदय, खासगी विद्यापिठे स्थापन करण्याबाबत सन २०१३ मध्ये पहिल्यांदा निर्णय घेण्यात आला व त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातूनच सन २०१९ मध्ये त्यात काही बदल करण्यात आले. त्यानुसार खासगी विद्यापिठे कशा प्रकारे चालविली पाहिजेत याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे आपण निश्चित केली. मागील पाच वर्षांमध्ये जशी काही खासगी विद्यापिठांना मान्यता देण्यात आली तशीच मान्यता या दोन वर्षांमध्ये एका विद्यापिठाला देण्यात आली. त्याच नियमाला अनुसरुन आपण डॉ.पी.ए.इनामदार विद्यापिठाची स्थापना करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी फीच्या संदर्भात उल्लेख केला. तसेच खासगी विद्यापिठे कशा प्रकारे चालतात यावर देखील त्यांनी भाष्य केले. मी याबाबत सांगू इच्छितो की, खासगी विद्यापिठांमध्ये फीच्या संदर्भात आजमितीस कोणतीही समिती कार्यरत नाही.

श्री.उदय सामंत.....

खासगी विद्यापिठांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी देखील फीचे स्ट्रक्चर असले पाहिजे यासाठी समिती नेमण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये २७ लाख ९ हजार ६०९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यापैकी फक्त ७९ हजार ८७६ विद्यार्थी खासगी विद्यापिठांमध्ये शिकत आहेत. याचे प्रमाण केवळ ३ टक्के आहे. गुजरात व अन्य राज्यांचा विचार करता हे प्रमाण ३५ ते ४० टक्क्यांपर्यंत आहे. या विद्यापिठाची स्थापना करीत असताना मी सांगू इच्छितो की, आपण सन २०१९ मध्ये जो कायदा केला आहे त्याला जर एखादे विद्यापीठ बगल देत असेल तर त्याच्यावर नक्कीच नियंत्रण ठेवले जाईल. तसेच नियमाच्या बाहेर जाऊन क्युरिक्युलम करीत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याची भूमिका महाराष्ट्र शासन नक्की घेईल, हा विश्वास मी या निमित्ताने देतो.

अध्यक्ष महोदय, आपण मागील वेळी २१ विद्यापिठांना मान्यता दिली आहे. त्या विद्यापिठांचे कायदे व या विद्यापिठाच्या कायद्यामध्ये तिळमात्रही बदल केलेला नाही. त्यामुळे संस्थाचालकांनी नियमाच्या बाहेर जाऊन विद्यापीठ चालविण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना आवश्यक ती बंधने घातली जातील.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. उदय सामंत...

परंतु पारंपारिक अभ्यासक्रम हे विद्यापीठामध्ये असू नयेत, अशा प्रकारची भूमिका आपण जी या ठिकाणी मांडली आहे. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, युजीसीने २००३ मध्ये मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत की, त्यामध्ये पारंपारिक अभ्यासक्रम असले तरी चालतील. त्याला कुठेही बंधन घातले नाही. परंतु आपण या ठिकाणी जो उल्लेख केला की, सार्वजनिक विद्यापीठांमध्ये शेतकऱ्यांची आणि गरीबांची मुले शिकतात. त्या विद्यापीठाला कुठेही बाधा पोहोचणार नाही, याची पूर्ण दक्षता सरकारकडून घेतली जाईल.

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्ष नेता) : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी १९ जानेवारी २०१९ रोजीच्या मार्गदर्शक तत्त्वांचा उल्लेख केला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, खाजगी विद्यापीठाला कोणताही विरोध नाही. कारण त्याशिवाय शिक्षण क्षेत्रामध्ये गुंतवणूक येणार नाही. म्हणून त्यासाठी आमचे पूर्ण समर्थन आहे. त्याचवेळी आपण 'फी'च्या बाबतीत उल्लेख करताना सांगितले की, त्याही बाबतीत काही ना काही बंधने येणार आहेत, त्याबद्दल आम्हाला आनंद आहे. आपण ही मार्गदर्शक तत्वे तयार करताना कोणकोणत्या क्षेत्रात आपल्याला विद्यापीठे निर्माण करता येतील, ती क्षेत्रे आपण निश्चित केली. आमची अपेक्षा अशी होती की, त्यामध्ये एक क्षेत्र, दुसरे क्षेत्र किंवा तिसरे क्षेत्र अशा पध्दतीने कोणत्या तरी विशिष्ट क्षेत्रात ही विद्यापीठे निर्माण व्हावीत. जसे मेडिकल असेल किंवा ॲस्ट्रॉनॉमी असेल त्यानुसार ते विद्यापीठ असावे. एखाद्याला ३-४ विषय घेता येतील, त्या दृष्टीने ते विद्यापीठ असायला हवे. आपण तसा नियम केला की, ज्याच्याकडे पदव्यूत्तर ५ अभ्यासक्रम असतील त्यांनी असे विद्यापीठ तयार करायला हवे. म्हणजे ही स्पेशलाईज युनिव्हर्सिटी आहे. पदव्यूत्तर अभ्यासक्रमाशी संबंधित ते विशिष्ट विद्यापीठ असेल अशा प्रकारच्या गाईडलाईन्स आपण बोंगिरवार समितीच्या माध्यमातून तयार केल्या आहेत. पण आता आपण या बिलामध्ये "होल्ड ऑल" करुन टाकले. म्हणजे यामध्ये आपण जितकी उद्दिष्टे २०१९ च्या गाईडलाईन्समध्ये दिली आहेत, ती सर्व उद्दिष्टे या बिलामध्ये टाकून दिले आहेत. त्यामुळे या विधेयकाच्या माध्यमातून आता आपण पी. ए. इनामदार असे विद्यापीठ तयार करु पाहत आहो की, जी जगातील कोणताही अभ्यासक्रम घेऊ शकेल. पण हे अपेक्षित नव्हते. अपेक्षित असे होते की, आपण जे क्षेत्र सांगितले होते त्यातील कोणत्या क्षेत्रात ते विद्यापीठ तयार करणार आहेत, हे सांगण्याची आवश्यकता होती. उदाहरणादाखल सांगायचे झाले तर जसे आपण बंटी ऊर्फ सतेज डी. पाटील यांनी स्पेसिफिक ॲग्रीकल्चर विद्यापीठ केले, एक आपण स्पेसिफिक मेडिकलची युनिव्हर्सिटी केली. आता आपण यामध्ये सगळीच कारणे आणि उद्दिष्टे दिली असल्यामुळे प्रश्न असा निर्माण झाला की, जी पुणे विद्यापीठाला परवानगी आहे त्या सर्व गोष्टी आता या विद्यापीठातून होतील. हे विद्यापीठ बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. अभ्यासक्रमासाठी

श्री. देवेंद्र फडणवीस...

उघडण्याचा आपला मानस नव्हता. त्याकरिता आपल्याला खाजगी गुंतवणूक नको आहे. उलट आपण केलेली गुंतवणूक मारुन आपलेच प्रोफेसर जास्त पगारावर त्या विद्यापीठात देऊन आणि महागडे शिक्षण देण्याचा प्रयत्न या माध्यमातून होणार आहे. आपल्याला असे अपेक्षित आहे की, आपण ज्या क्षेत्रात गुंतवणूक करु शकत नाही किंवा जेथे गुंतवणूक लागते, त्यांच्या बाबतीत हे करायचे आहे. कारण आपल्याला गरीबाला शिक्षण द्यायचे आहे. मध्यमवर्गीयांना शिक्षण द्यायचे आहे. आपले सर्व रिसोर्सेस आपण तिकडे पुल करीत आहोत. म्हणून जे सेक्टर सुटते, जे इमर्जिंग सेक्टर आहेत, तेथे गुंतवणूक यावी, असे आपले उद्दिष्ट होते, ते या ठिकाणी पूर्ण होताना दिसत नाही. कारण यामध्ये सर्वच म्हणजे १०० टक्के उद्दिष्टे टाकल्यामुळे एक पॅरलल टू पुणे युनिव्हर्सिटी असे विद्यापीठ आपण तयार करीत आहोत आणि म्हणून माझी याला हरकत आहे. इतर आमची काही हरकत नाही. त्यांनी स्पष्ट सांगावे की, आम्ही अमुक या ४ क्षेत्रासाठी हे विद्यापीठ चालवू. त्यांना जर आणखी इतर १० अभ्यासक्रम चालवायचे असतील तर त्यांनी तशी परवानगी घ्यावी. त्यासाठी पुन्हा आपल्याकडे यावे आणि त्या अभ्यासक्रमाची परवानगी घ्यावी. पण "होल्ड ऑल" पध्दतीने सर्व कोर्सेस एकाच बिलामध्ये टाकून दिले आहेत. खरं म्हणजे यातील अनेक अभ्यासक्रम ते सुरू करणार नाहीत. यातील अनेक अभ्यसक्रम असे आहेत की, जे पी. ए. इनामदार विद्यापीठात कुठेही नाहीत. आता त्यांच्याकडे पदव्यूत्तर शिक्षणही नाही. पण तरीही त्यांनी ते या विधेयकामध्ये टाकून घेतले आहे. याला माझा विरोध आहे. म्हणून माझी अशी विनंती आहे की, आपण हे थांबवावे, त्यांच्याशी चर्चा करावी. मी पुन्हा आपल्याला सांगतो की, आमचा याला विरोध नाही. आम्ही याला मान्यता द्यायला तयार आहोत. पण आपल्या विद्यापीठांचा इन्ट्रेस्ट संरक्षित करणे सुध्दा अत्यंत आवश्यक आहे. म्हणून आपण त्यांना या "होल्ड ऑल" पध्दतीमधील नेमके कोणते कोर्सेस ते सुरू करणार आहेत, याची विचारणा करावी. कारण आपण एकदम १५० क्षेत्रे त्यांना देत आहोत आणि ही सर्व क्षेत्रे ते एकदम सुरू देखील करु शकत नाहीत. त्यामुळे ते नेमके कोणते सुरू करणार आहेत, ते त्यांनी सांगावे आणि त्यावर आधारित

श्री. देवेंद्र फडणवीस...

विधेयक आणावे आणि नंतर त्यांना वाढवून हवे असतील तर ते कोर्सेस वाढवून द्यावेत. पुन्हा ते अधिक गुंतवणूक करीत असतील आणि सांगत असतील की ही इमारत तयार आहे आणि म्हणून अमुक २ अभ्यासक्रमांसाठी परवानगी द्यावी तर ती तशी देता येईल. एवढेच आमचे ऑब्जेक्शन आहे. म्हणून या संदर्भात आपण उचित निर्णय घ्यावा, अशी आमची मागणी आहे.

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एका गंभीर मुद्याकडे मंत्री महोदयांचे, सदनाचे व महाराष्ट्राच्या जनतेचे लक्ष वेधले आहे. अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, खाजगी विद्यापीठांना प्रोत्साहन देताना या संदर्भातील कायदा जेव्हा या विधानसभेने मंजूर केला तेव्हा अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. आरक्षणाच्या प्रश्नापासून तर राज्याच्या सरकारच्या संदर्भात ज्यांचा संबंध आहे, अशा विद्यापीठांच्या कामकाजावर याचा दुष्परिणाम होईल, अशी चर्चा या सभागृहात झाली. पण या सभागृहात जेथे सरकारच्या मर्यादा संपतात तेथे इन्व्हेंशन असेल, इनोव्हेशन असेल, अनुसंधान असेल, रिसर्च असेल, जागतिक स्थरावरील ज्ञान देण्यासाठी एखाद्या व्यक्तीने पुढाकार घेतला तर त्याला प्रोत्साहन मिळावे, यासाठी आपण खाजगी विद्यापीठाच्या संदर्भात हा नियम केला की, उद्या एखादा अमेरिकेतील तज्ज्ञ तो आणू शकेल. परंतु आपल्यावर काही मर्यादा येतात. आपण एखाद्याला पगार द्यायचा असेल तर आपले काही नियम आहेत की, तो आपल्या मुख्य सचिवांपेक्षा जास्त आता कामा नये. आम्ही हे अनेकदा बघितले की, या कारणाने अनेक प्रश्न उद्भवतात. वेतनश्रेणीच्या बाबतीत उद्भवतात, नियुक्तीच्या बाबतीत उद्भवतात. त्याकरिता आपण पायलट यांच्या नियुक्त्या देऊ शकलो नाही. त्यामुळे हे इनामदार विद्यापीठ कायदा आणताना सरकार "ईमानदार" दिसत नाही. मला असे वाटते की, दोन कारणांनी हे विधेयक आले असावे. कारण आपण असे ठरविले होते की, ट्रॅडिशनल कोर्सेस म्हणजे बी.ए., बि.कॉम., बी.एस्सी. अशा कोर्सेसना खाजगी विद्यापीठांमध्ये जाण्याचे काही कारण नाही. त्यांचे अभ्यासक्रम हे रिसर्च बेस असावेत.

अध्यक्ष महोदय, मागच्या अधिवेशनात मंत्री महोदयांनी असाच एक कायदा आणला होता आणि त्यावर माननीय विरोधी पक्षनेते भाषण करीत होते. पण आपले कान बंद करुन ते न ऐकता जबदरस्तीने मंजूर केले. आजही शेवटचा दिवस आहे. असे शेवटच्या दिवशी विद्यापीठांचे, विद्यार्थ्यांच्या हिताचे कायदे आणले तर आपले जे स्वप्न आहे की ५० वर्षे सरकार चालवायचे तर त्यावर मला कधी कधी असे वाटते की, हे सरकार जावे, अशी आपल्या मनात इच्छा दिसते. म्हणूनच हे सरकार लवकर

श्री. सुधीर मुनगंटीवार..

जावे म्हणून विद्यार्थ्यांच्या असंतोषाचे जनक होण्याचा मान घेण्याचे आपण प्रयत्न करता, असे दिसते. आपण आमचे मित्र आहात, सन्मित्र आहात, चांगले व्यक्ती आहात. तसेच रत्नागिरीसारख्या प्रदुषणमुक्त शहरातून आले आहात. त्यामुळे शैक्षणिक प्रदुषण करण्याचे काम करु नका. एखाद्या नेत्याचा आपल्यावर दबाव असू शकतो. पण अशा महत्वपूर्ण विषयावर जेव्हा आपण कायदा करु पाहतो आणि त्यावर जेव्हा कमी चर्चा होते तेव्हा आपल्याला विनंती आहे की, संयुक्त समितीकडे आपल्याला हे विधेयक पाठविता आले तर ते पाठविले पाहिजे किंवा या संदर्भात एखादी बैठक घेतली पाहिजे आणि त्यांची जी उद्दिष्टे असतील किंवा त्यांनी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत जे अभ्यासक्रम दिले त्यात नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम असले पाहिजेत. शेवटी आम्ही या सभागृहात विनंतीच करु शकतो. अहंकाराने सरकार चालले तर ते काही कालावधी चालते, त्यात दुमत नाही. पण हा अहंकार, उन्मत्तपणा चर्चा केल्यानंतरही चालू ठेवला तर मला असे वाटते की, हे राज्याच्या हिताचे नाही, विद्यार्थ्यांच्या हिताचे नाही. आपण निश्चितपणे हा कायदा आता मंजूर न करता विधिमंडळाच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठवावा. त्यामध्ये कुठेही सन्मान किंवा प्रतिष्ठेचा विषय करु नये. कोणी जर दबाव टाकत असेल तर त्याचे आपण नाव सांगावे, आपण सर्वजण मिळून त्यांना त्यांची जागा दाखवू. कारण हा महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांचा आहे. त्यामुळे तो आपल्यावर कसा दबाव टाकतो? म्हणून आपण दबावात येऊन काम करु नये, अशी माझी विनंती आहे.

श्री. हरिभाऊ बागडे (फुलंब्री) : अध्यक्ष महोदय, या कायद्याच्या उद्देश आणि कारणे यामध्ये असे म्हटले आहे की, "महाराष्ट्र शासनाने राज्यात उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करुन त्याद्वारे उच्च शिक्षण क्षेत्रातील संधी, गुणवत्ता, सर्व समावेशकता व संशोधन यामध्ये वाढ करण्यासाठी खाजगी क्षेत्राचा सहभाक सुकर करण्याकरिता भरीव प्रयत्न करण्याचे ठरविले आहे."

अध्यक्ष महोदय, आपण आमच्या खेड्यापाड्यामध्ये यापूर्वी जी खूप कॉलेजेस दिली आहेत. आमच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये ९० टक्के कॉलेजेस असे आहेत की, त्यामध्ये पात्रताधारक प्राध्यापक नाहीत, प्राचार्य सुध्दा नाहीत. विद्यार्थी फक्त प्रवेश घेण्यासाठी येतात. पार मुंबई, डोंबिवली, ठाणे आणि कल्याण येथूनही येतात.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. हरिभाऊ बागडे.....

फक्त नाव नोंदविताना एकदा गर्दी दिसते आणि मग पुन्हा परिक्षेच्या वेळेलाच गर्दी दिसते. मधल्या काळात हे विद्यार्थी आपापल्या गावात खाजगी क्लास किंवा इतर काही करीत असतील. रोजगार हमी प्रमाणे कॉलेजमध्ये पास होण्याची हमी दिली जाते. त्यामुळे विद्यार्थी तिथे प्रवेश घेतात. असे कॉलेज चालवून आपल्याला गुणवत्ता कशी मिळणार आहे किंवा दर्जेदार शिक्षण कसे मिळणार आहे ? अशा कॉलेजच्या माध्यमातून आपण विद्यार्थ्यांच्या पिढयानपिढया बर्बाद करीत आहोत. याचा आपण विचार केला पाहिजे. परीक्षा सुद्धा गोडाऊन किंवा इतर ठिकाणी घेतली जाते. यासाठी मला आग्रह करायचा आहे की, आपण खरच जर राज्यातील शिक्षण गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार कराचये ठरवले असेल तर या कॉलेजच्या परीक्षा आणि त्यांचे शिक्षण याकडे विद्यापीठाचे किंवा शिक्षण विभागाचे लक्ष नाही. या विद्यार्थ्यांना पास होण्यासाठी प्रमाणपत्र मिळते. इंजिनियर झालेली मुले प्रमाणपत्र घेऊन येतात आणि एखाद्या कंपनीत जागा असेल तर आम्हाला फोन करण्यासाठी सांगतात. मग आम्ही फोन करतो तिथे कोणी आमच्या ओळखीचा असेल किंवा आमचा मान ठेवण्यासाठी तो त्या विद्यार्थ्यांना बोलावतो आणि चार ते पाच प्रश्न विचारतो. एकाही प्रश्नाचे उत्तर त्या विद्यार्थ्याला देता येत नाही. बी.ई. झालेला विद्यार्थी असून त्याला त्या क्षेत्रातील किंवा तो जे शिकला आहे त्याचे उत्तर देता येत नाही. मग नाईलाजाने त्याला तिथे नोकरी मिळत नाही. मग विद्यार्थी म्हणतात की, आम्ही स्थानिक आहोत, आमचा हक्क आहे त्यामुळे आम्हाला नोकरी मिळाली पाहिजे. तो विद्यार्थी शिकलाच नाही किंवा त्याच्या शिक्षणासाठी कॉलेजला सुविधाच नाही तर तो कसा शिकणार नाही आणि शिकला नाही तर गुणवत्ता येणार नाही, गुणवत्ता नाही तर मग नोकरी किंवा चांगला व्यवसायही करता येत नाही. त्यामुळे आपण अशा पिढया वाया घालविण्याचे काम करु नका. एवढीच विनंती करुन या कॉलेजकडे लक्ष द्या, अशी प्रार्थना करुन मी थांबतो.

श्री. उदय सामंत (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस आणि सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी अतिशय चांगले मुद्दे मांडलेले आहेत. सार्वजनिक विद्यापीठाला कुठेही बाधा येणार नाही याची आम्ही दक्षता घेणार आहोत. पण मघाशी आपण इनामदार संस्थेच्या बाबत उल्लेख करीत असताना इमानदारीचाही उल्लेख केला आहे. तसेच आपण पारंपारिक अभ्यासक्रमाचा देखील उल्लेख केला आहे. यापूर्वी आपण जी २१ विद्यापीठे निर्माण केलेली आहेत. त्यातील अभ्यासक्रम मी मुद्दाम आपल्या माहितीसाठी वाचून दाखवितो. आपण पुण्याच्या स्पायकर विद्यापीठाला मान्यता दिली. काल माननीय विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, हे सर्व पुण्यामध्ये होत आहे. आधीच आपण पुण्यात ११ विद्यापीठांना मान्यता दिलेली आहे. त्यातीलच हे एक विद्यापीठ आहे. त्यामध्ये बी.ए.,अर्थशास्त्र, बी.कॉम, बी.ए. रेग्युलर, बी.ए.बायोलॉजी असे कोर्सेस सुरु आहेत. युजीसीने जी गाईडलाईन काढलेली ती महत्त्वाची आहे. त्यामध्ये त्यांनी असे सांगितले की.....

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, बी.ए. बायोलॉजी हा कोर्स झाला पाहिजे. कारण हा अपारंपारिक कोर्स आहे. आता प्रश्न एवढाच आहे की, आपण आता ज्यांना होल्ड ऑल यांना अलाऊ करीत आहोत त्यामध्ये सर्व पारंपारिक कोर्सेस सुरु आहेत. या खाजगी विद्यापीठाच्या बाबतीत आमची हीच अपेक्षा होती आणि केंद्राच्या नवीन शैक्षणिक धोरणाचीही तिच अपेक्षा आहे की, ज्या कोर्सेसमध्ये आर्टस आणि बायोलॉजी, मॅथस आणि आर्टस असे २ सेक्टर एकत्रित करता येतात यासाठी उत्तम आहे. कायद्यामध्ये आता ज्या तरतुदी केल्या आहेत त्यानुसार यांना कोणताही कोर्स सुरु करता येईल. त्यावर काही बंधन नाही. आज आपण म्हणता की, पारंपारिक विद्यापीठाला अडचण येऊ नये यासाठी आपण दक्षता घेणारआहात. पण हा कायदा आपल्याला तसे अलाऊ करीत नाही. आता आपण कायद्यामध्ये सर्व बाबी टाकल्यामुळे कायदा आपल्याला सर्व काही करायला अलाऊ करतो. आमची अडचण अशी आहे की, जर विद्यापीठांनी बी.एससी अर्थशास्त्र सुरु केले तर ते पारंपारिक विद्यापीठात नाही पण ते असायला पाहिजे.कारण जगात ते आहे. परंतु त्यांनी जर सामान्य बी.एससी. किंवा सामान्य एम.ए. सुरु केले तर आमचा आक्षेप

श्री. देवेंद्र फडणवीस.....

आहे. कारण मग आमच्या विद्यापीठांनी काय करायचे आहे. मग त्यांचे हळुहळु आमचे विद्यापीठ एअर इंडिया होईल, इंडिगो सारखे पुढे जातील आणि मग आमच्या विद्यापीठाला टाटाकडे द्यावे लागेल. असे होऊ एवढीच आमची अपेक्षा आहे. आपण माझी भावना समजून घ्या. आमचा काही विधेयकाला किंवा इनामदार संस्थेलाही विरोध नाही. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार त्या संस्थेबद्दल नाही. तर गंमतीने बोलले आहेत. या कायद्यामुळे पारंपारिक विद्यापीठांना संरक्षण मिळत नाही, एवढेच आमचे म्हणणे आहे. आपण काय करणार हे विद्यापीठांना स्पेसिफिक सांगितले पाहिजे. मग क्षेत्र आपण या कायद्यामध्ये आणले पाहिजे. आता यामध्ये १५० क्षेत्र येतात म्हणजे जगाच्या पाठीवर काहीच उरत नाही. सर्वच क्षेत्र काही सुरुही करता येत नाहीत त्यामुळे मला असे वाटते की, या संदर्भात आपण नीट पुनर्विचार करुन निर्णय करावा.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांना माझी एका वाक्यातच अशी विनंती आहे की, आपण ब्लँकेट न देता डेडिकेटेड किवा सिलेक्टेड कोर्सेस द्या. कारण तोच आपला हेतू आहे. त्यामुळे तो हेतू जर आपल्याला जपायचा असेल तर आपल्याही मनात तेच असेल. १०० ते १५० क्षेत्र दिल्यानंतर काय परिणाम होईल हे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आहे.

श्री. उदय सामंत : अध्यक्ष महोदय, या कायद्यातील अजून एक डेव्हलपमेंट मी आपल्याला सांगतो की, युजीसीने आणि एआयसीटी या दिल्लीतीन ॲपेक्स बॉडीने आम्हाला असे पत्र दिलेले आहे की, आता आपण खाजगी विद्यापीठ दिले किंवा सार्वजनिक विद्यापीठ असतील तरी सार्वजनिक विद्यापीठाची स्वायतत्ता अबाधित राहिली पाहिजे. ही विद्यापीठे दिल्यानंतर ॲपेक्स बॉडीच्या परवानगी असल्याशिवाय कोणत्याही कोर्सेसला मान्यता देण्यात येऊ नये. अशा प्रकारे एआयसीटी आणि युजीसीने देखील सांगितलेले आहे.त्यामुळे सारखे सारखे पारंपारिक कोर्सेस बाकीच्या विद्यापीठांनी सुद्धा सुरु करण्याचा प्रयत्न केला तर युजीसी त्याला परवानगी देईल किंवा नाही याबाबत खूप मोठी साशंकता आहे. ज्यावेळी ही विद्यापीठे सुरु होतील

श्री. उदय सामंत....

तेव्हा त्यांच्या नाविण्यपूर्ण अभ्यासक्रमालाच युजीसी किंवा एआयसीटी परवानग्या देतील.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, पारंपारिक कोर्सेससाठी विद्यापीठांना युजीसीकडे जाण्याची गरजच नाही. तुम्ही कायदा तयार केल्यानंतर त्यांना नवीन सॅन्डवीच कोर्सेससाठी युजीसी कडे जावे लागेल.त्यामुळे यातून तयार होणारी अडचण आपण लक्षात घेतली पाहिजे.

श्री. उदय सामंत : अध्यक्ष महोदय, हे योग्य आहे. परंतु युजीसीने सन २००३मध्येच असे स्पष्टपणे सांगितलेले आहे की, ही विद्यापीठे स्थापन करीत असताना किंवा सन २०१९ मध्ये माननीय विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस जेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते तेव्हा हा कायदा निर्माण झाला त्यामध्येसुद्धा स्पेसिफिक असे म्हटलेले आहे की, पारंपारिक जास्त कोर्सेस सुरु झाले तर आपल्या विद्यापीठांना बाधा निर्माण होऊ शकते याबद्दल दूमत असण्याचे कारणच नाही. परंतु मागचय २१ विद्यापीठांना ज्या कायद्याने मान्यता दिलेली आहे त्याच कायद्याने या विद्यापीठांच्या मान्यतेचे विधेयक आणण्यात आलेले आहे. यामध्ये कुठेही बदल केलेला नाही. त्यामुळे मागच्या विद्यापीठांना जो न्याय दिला आहे त्याचप्रकारचा न्याय या विद्यापीठांना दिला जात आहे .यामध्ये आपण नवीन काहीच करीत नाही. कायद्यामध्ये किंवा विधेयकामध्ये देखील बदल केला जात नाही. माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले की, विद्यापीठांना १५० कोर्सेस दिले जाणार आहेत. तर यामध्ये फक्त स्पेसिफिक कोर्सेसची यादी आलेली आहे. बाकीच्या विधेयकांना फक्त ही यादी नव्हती. तरी सुद्धा हे कोर्स बाकीच्या विद्यापीठांना सुरु करायचे असतील तरी सुद्धा ते सुरु करु शकतात. अशा पद्धतीची तरतूद कायद्यामध्ये आहे. मागच्या विद्यापीठांच्या विधेयकाप्रमाणेच हे विधेयक सभागृहात आणण्यात आलेले आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, बाकीची विधेयके मी बघितलेली आहेत यामध्ये कदाचित एखादे विधेयक सुटले असेल. सन २०१९ चा जो शासन

श्री. देवेंद्र फडणवीस....

निर्णय काढला होता त्यामध्ये आपण क्षेत्र ठरविले होते. ती सर्व क्षेत्र आता घेतलेली आहेत.यापूवी्र असे कधी केले नव्हते कारण बाकीच्यांनी स्पेसिफाईड क्षेत्रे घेतली होती. त्यामुळे ते कोणत्या क्षेत्रात गुंतवणूक करणार आहेत हे आपल्याला माहीत आहे. त्यांनी अंडरटेकिंग द्यावे की, यासर्व क्षेत्रामध्ये आम्ही गुंतवणूक करु. नाहीतर काही क्षेत्रामध्ये फक्त पदव्या दिल्या जातील यामुळे माझे मत एवढेच आहे की, असे होल्ड ऑल किंवा ब्लँकेट पद्धतीने सर्वच क्षेत्र देणे हे योग्य होणार नाही त्याचा पारंपारिक विद्यापीठावर काही परिणाम होईल. दुसरे असे आहे की, नॅक अक्रीडेटेशन वगैरे हे सर्व विषय त्या पलिकडे येतात. पण त्यापूर्वी जर एखाद्या क्षेत्रात यांनी पदव्या वाटप करण्याचा कारखाना सुरु केला तर आपण तो थांबवू शकणार नाही.

यानंतर श्रीमती करंदीकर.....

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस.....

आपल्याला थांबवण्यास स्कोप नाही. यात काही बेकायदेशीर आहे असे माझे मत नाही. आपण हे ज्या स्पिरीटने तयार केले होते ते काही विशिष्ट क्षेत्रातील गुंतवणुकीकरिता होते. त्यांनी सर्व एकत्र केले आहे. म्हणून माझा या करिता विरोध आहे की, आपण स्पेसिफिक क्षेत्र विचारा व त्यामध्ये त्यांना परवानगी द्यावी.

श्री. उदय सामंत : अध्यक्ष महोदय, आपण डी वाय पाटील युनिव्हर्सिटी कृषी व इंजिनिअरिंग क्षेत्राकरिता तयार केली आहे. यामध्ये बंधन घातलेले आहेत. त्यांना काही पारंपरिक कोर्सेस सुरु करायचे असतील व त्या पलीकडे जाऊन आणखी काही कोर्सेस सुरु करायचे असतील तर त्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागेल. अशी तरतूद केलेली आहे. शासन निर्णय घेईल की, त्यांना जर पारंपरिक कोर्सेस सुरु करायचे असतील... नाविन्यपूर्ण कोर्सेस सुरु करण्यास शासन मान्यता देईल. त्यांनी शासनाकडे तसे प्रस्ताव पाठवावेत. शासनाने परवानगी दिल्यानंतर त्यांनी कोर्सेस सुरु करावेत असे बंधन घालण्यात येईल.

प्रा. देवयानी फरांदे (नाशिक मध्य) : अध्यक्ष महोदय, वि.प.वि. क्रमांक ३ संबंधी माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी या ठिकाणी चांगले मुद्दे मांडले आहेत. आपण जेव्हा विद्यापीठे निर्माण करतो तेव्हा त्यांना काही स्पेसिफिक नवीन कोर्सेस विकसित करण्याची मान्यता दिली जाते. मागणी व पुरवठा या गोष्टींचा विचार करुन शासनाने आपली भूमिका निश्चित करावी. हजारो विद्यार्थी फार्मासिस्ट, एमबीए होऊन बाहेर पडत आहेत. मात्र त्यांना आज नोकऱ्या मिळत नाहीत. माझी विनंती आहे. आपण काळाची गरज ओळखली पाहिजे. या करिता शासनाचा विभाग काम करीत आहे काय ? विद्यापीठांना स्पेसिफिक कोर्सेसकरिता मान्यता दिली पाहिजे. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी महत्त्वाचा विषय मांडला. या संबंधी शासनाचा जी. आर असला पाहिजे. अन्यथा शासकीय अधिकाऱ्यांच्या मर्जीने कोर्सेसला मान्यता दिली जाईल. म्हणून शासनाने सदर विषयाबाबत अपारंपरिक किंवा पारंपारिक कोर्सेसबाबत स्पेसिफिक जीआर काढावा व त्या पद्धतीने अधिकारी काम करतील.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, आता आपण या विधेयकामध्ये काही सुधारणा करु शकत नाही. यामुळे आता फ्लोअर ऑफ द हाऊस आम्हाला एवढेच आश्वासन द्यावे की, या विधेयकाच्या संबंधी नियम ३ महिन्यात तयार केले जातील. यामध्ये जे आश्वासन दिलेले आहे, ते नियमात समाविष्ट केले जाईल.

श्री. उदय सामंत : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी विरोधी पक्ष नेते यांनी सूचना केलेली आहे त्याचा विचार करु, पालन करु. दोन महत्त्वाचे मुद्दे आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कॉलेजला मान्यता देत असताना.... माननीय माजी मुख्यमंत्री हे स्वत: महा-एडचे अध्यक्ष होते. महा-एडच्या बैठकीमध्ये ठरवले जाते की, राज्यात किती बिंदू टाकले पाहिजेत व किती कॉलेजेस केले पाहिजेत. मला येथे आकडेवारी सांगायची नाही. मागील ५ वर्षामध्ये किती जाहीर झाले, यावर मला बोलायचे नाही. सन २०१८-१९ मधील कॉलेजचा आलेख पाहिला तर सन २०१८ मध्ये १४९ कॉलेजना मान्यता देण्यात आली होती. सन २०१९-२० मध्ये ८२ कॉलेजला मंजुरी दिलेली आहे. येथे औरंगाबादचा उल्लेख केला गेला. तेथे काही न्यायालयीन बाबी असल्यामुळे गोष्टी थांबल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून महाराष्ट्रासाठी महत्त्वाची गोष्ट मी आपल्याला सांगू इच्छितो. मुंबईत जे.जे. स्कुल ऑफ आर्ट्सचे मोठे कॉलेज आहे. त्याला विद्यापीठाचा दर्जा देण्याचा विचार शासन करीत आहे. राज्यात कला विद्यालये आहेत. जे जे स्कुल ऑफ आर्ट्सला विद्यापीठाचा दर्जा देण्याचा निर्णय आम्ही घेतला असून या बाबत पुढील अधिवेशनात विधेयक आणले जाईल. माननीय सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी मागणी केली होती की, गोंडवाना विद्यापीठाला ट्रायबल व फॉरेस्टचा दर्जा दिला गेला पाहिजे. या करिता आम्ही प्रयत्न करीत असून हे विधेयक देखील पुढील अधिवेशनामध्ये आणले जाणार आहे.

श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) : अध्यक्ष महोदय, वि.प.वि. क्रमांक ३ संबंधी माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी मंत्री महोदयांना सूचना करु इच्छिते. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये बोर्ड मेंबर म्हणून मी काम करीत आहे. माझे भाग्य आहे की, या विद्यापीठाचे कार्यालय माझ्याच मतदारसंघात आहे. येथे वारंवार प्रश्न येतो. आता मराठी भाषेचा एवढा बोलबाला केला जात आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त व्हावा, अशी सर्वांची इच्छा आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मुले इंग्रजी माध्यमातून शिकत नाहीत. ती मुले जिल्हा परिषद किंवा इतर शाळांमधून मराठी माध्यमामधून शिकतात. बीएससी (ॲग्री) हा अभ्यासक्रम मराठी भाषेतून शिकण्यास युजीसी परवानगी देत नाही. हा अभ्यासक्रम डिस्टन्स लर्निंगच्या माध्यमातून मराठी भाषेतून शिकण्यास परवानगी मिळाली तर शेतकऱ्यांची मुले शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान शिकून त्याचा वापर आपल्या शेतात करु शकतील. यामुळे ते आपल्या शेतीतून चांगले उत्पन्न काढू शकतील. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, या करिता आपण प्रयत्न करावा. बीएससी (ॲग्री) हा अभ्यासक्रम मराठी भाषेतून शिकण्याकरता युजीसीशी पत्र व्यवहार करावा किंवा त्याकरिता परवानगी मिळवून द्यावी, अशी मी मागणी करते व माझे दोन शब्द पूर्ण करते.

श्री. उदय सामंत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केली आहे तशी शिफारस युजीसीला केली जाईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभाध्यक्ष : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते ५२ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. उदय सामंत : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ३ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) : सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक -३ संमत झाले आहे.

असुधारित प्रत

असुधारित प्रत

विद्यापीठांच्या सिनेटमध्ये सन्माननीय सदस्यांची नावे पाठविण्याबाबत

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसीजर आहे. विधानमंडळाचे सदस्य सर्व विद्यापीठांच्या सिनेटवर जातात. त्याचे अधिकार अध्यक्षांना असतो. अध्यक्ष सर्वांकडून नावे मागवतात. एक वर्षापूर्वी नावे मागवली आहेत. आम्ही ती नावे दिलेली आहे. मात्र अद्याप ती नावे गेलेली नाहीत. कदाचित एखाद्या पक्षाकडून नावे यायची असतील. आज आपण सचिवालयाला सांगावे. ३-४ दिवसाचा वेळ द्यावा. त्या नंतर किमान जी नावे आली आहेत... आज विद्यापीठाच्या कारभारात आमदारांचे नियंत्रण नाही. माझी विनंती आहे की, पुढील आठवड्यात सचिवालयाला सांगून ही नावे विद्यापीठाकडे पाठवावी.

श्री.उदय सामंत : होय.

अंतिम आठवडा प्रस्ताव संबंधी

ॲड आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, आपण आता अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा सुरु करणार आहोत. काल रात्री उशिरापर्यंत आपण सदनात थांबलो होतो. आमचे काही सदस्य रात्री उशिरा पर्यंत थांबले होते. आता यावर सन्माननीय सदस्य सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, रविंद्र चव्हाण, कालिदास कोळंबकर सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी, असे अनेक सदस्य बोलणार आहेत. दुपारी साडे तीन ते चार वाजे पर्यंत ही चर्चा संपवून दुपारी ४.०० वाजता रिप्लाय घ्यावा, अशी विनंती आहे. आमच्या बाजूने काल रात्री जे सदस्य थांबले होते, तेच भाषण करणार आहेत. माननीय संसदीय कार्य मंत्री व माननीय उपाध्यक्ष यांना मी विनंती केलेली आहे. ४.००वाजता आपण रिप्लाय सुरु करु.

म्युकरमायकोसिस झालेल्या रुग्णांना मदत देण्याबाबत

श्री. सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. कोव्हिडमुळे अनेकांचे मृत्यू झाले. ज्यांना कोव्हिड झालात्यांना जोडूनच म्युकरमायकोसिस (काळी बुरशी) हा रोग अनेकांना झाला. अनेकांचा एक डोळागेला. काही जणांचे दोन्ही डोळे गेले. माझी शासनाला विनंती आहे. या ठिकाणी माननीय अर्थ मंत्री व आरोग्य मंत्री येथेनाहीत. मात्र हे संपूर्ण सभागृह यास मान्यता देईल.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.सुनील प्रभू ...

मृत्युमुखी पडलेल्या माणसांच्या कुटुंबीयांना सरकारने जशी मदत केली त्याप्रमाणे त्या कुटुंबातील प्रमुख माणसाचे, ज्याच्यावर त्या घराचा उदरनिर्वाह चालतो अशाचे दोन्ही डोळे या आजाराने गेले तर ते पूर्ण घर कोलमडून जाते. त्यामुळे सरकारने याबाबत साधक-बाधक विचार करुन ज्यांचे या आजारात दोन्ही डोळे गेलेले आहेत, त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन काही तरी मदत करावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून आपण त्यांच्या उपचाराकरिता मदत केली त्यामुळे त्यांना पैसे द्यावे लागले नाहीत. परंतु, या आजारात दोन्ही डोळे गेलेल्यांना सरकारने काही तरी कायमस्वरुपी मदत करावी, अशी माझी मागणी आहे.

तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) : सरकारने याची दखल घेऊन उचित कारवाई करावी.

श्री.रणधीर सावरकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी म्युकर मायकोसिसच्या आजाराबाबत सांगितले आहे. त्यामध्ये नागिण या आजाराचा देखील समावेश करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सभागृहात अनेक महत्वपूर्ण विषय मांडतात. सन २००६-२००७ मध्ये असा एक निर्णय झाला होता की, विधानसभेत जेव्हा एखाद्या महत्वाच्या विषयावर एखादा मुद्दा उपस्थित होतो, त्याचे लेखी उत्तर संबंधित सदस्याला द्यावे.

अध्यक्ष महोदय, आपण याबाबत निर्देश द्यावेत. असे महत्वपूर्ण विषय मंत्रालयातील नस्तीमध्ये कुठेतरी संपून जाऊ नये याकरिता आपल्याकडून अपेक्षा आहे. आपण फलटण येथील बुलंद आवाज आहात. आपल्याकडून अपेक्षा आहे. विधिमंडळाच्या पुढच्या अधिवेशनात या महत्वपूर्ण विषयाचे उत्तर आम्हाला देण्यात यावे, अशी आपल्याला विनंती आहे. आपण याबाबत निर्देश द्यावेत.

तालिका सभाध्यक्ष: विधानसभेचे सन्माननीय सदस्य आपापल्या मतदारसंघातील किंवा राज्यातील महत्वपूर्ण विषय सभागृहात मांडतात त्यांची गंभीरपणे दखल घेऊन त्याबाबतचे निवेदन सरकारने काही दिवसांमध्ये करावे, अशी सूचना मी करीत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांनी म्युकर मायकोसिस या आजाराने दोन डोळे गमावलेल्या व्यक्तींबाबतचा विषय उपस्थित केला त्याबाबत तसेच नागिण या आजाराबाबतच्या विषयाची देखील सरकारने गंभीरपणे दखल घेऊन त्याबाबत उचित कार्यवाही करावी.

.....

असुधारित प्रत

पृ. शी. : मुंबईच्या समस्या, मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचार, मुंबईतील पर्यावरणाची स्थिती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आणि अनुशेष दूर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देणे

मु. शी. : मुंबईच्या समस्या, मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचार, मुंबईतील पर्यावरणाची स्थिती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आणि अनुशेष दूर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देणे या विषयासंबंधी सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, ॲड आशिष शेलार, सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, गिरीष महाजन, नितेश राणे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री गणेश नाईक, मंगलप्रभात लोढा, अतुल भातखळकर, अमित साटम, योगेश सागर, रणधीर सावरकर, प्रशांत ठाकूर, ॲड पराग अळवणी, ॲड राहूल नार्वेकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री सुनील राणे, संजय केळकर, रविंद्र चव्हाण, मिहिर कोटेचा, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री पराग शहा, राम कदम, डॉ. भारती लव्हेकर,

असुधारित प्रत

श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री महेश बालदी, सुभाष देशमुख, हरिभाऊ बागडे, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री कालिदास कोळंबकर, विजय देशमुख, सिध्दार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, लक्ष्मण जगताप, महेश लांडगे, संभाजी पाटील-निलंगेकर, अभिमन्यु पवार, राणाजगजितसिंह पाटील, सचिन कल्याणशेट्टी, राम सातपुते, डॉ.सुरेश खाडे, श्री मोहन मते, सर्वश्रीमती सीमा हिरे, नमिता मुंदडा, श्वेता महाले, ॲड राहूल कुल, श्री दादाराव केचे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री.शिवेंद्रराजे भोसले, जयकुमार रावल, जयकुमार गोरे, डॉ.विजयकुमार गावित, डॉ.संजय कुटे, सर्वश्री राजेंद्र पाटणी, समीर कुणावार, डॉ.देवराव होळी, श्री. संजीवरेड्डी बोदकुरवार, प्रा.डॉ.अशोक उईके, सर्वश्री मदन येरावार, राजेश पवार, संतोष दानवे, बबनराव लोणीकर, डॉ.तुषार राठोड, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्री. अतुल सावे, प्रशांत बंब, किसन कथोरे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री. गणपत गायकवाड, कुमार आयलानी, प्रकाश आवाडे, समाधान आवताडे, धनंजय

असुधारित प्रत

गाडगीळ, प्रताप अडसड, समिर मेघे, हरिष पिंपळे, नामदेव ससाने, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री. राजेश पाडवी, कीर्तीकुमार भांगडिया, भिमराव केराम, गोवर्धन शर्मा, प्रकाश भारसाकळे, लखन मलिक, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. टेकचंद सावरकर, विजय रहांगडाले, कृष्णा गजबे, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, डॉ. राहूल आहेर, श्री. दिलीप बोरसे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री. मंगेश चव्हाण, नारायण कुचे, तान्हाजी मुटकुळे, महेश चौघुले, रविशेठ पाटील, लक्ष्मण पवार, काशिराम पावरा, संजय सावकारे, सुरेश भोळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु...

श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर): अध्यक्ष महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर काही महत्वपूर्ण मुद्दे मांडण्याकरिता, सरकारला जागे करण्याकरिता मी या चर्चेमध्ये सहभागी होत आहे.

अध्यक्ष महोदय, आजच्या महाराष्ट्र विधानसभेच्या दिवसाच्या कामकाजाचा क्रम दर्शविणारी जी कामकाजपत्रिका आहे त्यामध्ये पृष्ठ क्रमांक ७ पासून ते पृष्ठ क्रमांक ९ पर्यंत या प्रस्तावाचा विषय नमूद केलेला आहे. ३ पक्षाच्या नेत्यांनी या प्रस्तावावर, या प्रस्तावाच्या चर्चेवर गंभीरपणे लक्ष देत या राज्याचे तीनतेरा वाजवू नयेत, यासाठी लक्ष वेधण्यासाठी मी उभा आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार ...

अध्यक्ष महोदय, या क्षणी विचार केला तर, दिनांक १ मे, १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी आणला. मराठी भाषेचे एक राज्य व्हावे, महाराष्ट्राच्या प्रगती, उन्नतीसाठी सर्व मराठी भाषिकांनी एकत्र यावे, यादृष्टीने संयुक्त महाराष्ट्राचा सुरु लढा झाला. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी आणला.

अध्यक्ष महोदय, त्या गोष्टीला या क्षणी ६१ वर्ष, ७४२ महिने, ३२२१ आठवडे, २२६०८ तास तास पूर्ण झाले आहेत. विदर्भ व मराठवाड्याच्या भूमीला देवाने बोलण्याचे काही क्षण दिले तर, ही भूमी आक्रोश व्यक्त करत एवढेच सांगेल की, आज विदर्भ, मराठवाड्याचे शोषण करणारे, विदर्भ, मराठवाड्यावर अन्याय करणारे, पूतना मावशीपेक्षा विषारी निर्णय करणारे, अमृत महोत्सवी वर्षात विदर्भ, मराठवाड्याच्या वाट्याला विषाची कुपी देणारे हे सन १९६० नंतरचे पहिले सरकार आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भ व मराठवाड्याच्या भूमीने आक्रोश करीत एवढेच सांगितले असते,

किती दुरावा, किती वेदना,

सतत नशिबी असह्य यातना,

ही कसली रे निष्ठूर भावना,

कसला हा अजब अहंकार,

उद्धवा अजब तुझे सरकार

अध्यक्ष महोदय, एखाद्या सरकारने किती निष्ठूर असावे, राज्याचा समतोल विकास व्हावा, प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे. १९५३ मध्ये तुम्ही विदर्भ-मराठवाड्याने संयुक्त महाराष्ट्रात यावे म्हणून करार केला. त्या करारावर स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या सह्या आहेत. संविधानात १९५६ मध्ये मराठवाडा,

श्री.सुधीर मुनगंटीवार ...

विदर्भला वैधानिक विकास मंडळ ३७१ (२) चे कवचकुंडल दिले. त्यामागे भावना, भूमिका एकच होती. "जियो और जीने दो."

अध्यक्ष महोदय, विदर्भ व मराठवाड्याची भूमी, विदर्भ व मराठवाड्याची जनता तुमच्याकडे दया मागत नाही, सहानुभूती मागत नाही, फेव्हर मागत नाही. आम्ही फक्त आणि फक्त संधी मागतो. विदर्भ, मराठवाड्याच्या जनतेमध्ये, शेतकऱ्यांमध्ये, कामगारांमध्ये, स्वयंरोजगार करणाऱ्या उद्योजकांमध्ये, लघु उद्योजकांमध्ये, हस्तकला उद्योजकांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये, विद्यार्थीनींमध्ये, तरुण, तरुणींना या वैधानिक विकास मंडळाचे जे कवचकुंडल आहे यातून एक संधी प्राप्त व्हायची.

अध्यक्ष महोदय, आज अजब सरकारची, गजब कहाणी झाली आहे. एका निर्णयातून बाहेर पडत नाही तर दुसरा मोठा अन्यायाचा निर्णय घेतला जातो. मानसशास्त्राचा सिध्दांत आहे की, छोटे दु:ख सरकारने दिले तर ते मोठे दु:ख दिल्यानंतर विसरले जाते. या दोन वर्षांचा राज्याचा कारभार काय, तर समन्यायी पध्दतीने निधीचे वाटप व्हावे. समतोल विकास व्हावा, मराठवाडा, विदर्भाच्या जनतेच्या इच्छाआकांक्षा पूर्ण व्हाव्यात, यादृष्टीने आम्ही आग्रह केला.

अध्यक्ष महोदय, या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेच्या उत्तरामध्ये वैधानिक विकास मंडळाबाबत घोषणा करावी, ही अपेक्षा आहे. परंतु, याद राखा अंतिम आठवडा प्रस्तावाच्या उत्तरात जर वैधानिक विकास मंडळ घोषित केले नाही तर हा अंतिम आठवडा आहे, हे सरकार बेईमानीने निवडून आले. परंतु, हे सरकार या सहस्त्रकातील शेवटचे सरकार असेल याकरिता आम्हाला काहीही करावे लागले तरी करु. विदर्भातील जनतेला एकत्र करु. मराठवाड्याचा आक्रोश पूर्ण करु.

अध्यक्ष महोदय, वैधानिक विकास मंडळ दिले का, अधिवेशन घेत नाही. मी त्यावर विस्तृत बोलणार आहे. नोकरी भरतीबाबत एकदा नाही तर तीनवेळा सांगितले. नोकरी भरतीच्या संदर्भात विदर्भाचे वैधानिक विकास मंडळ, मराठवाड्याचे वैधानिक

श्री.सुधीर मुनगंटीवार ....

विकास मंडळ गेले की, आमचा नोकर भरतीमध्ये जो हक्क आहे, आम्हाला जे संरक्षण आहे, आमच्यासाठी जे आरक्षण आहे ते संपेल. विदर्भ, मराठवाड्यातील तरुणांचा आक्रोश आहे. मी सरकारकडे लेखी पत्र दिले. सरकारने सांगितले की, वैधानिक विकास मंडळ संपले. आता विदर्भ, मराठवाड्याच्या तरुणांचा जो हक्क आहे, त्या हक्काला आम्ही संरक्षण देऊ शकत नाही.

अध्यक्ष महोदय, उद्योगाबाबत मी आकडेवारी देतो. विदर्भ, मराठवाड्याची काय अवस्था आहे, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वामध्ये सरकार होते. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रामध्ये उद्योग यावेत याकरिता आम्ही एक रुपया विजेचा दर कमी केला. एखाद-दुसरा अपवाद सोडला ना तर सर्व वीज विदर्भात तयार होते. सर्व कोळशा खाणी विदर्भात आहेत.

अध्यक्ष महोदय, सरकारने एक रुपया युनिटने वीज द्यावी, असा आग्रह आम्ही धरला. त्यात देखील झारीतील शुक्राचार्य आडवे आले. चक्राकार पध्दत आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना, विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकणाला न्याय मिळावा ... शेवटी निधी दिल्यामुळे काम होत नाही, समजा मी तुम्हाला उद्या गाडी दिली व पेट्रोल, डिझेल दिले नाही तर गाडी पाण्यावर, हवेवर चालणार आहे की, मंत्रोच्चारावर चालणार आहे?

अध्यक्ष महोदय, तुम्ही आम्हाला बजेटमध्ये निधी द्याल, परंतु पदभरती झाली नाही. चक्राकार पध्दतीच्या संदर्भात देखील अन्याय केला. कृषी पंपांच्या पायाभूत सुविधांबाबत अचानकपणे पहाटे एक जी.आर. काढला, तेथेही अन्याय केला.

नंतर श्री.शिंदे ...

श्री.सुधीर मुनगंटीवार...

धानाचा बोनस देण्यात यावा, यासाठी ८१ आमदार महोदयांनी निवेदन दिले आहे. ते मी आपणाकडे पाठवितो. या प्रकरणीही अन्याय करण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता श्री.देवेंद्र फडणवीस यांना मराठवाड्यातील सर्व आमदार महोदयांनी सांगितले की, मराठवाडा पाण्यापासून वंचित आहे, या भागातील शेतकरी कष्ट करण्यास कमी नाही. या भागात ४.६२ टक्के जंगल आहे. या भागामध्ये ५ पैकी ४ वर्ष दुष्काळ असतो. या भागातील जनतेला पाणी दिले पाहिजे. मराठवाड्याची ग्रीड दिली नाही. या सभागृहामध्ये त्यांच्यावर अन्याय करीत सांगितले की, आम्ही दुसरी संकल्पना राबविणार आहोत. यांच्या सुपिक डोक्यातून नापीक संकल्पना निघतात.

अध्यक्ष महोदय, आमचा सिंचनाच्या संदर्भात वैधानिक विकास मंडळ हा हक्क होता, त्यास कायद्याचे संरक्षण होते. आज सिंचनाचा अनुषेश वाढत आहे. व्यक्तीचे हृदय हे मांसपेशींचे असते. या सरकारमधील माननीय मंत्री श्री.गुलाबराव पाटील, माननीय मंत्री श्री.राजेश टोपे, माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांचेसारखे चांगले मंत्री आहेत. माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील हे विदर्भाचे जावई आहेत. तरी अन्याय करतात. सासुरवाडीवर जो अन्याय करतो त्याला देव ही माफ करीत नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता यांना मला सांगावे वाटते की, काही लोक सत्ताधारी पक्षात का आहेत, त्यांना आपल्या पक्षात घ्यावे. मग ढोल ताशे वाजवत त्यांना माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांच्या घरासमोर घेऊन जायचे.

अध्यक्ष महोदय, विदर्भाची चूक काय आहे ? आपणास विदर्भाचा इतिहास कदाचित माहिती नसेल. आपण प्रभू रामाला या देशाचे आराध्य दैवत, मानबिंदू मानतो. त्यांची आजी इंदूमती, युद्धात विजय प्राप्त व्हावा यासाठी भगवान कृष्णा सोबत जाणारी माता रुख्मीणी, जय भवानी जय शिवाजी असा आम्ही नारा देतो त्या

श्री.सुधीर मुनगंटीवार...

छत्रपती शिवाजी महाराजांना जन्म देणारी माँ जिजाऊ, शेक्सपिअरचे आपण नाव घेतो परंतु त्याच्या बरोबरीने साहित्य तयार करणारे शाकुंतल, कालिदास, हे सर्व विदर्भातील आहेत. एवढेच नव्हे तर देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचा अमृत महोत्सव साजरा करताना देशभक्तीचा हुंकार वर्धा येथील सेवाग्राम मधून आला तेथे महात्मा गांधी यांनी १२ वर्ष वास्तव्यास होते. सन १९३९ ते सन १९४८ चले जाओ, अंग्रेजों भागो, हा मंत्र मुंबईतील गवालिया टँक येथून दिला असला तरी तो सेवाग्राम या विदर्भाच्या भूमीतून आला होता. शोषितांचा हुंकार, ऊर्जा केंद्र असलेली दिक्षाभूमी विदर्भात आहे. देश भक्तीची गंगोत्री रेशीम बाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यात्म सांगणारे संत नव्हते तर जीवन जगण्याची पद्धत सांगणारे होते ते विदर्भातील होते. सेवेचा मंत्र देणारे वैराग्यमुर्ती संत गाडगे बाबा हे विदर्भाचे होते. वऱ्हाड सोन्याची कुऱ्हाड आहे. "काळी माती पिकवी हिरे आणि मोती" हिरवे सोने म्हणजे जंगल आहे, काळं सोनं म्हणजे कोळसा, पांढरे सोनं म्हणजे कापूस आहे. बारा महिने वाहणाऱ्या नद्या असल्या तरी ही विदर्भ व मराठवाड्यामध्ये ८६ टक्के आत्महत्या होतात.

अध्यक्ष महोदय, श्री.मनोहर जोशी यांच्या नेतृत्वातील स्व.बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना खरी होती, तेव्हाची शुद्ध २४ कॅरेटची शिवसेना होती.

अध्यक्ष महोदय, विदर्भाच्या भूमीच्या माध्यमातून आम्ही प्रगतीच्या मार्गावर निघालो होतो. परंतु या सरकारमध्ये अहंकार, जिद्द, उन्मत्तपणा किती असावा ? धानाचा बोनस देणार नाही, असे सांगण्यात येत आहे. या राज्याची तिजोरी तुमची आहे काय ? पुणे येथील लोकमान्य टिळक म्हणत असत की, स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार आहे. तशा पद्धतीने मी वैधानिक मंडळ देणार नाही, असे सांगण्यात येत आहे. सन १९५३ मधील करार असताना नागपूर येथे अधिवेशन घेत नाहीत. चांगले मंत्री पदे देत नाहीत. गोसीखुर्द प्रकल्पाचे १० हजार कोटी रुपयांचे डपके तयार केले. त्यामधील पाणी शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत जात नाही.

श्री.सुधीर मुनगंटीवार...

अध्यक्ष महोदय, विदर्भ व मराठवाड्याला समान संधी दिली पाहिजे, समन्यायी पद्धतीने पाणी व निधी वाटप झाले पाहिजे, याकरिता दांडेकर समिती गठीत करण्यात आली होती. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी सांगितले होते की, विदर्भाला व मराठवाड्याला न्याय देण्यासाठी आम्ही पूर्ण शक्तीनिशी प्रयत्न करु. माहे नोव्हेंबर, १९९५ मध्ये निर्देशांक अनुशेष समिती गठीत करण्यात आली होती. दिनांक ३१ मे, २०११ रोजी डॉ.विजय केळकर समितीने ५४६ पानांचा अहवाल सादर केला, त्यामध्ये १४६ शिफारशी करण्यात आल्या होत्या. आमच्या मागील सरकारचा शपथविधी सोहळा दिनांक ३१ मे, २०१४ रोजी संपन्न झाला होता. विदर्भातील एका भूमीपुत्राचे नाव असलेल्या स्टेटियममध्ये श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या सारखा कार्यक्षम मुख्यमंत्री शपथ त्यावेळी घेत होता. आमच्या सरकारने ५ वर्षे विदर्भावर व मराठवाड्यावर अन्याय होऊ नये, याची काळजी घेतली होती. हे राज्य एक असावे, कोणावर अन्याय होता कामा नये. या राज्यातील ३६ जिल्ह्यातील ३५८ तालुक्यांचा विकास करण्याचे आमचे ध्येय होते. परंतु आता विदर्भाला फसविले जात आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भ व मराठवाड्याच्या संदर्भात एखादी घोषणा करण्यात येते परंतु तिची अंमलबजावणी करण्यात येत नाही. माझ्याकडे त्यांची यादी आहे. आम्ही लहानपणी एक कथा ऐकली होती. फसविणारे लोक कसे फसवितात हे त्यावेळचे आमचे शिक्षक सांगत असत. मी एक गोष्ट सांगतो. "बारामतीचा एक नेता होता. तो म्हणाला देवा मला तुझ्या सोबत भागीदारी करावयाची आहे. देव विदर्भ व मराठवाड्यातील जनते सारखा साधा व सज्जन होता. देव म्हणाला ठीक आहे. नेता देवाला म्हणाला, यावर्षी शेतामध्ये पीक लावू त्याच्यावरील भागात जे येईल ते तुझे व खालील भागात जे येईल ते माझे. त्या नेत्याने भुईमुगाच्या शेंगाचे पीक घेतले. बारामतीच्या नेत्याने खालील भागातील शेंगा घेतल्या व वरील भाग देवाच्या नशिबात होता. त्यामुळे देव रागावला व म्हणाला हे चूक आहे. तो नेता म्हणाला मी

श्री.सुधीर मुनगंटीवार...

चूक दुरुस्त करतो. आता पिकाचा खालील भाग तुझा व वरील भाग माझा असेल. देव विदर्भ व मराठवाड्यातील जनते सारखा साधा व सज्जन होता. देव म्हणाला ठीक आहे. त्यावर्षी हायब्रीडचे पीक घेतले. नेत्याच्या वाट्याला कणसे आली व दांडे आमच्या देवाच्या नशिबाला आले. त्यानंतर देव म्हणाला तू फसवतोस. तो म्हणाला चिंता करु नका, आता वरचा व खालचा भाग तू घे मी मधला भाग घेईन. देव म्हणाला ठीक आहे. त्यावर्षी मक्याचे पीक घेतले. नेत्याने स्वत: मक्याची कणसे काढून घेतली व त्याचे दांडे आमच्या नशिबात आले."

अध्यक्ष महोदय, आमचा भाग ११० आमदार महोदयांचा आहे. जगातील वाघांच्या संख्येपैकी सर्वाधिक वाघ विदर्भात आहेत. ते वाघ स्वत:ला वाघ म्हणवून घेणारे नसून खरोखरचे आहेत. जगातील १९३ देशांपैकी १४ राज्यात वाघ आहेत व सर्वाधिक आपल्या देशात आहेत व सर्वात अधिक व्याघ्र प्रकल्प व पराक्रमी वाघ विदर्भात आहेत.

अध्यक्ष महोदय, आम्ही मंत्री पदांचा हिशोब काढला आहे. २८८ आमदार आहेत. राज्यात २ मंत्री महोदयांनी राजीमाने दिल्याने आज ४१ मंत्री आहेत. १५ टक्क्यांच्या नियमानुसार ४३ मंत्री असतात.

यानंतर श्री.तेलंग...

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

सात आमदार महोदयांमागे एक मंत्री पद असणे आवश्यक आहे. विदर्भातील ६२ आमदार आहेत. आता विदर्भातील मंत्री कोण आहेत, त्यांच्याकडे कोणत्या विभागाची जबाबदारी दिली आणि त्या विभागाला किती निधी उपलब्ध करुन दिला, याबाबतची माहिती देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, श्री.सुनिल केदार यांच्याकडे पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, क्रीडा व युवक, या विभागांची जबाबदारी आहे. म्हणजे गायरानामध्ये जाऊन गायी, म्हैशी, बकऱ्या पाळा. माननीय डॉ.नितिन राऊत यांच्याकडे ऊर्जा विभागाची जबादारी देण्यात आलेली आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये त्यांचे एकच गाणे असते. "गरिबों की सुनो, वह तुम्हारी सुनेगा." आणि माननीय श्री.अजित पवार यांच्याकडे पाहून म्हणतात. "तुम एक पैसा दोगे, तो मैं दस लाख दुंगा." ते फक्त निधीची मागणी करीत राहतात. महावितरण कंपनीचा ६० हजार कोटी रुपयांचा अनुशेष आहे, त्यामुळे आम्हाला निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी नेहमी विनंती करतात. परंतु त्यांच्याकडे फक्त ऊर्जा विभाग दिला प्रत्याक्षात वीज मात्र दुसरीकडेच दिली जात आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.विजय वडेट्टीवार यांच्याकडे एवढे विभाग आहेत की, त्या विभागांच्या नावासाठी स्वतंत्र लेटहेड जोडावे लागते. इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती विभाग त्यांच्याकडे का दिला हे मला माहिती नाही. कदाचित ते कधी शिवसेना तर कधी काँग्रेस पक्षामध्ये भटकत राहतात म्हणून दिले असावे, असे मला वाटते. खार जमिनी विकास व भुकंप पुनर्वसन, या विभागांची जबाबदारी देण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय ॲड.यशोमती ठाकूर यांच्याकडे महिला व बाल विकास विभागाची जाबाबदारी दिलेली आहे. माननीय श्री. बच्चू कडू यांच्याकडे अनेक विभाग आहेत, परंतु मला कोणताही अधिकारी नाहीत, असे ते नेहमी सांगत आहेत. माननीय डॉ.राजेंद्र शिंगणे यांच्याकडे अन्न व औषध प्रशासन या विभागाची

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

जाबाबदारी दिलेली आहे. अशा प्रकारे विदर्भ आणि मराठवाड्याला मंत्री पदे दिलेली आहेत.

अध्यक्ष महोदय, विदर्भ आणि मराठवाड्यातील मंत्री महोदयांच्या विभागाला किती निधीची तरतूद केली आहे याबाबत माहिती देतो. सन १९९५ ते १९९९ च्या मंत्रिमंडळामध्ये माननीय श्री.नितीन गडकरी होते आणि सन २०१४ ते सन २०१९ च्या काळात मुख्यमंत्री म्हणून माननीय श्री. देवेंद्र फडणवीस होते. तेव्हा विदर्भ आणि मराठवाड्याला निधीची मागणी करण्याची गरजच पडलेली नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.सुनिल केदार यांच्या विभागालासाठी मागील वर्षीच्या निधीपेक्षा यावर्षी निधी कमी दिलेला आहे. मागील वर्षी ४२८ कोटी रुपये दिले होते तर यावर्षी ४०६ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. विदर्भाच्या वाट्याला आलेल्या विभागला देखील निधी कमी द्यायचा हा कोणता न्याय आहे?

अध्यक्ष महोदय, सन २०१४ मध्ये प्रसिद्धतीसाठी २६ कोटी रुपयांची तरतूद केली होती. परंतु यावर्षी जनतेच्या इच्छा आकांक्षासाठी पैसे नाहीत परंतु खोटी-नाटी प्रसिद्धी करण्यासाठी २६५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केलेली आहे. म्हणजे १० पट जास्त निधीची तरतूद केलेली आहे. नकली विचार जनतेपर्यंत पोहोचायचे असेल तर प्रसार माध्यमांचा योग्य उपयोग करता यावा यासाठी एवढ्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, काल मुख्यमंत्री महोदय भाषण करताना माझी तब्येत बरी नसल्यामुळे मी सभागृहामध्ये उपस्थित राहू शकलो नाही. त्यांनी अतिशय कमी वेळेमध्ये भाषण केले आहे. इंग्रजी सिनेमा ४५ मिनिटांचा असतो तसे त्यांचे भाषण होते. आमचे भाषण म्हणजे मराठी सिनेमा, कमीत कमी दोन-तीन तास तरी भाषण करतो.

अध्यक्ष महोदय, काल त्यांनी भाषणामध्ये म्हटले होते की "आम्ही जे बोलतो ते आम्ही करतो. " आपण जे बोलता ते करा. परंतु ज्यांनी महाराष्ट्र राज्याचा

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

मंगलकलश आम्हाला दिला असे स्व.यशवंतराव चव्हाण यांनी याच विधानसभेमध्ये दिनांक १२ ऑगस्ट, १९६० रोजी केलेल्या भाषणातील काही मुद्दे आपणास सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, "नागपूर करारासंदर्भात काही गोष्टींचा मी खुलासा करणार आहे. नागपूरच्या करारावर सह्या करणाऱ्यांपैकी मी एक आहे. येथे जी चर्चा झाली ती सर्व माझ्या समोर आजही येथे आहे. नागपूर हे राजधानीचे शहर असताना नागपूरच्या किंवा विदर्भाच्या लोकांना जे काही फायदे मिळत होते, ते त्यांना शक्य तितक्या प्रमाणात महाराष्ट्रात आल्यानंतरही मिळावेत, अशी आमची इच्छा आहे. विदर्भाला काही सवलती देऊन आणि त्यांच्या काही विशिष्ट मागण्या मान्य करुन त्यांना आम्ही बनवत आहोत, असे कोणीही समजू नये." हे काम करण्यासाठी त्यांनी एक योजना सूचविली. त्यांनी असे सांगितले की, "नागपूर अधिवेशना वेळी मी कमीत कमी तीन महिने राहू इच्छितो. अर्थात, मी म्हणजे मी व्यक्तीश: नसून मुख्यमंत्री व त्याच बरोबर सरकार अशा अर्थाने मी सांगत आहे. आपण Parliamentary Democracy चालवित असताना तीन ते चार अशी मुदत घातली गेली तर सवलतीची शक्यता कमी न होता सन्माननीय सदस्य श्री.देशपांडे यांनी सांगितल्याप्रमाणे ती वाढत जाते. नागपूर येथे मुख्यमंत्री म्हणून सहा महिने रहावे, असे मला वाटते." असे असेल तर हे सरकार नागपूर येथे अधिवेशन का घेत नाही? आज महाराष्ट्रामधील परिस्थिती काय आहे? नागपूर येथे अधिवेशन घेतल्यानंतर विदर्भातील प्रश्न मार्गी लागत होते. तेथील प्रश्नांवर सखोल चिंतन-मंथन-चर्चा होत होती. त्यामुळे विदर्भ मराठवाड्याच्या जनतेला सन १९५३ मध्ये झालेल्या करारानुसार न्याय दिला जात होता. परंतु आज विदर्भ व मराठवाड्याचे दुर्दैव आहे. मुख्यमंत्री महोदय फक्त मुंबईची चिंता करीत आहेत. त्यांना मुंबई महानगरपालिका जिंकायची आहे, त्यामुळे ते जहिरातीचे बोर्ड लावत आहेत. आज महाराष्ट्राला वास्तविक पण नामधारी मुख्यमंत्री व कार्यकारी मुख्यमंत्री असे दोन मुख्यमंत्री आहेत. कार्यकारी मुख्यमंत्री आम्हाला सांगतात की, वैधानिक विकास महामंडळ आम्ही

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

देणार नाही. वैधानिक विकास महामंडळ हा आमचा हक्क आहे. वैधानिक विकास महामंडळ का दिले पाहिजे, हे दोन-तीन बाबींवरुन लक्षात आणून देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये सन २००१ पासून आजपर्यंत जेवढ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या, त्यापैकी ८३.७४ टक्के शेतकरी हे मराठवाडा आणि विदर्भातील आहेत. या आकडेवारीमध्ये उत्तर महाराष्ट्र व नाशिक विभाग घेतलेला नाही. महाराष्ट्रातील सर्व विभागाचा विकास झाला पाहिजे, असे आमचे मत आहे. परंतु आज एक जण ऊपाशी आहे आणि दुसरा तुपाशी आहे. एकाच्या ताटामध्ये भूक भागेल एवढी देखील चपाती नाही. परंतु दुसऱ्याच्या ताटामध्ये चपातीचा ढीग लागलेला आहे. असे असताना विदर्भ व मराठवाड्याच्या आवाजाचा आम्ही प्रतिनिधी करु नये काय?

अध्यक्ष महोदय, या राज्यामध्ये एकूण ३५८ तालुके आहेत. त्यापैकी १२५ तालुके मानव विकास निर्देशांकामध्ये आहेत. या भागामध्ये रोजगार नाही, या भागामध्ये अतिशय निकृष्ट दर्जाच्या सोयी आहेत आणि अतिशय निकृष्ट दर्जाच्या शैक्षणिक सोयी आहेत. १२५ तालुक्यांपैकी मराठवाडा आणि विदर्भातील ९० तालुके आहेत. या १२५ पैकी ८ तालुके कोकणातील आहेत. परंतु पुणे जिल्ह्यातील एकही तालुका मानव विकास निर्देशांकामध्ये नाही. कारण पुणे विभागाला आपण नेहमी झुकते माप देत आहात. झुकते माप दिले पाहिजे. त्या भागामध्ये आमचेच बांधव राहतात. परंतु १२५ तालुके हे मानव विकास निर्देशांकामध्ये पिछाडीवर आहेत. या तालुक्यांना वैधानिक विकास महामंडळाचे कवच असेल तर कोणताही अधिकारी, कोणताही कक्ष अधिकारी, अवर सचिव, उप सचिव, सचिव, प्रधान सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव, मुख्य सचिव, राज्य मंत्री, कॅबिनेट मंत्री यापैकी कोणीही आमच्यावर अन्याय करु शकत नाही. दिनांक ३० एप्रिल, १९९४ रोजी स्वतंत्र विकास मंडळाचा आदेश निर्गमित केला. तो आदेश सन २०२० मध्ये संपुष्टात आला आहे. विदर्भ व मराठवाड्यातील जनतेला संरक्षण हवे आहे. मला आठवते की, दिनांक १९ मार्च, १९९१ रोजी तत्कालीन सदस्य श्री.रायबान जाधव यांनी

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

सरकार विरोधात हक्क भंग आणला होता. तेव्हा त्यांनी सांगितले होते की, वैधानिक विकास महामंडळाला मान्यता दिलीच पाहिजे. काही लोक शुक्राचार्यासारखे काम करीत आहेत. त्यांनी विदर्भ व मराठवाड्याचे कवच कुंडल काढून घेतलेले आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार.....

अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार हे सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी सांगितले की, वैधानिक विकास मंडळे केली जाणार नाहीत. असे असताना त्यांनी माझ्याकडे नियोजन विभागाचे एक पत्र पाठविले आहे. नियोजन विभाग, १४१६ सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय चर्चेदरम्यान उपस्थित झालेला मुद्दा क्र. – २९, विदर्भ व मराठवाड्यावर हे शासन अन्याय करीत आहे, असा तो मुद्दा होता. खरे तर मी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्यावर टीका करण्याचे टाळत असतो. याचे कारण असे की, भविष्यात सरकार स्थापन करण्यासाठी त्यांची मदत लागू शकते, असे माझ्या कानावर येते. परंतु आता आम्ही किती सहन करावयाचे ? खड्यात गेले सरकार, मंत्रीपद. विदर्भ आणि मराठवाड्याच्या जनतेचे जिवन असहय्य होत आहे. मी नियोजन विभागाला पत्र दिले आहे. मागील वर्षी दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहामध्ये अर्थसंकल्प मांडण्यात आला होता. त्यावेळेस आश्वासन दिले की, जरी वैधानिक विकास मंडळ नसले तरी निधी वाटप कमी पडू दिले जाणार नाही. त्यात अन्याय केला जाणार नाही. सन २०२१-२२ मध्ये विदर्भ –२६ टक्के, मराठवाडा १८.६२ टक्के उर्वरित महाराष्ट्र ५५.३८ टक्के हे आकडे आहेत. हे सरकार एका पोतडीमधून पैसे देते आणि दुसरीकडून ते काढून घेतले जाते. जसे राजभवनमध्ये गुफा आहे ती एकीकडून दुसरीकडे निघते.

अध्यक्ष महोदय, मी मागील सव्वा महिन्यापासून यातील किती खर्च झाला आहे, यासाठी अनेक पत्र दिले आहेत. परंतु शासनाकडून सांगण्यात येते की, किती खर्च झाला, हे सांगता येणार नाही. हे न सांगण्याचे कारण असे की, आता वैधानिक विकास मंडळाचा नियम राहिलेला नाही. वैधनिक विकास मंडळ असेल तर किती खर्च झाला, हे सांगावे लागते. मी नोकरीचा विषय मांडला आहे. दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजीचे सामान्य प्रशासन विभागाचे पत्र आहे. विभागनिहाय वैधानिक मंडळ अस्तित्वात नसल्यामुळे नोकरभरतीचे बंधन सद्य:स्थितीत लागू आहे किंवा नाही, हे सांगता येणार नाही, असे त्यात म्हटले आहे. चंद्रपूर जिल्ह्याची दारूबंदी हटविली आहे. येथील लोकांनी दारु पिऊन नशेत राहावयाचे, हे शासनाने ठरविले आहे काय

श्री. सुधीर मुनगंटीवार.....

? आमच्या तरूणांना नोकऱ्या नाहीत. विदर्भ आणि मराठवाड्यातील तरुणांना बुद्धी कमी आहे काय ? शासनाने सांगितले की, राज्यपाल महोदयांकडे जाऊन फाईल अडेल. हे कारण सांगणे किती योग्य आहे ? याचा विचार केला पाहिजे. अकबर बिरबलाच्या कहानीत जसे तो व्यक्ती रात्रभर थंड पाण्यात उभा असतो. त्याला थंडी वाजली नाही, याचे कारण दूरवर राजमहालाजवळ एक दिवा जळत होता. याप्रमाणे हे कारण आहे. वैधानिक विकास मंडळ केले तर विदर्भ आणि मराठवाड्याच्या फाईल्स प्रलंबित राहतील. हे कारण किती तकलादू आहे. या चर्चेच्या उत्तरात सरकारकडून कदाचित सांगण्यात येईल की, आमचे सरकार होते या काळात असे झाले आहे. सन १९६० पासून आम्हाला सरकार बनविण्यासाठी किती संधी मिळाली आहे ? खरी संधी आता सन २०२४ मध्ये मिळणार आहे. ही संधी शुद्ध बहुमताची असणार आहे. मी शब्दच्छल करीत नाही. सरकारने अन्यायाची परिसीमा ओलांडली आहे. मी काही आकडेवारी येथे वाचून दाखविणार आहे. आर्थिक पाहणी अहवालातील जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक, परिशिष्ट १० व १५ मी वाचून दाखवितो. प्रत्येक जिल्ह्याचे अतिशय अल्प, मध्यम, उच्च आणि अतिउच्च असे चार भाग करण्यात आले आहेत. मी अल्प आणि मध्यम जिल्ह्यांची नावे मी वाचून दाखवितो. यात गडचिरोली, वाशिम, हिंगोली, उस्मानाबाद, नांदेड, जालना, लातूर, बीड, परभणी, बुलडाणा, यवतमाळ, गोंदिया, अमरावती, भंडारा, चंद्रपूर हे सर्व मागास जिल्हे आहेत. हे जिल्हे म्हणजे, "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जे आपुले" असे आहेत.

अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत सन २०२०-२१ अंत्योदय योजनेबाबत मी माहिती देऊ इच्छितो. यात कोणाला धान्य दिले जाते ? ज्याचे हातावर पोट नसून शरिरावर आहे, त्यांचा यात समावेश होतो. यातील आकडेवारी मी आपणास वाचून दाखवितो. पुणे ग्रामीण आणि पुणे शहरात आमच्या पेक्षा लोसंख्या जास्त आहे. तेथे ३ हजार २०९ लाभार्थी आहेत. चंद्रपूर – ५५,९७६,

श्री. सुधीर मुनगंटीवार.....

गडचिरोली – ४०,४३४, गोंदिया – ३२,२४५ ही आकडेवारी आहे. मी सर्व आकडेवारी वाचून दाखविणार आहे. या ठिकाणी गरिबांची संख्या अधिक आहे.

अध्यक्ष महोदय, आता जर दांडेकर यांचा नातू असेल तर त्याला अनुशेषासाठी नवीन समिती तयार करावी लागेल. राज्यात ५ हजार ४३३ मोठे उद्योग आहेत. यापैकी विदर्भ आणि मराठवाड्याच्या हक्कानुसार येथे २ हजार १७३ उद्योग आसावयास पाहिजेत. परंतु विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये मोठे उद्योग ८३० असून इतर भागात ४ हजार ६०३ इतके उद्योग आहेत. यामुळेच आम्ही एक रुपया कमी दराने वीज मागितली आहे. यावर सांगण्यात आले की, जालना येथे कोणीतरी गडबड केली आहे. असे केले असेल तर त्यावर कारवाई करावी. विदर्भ आणि मराठवाड्याची लोकसंख्या ३९ टक्के आहे. असे असताना विदर्भ आणि मराठवाड्यात मोठ्या उद्योगांची संख्या कमी आहे. मोठ्या उद्योगामध्ये दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजीच्या आकडेवारीनुसार १६ लाख २९ हजार रोजगार आहे. याच्या ३९ टक्के रोजगार गृहीत धरला तर येथे ६ लाख ५१ हजार ६०० इतका रोजगार असला पाहिजे. परंतु प्रत्यक्षात केवळ २ लाख ७१ हजार रोजगार आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी, तरुणांनी पुढे गेले पाहिजे. पीक विमा, रोजगार, सुक्ष्म उद्योग, लघू उद्योग, ग्रामोद्योग, स्वयं रोजगार, कुटोरोद्योग यातून त्यांनी स्वत:च्या पायावर उभे राहिले पाहिजे. कर्जवाटपाबाबत किती अन्याय होतो, याची आकडेवारी मी वाचून दाखवितो. राज्य सरकारने सन २०२१-२२ मध्ये जिल्हानिहाय कर्जवाटप योजना जाहीर केली आहे. आर्थिक पाहणी अहवालातील पृ.क्र. ९७ वरील परिशिष्ट – २ मध्ये चंद्रपूर – २,७५० कोटी रुपये आणि पुणे ८३, २९७ कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. या सरकारने कोरोना काळात दारुबंदी हटविली आहे. इतर चांगले निर्णय करता आले नाहीत. किराणा दुकानात वाईन विक्री केली आहे. शेतकऱ्यांसाठी मदत करावयाची असती तर एक्स्पोर्टकरिता यंत्रणा उभी करावयाची होती. ज्या राज्याच्या संस्कृतीमध्ये वाईनचा

श्री. सुधीर मुनगंटीवार.....

सन्मान असेल तेथे वाईन विक्री करावयास हवी होती. राज्यातील जनतेला नशेला लावण्याचे काम या राज्य सरकारने केले आहे.

अध्यक्ष महोदय, मी धानाच्या बोनसचे निवेदन मंत्री महोदयांना देणार आहे. सरकारने सांगितले की, एकर व हेक्टरने मदत करण्यात येते. मी माहिती घेतली आहे. खरे तर चूक झाली असेल तर ती दुरुस्त करावयाची असते. बोटाला जखम झाली असेल तर त्यावर मलमपट्टी करावयाची असते संपूर्ण बोट कापावयाचे नसते. शेतकरी शासकीय खरेदी केंद्रावर जात असतात. जेव्हा विक्री करावयाची असते तेव्हा सातबारा उतारा जोडावयाचा, असा नियम केला आहे. काही दिवसापूर्वी सांगण्यात आले की, यात गैरव्यवहार आहे. जो गैरव्यवहार करीत असेल त्याला चाबकाचे फटके मारावेत. यासाठी विशेष कायदा तयार करावा. लोकशाही सरकारमध्ये कायदे करण्याचा सरकारला अधिकार आहे. जर सिंचन विभागामध्ये गैरव्यवहार असेल तर तो विभाग बंद केला जात नाही. एखाद्या परिवहन विभागामध्ये कोणी भ्रष्टाचार केला असेल तर तो विभाग बंद केला जात नाही. धानाचा बोनस एकरी देऊ असे सांगितले आहे. यासाठी इतका कालावधी का लागत आहे ?

यानंतर श्री. चौधरी.....

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

धान पिकवणारे शेतकरी विदर्भ व कोकणातील आहेत म्हणून असे केले जात आहे का ? सन २०१३ पासून बोनस दिला आहे. एकीकडे सरकार सांगते की आम्हाला सत्तेचा बोनस दिला पाहिजे परंतु दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांना मात्र धानाचा बोनस दिला जात नाही. तुम्ही माझे वाक्य लिहून ठेवा की, धानाचा बोनस न देणाऱ्या सरकारला २०२४ नंतर एक दिवसाचाही बोनस दिला जाऊ शकत नाही.

अध्यक्ष महोदय, मी केंद्र सरकारचे कौतुक करतो कारण ते केंद्र शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले. हे राज्य सरकारनेच सन २०२२ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनातील लक्षवेधी सूचनेवरील उत्तरामध्ये सांगितले. ते ऐकून मला केंद्र सरकारचा अभिमान वाटला. विश्वगौरव, देशगौरव माननीय श्री.नरेंद्र मोदी यांचा अभिमान वाटला. वैश्विक कोरोना महामारीमध्ये जगातील सर्व देश अडचणीत असताना जय जवान, जय किसान, जय विज्ञान, जय अणुसंधान हा नारा देत दिनांक १५ मार्च, २०२२ अखेर एकूण १ कोटी ९ लक्ष ३३ हजार शेतकऱ्यांना त्यांनी १८ हजार १२० कोटी रुपये दिले. १८ हजार १२० कोटी रुपये ही रक्कम छोटी नाही. महाराष्ट्र सरकारने २० हजार कोटींची कर्जमाफी दिल्यानंतर हात दुखतील एवढी पाठ थोपटून घेतली. परंतु केंद्र सरकार मात्र प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांना उपरोक्त रक्कम देत आहे. राज्य सरकारकडून मात्र बोनस देताना कारणे सांगितली जातात.

अध्यक्ष महोदय, माझ्याकडे दिनांक २८ सप्टेंबर, १९५३ रोजीच्या कराराची प्रत आहे. यावर अनेक मोठया व्यक्तींच्या, महामानवांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावर चवन्नी छाप किंवा अठन्नी छाप नेत्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. हजारो वर्षे ज्यांचा शब्द, ज्यांचे लक्ष्य, ज्यांचे उद्दिष्ट, ज्यांच्या विचारांना कुर्निसात केला पाहिजे अशा महामानवांच्या यावर स्वाक्षऱ्या आहेत. यामध्ये नमूद केले आहे की, "सरकार बनवताना या घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्यात येईल." विदर्भातील तुमच्या पक्षातील आमदार तेवढया पात्रतेचे नाहीत असा तुमचा समज असेल तर त्यांना मंत्री पदे देऊ नका, कारण याबाबतीत माझा नाईलाज आहे. यामध्ये नमूद केले आहे की, "शासनाकडील व शासन नियंत्रित उपक्रमांमधील सर्व श्रेणीतील

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

नोकर भरतीच्या वेळी संबंधित घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व दिले जाईल." आम्ही यापेक्षा वेगळे काय मागत आहोत ? विदर्भ-मराठवाडयातील जनता या पवित्र सभागृहामध्ये तुमच्यासमोर आपल्या हक्कांची मागणी करीत आहे. त्यामध्ये वैधानिक विकास मंडळे, धानाचा बोनस, चक्राकार पध्दत, इत्यादींचा समावेश आहे.

अध्यक्ष महोदय, मी चक्राकार पध्दतीबाबत बोलू इच्छितो. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यानुसार पदोन्नतीच्या वेळी पहिले पद नागपूर विभागासाठी, दुसरे पद अमरावती विभाग व तिसरे पद मराठवाडा विभागासाठी देण्याची तरतूद होती. परंतु दिनांक १४ जुलै, २०२१ रोजी या शासन निर्णयामध्ये बदल करण्यात आला. विदर्भातील मंत्री महोदय शांत बसतात हे समजू शकतो परंतु मराठवाडयातील मंत्री महोदय देखील शांत बसतात याचे मला आश्चर्य वाटते. विदर्भ-मराठवाडयाचा प्रश्न आल्यानंतर त्यांनी आपल्या हक्कांसाठी लढायला पाहिजे. हे सरकार असे वागत असेल तर हे कसले सरकार आहे ? लोकांनी न निवडून दिलेले व जबरदस्तीने आलेले हे सरकार आहे. चक्राकार पध्दत बंद केल्याचा परिणाम असा झाला की, आज रोजी चंद्रपूर जिल्हयामध्ये १० टक्के कनिष्ठ अभियंता नाहीत. विदर्भात कृषी विभागाच्या ७६ पदांपैकी २६ पदे भरलेली आहेत तर पुणे विभागामध्ये ५६ पैकी ५२ भरलेली आहेत. असे असताना मराठवाडा व विदर्भातील मंत्री महोदयांनी मंत्रिमंडळ बैठकांमध्ये केवळ बाके वाजविण्याची कामे करायची का ? जनतेने त्यांना विदर्भ-मराठवाडयांच्या हक्कांसाठी नाही तर कशासाठी पाठविले आहे ? चक्राकार पध्दत ही विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्राला न्याय देणारी होती परंतु या सरकारने ती पध्दत रद्द केली आहे. चक्राकार पध्दत पुन्हा सुरु करण्याची आमची मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, परवा आपल्या राज्याच्या दरडोई उत्पन्नाची आकडेवारी सांगितली गेली. कर्नाटक व इतर काही राज्यांपेक्षा ते कमी आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

सर्व भागाचा समतोल विकास व्हावा याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे व त्याच्याशी संबंधित दोन उदाहरणे मी या ठिकाणी देऊ इच्छितो. यावर्षी राज्याचे दरडोई उत्पन्न २ लक्ष २५ हजार ७३ रुपये एवढे आहे. मराठवाडा ही देवभूमी आहे. या भूमीवर परळी वैद्यनाथ, घृष्णेश्वर, औंढा नागनाथ ही भगवान महादेवाची ज्योतिर्लिंगे आहेत. आपण भगवान महादेवाचे भक्त आहोत व त्यांच्याप्रमाणेच साधे आहोत. परंतु माननीय मंत्री श्री.धनंजय मुंडे यांना मी सांगू इच्छितो की, ज्या पद्धतीने अन्याय होत आहे तो पाहता आता तिसरा डोळा उघडण्याची वेळ आली आहे. राज्याचे दरडोई उत्पन्न २ लक्ष २५ हजार ७३ रुपये आहे. परंतु गडचिरोली जिल्हयाचे दरडोई उत्पन्न मात्र केवळ ९४ हजार २१४ रुपये एवढे आहे. तसेच बीड जिल्हयाचे दरडोई उत्पन्न १ लाख २१ हजार ५१५ रुपये आहे. दुसऱ्या बाजूला पुणे जिल्हयाचे दरडोई उत्पन्न राज्याच्या सरासरीपेक्षा जास्त म्हणजे २ लाख ५६ हजार ९३६ एवढे आहे. अर्थात, आमचा कोणत्याही भागाला विरोध नाही. तुम्ही १५ हजार कोटी रुपयांचा रिंग रोड करीत असले तरीही आम्हाला काही अडचण नाही. परंतु असे करताना आमच्या नशिबातील दुष्ट रिंग देखील काढावी. त्यानंतर १५ हजार कोटींचा रिंग रोड करा. बोनस देताना अमूक नियम, अमूक फुटपट्टी, इंचपट्टी, सेंटीमिटर, वजन हे सर्व का पाहिले जाते ? बोनस देताना सांगितले जाते की, त्यामध्ये गडबड आहे. गडबड आहे तर दूर करावी, तुम्हाला कोणी थांबविले आहे ?

अध्यक्ष महोदय, मी सांगितले की, "वऱ्हाड, सोन्याची कुऱ्हाड", "काळी माती, पिकवी हिरे आणि मोती."

अध्यक्ष महोदय, वीज जोडण्यांमध्ये आमचा अनुशेष होता. आता सरकारने एक शासन निर्णय काढून त्याद्वारे सांगितले की, अभयदान योजनेतून शेतकऱ्यांच्या कृषी पंम्पांची जी थकित बिले वसूल केली जातील त्यापैकी ६६ टक्के निधी त्या जिल्हयाच्या पायाभूत सुविधांसाठी खर्च केला जाईल. पहिला मुद्दा म्हणजे आम्ही वीज बिले थकवत नाहीत. परंतु जी थकित बिले असतील त्यासाठी आपण अभयदान योजना केली आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

वीज बिले थकितच नसतील तर पायाभूत सुविधांसाठी पैसे तरी कुठून येतील ? पूर्वी हे सर्व पैसे वितरण कंपनीच्या एका पूलमध्ये जमा व्हायचे. त्यातून आवश्यक त्या ठिकाणी पायाभूत सुविधांसाठी तो वितरित केला जायचा. अर्थात, हे स्वाभाविक आहे. कारण घरामध्ये एखादा वृध्द व्यक्ती असताना त्याच्या मुलाने जर अशी भूमिका घेतली की, जो कमवेल तोच जेवण करील, बाकी सर्वजण उपाशी राहतील. मला असे वाटते की, असे होऊ शकत नाही. मी केवळ चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयाची थकबाकी सांगतो. चंद्रपूर जिल्हयाची थकबाकी ८०.१० कोटी रुपये तर गडचिरोली जिल्हयाची थकबाकी ८१ कोटी रुपये एवढी आहे. आम्ही ही थकीत रक्कम भरली तर आम्हाला पायाभूत सुविधांसाठी ६६ टक्क्यांप्रमाणे ४८ कोटी रुपयांच्या आसपास रक्कम मिळेल. दुसऱ्या बाजूला एकटया बारामती सर्कलची थकबाकी २ हजार ४८ कोटी रुपये आहे. त्यांना सुमारे १२५० ते १३०० कोटी रुपये उपलब्ध होतील. म्हणजे हे असे आहे की, "नेकी कर जूते खा, मैंने खाए तू भी खा" आम्ही ९३ टक्के वसुली केली हे आमचे पाप आहे का ? असे होत असताना विदर्भ-मराठवाडयातील मंत्री महोदय टाळया वाजवत बसतात. ही कोणती चक्राकार पध्दत आहे ?

अध्यक्ष महोदय, आम्ही सरकारमध्ये असताना आमच्याकडून देखील एखादी चूक झाली असेल हे मान्य आहे. परंतु त्यावेळी यांनी लक्षात आणून दिले नाही. अन्यथा, आम्ही चूक दुरुस्त केली असती. चर्चा, संवाद, वाद, प्रतिवाद, निती, नियम हे सर्व मार्ग आहेत. कोणाची चूक झाली असेल तर दुरुस्त केली पाहिजे. कधी-कधी तर मला शिवसेना पक्षातील नेत्यांचे बोलणे आवडते. कारण ते विसरुनच जातात की, आपण देखील मागील सरकारमध्ये सामिल होतो. ते मागील सरकारमध्ये सामिल असतानाही आता असे बोलतात की, सन २०१४ ते २०१९ पर्यंत हा अन्याय झाला... परंतु ते विसरतात की ते देखील या काळात सरकारमध्ये सामिल होते... (अडथळा...) असून नसल्यासारखे होते तर राहायचेच नव्हते.

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

अध्यक्ष महोदय, मी एक कथा ऐकली होती. एकदा एक पिता आपल्या मुलावर जोरजोराने ओरडत होता. तो म्हणत होता की, "तु अभ्यास करावा म्हणून तुला सर्व सुख-सुविधा उपलब्ध करुन दिल्या परंतु तु नापास झालास. अरे, काही तरी लाज ठेव."

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार...

ती त्याची मार्कशीट नाही. मी आलमारी साफ करीत असताना तुमची लहानपणीची मार्कशीट सापडली. म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, ती आमची चूक नव्हती. आम्ही विदर्भ आणि मराठवाड्यातील ३९ टक्के जनतेला न्याय मिळावा म्हणून पूर्ण शक्तीने काम करीत होतो. पण या चर्चेच्या निमित्ताने मी या सरकारला एकच इशारा देऊ इच्छितो की, हा अहंकार, हा उन्मत्तपणा, ही दादागिरी, अधिवेशन घेणार नाही, बोनस देणार नाही, वैधानिक विकास मंडळे सुरू करणार नाही, चांगले मंत्री पदे देणार नाही, सिंचनाची व्यवस्था करणार नाही आणि त्या पुष्पा चित्रपटाचा काही जण डायलॉग मारतात, "झुकेगा नहीं. काहे का झुकेगा नहीं? झुकेगा वहीं जिसमें जान है, अकड़ तो मुर्दे की खास पहचान है."

अध्यक्ष महोदय, विकासापासून कोणी वंचित राहू नये, अशी आमची भूमिका आहे. त्या दृष्टीने तुमची रेष मोठी करा. पण ती रेष मोठी करताना जर वक्रदृष्टीने आमच्याकडे पहाल तर विदर्भ हा वीर पुरुषांचा आहे. या ठिकाणी विदर्भावरचा अन्याय दूर केला पाहिजे. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित झाले आहेत. मी त्यांना आता शेवटच्या मागण्या करतो की, त्यांनी यामध्ये आता कोणत्याही पध्दतीने कोणताही अहंकार मनात न ठेवता या ठिकाणी आमच्या मागण्या मान्य केल्या पाहिजेत. हा अंतिम आठवडा प्रस्ताव आहे. हा अंतिम इशारा आहे. नाही तर यांचा अंतिम क्रियाविधी केल्याशिवाय राहणार नाही. १) वैधानिक विकास मंडळ ताबडतोब घोषित करा. २) पुढचे अधिवेशन आमच्या हक्काचे आहे ते नागपूरला घ्या. ३) १ रुपया प्रति युनिट या दराने वीज द्या.

अध्यक्ष महोदय, गंमती गंमतीमध्ये माननीय उपमुख्यमंत्री तर खूप कामे करुन जातात.

श्री. अजित पवार (बसून) : तुम्ही बोललेले चालते आणि आम्ही बोललो की राग येतो.

श्री. सुधीर मुनगंटीवार : महोदय, मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आम्हाला लागत नाही. पण तुम्हाला राग येणार, याची मला जाणीव होती. पण आपण आमच्यावर जो अन्याय करीत आहात, तो देखील एक परिसीमा आहे.

अध्यक्ष महोदय, आम्ही १ रुपया दराने वीज दिली होती ती तुम्ही काढून टाकली. तुम्ही म्हटले की जालन्याला गडबड आहे. आपण त्या जालन्याची गडबड थांबविली पाहिजे. पण आपण ५-७ वर्षापासून उद्योगांना दिलेली वीज काढून टाकणार आहात काय ? म्हणून माझी मागणी आहे की, आपण वैधानिक विकास मंडळ पुन्हा सुरू करावे. हे काम दुसऱ्याच्या भरवशावर ठेऊ नका. नागपूरला अधिवेशन घेण्याची घोषणा करा. १ रुपया प्रति युनिट दराने वीज, ही घोषणा करा. हवं तर ती दीड रुपया दराने करा. त्याबद्दल एक सुंदर अभिनंदन पत्र आम्ही तयार करु. सन २०१५ ची अधिकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांच्या नियमनाची चक्राकार पध्दत पुन्हा सुरू करा. पदोन्नती झाल्यानंतर पहिल्यांदा नागपूर, अमरावती, मराठवाडा, नाशिक आणि कोकण अशी पध्दत ठेवा. कृषी पंप आणि पायाभूत सुविधा, यामध्ये ६६ टक्क्यांचा नियम लावू नका. धानाचा बोनस आज घोषित करा की, आम्ही हेक्टरी अमुक इतके पैसे देऊ. नागपूरचे अधिवेशन हक्काचे होते. आपण तेथे आले असते तर आंदोलने, मोर्चे झाले असते. आजही धानाच्या बोनसबद्दल आंदोलन सुरू आहे. मराठवाडा ग्रीड महत्त्वाचे आहे. आपण सांगितले की, मराठवाड्याला पाणी देण्यासाठी मराठवाडा ग्रीड तांत्रिकदृष्ट्या फिजिबल नाही. हे ठीक आहे. आपण त्याचे तांत्रिक दोष दूर करा. पण याचा आपण स्पेसिफिक निर्णय केला पाहिजे. सिंचनाच्या बाबतीत बोलायचे झाले तर आर्थिक पाहणी अहवालात आता आकडेवारीच सापडत नाही. सन २०१३ नंतरची आकडेवारी उपलब्ध नाही, असे तेथे लिहून आहे. त्यामुळे माहिती मिळत नाही. पण या चर्चेच्या निमित्ताने माझी विनंती आहे की, विदर्भ आणि मराठवाड्याच्या सिंचनासाठी ही आकडेवारी सभागृहात सादर केली पाहिजे. किती भौगोलिक क्षेत्र, किती लागवडीयोग्य क्षेत्र आहे आणि किती सिंचन आमच्या भागात होते, याची आता माहिती

श्री. सुधीर मुनगंटीवार...

दिली पाहिजे, अशी मी विनंती करतो आणि पुन्हा एकदा सरकारला इशारा देतो की, "सुधर जाओ, नहीं तो जनता आपको सुधार के रख देगी." धन्यवाद.

जय विदर्भ, जय मराठवाडा.

असुधारित प्रत

श्री. दिलीप लांडे (चांदिवली) : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावावर बोलताना माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या सभागृहाची कशी दिशाभूल केली आहे, यासंबंधी काही मुद्दे मी आपल्यासमोर मांडणार आहे. या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार यांना या सभागृहाची आणि मुंबई महानगरपालिकेची चांगली माहिती आहे. त्यामुळे त्यांनी विरोधी पक्षनेत्यांना पाठीमागे बसून जे मार्गदर्शने केली त्यांनी ती व्यवस्थित करायला हवी होती, अशी आमच्यासारख्यांनी अपेक्षा आहे. अध्यक्ष महोदय, मुंबई महापालिकेच्या माध्यमातून मुंबई शहराला ज्या विविध सुविधा दिल्या जातात त्यामुळे ही महानगरपालिका देशामध्ये पहिल्या क्रमांकाची महापालिका आहे. ही महापालिका चांगले काम करते म्हणून या महानगरपालिकेचा नावलौकिक आहे. पण यामुळे काही लोकांच्या पोटामध्ये जसा गोळा येतो तसा गोळा आला आहे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, दिनांक २६ जुलै २००५ रोजी या महाराष्ट्रामध्ये विशेषत: मुंबईमध्ये महापूर आला आणि या महापूराबरोबरच मी ज्या मतदार संघामध्ये राहतो त्या मतदार संघातील मिठीनदीला सुध्दा मोठ्या प्रमाणात महापूर आला. या महापुरामुळे मिठीनदीच्या पात्रात असलेल्या झोपडपट्टीची मोठ्या प्रमाणात वित्तहानी आणि जिवितहानी झाली. त्यानंतर शासनाने आणि मुंबई महानगरपालिकेने यावर मोठा निर्णय घेऊन त्या नदीपात्रामध्ये असणाऱ्या झोपडपट्टीधारकांचे स्थलांतर करण्याचे काम आणि त्या नदीपात्राचे रुंदीकरणाचे काम महापालिकेने हाती घेतले. मी अभिमानाने सांगेन की, मुंबई महापालिकेने मिठीनदीच्या रुंदीकरणाचे काम अतिशय चांगल्या पध्दतीने पूर्ण केले. गोरगरीब झोपडपट्टीमधील लोकांना त्या कामी न्याय देण्यात आला. या नदीपात्राचे पाणी शेजारील झोपडपट्टीमध्ये घुसत होते. त्यामुळे त्या पात्राच्या ठिकाणी संरक्षण भिंती बांधण्यात आल्या.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, काही भाग पूर्वीच्या राजकीय लोकांमुळे आणि राजकीय दबावामुळे कालिनाथ ब्रिज ते

श्री. दिलीप लांडे....

सीएसटी ब्रिज या भागाचे रुंदीकरणाचे काम राहिले आहे. ते रुंदीकरण लवकर झाले तर क्रांतीनगर या झोपडपट्टीमधील लोकांच्या घरात जे पुराचे पाणी घुसते ते पाणी घुसणार नाही आणि तेथील लोकांना त्रास होणार नाही, असे मला वाटते. मी आपल्याला सांगितले की, या झोपडपट्टीमधील लोकांचे फक्त राजकारण करण्याचे काम केले. या मिठी नदीच्या पुरातून काही लोक वाहून गेली. त्यामुळे त्यांच्यासाठी सन २००८-०९ मध्ये पुनर्वसनाची एक योजना राबविण्यात आली. पण काही राजकीय लोकांच्या दबावापोटी त्या लोकांना घरे दिली गेली नाहीत. पूर्वीचे अनेक मंत्री आले, तत्कालीन मुख्यमंत्री आले. त्या मुख्यमंत्र्यांनी काही खोटी कागदपत्रे दिली. परंतु घरे दिली नाहीत. त्या लोकांना घरे मिळालीच नाहीत. लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी जे मुख्यमंत्री असताना आले. आता जे विरोधी पक्षनेते आहेत तेव्हा ते मुख्यमंत्री होते. त्यांनी तर खोट्या प्लॅस्टीकच्या चाव्या दिल्या आणि माझ्या गोरगरीब लोकांच्या भावनांचे राजकारण केले. परंतु त्या ठिकाणी एकही घर मिळाले नाही. म्हणून दोन दिवसांपूर्वी मला सभागृहामध्ये बोलावे लागले की, जर या लोकांना न्याय दिला नाही तर सभागृहातील हे माझे शेवटचे भाषण असेल. अध्यक्ष महोदय, त्या माझ्या भाषणाचा, माझ्या भावनांचा, माझ्या गोरगरीब लोकांच्या, जनतेच्या भावनांचा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय श्री. उद्धवजी ठाकरे यांनी आदर करुन दखल घेतली आणि ५१ लोकांना काल याच सभागृहाच्या प्रांगणात त्यांच्या घरांच्या चाव्या दिल्या.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. दिलीप लांडे.....

अध्यक्ष महोदय, फक्त चाव्या दिल्या नाहीतर घरे दिली आहेत. मराठी माणसाचा, हिंदूत्वाचा सण असणाऱ्या गुढीपाडव्याच्या दिवशी ५१ लोकांना डोरली जीमच्या नादात त्या खेळासह गोरगरिबांना त्यांच्या हक्काची घरे दिली जात आहेत. हे काही राजकारण केले जात नाही. परंतु आपण तरी काय करणार ज्यांना कावीळ झालेला आहे त्यांना सर्व काही पिवळेच दिसते. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी आज पांढरे जॉकेट घातले असले तरी मला ते पिवळेच दिसत आहे.

अध्यक्ष महोदय, या झोपडपट्टीधारकांना सन २००८-०९ पासून कोणत्याही राजकीय पक्षाने न्याय दिला नव्हता तो न्याय महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी काल दिलेला आहे.

अध्यक्ष महोदय, शिक्षणाच्या बाबतीत सभागृहामध्ये खोटी परिस्थिती सांगितली जात होती. महानगरपालिकेचा अहवाल मी आणलेला आहे. त्यामध्ये वस्तुस्थिती सांगितलेली आहे. आमच्या भागाचे माननीय पालकमंत्री तसेच युवा सेना प्रमुख श्री. आदित्य ठाकरे यांच्या संकल्पनेतून गोरगरिबांच्या मुलांना चांगले शिक्षण आणि नवीन तंत्रज्ञान मिळावे या दृष्टीकोनातून अनेक पावले उचलली आहेत. हे कोणालाच का दिसत नाही हे मला माहीत नाही. मुंबई उपनगरमध्ये झोपडपट्टीत बैठया शाळा होत्या. विद्यार्थ्यांना बसण्यासाठी जागा अपुरी पडत होती तेव्हा माननीय पालकमंत्री श्री. आदित्य ठाकरे यांनी याची पाहणी केली. या ठिकाणी ३ ते ५ माळयांच्या शाळेच्या इमारती बांधल्या. मी अभिमानाने सांगेल की, माझ्या विभागात पवई येथे ५ माळयाची इमारत बांधून गरिबांच्या मुलांना चांगली शाळा दिली. दोनच दिवसापूर्वी माझ्या विभागातील उत्तर भारतीय लोकांना हिंदी भाषेत शिकण्यासाठी त्यांच्या विद्यार्थ्यांना ३ माळयाची इमारत बांधून शाळा पूर्ण करुन दिलेल्या आहेत. अशा पद्धतीच्या शाळा, चांगले सुशोभिकरण आणि त्यांना तांत्रिक पद्धतीने शिक्षण घेता यावे म्हणून टॅब देखील वाटण्यात यावेत. ते टॅब महानगरपालिकेच्या नियमानेच दिले आहेत. तसेच केंद्र शासनाने दिलेल्या नियमाचे पालन करुन निविदा काढल्या. निविदा काढताना कोणत्या वर्तमानपत्रात जाहिरात आली हे जर त्यांनी वाचले नसेल

श्री. दिलीप लांडे.....

तर यामध्ये महानगरपालिकेचा काय दोष आहे ? सर्वांना इंग्रजी माध्यमातूनही वर्तमानपत्र वाचता यावे यासाठी लोकसत्ता, हिंदुस्थान टाईम्स, टाईम्स ऑफ इंडिया या सर्व वर्तमानपत्रात जाहीरात दिली तरी देखील निविदा कुठ आहेत किंवा टेंडर कसे वाटले गेले असे विचारले जाते. केंद्र शासनाने जे नियम दिली आहेत त्याप्रमाणे निविदा काढली आणि त्यानुसारच गोरगरिबांना टॅब देण्यात आहे. एखादा विद्यार्थी गरीब आहे तो टॅब घेऊ शकत नाही यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने टॅब दिले आहेत यासाठी त्यांचे अभिनंदन करायला पाहिजे परंतु ते करणार नाही कारण त्यांना तर कावीळ झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहराची स्वच्छता पाहिली तर आपल्या लक्षात येईल की ती अतिशय चांगल्या प्रकारची आहे. माझ्या माहितीप्रमाणे रोज ६ हजार मॅट्रीक टन कचरा जमा केला जातो. प्रत्येक गल्लीमध्ये मुंबई महानरपालिकेचे कामगार हे शहरातील रहिवश्यांना चांगल्या प्रकारची स्वच्छता देण्याचे काम करतात. या लोकांना हक्काचे घर मिळावे, स्वच्छता करताना त्यांना त्यातून काही आजार होऊ नये म्हणून त्यांचे आरोग्य चांगले राहावे या दृष्टीकोनातून आरोग्य सेवा देण्यात याव्यात अशा प्रकारचे काम मुंबई महापालिकेत चांगले सुरु आहे. याच विभागाला विश्वासात घेऊन मुंबई शहरतील रस्ते किंवा त्याच्या शेजारचे फुटपाथ, भिंती, मुंबई शहरातील पूल किवा पुलाच्या भिंती खूप घाण होत्या. माननीय पालकमंत्री तसेच पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांच्या संकल्पनेतून या भिंती चांगल्याप्रकारे सुशोभित करण्याचे काम सुरु आहे. वरळीपासून चांदिवलीपर्यात किंवा कुर्ल्याला जाऊन बघितले तर तिथे सुशोभिकरणाचे काम सुरु असल्यचे आपल्याला लक्षात येईल. त्यामुळेच काही लोकांच्या पोटात दुखण्याचे सुरु झाले आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरात गिरगाव किंवा दादर चौपाटी आहे. परंतु मुंबई उपनगरमध्ये एकही चौपाटी नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी मी आपल्याच भावना सांगत आहे आणि तुमच्याबद्दलच बोलत आहे. गिरगाव पासून पश्चिम उपनगरमध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी यांच्या घरापर्यंत

श्री. दिलीप लांडे.....

चौपाटी आहेत परंतु पूर्व उपनगरामध्ये एकही चौपाटी नाही. हे जेव्हा माननीय पालकमंत्री तसेच पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांच्या लक्षात आले आणि आम्ही मागणी केली की, पवई तलाव हा अतिशय महत्त्वाचा असून तो पूर्व उपनगरातील लोकांचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे याचे चांगले सुशोभिकरण करावे आणि त्या माध्यमातून पूर्व उपनगरातील रहिवाश्यांना त्या विभागातील लोकांना आपल्या मुलाबाळांसह एक चांगले रम्य ठिकाण मिळावे या दृष्टीकोनातून प्रयत्न केले जात आहेत. संपूर्ण उपनगरातील जनता माननीय पालकमंत्री तसेच पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांच्यासोबत आहोत. त्यांनी या ठिकाणच्या लोकांसाठी अतिशय चांगले काम हाती घेतले आहे. या तलावामध्ये विशेष तांत्रिक बाबीचा विचार करुन पर्यावणाचा आदर ठेवून विकास केला जात आहे तसेच तिथे पर्यावणाची कोणती अडचण येऊ नये याचीही दक्षता घेतली जात आहे. गेल्या अनेक वर्षापासून त्या तलावात जे घाण पाणी सोडले जात होते ते पाणी बंद करण्यासाठी मल्लनिस्सारण वाहिनेचे काम सुरु आहे. दिनांक ३० एप्रिल, २०२२ पर्यंत ते काम पूर्ण होऊन या तलावातील घाण पाणी जाणे बंद होईल. या घाण पाण्यामुळे तेथील वनस्पतीमध्ये असणारे जिवजंतुंचा त्रास होत होता. त्यामुळे तेथील वनस्पती काढण्याचेही काम सुरु आहे. अशा प्रकारचे चांगले काम माननीय पालकमंत्री तसेच पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांनी हातामध्ये घेतलेले आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय पालकमंत्री तसेच पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांना माझी सभागृहामध्ये विनंती आहे की, न्यायालयाचा तसेच आमच्या भावनांचा आदर ठेवून पवई तलावाचे काम करावे. पूर्व उपनगरातील लोक आपल्याकडे अपेक्षेनेपाहत आहेत तर ते काम पूर्ण व्हावे, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. शेवटी मी एकच वाक्य सांगतो की, माननीय हिदुह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या काल स्वप्नात आले होते.त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी आज शिवसेनाप्रमखांचे अतिशय नावलौकिक केले. हे बोलत असताना मी लहान

श्री. दिलीप लांडे.....

तोंडी मोठा घास घेत आहे कारण मी अतिशय छोट आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार मी आपल्याकडून शिकण्यासाठी आपले भाषण ऐकण्यासाठी सभागृहामध्ये बसत असतो. परंतु आपण आणि आपल्या पलिकडे बसणारे हे फक्त विदर्भ, विदर्भ करीत असताना आपल्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील असणारेही एक सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत (दादा) पाटील बसलेले आहेत. त्यांच्यावर आपण अन्याय करता. त्यामुळे, मधल्या भागातून ते सन्माननीय सदस्य श्री. कालीदास कोळंबकर यांना घेऊन मला भेटण्यासाठी येऊ नये,याची आपण दखल घ्यावी. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार आपल्याला माझी दुसरी एक विनंती आहे कीा, मागच्या चार दिवसापासून मी टी.व्ही. वर रोज पाहत आहे की, पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी हिदुस्थान बद्दल चांगले शब्द बोलेले म्हणून त्याचे सरकार धोक्यात आलेले आहे. आज आपण शिवसेना प्रमुखांबद्दल चांगले बोलले आहात तर आपली सन २०२४ ची सीट धोक्यात येऊ नये. आपल्याला जर तिकिट मिळाले नाही तर मी माननीय मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांची परवानगी घेऊन त्याची ही जबाबदारी आम्ही घेऊ, अशी मी आपल्याला विनंती करतो. धन्यवाद !

यानंतर श्रीमती करंदीकर....

तालिका सभाध्यक्ष : मी आपणास सांगू इच्छितो की, आज दुपारी साडे तीन वाजता मंत्री महोदयांचे उत्तर सुरु होणार आहे.

श्री. रविंद्र चव्हाण (डोंबिवली) : अध्यक्ष महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर मी माझे विचार व्यक्त करण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई व मुंबईच्या आसपासचा भाग एमएमआर म्हणून ओळखला जातो. येथील महापालिका व ग्रामीण भाग याचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे म्हणून एमएमआरडीएची स्थापना करण्यात आली. माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार सांगत होते की, विदर्भात अनुशेष आहे. त्याच प्रकारचा अनुशेष गेली अनेक वर्षे एमएमआरमधील सर्व महापालिका व येथील सर्व ग्रामीण भागात होत आहे. एमएमआर मधील ग्रामीण भागात मोठया प्रमाणात अन्याय होत आहे हे लक्षात घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री मानीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या काळात बऱ्याच मोठया प्रमाणात हद्दवाढ करण्याचे काम केले. सब का साथ, सब का विकास या प्रमाणे कोणावरही अन्याय होणार नाही असे काम पूर्वी करण्यात आले.

अध्यक्ष महोदय, एमएमआर मधील आम्ही सर्व लोकप्रतिनिधी गेली १०-१५ वर्षे प्रयत्न करीत आहोत. येथे माननीय सदस्य श्री.गणेश नाईक बसले आहेत. त्यांनी ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम केले त्यांनाही असाच अनुभव येत होता. एमएमआरमध्ये निधीचे वाटप होत नाही.माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी न्याय देण्याचा प्रयत्न केला. महाविकास आघाडी शासनाच्या काळात सब का साथ सब का विकास बाजुला होण्यास सुरुवात झाली. या दोन वर्षाच्या काळात कोरोनाचे कारण सांगून या भागातील रस्त्यांकरिता, उपक्रमांकरिता जो निधी मंजूर झाला होता, त्या निधीकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले गेले. हा सर्व निधी रद्द करण्याचे काम केले गेले. ही शोकांतिका आहे. विधानसभेचा एक आमदार म्हणून वेगवेगळया पद्धतीने ही बाब मांडण्याचा मी सातत्याने प्रयत्न केला गेला.

अध्यक्ष महोदय, येथे माननीय वित्त मंत्री आहेत. त्यांना या सर्व गोष्टींची कल्पना आहे. एखाद्या रस्त्याचे काम करायचे असेल तर त्याचे एस्टीमेट, डीपीआर

श्री. रविंद्र चव्हाण....

तयार होतात त्या नंतर त्याला मान्यता मिळते. एमएमआरडीएमध्ये माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या काळात १ हजार ४५६ कोटी रुपयांचे डीपीआर तयार झाले. रस्त्यांचे डीपीआर तयार झाले. ते तयार करण्याकरिता १२ ते १३ कोटी रु. खर्च झाले. मात्र नंतरच्या काळात हे सर्व प्रकल्प कोणत्या तरी एखाद्या व्यक्तीने बाजुला करण्याचे काम केले. हे का झाले, कशासाठी झाले याच्या खोलात मी जाणार नाही. माझी विनंती आहे. शासनाचे डीपीआरसाठी १२ कोटी रु खर्च झाले असतील. कल्याण डोंबिवली महापालिकेचे ४५६ कोटी रुपयाचे प्रकल्प असतील. उल्हासनगर महापालिकेत ८० कोटी रुपयाचे काम असेल. एमएमआरमध्ये १हजार ४५६ कोटी रुपयांचे प्रकल्प असतील तर त्याला तत्काळ मंजुरी देणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार हे अत्यंत स्पष्टवक्ते आहेत. आम्हाला त्यांचा अभिमान आहे. मी नगरसेवक होतो. तेव्हा मी अनेकदा सांगण्याचा प्रयत्न करीत होतो. आम्ही नगरसेवक असताना त्यांच्याकडे एकदा मागणी केली की, कल्याण डोंबिवली महापालिकेमध्ये पाण्याची अत्यंत कमतरता आहे. आम्हाला पाण्याचा साठा वाढवून दिला पाहिजे. आम्ही लहान नगरसेवक होतो. विरोधी पक्षातील होतो, आम्हाला आठवत आहे की, त्यावेळी त्यांनी मला बोलावले व सांगितले की, तुमचा हा अधिकार आहे. त्यांनी एका मिनिटात बैठकीत निर्णय घेतला व सर्वांना पाण्याचा साठा वाढवून देण्याचे काम केले. मी हे येथे का सांगत आहे. याचे कारण असे आहे की, आता माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांचे लक्ष बदलले आहे. ते या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करु लागले आहेत. वारंवार सांगण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. नगरसेवकानंतर मी आमदार झालो. तेव्हा मी महासभेत बोलत होतो. जिल्हा नियोजन बैठकीत आम्ही वारंवार सांगत आहोत की, शहरातील आमदारांना जिल्हा नियोजनमधील निधी मिळणे कठीण आहे. त्यामध्ये तशी तरतूद नाही. जेथे तरतूद आहे तेथे आम्हाला मोठा निधी मिळणे

श्री. रविंद्र चव्हाण ....

अपेक्षित आहे. सर्व महापालिकेत एमएससीबीचे पोल्स रस्त्यावर असतात. ते शिफ्ट करण्यासाठी एमएसईबी कोणताही निधी देत नाही. किंबहुना असे सांगते की, तुम्ही तुमच्या पैशाने करा. महापालिका हे काम करत नाही. या करिता जिल्हा नियोजन मंडळातील निधी मिळत नाही. माझी मानीय वित्त मंत्री यांना विनंती आहे. जिल्हा नियोजनमधून या कामाकरिता विशेष निधी देण्याची गरज आहे. पूर्ण ठाणे जिल्ह्याला दोन कोटी रु. निधी दिला आहे. या निधीत महापालिकेतील एक-दुसरा पोल देखील निघू शकत नाही. मोठा निधी देणे अपेक्षित आहे. पूर्वी चांगल्या पद्धतीने आपले लक्ष असायचे. या सर्व गोष्टी लक्षात ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, महापालिकेच्या निर्मिती आधीचा जो काळ होता तो आता पुन्हा आठवत आहे. सन १९९३ व त्या पूर्वीचा काळ होता. या सर्व महापालिकेत प्रशासकांनी कारभार केला त्याची आठवण होऊ लागली आहे. काळाची गरज म्हणून सर्व महापालिकेत मोठया प्रमाणात प्रशासक शासनाने सर्व ठिकाणी नेमले असतील. सर्व प्रशासक कशा प्रकारे काम करीत आहेत याकडे शासनाचे लक्ष आहे काय हे बघण्याची गरज आहे. या सर्व महापालिकेचे बजेट पाहिले तर आपल्याला दिसून येईल की, त्यांची आर्थिक घडी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. काही महापालिका उदा. ठाणे महापालिका येथे ३ हजार कोटी रु. पेक्षा जास्त स्पील वर्क आहे. कल्याण -डोंबिवली महापालिकेमध्ये १२०० ते १३०० कोटी रुपयांचे स्पील वर्क आहे. सर्व भागात मोठया प्रमाणात स्पीलवर्क आहे. यास जबाबदार तेथील प्रशासकीय अधिकारी आहेत. त्यांच्याकडे कोण लक्ष देणार आहे, याचा विचार करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय पंतप्रधान श्री.मोदी यांच्या नेतृत्वामध्ये सन २०१४ पासून वेगवेगळया योजना जाहीर करण्यात आल्या. काही योजना जनजागृतीच्या माध्यमातून सुरु झाल्या. सब का साथ सब का विकास या पद्धतीने सब का विश्वास

श्री. रविंद्र चव्हाण .....

या नात्याने वेगळया पद्धतीने कामाला सुरुवात झाली. पूर्ण देशातील १०० शहरे स्मार्ट झाली पाहिजेत, या करिता प्रयत्न करण्यास सुरुवात झाली. यामध्ये आपल्या राज्यातील १० शहरे असावीत, या करिता माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी प्रयत्न केला. त्यांनी त्या काळात हट्टाने कल्याण डोंबिवली महापालिकेला स्मार्ट बनवण्यासाठी प्रयत्न करण्यास सुरुवात केली. मी आपल्यलाा हे सांगण्याचा प्रयत्न करीत आहे की, स्मार्ट सिटी व स्मार्ट सिटीचे प्रकल्प यांकडे, कल्याण डोंबिवली किंवा ठाणे महापालिकेतील प्रशासकांच्या माध्यमातून दुर्लक्ष केले जात आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.रविंद्र चव्हाण...

हे सर्वच्या सर्व प्रकल्प आज अडचणीत येण्यास सुरुवात झाली आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये स्मार्ट सिटीचे सर्वच्या सर्व पैसे फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवण्याचे काम... अध्यक्ष महोदय, एमएमआर मधील मीच एक बोलणार आहे म्हणून मी बोलत आहे.

तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) : अजून ५ सन्माननीय सदस्य बोलणार आहेत.

श्री.रविंद्र चव्हाण : अध्यक्ष महोदय, या सर्व प्रकल्पांकडे दुर्लक्ष केले जात आहे. याकडे कुठे तरी लक्ष देण्याची गरज आहे ती प्रशासकांकडून दिली जात नाही. तेथे सिटी पार्कसारखा प्रकल्प आहे. त्याकरिता भूसंपादनाची गरज होती. ते भूसंपादन केले जात नाही. शासनाने या सर्व गोष्टींकडे लक्ष देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, सर्व ठिकाणी स्मार्ट सिटीच्या माध्यमातून कॅमेरे लावण्याचा प्रयत्न केला गेला. सर्व भागामध्ये कॅमेरे लावले आहेत. परंतु, एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये ९ रेल्वे स्थानके जवळ आहेत. या सर्व भागात फेरीवाले धोरण अवलंबिले जात नाही. तेथे नागरिकांना फार मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. त्याकडे शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, या सर्व गोष्टी करीत असताना मोठ्या प्रमाणावर निधी दिला गेला पाहिजे होता. मात्र वेद पाठशाळेला दिलेला निधी रद्द करण्याचे काम केले गेले. शहरांमध्ये मच्छी मार्केट सुधारली पाहिजेत. चांगली झाली पाहिजेत, यासाठी प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे होते. परंतु, याकडे देखील लक्ष दिले जात नाही. त्यासाठी माननीय श्री.अस्लम शेख आपल्या खात्याकडून निधी देणे अपेक्षित आहे. आपण त्याकरिता जर ५ कोटी रुपयांचा निधी दिला तर नक्कीच शहरामध्ये एक चांगले मार्केट तयार होईल.

अध्यक्ष महोदय, एमएमआरडीए व एमएसआरडीच्या माध्यमातून महत्वाचा असणारा जो रस्ता आहे, जो कल्याण-शिळ रोड आहे त्याची आता फार दुरवस्था

श्री.रविंद्र चव्हाण...

झाली आहे. हा रस्ता ३ पदरी व नागपूर सारखा उन्नत होणे अपेक्षित आहे. कारण आजूबाजूला मोठ्या प्रमाणामध्ये नागरीकरण झाले आहे. हा रस्ता ३ पदरी असला पाहिजे, तो उन्नत असला पाहिजे, त्यावरुन मेट्रो धावली पाहिजे. त्याच बरोबर नवी मुंबई व डोंबिवली या भागात एक मिनी मेट्रो ज्याबद्दल माननीय श्री.नितीन गडकरी वारंवार सांगत आहेत. शासन किंवा एमएसआरडीकडे या संदर्भात निधी उपलब्ध नसेल तर हे सर्वच्या सर्व प्रकल्प माननीय श्री.नितीन गडकरी यांच्या खात्याकडे वर्ग करण्यात यावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, या सर्व विषयांव्यतिरिक्त आरोग्याची व्यवस्था होणे अत्यंत गरजेचे आहे. दिव्यासारख्या भागात एक प्रकल्प आहे. तेथे असलेल्या जागेवर हॉस्पिटलचे आरक्षण आहे. तेथे हॉस्पिटल होणे अपेक्षित असून ते होणे गरजेचे आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे, विभा ही कंपनी ही एमआयडीसीमध्ये आहे. एमआयडीसीमध्ये असणारी ही विभा कंपनी.... त्या ठिकाणी हॉस्पिटल होण्यासाठी महानगरपालिकेने विशेष प्रयत्न करणे देखील अत्यंत गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रीन मुंबईच्या मालमत्तांच्या संदर्भात मालमत्ता करात सूट देण्याचे सूट ठरवत असताना महानगरपालिकेमध्ये घन कचऱ्यासाठी वेगळा उपविधी कर लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याकडे देखील लक्ष देण्याची गरज आहे. आपल्या सर्वांना माहिती आहे की, राष्ट्रीय स्वयंसेवक सेवा संघात आमच्यासारखे कार्यकर्ते व अनेक संस्था सामाजिक बांधिलकी ठेवून आदिवासी पाड्यामध्ये, सर्व भागांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी काम करीत असतात.

अध्यक्ष महोदय, आमच्या सर्वांचे प्रमुख सरसंघचालक मोहनजींबाबत माननीय श्री.उद्धवजींनी जे म्हटले ते अतिशय चुकीच्या पध्दतीने म्हटले आहे. या सर्व गोष्टी त्यांनी बोलणे हे अत्यंत चुकीचे होते. त्यांनी अशा सर्व गोष्टींबाबत वक्तव्य करणे, हे चुकीचे आहे. आम्हा सर्वांना याचा राग येत नाही. परंतु, त्यांची प्रतिमा कुठे तरी..... आमच्या सारख्या सर्व कार्यकर्त्यांची व जनभावना कुठे तरी दुखावली जात आहे. याची नोंद त्यांनी घेणे, अत्यंत गरजेचे आहे, असे मला वाटते.

श्री.रविंद्र चव्हाण...

अध्यक्ष महोदय, मी मध्यंतरी देखील माहितीच्या मुद्याच्या माध्यमातून हे सांगण्याचा प्रयत्न केला की, भारतीय जनता पक्षाच्या श्री.मनोज कटके या कार्यकर्त्याला मारहाण होऊन एक महिना झाला. आजपर्यंत त्यांच्या आरोपींना अटक केली गेली नाही, हे अत्यंत वाईट आहे. मी या सर्व गोष्टींचा निषेध करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

.....

(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)

असुधारित प्रत

श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर): अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्याकरिता उभी आहे.

अध्यक्ष महोदय, या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलत असताना खास करुन मुंबई महानगरपालिकेबाबत मी बोलणार आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून, मुंबई महानगरपालिका ही आशियातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका आहे. मुंबई महानगरपालिकेचे बजेट जरी जास्त असले तरी, प्रशासनाच्या काही चुकांमुळे मुंबईच्या जनतेला त्रास होत आहे. टॅक्सच्या माध्यमातून मुंबईतील जनतेचे करोडो रुपये महानगरपालिकेला मिळतात. हे लाखो रुपये खर्च करुन देखील मुंबईतील गटारे तुंबतात, नाले सफाई अर्धवट होते.

अध्यक्ष महोदय, पावसाळ्याच्या आधी गटारे साफ करण्याकरिता महानगरपालिका लाखो रुपयांचा खर्च करते. परंतु, दरवर्षी मुंबई तुंबते. मुंबईतील याच तुंबलेल्या गटारामध्ये मुंबईतील एक नामवंत डॉक्टर वाहून गेले, हे आपले दुर्दैव आहे. अनेकांनी आपल्या जाहीरनाम्यामध्ये मुंबईला शांघाय सारखे शहर बनविणार, अशा वल्गना केल्या. परंतु, जेव्हा आपण विमानाने येतो तेव्हा विमान लँड होताना विमानतळावर आपण निळे पत्रे असलेली झोपडपट्टी पाहतो.

अध्यक्ष महोदय, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, स्वर्गीय प्रमोद महाजन, स्वर्गीय लोकनेते गोपीनाथजी मुंडे यांनी १९९५ मध्ये गरीब माणसाला स्वत:चे हक्काचे घर मिळावे याकरिता एसआरए योजना आणली. परंतु, मुंबईतील ही झोपडपट्टी कधी संपणार? मुंबईत आलेल्या माणसाने ४ बांबू बांधले तर त्याला एसआरएमध्ये ३०० चौ.फुटांचे घर मिळते. मात्र १०x१० च्या घरात राहणारा माझा भूमिपूत्र, माझा मराठी माणूस असेल त्याला स्वत:चे घर विकत घेता येत नाही, हे आमचे दुर्भाग्य आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये जे अतिक्रमण होत आहे. मुंबईतील झोपडपट्टया वाढत आहेत त्याला जर कोण जबाबदार असेल तर मुंबई महानगरपालिकचे बिल्डिंग व फॅक्टरीचे डिपार्टमेंट व पोलीस खाते आहे. मी आपणांस सांगू इच्छिते की, ज्या ठिकाणी २०० घरे होती. त्या ठिकाणी ४-४ हजार लोकांच्या झोपड्या झाल्या.

श्रीमती मनिषा चौधरी...

अध्यक्ष महोदय, मुंबईतील ४ नद्यांचे संवर्धन करण्याच्या अनुषंगाने माजी मुख्यमंत्री माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात सन २०१४ ते सन २०१९ पर्यंत माझ्या मतदारसंघातील दहिसर नदीचा डीपीआर बनविला. ते काम सुरु झाले. मुंबई महानगरपालिकेमार्फत ७० टक्के काम पूर्ण झालेले आहे. आपण करोडो रुपये खर्च करुन नद्यांचे संवर्धन करतो, त्यांना नवसंजिवनी देतो. परंतु, जोपर्यंत नदीलगत असलेले तबेले, धोबी घाट यांचे आपण पुनर्वसन करीत नाही, तोपर्यंत ते सांडपाणी तसेच नदीत जाणार.

अध्यक्ष महोदय, माननीय पर्यावरण मंत्री व आमचे माननीय पालक मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मुंबईतील तबेले दापचरी येथे हलविण्याबाबतचा निर्णय झालेला आहे. करोडो रुपये खर्चून आम्ही दहिसर नदीचे पुनर्वसन करतो. परंतु, माझ्या मतदारसंघातील सुकरवाडीच्या बाजूला असलेल्या तबेल्यांचे सांडपाणी तसेच मेलेली वासरे वगैरे त्या नदीमध्ये डायरेक्ट सोडली जातात.

अध्यक्ष महोदय, महापालिका आयुक्त, ए.एम.सी., डी.एम.सी., सर्वांकडे बैठका घेतल्या. २०० रुपयांचा दंड लावतात व त्या तबेलेवाल्यांवर कोणतीही कारवाई करीत नाहीत. त्यामुळे आपणामार्फत मी मंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, कडक कारवाई करुन नदीमध्ये जे सांडपाणी सोडले जाते ते बंद झाले पाहिजे. धोबी घाटातील पाणी प्रक्रिया करुन नदीमध्ये सोडले पाहिजे, याकरिता देखील कडक कारवाई करणे गरजेचे आहे.

नंतर श्री.शिंदे ...

श्रीमती मनिषा चौधरी...

दरहिसर नदीचे ३० टक्के काम बाकी आहे. माझ्या मतदारसंघातील साईनाथ नगर, शांती नगर, इंदिरा नगर येथे झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांना तेथेच पीएपी तयार करुन घर देण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, डीपीमध्ये दहिसर येथील अनेक रस्ते दाखविण्यात आले आहेत. या भागातील लोकांचे पुनर्वसन होत नाही. आपणास याच भागामध्ये घरे मिळतील, असे आपण लोकांना सांगणे गरजेचे आहे. पीएपी अधिक तयार करण्यासाठी आर ॲन्ड एलचे प्लॉट विकसीत करुन तेथे सदरहू लोकांचे पुनर्वसन करण्यात यावे. वॉर्डमधून डीपी मधील रस्ते मुक्त करण्यात यावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघाची सीमा मीरा रोड जवळ संपते. यासंदर्भातील मुद्दा मी मांडला होता, त्यावेळी पर्यावरण व वन मंत्री महोदय सभागृहामध्ये नव्हते. मॅन्ग्रोव्हज् मध्ये सुनामीला थांबविण्याची ताकद आहे. तिचे जनत करणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. यामध्ये राजकारण न करता सांगू इच्छिते की, मीरा रोड येथील पेंडकर पाडा येथे रोज रात्री मॅन्ग्रोव्हज् जाळण्यात येतात, हे तातडीने थांबविण्यात यावे. मुंबई उप नगर जिल्हा व ठाणे जिल्हा यापैकी कोणता जिल्हा हे प्रकरण हातळणार यात न पडता जे कोणी मॅन्ग्रोव्हज् जाळत असतील त्यांच्यावर सीसीटीव्ही फुटेज पाहून कडक कारवाई केली पाहिजे. मी वारंवार सांगत आहे की, माझ्या मतदारसंघामध्ये गणपत पाटील नगर असून तेथे रोज मॅन्ग्रोव्हज् कट करण्यात येत आहेत. वेट लॅण्डच्या मॅपनुसार सीमा निश्चित करुन कम्पाऊंड तयार करणे गरजेचे आहे. मॅन्ग्रोव्हज् वाचविणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे. पालक मंत्री महोदयांना यासंदर्भात उपाययोजना करण्यात यावी, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आमच्या गणपत पाटील नगरने ५६ लाख रुपये रुपये मोजणी सर्वे करण्यासाठी गृह निर्माण विभागाकडे भरली आहे. तो सर्वे सुरु करण्यात यावा.

श्रीमती मनिषा चौधरी...

हा सर्वे केल्यानंतर वेट लॅण्डची सीमा ठरवून त्या बाजूला मार्गिका तयार करावी व त्यावर सोलार लाईट लावून लोकांसाठी वॉक वे तयार केला तर त्याचा फायदा होईल व मॅन्ग्रोव्हज् वाचवू शकू.

अध्यक्ष महोदय, कोस्टल रोडचे काम सुरु आहे. वरळी येथील किनाऱ्यावर चांगल्या प्रकारची मच्छी प्रजननासाठी येते. वरळी येथील भगाात खोल समुद्रातील लॉप्स्टर सारखे मासे येऊन प्रजनन करीत असतात. मच्छीमारांचे खूप नुकसान होणार आहे. मच्छीमारांनी विख्यात कोस्टल जिओफॉर्मोलॉजिस्ट डॉ.सुरेंद्र ठाकूर यांचेकडून स्वतंत्र अहवाल तयार करुन घेतला व २० दिवसांपूर्वी मुंबई महानगरपालिकेला सादर केला आहे. आपण या रोडच्या संदर्भाने येणाऱ्या विषयाच्या संदर्भात एकत्र बसलो तर निर्णय निघू शकतात. सदरहू अहवालाच्या संदर्भात महानगरपालिका आयुक्त यांनी उत्तरही दिले नाही. सदरहू अहवालामध्ये मासेमारी करण्यासाठी दोन पिलरमधील अंतर १६० मीटर असणे आवश्यक आहे. ते कमी ठेवले तर भविष्यात मच्छिमारांना मासेमारी करताना कमी अंतरामुळे जीव गमवावा लागेल. या परिस्थितीस मुंबई महानगरपालिका जबाबदार राहील.

अध्यक्ष महोदय, एमएसआरडीसीने कोस्टल रोडला परवानगी दिली त्याच्या ना-हरकत दाखल्यातील अट क्रमांक १४ मध्ये नमूद केले आहे की, बांधकाम करताना मच्छीमारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आणि मच्छीमारांनी हरकती नोंदविल्या तर ना-हरकत दाखला रद्दबादल समजण्यात येईल. एमएसआडीसीने मच्छीमारांनी विचारलेल्या प्रश्नाला दुजोरा दिला. त्यामुळे मच्छीमार बांधवांना न्याय मिळवून द्यावा, त्यातून तोडगा काढून द्यावा.

अध्यक्ष महोदय, कोस्टल रोड होणे गरजेचे आहे. पक्षपात न करता सर्वंनी एकत्र येऊन यातून कोणता चांगला तोडगा काढण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला पाहिजेत.

श्रीमती मनिषा चौधरी...

अध्यक्ष महोदय, आपण म्हणतो की, सर्व रोजगार हे गुजरात राज्यामध्ये चालले आहेत. त्यामागील कारणे काय आहेत ? माझ्या मतदारसंघात डायमंड इंडस्ट्री आहेत. त्या सूरतला स्थलांतरीत झाल्या याचे कारण कोणीही उठतो आणि त्यांची तक्रार करतो. त्यामुळे त्या व्यापाऱ्याला त्रास देण्यात येतो. त्यामुळे तो व्यापारी म्हणतो, या युनियन नको, हा त्रास पण नको, ही महापालिकेची रोजची टांगती तलवार पण नको. आम्ही ज्या ठिकाणी एका दिवसामध्ये सर्व परवानग्या मिळतात तेथे जातो. हे व्यापारी त्या भागात गेले व त्यांच्याकडे काम करणारे हजारो कर्मचारी नोकरी विना राहिले आहेत. याला जबाबदार मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी आणि राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आहेत.

अध्यक्ष महोदय, मी सांगू इच्छिते की, मुंबईतील फेरीवाला धोरण अजून जाहीर झालेले नाही. आता कोरोनाच्या काळामध्ये ज्याला जिकडे वाटेल तिकडे चायनीज, भाजी पोळी, मच्छी विक्री असे धंदे सुरु केले आहेत. ज्या लोकांनी कधी मच्छीचे टोपले बघितलेले नाही, तो त्या समाजाचा नाही, तो माणूस मच्छीचे टोपले घेऊन मच्छी विक्री करीत आहे. या धंद्यामुळे वयोवृद्ध लोकांना फुटपाथवरुन चालणे कठीण झाले आहे. मी मंत्री महोदयांना विनंती करते की, मुंबईमध्ये लवकरात लवकर येथील फेरीवाला धोरण जाहीर करा आणि त्यांना मदत करा.

अध्यक्ष महोदय, मुंबईत पंधरा टक्के पाणी कपात होते. माझा उपनगरातील मतदारसंघ हा शेवटचा मतदारसंघ आहे. आम्हाला टनेल मधून पाणी येते त्यामध्ये प्रेशर भरता भरता १५ टक्के कट आमच्या भागात पाणी येईपर्यंत ४५ टक्के होतो. त्यामुळे आमच्या लोकांना पाणी मिळत नाही. अशी परिस्थिती असताना गारगाई आणि पिंजाळ धरणाचे काम मुंबई महानगरपालिकेने बंद केले आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०१४ मध्ये एनडीए सरकार सत्तेत आले. त्यापूर्वी महानगरपालिकेला १४ वर्षे परवानग्या देण्यात आल्या नव्हत्या. पण सन २०१४ मध्ये माननीय श्री. प्रकाश जावडेकर हे पर्यावरण मंत्री झाले व त्यांनी १४ दिवसांत सर्व परवानग्या दिल्या.

श्रीमती मनिषा चौधरी...

अध्यक्ष महोदय, मुंबईतील वाढती लोकसंख्या पाहता भविष्यात पाण्याची अडचण निर्माण होणार आहे. त्यामुळे गारगाई पिंजाळ धरणाच्या संदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, असे मी सूचित करु इच्छित आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई टॅक्सपेअरच्या सहयोगावर चालते. मुंबईच्या घरपट्टीमध्ये वृक्ष कर, शिक्षण कर, सिवरेज कर असे कर लावण्यात येतात. सोसायटी झाडांचे ट्रिमिंग करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेची परमिशन घेतात. त्यासाठी हजारो रुपये आकारण्यात येतात आणि ट्रिमिंग केलेला झाडपाला मुंबई महानगरपालिका उचलत नाही. महानगरपालिका वृक्ष कर लावते, लोक टॅक्स भरतात. त्यांना महानगरपालिकेने मोफत ट्रिमिंग करुन दिले पाहिजे व ते तातडीने त्याच वेळेला उचलावयास पाहिजे.

अध्यक्ष महोदय, कोविडच्या काळामध्ये मी स्वतः माझ्या मतदारसंघांमधील हजार मुलांचा आणि मतांचा कॅम्प घेतला होता. शुन्य ते पाच वयातील मुलांचे प्रमाणापेक्षा कमी वजन भरत आहे.

यानंतर श्री.तेलंग...

श्रीमती मनिषा चौधरी.....

अध्यक्ष महोदय, सद्य:स्थितीत मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ० ते ५ वर्ष वयाच्या मुलांचे अंडरवेटचे प्रमाण खूप वाढलेले आहे. जव्हार व मोखाडा येथे कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. परंतु ही कुपोषित बालके मुंबईमध्ये देखील मोठ्या प्रमाणात आहेत. तरी देखील सन २०१९ नंतर ते आजपर्यंत ० ते ५ वयोगटातील मुलांची मोजणी झालेली किंवा त्यांचे माप घेतलेला डाटा उपलब्ध नाही.

अध्यक्ष महोदय, पार्किंग ही मुंबईची सर्वात मोठी समस्या आहे. आपण नवनवीन रस्त्यांची कामे करीत आहोत, रोड वाईडिंग देखील करीत आहोत. शासन PAP यांना घरे देत आहे. देत आहे, दुकाने देत आहे. परंतु रोडच्या दोन्ही बाजूला वाहन पार्किंग करण्यास जागा राहत नाही. मुंबईमध्ये पार्किंगचा प्रश्न हा खूप महत्त्वाचा आहे.

अध्यक्ष महोदय, मी सांगू इच्छिते की, जेव्हा महानगरपालिकेची नगरसेविका होते, तेव्हा मी ठरावाची सूचना मांडली होती. मुंबई महानगरपालिकेतील जेवढे खेळाची मैदाने आहेत, त्यामध्ये अंडरग्राउंड पार्किंगची व्यवस्था करावी, जेणेकरून रस्त्यावरचा पार्किंगचा प्रश्न सुटेल.

अध्यक्ष महोदय, भूमिपूत्र मच्छीमार लोकांचे दादर येथील मच्छिमार्केट त्याच ठिकाणी असणे आवश्यक आहे. क्रॉफर्ड मार्केटमध्ये जे मच्छीमार लोक बसत होते, त्यांना सुद्धा त्याच ठिकाणी जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. बोरिवली स्टेशनसमोर मच्छीमार्केट आहे, त्या मार्केटच्या बाजूला आर सेंटरचे कार्यालय होते. ते कार्यालय धोकादायक असल्याकारणाने तोंडून टाकण्यात आलेले आहे. सदर कार्यालय नवीन ठिकाणी स्थापित केले आहे. परंतु मच्छीमार्केट हे त्याच ठिकाणी आहे. त्यामुळे सदर मच्छीमार्केट लवकरात लवकर विकसित करून परवानाधारक मच्छीमार लोकांना गाळे उपलब्ध करून देण्यात यावेत, अशी विनंती करते.

श्रीमती मनिषा चौधरी.....

अध्यक्ष महोदय, आगरी-कोळी लोक हे खऱ्या अर्थाने मुंबईचे भूमिपूत्र आहेत. दहिसर गावठाणच्या बाजूला वर्षानुवर्षे मच्छीमार लोक बसत आहेत. त्यामुळे त्या ठिकाणाला मच्छीमार्केट म्हणून जाहीर करणे अत्यंत गरजेचे आहे. एक्सर मार्केट येथे रस्त्यावर बसणाऱ्या विक्रेत्यांना त्याच ठिकाणी त्यांना सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. भूमिपूत्र जिकडे मत्स्यव्यवसाय करीत आहेत, त्याच ठिकाणी त्यांना व्यवसाय करण्याची परवानगी द्यायला पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, शहर आणि ग्रामीणचा एक सेतू तयार करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागामध्ये अनेक बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिला चांगल्या दर्जाच्या वस्तू तयार करीत आहेत. त्या वस्तुंची विक्री करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने परवानगी दिली, नि:शुल्क किंवा कमी प्रमाणात भाडे घेऊन त्यांना गाळे उपलब्ध करुन दिले तर ग्रामीण भागामध्ये तयार केलेल्या वस्तुंचे मार्केटिंग शहरी भागामध्ये करता येऊ शकेल. डहाणू नगरपालिकेने चिकू फेस्टिव्हल केला. त्यामुळे आजूबाजूच्या सर्व गावांतील महिलांनी त्या ठिकाणी येऊन आपला माल विक्री केला. त्याचप्रमाणे प्रत्येक ठिकाणी दोन ते तीन दिवसाचा एक एक फेस्टिव्हल करून ग्रामीण भागात तयार केलेल्या मालाला मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये विक्रीसाठी जागा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०१७ च्या जाहिरनाम्यामध्ये ७०० चौ.फुटापेक्षा जास्त असलेल्या सदनिकातील कचरा विलगीकरण, गांडूळ खत प्रकल्प, रेनवॉटर हार्वेस्टिंग, सोलार एनर्जी, पाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या सोसायट्यांच्या मालमत्ता करामध्ये सवलत देणार असे सांगितले होते. परंतु आजची वस्तुस्थिती वेगळीच आहे. नवीन बांधकाम परवाना देताना रेनवॉटर हार्वेस्टिंग, सोलार एनर्जी बंधनकारक करण्यात आली आहे काय, तर नाही. सी.सी. दिल्यानंतर ती यंत्रणा कार्यान्वित आहे किंवा नाही, याबाबतची तपासणी करण्याची कोणतीही यंत्रणा महापालिकेकडे आहे काय, तर नाही. ही जबाबदारी महापालिकेने पार पाडली काय, तर नाही. याला कोण जबाबदार आहे?

श्रीमती मनिषा चौधरी.....

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये तरुणांसाठी ई-वाचनालय उभारणार असल्याचे सांगण्यात आले होते. परंतु मुंबईमध्ये एकही ई-वाचनालय नाही आहे. मुंबई महानगरपालिकेने आतापर्यंत किती कौशल्य विकास केंद्रांची स्थापना केली आहे.

अध्यक्ष महोदय, भायखळा येथील आयटीआयसाठी आरक्षित असलेला भूखंड अल्पसंख्याकांच्या उर्दू भवनासाठी देण्यात आला आहे. मुंबईला आज आयटीआयची खूप गरज आहे. उर्दू भवनासाठी अवश्य जागा द्या. परंतु सात बेटावर वसलेल्या मुंबईमध्ये पहिले आगरी, कोळी आणि माळी या तीन समाजातील लोक आलेले आहेत. त्यामुळे या आगरी, कोळी व माळी भवन देखील उभारणे आवश्यक आहे. पालकमंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, माझ्या मतदारसंघामध्ये दहिसर गावठाण आणि एक्सर गावठाण या ठिकाणी आगरी, कोळी व माळी भवन बांधण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, कोरोनाच्या काळामध्ये सर्वच पक्षाच्या लोकांनी सेवा दिलेल्या आहेत, अनेक डॉक्टरांनी मदत केली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामध्ये ज्या आरोग्य सेविकांनी सेवा दिली, त्यांना अत्यंत कमी वेतन आहे. ६०-६२ वर्षांच्या महिला देखील आरोग्य विभागामध्ये काम करीत आहेत. परंतु त्यांच्याकडे कोणतेही ओळखपत्र नाही. आरोग्य सेवा देण्यासाठी त्या एखाद्या झोपडीमध्ये गेल्या किंवा डोंगरावर चढल्या आणि तेथे त्यांचा विनयभंग झाला तरी त्यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे संरक्षण नाही. हे शासन अनेक कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करीत आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या सेवेमध्ये असलेल्या सर्व आरोग्य सेविकांना शासन सेवेत सामावून घेऊन वेतन वाढीसह त्यांना पेंन्शन योजनेचा लाभ देण्यात यावा, अशी मी विनंती करते आणि मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा) : अध्यक्ष महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, कालच माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील समस्या किंवा येत असलेल्या अडचणींची अत्यंत उत्तम पद्धतीने मांडणी केली.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये वाढणाऱ्या झोपडपट्टीकडे पालकमंत्री महोदयांनी स्वत: लक्ष घालावे. कशा पद्धतीने मुंबईमध्ये झोपडपट्टया वाढल्या जात आहेत, त्याचे सन्माननीय सदस्य श्री.अबु आजमी यांनी माननीय श्री.आदित्य ठाकरे यांना फोटो दाखविले आहेत. कुठेतरी या झोपडपट्टी वाढीला आळा घालण्यासाठी शासनाने त्या त्या विभागातील स्थानिक पोलीस स्टेशन, स्थानिक वार्ड ऑफिसर यांच्यावर याबाबतची जबाबदारी टाकणे आवश्यक आहे. अशाच पद्धतीने झोपडपट्टी वाढत असेल तर संबंधित लोकांना निलंबित केले गेले पाहिजे. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केल्याशिवाय झोपडपट्टीमधील वाढ थांबणार नाही.

अध्यक्ष महोदय, काल माननीय डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, वरळी आणि नायगाव भागामध्ये एकूण ९२ एकरवर बीडीडी चाळी आहेत. त्या चाळींचा पुनर्विकास केला जात आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस ज्यावेळी मुख्यमंत्री होते, त्यावेळी त्यांनी ५०० चटईक्षेत्राचे घर देण्यात येईल, असे घोषित केले होते. पुनर्विकासाच्या कामाला चांगली गती प्राप्त झाली होती. परंतु दोन वर्षांपूर्वी कोरोनाचे संकट आल्यामुळे पुनर्विकासाचे काम ठप्प झाले होते. परंतु आता माननीय गृहनिर्माण मंत्री डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी उक्त कामास गती दिली आहे. आता सदर काम जलदगतीने चालू झाले आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. कालिदास कोळंबकर....

नायगाव बीडीडी चाळीस माननीय श्री. शरद पवार यांचे नाव देण्याचे त्यांनी जाहीर केले आहे. मी माननीय गृहनिर्माण मंत्र्यांना विनंती करणार आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे हे हयात नाहीत. त्यांचे नाव वरळी येथील बीडीडी चाळीस देणे योग्य आहे. परंतु माननीय श्री. शरद पवार यांचे नाव बीडीडी चाळीला देण्यात आले आहे. त्यांच्याबद्दल मला नितांत आदर आहे. महाराष्ट्रातील राजकारणाचे व्यासपीठ आहे. अशा वेळेस तेथे नाव देण्याचा जो प्रयत्न केला आहे, त्यास माझा विरोध आहे. याचे कारण असे की, बीडीडी चाळ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य होते. ते तेथील १७ क्रमांकाच्या खोलीमध्ये राहत असत. तेथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खासदारकीला उभे राहिले होते. तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जवळपास १० हजार अनुयायी आहेत. यामुळे तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, अशी मी विनंती करतो. याचा विचार माननीय गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी करावा लागतो.

अध्यक्ष महोदय, साफसफाई कर्मचाऱ्यांना हक्काची घरे देण्याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केले आहे. परंतु ती घरे कधीपर्यंत देणार आहेत ? यासाठी कालावधी ठरविला पाहिजे. माननीय गृहमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. पोलीस गृहनिर्माण संस्थांबाबात आयुक्त गवई यांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. हा प्रस्ताव अतिशय चांगला आहे. मुंबईतील १ लाख पोलिसांना हक्काची शासकीय घरे मिळणार आहेत. ही घरे ५०० कारपेट एरियाची असून ती ३० लाख रुपयांपर्यंत उपलब्ध होतील. असा हा प्रस्ताव आहे. आदरणीय श्री. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी मला सांगितले होते की, चार दिवसामध्ये हे धोरण जाहीर करण्यात येणार आहे. परंतु त्यापूर्वीच निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली होती. त्यामुळे तो प्रस्ताव अजून प्रलंबित आहे. शासनाने पोलीस गृहनिर्माण संस्थांचे धोरण जाहीर करावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, कन्र्झवन्सी कर्मचाऱ्याबाबतचेही धोरण जाहीर करावे, अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

नाशिक येथील पीव्हीआर चित्रपटगृहामध्ये महिला भगवा स्कार्फ घालून गेल्यामुळे महिलांविरुद्ध नाशिक पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याबाबत

प्रा. देवयानी फरांदे : अध्यक्ष महोदय, मी एका अतिशय महत्त्वाच्या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते.

अध्यक्ष महोदय, मघाशी मी नाशिक येथील पीव्हीआर सिनेमागृहातील द कश्मिर फाईल्स हा चित्रपट बघतानाचा मुद्दा उपस्थित केला आहे. तेथे काही महिला भगवा स्कार्फ घालून हा चित्रपट पाहण्यासाठी गेल्या होत्या. हे पीव्हीआर सिनेमागृह सरकारवाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आहे. मात्र दुसऱ्या हद्दीतील पोलीस स्टेशनमधील श्री. इरफान शेख नावाच्या पोलीस निरीक्षकांने भगवा स्कार्फ घालून गेल्यामुळे त्या महिलांवर गुन्हा दाखल केला आहे. माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहे. हा अतिशय गंभीर मुद्दा आहे. महिलांनी कोणत्या रंगाचा स्कार्फ घालावा, हा गुन्हा होऊ शकतो काय ? यात जवळपास १०० ते १५० महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोणत्या कारणामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे ? या नोटीसची प्रत मी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना देईन. ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये ते पीव्हीआर थिएटर येते त्याच्या ऐवजी दुसऱ्या पोलीस स्टेशनमधील श्री. इरफान शेख या पोलीस निरीक्षकांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत मी माननीय गृह मंत्र्यांनाही भेटून हा प्रकार सांगितला आहे. माननीय गृहमंत्र्यांनी याबाबतचे निवदेन करावे, अशी मी विनंती करते. तसेच अशा प्रकारे गुन्हा दाखल करणाऱ्या त्या पोलीस निरीक्षकावर कारवाई केली जाणार आहे काय ? याची चौकशी करण्यात येणार आहे काय ? तसेच माझ्या मतदारसंघात दाजीबा वीर आहेत. मागील ३०० वर्षांची त्यांची परंपरा आहे. त्या परंपरेवर गालबोट लागले आहे.

पृ.शी.: मुंबईच्या समस्या, मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचार, मुंबईतील पर्यावरणाची स्थिती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आणि अनुशेष दूर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देणे.

मु.शी.: मुंबईच्या समस्या, मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचार, मुंबईतील पर्यावरणाची स्थिती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आणि अनुशेष दूर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देणे या विषयासंबंधी सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, ॲड आशिष शेलार, सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, गिरीष महाजन, नितेश राणे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री गणेश नाईक, मंगलप्रभात लोढा, अतुल भातखळकर, अमित साटम, योगेश सागर, रणधीर सावरकर, प्रशांत ठाकूर, ॲड पराग अळवणी, ॲड राहूल नार्वेकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री सुनील राणे, संजय केळकर, रविंद्र चव्हाण, मिहिर कोटेचा, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री पराग शहा, राम कदम, डॉ. भारती लव्हेकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री महेश बालदी, सुभाष देशमुख, हरिभाऊ बागडे, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री कालिदास कोळंबकर, विजय देशमुख, सिध्दार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, लक्ष्मण जगताप, महेश लांडगे, संभाजी पाटील-निलंगेकर, अभिमन्यु पवार, राणाजगजितसिंह पाटील, सचिन कल्याणशेट्टी, राम सातपुते, डॉ.सुरेश खाडे, श्री मोहन मते, सर्वश्रीमती सीमा

असुधारित प्रत

हिरे, नमिता मुंदडा, श्वेता महाले, ॲड राहूल कुल, श्री दादाराव केचे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री.शिवेंद्रराजे भोसले, जयकुमार रावल, जयकुमार गोरे, डॉ.विजयकुमार गावित, डॉ.संजय कुटे, सर्वश्री राजेंद्र पाटणी, समीर कुणावार, डॉ.देवराव होळी, श्री. संजीवरेड्डी बोदकुरवार, प्रा.डॉ.अशोक उईके, सर्वश्री मदन येरावार, राजेश पवार, संतोष दानवे, बबनराव लोणीकर, डॉ.तुषार राठोड, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्री. अतुल सावे, प्रशांत बंब, किसन कथोरे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री. गणपत गायकवाड, कुमार आयलानी, प्रकाश आवाडे, समाधान आवताडे, धनंजय गाडगीळ, प्रताप अडसड, समिर मेघे, हरिष पिंपळे, नामदेव ससाने, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री. राजेश पाडवी, कीर्तीकुमार भांगडिया, भिमराव केराम, गोवर्धन शर्मा, प्रकाश भारसाकळे, लखन मलिक, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. टेकचंद सावरकर, विजय रहांगडाले, कृष्णा गजबे, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, डॉ. राहूल आहेर, श्री. दिलीप बोरसे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री. मंगेश चव्हाण, नारायण कुचे, तान्हाजी मुटकुळे, महेश चौघुले, रविशेठ पाटील, लक्ष्मण पवार, काशिराम पावरा, संजय सावकारे, सुरेश भोळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....

श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : अध्यक्ष महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई एमएमआर रिजनमध्ये माझा कल्याण हा मतदारसंघ येतो. मुलभूत सुविधांपासून वंचित असा हा मतदारसंघ आहे. कल्याण पूर्व येथे दाटीवाटीची वस्ती आहे. तेथे महानगरपालिका आणि ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे आहेत. कल्याण पूर्व येथून कल्याण स्टेशनकडे जाण्यासाठी जो मुख्य रस्ता आहे तो ८० फुटाचा झाला पाहिजे. हा रस्ता तयार करीत असताना अनेक घरे उद्धवस्त होणार आहेत. या घरातील रहिवाशांना बीएसयुपी अंतर्गत बांधलेली घरे द्यावीत. माझ्या माहितीप्रमाणे मागील सात ते आठ वर्षापासून जवळपास ७ ते ८ हजार घरे रिकामी आहेत. त्या घराचा उपयोग होत नाही. त्यामुळे यु टाईप रस्त्यामध्ये बाधित होणाऱ्या घरांचे पुनर्वसन करावे. अन्यथा युएलसीच्या माध्यमातून जवळपास १२०० ते १३०० मालमत्ता विकासकांकडून घ्यावयाच्या आहेत. युएलसी अंतर्गत बिल्डरकडून घरे घेतलेली नाहीत. त्या घरामध्ये काही विकासकांनी भाडेकरु ठेवले आहेत. तर काही घरे विकली आहे. ही घरे पुन्हा घेऊन त्या लोकांचे पुनर्वसन करावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील काही भागांमध्ये रस्त्यांची अतिशय दुरवस्था झाली आहे. तेथून आपणास चालणेदेखील शक्य होत नाही. मागील सरकारच्या काळत तेथे १९ रस्त्यांना परवानगी दिली गेली. या १९ रस्त्यांचा डीपीआर मंजूर झाला आहे. त्यानंतर निविदा प्रक्रिया होणे शिल्लक होते. त्यानंतर सरकार बदलले होते. आता या नवीन सरकारच्या काळात तेथील कामांची निविदा प्रक्रिया थांबिवली गेली आहे. मागील वर्षी मी माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाबद्दल सद्भावना होम मी केला होता. त्या भागातील आसेरा गाव आणि मनेरा गावातील २.५ कि.मी. च्या जागेवर रस्ता शिल्लक राहिला नाही. अशा ठिकाणी रस्त्यांची कामे झाली पाहिजेत. या कामांचे श्रेय कोणत्याही पक्षाला भेटले तरी चालेल. परंतु लोकांची कामे झाली पाहिजेत. त्यांच्या अडचणी दूर झाल्या पाहिजेत.

श्री. गणपत गायकवाड.....

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात वालधुनी नदी आहे. तेथे मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. तेथे संरक्षण भिंतदेखील नाही. यामुळे अनेक ठिकाणी झोपडपट्टीभागामाध्ये पाणी भरते. तेथील लोकांना यामुळे मोठ्या प्रमाणात त्रास होतो. तसेच मागील वेळेस तेथे पूर आला होता. तेव्हा सरकारने या पुरामध्ये ज्यांचे नुकसान झाले त्यांना मदत करण्यात येईल, असे सांगितले होते. परंतु त्यांना अद्यापपर्यंत मदत मिळाली नाही. त्या लोकांना मदत मिळाली पाहिजे. तसेच वालधुनी नदीपात्रावर दोन्ही बाजुने संरक्षण भिंत बांधली पाहिजे. माझ्या मतदारसंघामध्ये अनेक आरक्षित भूखंड आहेत. मी आमदार होण्यापूर्वी तेथे मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाली होती. मी निवडून आल्यानंतर तेथे बांधकामे होऊ दिली नाहीत. काही वर्षापासून ज्यांचे भूखंड आरक्षित आहे ते महानगरपालिका ताब्यात घेत नाही आणि तेथे कोणताही विकास केला जात नाही. त्यामुळे तेथे अनधिकृत बांधकामे होत आहेत व लोकांनाही मोबदला मिळत नाही. ते भूखंड ताब्यात घेऊन त्यांचा विकास केला पाहिजे. माझ्या मतदारसंघात बारवे धरणातून पाणी येते. त्या धरण क्षेत्रात उल्हासनगर, बदलापूर अशी अनेक शहरे आहेत.

यानंतर श्री. चौधरी.....

श्री.गणपत गायकवाड.....

महापालिका जेथून पाणी उचलते तेथे संडासचे पाणी, गटाराचे पाणी सोडले जाते तसेच मेलेली जनावरे देखील तेथे टाकली जातात. तेच पाणी फिल्टर करुन आम्हाला प्यायला दिले जाते. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांना विनंती आहे की, आपण माझ्यावर कमी झालेले थोडे प्रेम दाखवावे व पिण्याच्या पाण्यासाठी बारवी धरणापर्यंत पाईपलाईन टाकून द्यावी. हे काम झाले तर आम्ही आपले खूप आभारी असू.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये दादासाहेब गायकवाड क्रींडागण आहे. कल्याण पूर्व भागामध्ये याव्यतिरिक्त कुठेही क्रीडांगणे, मैदाने, बगिचे नाहीत. या एकमेव क्रीडांगणाच्या मधून एक रस्ता गेलेला आहे. सदर रस्ता शिफ्ट करुन क्रींडागणाचा विकास करावा, ही या निमित्ताने माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये आरक्षण क्रमांक ११०-अ ६७ (७) असे आरक्षण आहे. परंतु या पोलीस ठाण्याची अवस्था झोपडपट्टीप्रमाणे झाली आहे. या पोलीस ठाण्यासाठी व्यवस्थित इमारत बांधावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, उल्हासनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये देखील मोठी जागा आहे. त्या जागेवर इतर लोक डोळा ठेऊन बसलेले आहेत. या आरक्षित जागांवर वेळेत बांधकाम झाले नाही, भिंत बांधली गेली नाही तर तेथे अनधिकृत बांधकामे होऊ शकतात. तसेच उल्हासनगर पोलीस वसाहत देखील अतिशय मोडकळीस आलेली आहे. सदर वसाहतीचे पुनर्वसन करावे ही विनंती करतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

पृ.शी./मु.शी. : सदस्यांच्या अटकेसंबंधी घोषणा.

उपाध्यक्ष : मला, माननीय विशेष न्यायाधीश, पी.एम.एल.ए. तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहर दिवाणी व सत्र न्यायालय, बृहन्मुंबई यांचेकडून दिनांक २४ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये असे कळविण्यात आले आहे की, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.अनिल वसंतराव देशमुख यांना विशेष पी.एम.एल.ए. प्रकरण क्र.१०८९/२०२१ मध्ये अटक करण्यात आलेली असून श्री.अनिल वसंतराव देशमुख यांना त्यांच्या न्यायालयासमोर व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी हजर करण्यात आले. सद्यस्थितीत ते आर्थर रोड कारागृहात न्यायालयीन कोठडीत असून आता त्यांचे प्रकरण दिनांक ५ एप्रिल, २०२२ पर्यंत उपस्थित करण्यास्तव स्थगित केले आहे.

असुधारित प्रत

उपाध्यक्ष : मला, माननीय विशेष न्यायाधीश, पी.एम.एल.ए. तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहर दिवाणी व सत्र न्यायालय, बृहन्मुंबई यांचेकडून दिनांक २४ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये असे कळविण्यात आले आहे की, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.नवाब मोहम्मद इस्लाम मलिक ऊर्फ नवाब मलिक यांना पी.एम.एल.ए. रिमांड ॲप्लिकेशन क्र.१८४/२०२२ मध्ये अंमलबजावणी संचालनालयाद्वारे अटक करण्यात येऊन त्यांच्या न्यायालयासमोर दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी हजर करण्यात आले. सद्यस्थितीत ते आर्थर रोड कारागृहात न्यायालयीन कोठडीत असून आता त्यांची न्यायालयीन कोठडी दिनांक ४ एप्रिल, २०२२ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

असुधारित प्रत

पृ.शी.: रोजगार हमी योजनेवर काम केलेल्या मजुरांच्या थकीत मजुरीबाबत.

मु.शी.: रोजगार हमी योजनेवर काम केलेल्या मजुरांच्या थकीत मजुरीसंबंधी माननीय रोजगार हमी राज्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.संजय बनसोडे (रोजगार हमी राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ४७ अन्वये पुढील निवेदन करतो :-

अध्यक्ष महोदय, सन २००५ मध्ये केंद्र शासनाने केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, विद्यमान नाव – महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम लागू केला. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी ही केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून महाराष्ट्रात मुंबई आणि मुंबई उपनगर हे जिल्हे वगळून सर्व जिल्हयांमध्ये सदरची योजना सन २००८ पासून राबविण्यात येत आहे. सदर योजनेचे प्रमुख उद्दिष्ट ग्रामीण भागातील अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देऊन कायम स्वरुपात टिकाऊ मालमत्ता निर्माण करणे हे आहे. योजनेत सार्वजनिक तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनेचा समावेश आहे.

(**प्रेस :** येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

पृ.शी.: मुंबईच्या समस्या, मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचार, मुंबईतील पर्यावरणाची स्थिती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आणि अनुशेष दूर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देणे.

मु.शी.: मुंबईच्या समस्या, मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचार, मुंबईतील पर्यावरणाची स्थिती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आणि अनुशेष दूर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देणे या विषयासंबंधी सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, ॲड आशिष शेलार, सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, गिरीष महाजन, नितेश राणे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री गणेश नाईक, मंगलप्रभात लोढा, अतुल भातखळकर, अमित साटम, योगेश सागर, रणधीर सावरकर, प्रशांत ठाकूर, ॲड पराग अळवणी, ॲड राहूल नार्वेकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री सुनील राणे, संजय केळकर, रविंद्र चव्हाण, मिहिर कोटेचा, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री पराग शहा, राम कदम, डॉ. भारती लव्हेकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री महेश बालदी, सुभाष देशमुख, हरिभाऊ बागडे, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री कालिदास कोळंबकर, विजय देशमुख, सिध्दार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, लक्ष्मण जगताप, महेश लांडगे, संभाजी पाटील-निलंगेकर, अभिमन्यु पवार, राणाजगजितसिंह पाटील, सचिन कल्याणशेट्टी, राम सातपुते, डॉ.सुरेश खाडे, श्री मोहन मते, सर्वश्रीमती सीमा हिरे, नमिता मुंदडा, श्वेता महाले, ॲड राहूल कुल, श्री दादाराव केचे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री.शिवेंद्रराजे भोसले, जयकुमार रावल, जयकुमार गोरे, डॉ.विजयकुमार गावित, डॉ.संजय कुटे, सर्वश्री राजेंद्र पाटणी, समीर कुणावार, डॉ.देवराव होळी, श्री. संजीवरेड्डी बोदकुरवार, प्रा.डॉ.अशोक उईके, सर्वश्री मदन येरावार, राजेश पवार, संतोष दानवे, बबनराव लोणीकर, डॉ.तुषार राठोड, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्री. अतुल सावे, प्रशांत बंब, किसन कथोरे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री. गणपत गायकवाड,

कुमार आयलानी, प्रकाश आवाडे, समाधान आवताडे, धनंजय गाडगीळ, प्रताप अडसड, समिर मेघे, हरिष पिंपळे, नामदेव ससाने, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री. राजेश पाडवी, कीर्तीकुमार भांगडिया, भिमराव केराम, गोवर्धन शर्मा, प्रकाश भारसाकळे, लखन मलिक, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. टेकचंद सावरकर, विजय रहांगडाले, कृष्णा गजबे, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, डॉ. राहूल आहेर, श्री. दिलीप बोरसे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री. मंगेश चव्हाण, नारायण कुचे, तान्हाजी मुटकुळे, महेश चौघुले, रविशेठ पाटील, लक्ष्मण पवार, काशिराम पावरा, संजय सावकारे, सुरेश भोळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु.....

कॅप्टन आर. तमिल सेल्वन (सायन कोलिवाडा) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २९२ के अंतर्गत जो प्रस्ताव सदन के सामने पेश किया गया है, उस पर बोलने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिका के भ्रष्टाचार के विषय पर कल चर्चा हुई थी. मैं मुंबई महानगरपालिका में स्थापत्य समिति का चेअरमन था. उस समय एक प्रस्ताव आया. ६ हॉस्पिटल की बगल में, गली में सिग्नल लगा. सिग्नल मेन्टेनन्स के लिए पैसे का प्रस्ताव पास करने लिए आया. वहां जाकर देखने पर पता चलता है कि वहां सिग्नल ही नहीं है. लेकिन सिग्नल मेन्टेनन्स के लिए महानगरपालिका में स्थायी समिति के चेअरमन के माध्यम से प्रस्ताव आ रहा है. इसमें बहुत भ्रष्टाचार है. एक साल में तीन बार एक ही फुटपाथ को बनाने का विषय है. २-३ साल में एक ही रोड फिर से बनाने का विषय है. वहीं से भ्रष्टाचार शुरु होता है. हर एक विभाग में पानी माफिया और बिजली माफिया है. एक गरीब व्यक्ति को पानी लेने के लिए ऑनलाईन ७२० रुपये भरने पड़ेंगे. प्लंबर को १५ हजार रुपये भरने होंगे. रोड कटींग के लिए ३५ हजार रुपये भरने पड़ेंगे. एक गरीब आदमी के पास ५० हजार रुपये रहेंगे तो ही वह पानी ले सकता है. यहाँ पर महानगरपालिका की बड़ी बड़ी बाते हो रही है.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन.....

ये गरीब आदमी पानी के लिए ५० हजार रुपये कहां से लाएगा? इसलिए वह पानी माफिया को १-२ हजार रुपये देकर पानी ले रहा है. ऐसे कई उदाहरण है.

अध्यक्ष महोदय, नाला सफाई के लिए प्रस्ताव पास होता है. करोड़ों रुपये का प्रस्ताव होता है. स्थायी समिति में प्रस्ताव पास होने के बाद वहां पर केवल बड़ी फोटो दिखायी जाती है, लेकिन नाला साफ नहीं होता है. इस बारे में पूछने पर बताया जाता है कि यह सेंट्रल एजेन्सी का काम है. सेंट्रल एजेन्सी मुंबई में नहीं है.

अध्यक्ष महोदय, मेरे मतदार क्षेत्र में सायन हॉस्पिटल है. भूतपूर्व मुख्यमंत्री सम्माननीय श्री देवेंद्र फडणवीस साहब के कार्यकाल में, सन २०१६ में एक संयुक्त बैठक हुई. उस समय श्री मेहता साहब कमिश्नर थे. उस समय ३,२०० बेड्स का, १,४०० करोड़ रुपये का, सायन हॉस्पिटल के पुनर्विकास का प्रस्ताव पास हुआ. अब डॉक्टर का बंगला बन रहा है. सिस्टर का बंगला बन रहा है. मेडिकल कॉलेज के विद्यार्थियों के लिए निवास की व्यवस्था हो रही है. सम्माननीय मंत्री श्री आदित्य ठाकरे जी ने उस दिन आकर भूमिपूजन किया. ४-५ टेंडर में से एक ही टेंडर हुआ. उसमें बेड्स की व्यवस्था बहुत कम है. आईसीयू में तीन बेड है. एक बेड पर तीन पेशन्ट है. नॉर्मल वॉर्ड में एक बेड पर तीन पेशन्ट है. सायन हॉस्पिटल की हालत खराब होते जा रही है. उसकी व्यवस्था देखने के लिए मुंबई महानगरपालिका है. इसलिए दूसरे भी टेंडर जल्दी से जल्दी निकालना चाहिए. एसआरए का विषय है. इसमें लोगों को भाड़ा नहीं मिल रहा है. मैं आपको उदाहरण देना चाहता हूं. वडाला संगीत, शांतिनगर एसआरए, इसमें मुसा लकड़ावाला करके एक विकासक है. वह भाड़ा बिल्कुल नहीं देता है. एसआरए के अधिकारी ने बुलाने पर भी वह बैठक में नहीं आता है. शेख मिस्त्री एसआरए सोसायटी है. ओंकार डेव्हलपर जेल में है. एसआरए से संबंधित माननीय मंत्री महोदय ने इस विषय को सुनना चाहिए, यह बहुत महत्वपूर्ण विषय है. एसआरए सोसायटी के श्री शेख मिस्त्री ने झोपड़पट्टी तोड़ दी है. सीईओ और अन्य अधिकारियों से बात होने के बाद, एसआरए की बात सुनने बाद, अब वह जेल में है. अब वहां का विकास नहीं होगा.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन.....

गरीब आदमी की झोपड़पट्टी तोड़ दी है. गरीब लोगों को भाड़ा नहीं मिल रहा है. उनके लिए क्या किया जा सकता है ? कई समस्याएं है. शांतिनगर एसआरए लकड़ावाला, साई सिटी प्रोजेक्ट, साई वडाला आरिफ सोसायटी है. इस ओर ध्यान दिया जाना चाहिए. समय के अभाव में इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

उपाध्यक्ष : मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण बसून बोलतात तरी चालेल.

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपला आभारी आहे. जेवढे शक्य आहे तेवढे उभे राहून बोलतो. कारण उभे राहून बोलल्याशिवाय जोर पण येत नाही. पण बसून बोलल्याने जोर गेला, असाही कोणी अर्थ काढू नये.

अध्यक्ष महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावाच्या चर्चेमध्ये सहभागी झालेल्या सर्व सन्माननीय सदस्यांमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस, सर्वश्री. रईस शेख, रविंद्र वायकर, ॲड आशिष शेलार, सर्वश्री. सुनील प्रभू, अमित साटम, अबू आझमी, नितेश राणे, संजय केळकर, अतुल भातखळकर, महेश बालदी, प्रशांत ठाकूर, सुधीर मुनगंटीवार, दिलीप लांडे, रविंद्र चव्हाण, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. कालिदास कोळंबकर, रविंद्र गायकवाड याशिवाय आणखी काही सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला असेल आणि त्यांनी जे काही मुद्दे उपस्थित केले आहेत, त्या सर्व मुद्यांना एकाच वेळेत उत्तर देणे शक्य नसले तरी याचा अर्थ असा नाही की त्यांनी मांडलेल्या सूचनांची आम्ही नोंद घेतलेली नाही. आपल्या सर्वांना माहिती आहे की, आपण काही प्रश्नांना उत्तरे देतो आणि काहींची नोंद घेऊन योग्य असेल त्यावर कारवाई करतो.

अध्यक्ष महोदय, आज मी आपल्या अंतिम आठवडा प्रस्ताव आणि आपले संपूर्ण अधिवेशन झाले त्यावर थोडेसे मनमोकळेपणाने बोलण्याचा प्रयत्न करणार आहे. मी जे काही बोलणार आहे ते तळमळीने बोलणार आहे. कारण मला असे खोटे बोलता येत नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणपासून जर आपण सुरूवात केली तर मला एका गोष्टीचे दु:ख आहे, खेद आहे. राज्यपाल हे संविधानिक पद आहे. त्यांचे महत्त्व काय आह, हे आमच्यापेक्षा विरोधी पक्षांना जास्त माहिती आहे. कारण वेळोवेळी कागळ्या नाही म्हणणार मी, पण तक्रार करण्यासाठी हक्काने राज्यपालांकडे, केवळ विरोधी पक्षच नाही तर राज्यातील कोणीही नागरिक जाऊ शकतो, तो जात असतो आणि त्याने जायला पाहिजे. पण दुर्दैवाने या सर्व गोष्टी

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे...

आपण जशा पाळतो. अधिकार आपण मानतो. तशा काही प्रथा, परंपरा या देखील आपण पाळल्या पाहिजेत. हे ठीक आहे की, एखाद्या गोष्टीबद्दल आपल्याला आक्षेप घ्यायचा आहे तर आपण तो घेऊ शकता, एखाद्या गोष्टीबद्दल विरोधात मत नोंदवायचे आहे तर ते आपण नोंदवू शकता. पण निदान आपल्या राज्याची एक संस्कृती आहे, प्रथा आहे, परंपरा आहे. राज्यपालांनी आपले अभिभाषण सुरू केल्याबरोबर जो काही गोंधळ झाला तो राज्याच्या संस्कृतीला शोभनीय नव्हता. आपण निदान राज्यपाल महोदय काय बोलतात, हे तरी ऐकून घ्यायला पाहिजे होते. हां, आपण त्यावेळी जो दाऊदचा उल्लेख केला, तो तेवढ्यापुरता नव्हता. नंतर संपूर्ण अधिवेशन काळात आणि जवळपास आपले महिनाभर हे अधिवेशन सुरू आहे, या संपूर्ण काळात तो उल्लेख आपण रोजच करीत आला आहात. काल माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी "तेच ते" ही कविता सांगितली, ते आपण महिनाभर केले. "दाऊद एके दाऊद आणि दाऊन एके दाऊद, दाऊद दुने कोण", हा भाग वेगळा. पण मला एक अपेक्षा होती की, ज्यावेळी हक्काने आपण राज्य सरकारबद्दल काही तक्रारी, आक्षेप राज्यपालांकडे नोंदवित असतो तेव्हा निदान आपले सरकार, आपल्या राज्याचे सरकार काय करीत आहे, त्याच्या प्रगतीचा आढावा माननीय राज्यपाल आपल्यासमोर मांडत असतात. आपण राज्यपालांचे भाषण होऊच दिले नाही. त्यामुळे माननीय राज्यपाल राष्ट्रगीताला सुध्दा थांबू शकले नाहीत, त्यांना थांबू दिले गेले नाही. म्हणजे एवढा मोठा घोर अपमान आजपर्यंत देशातल्या कुठल्याही विधानसभेत क्वचितच झाला असेल. पण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दे जर आपण पाहिले असतील तर त्यातून त्यांनी काय सांगितले आहे. त्यांनी सांगितले की, माझे शासन हे समाजसुधारकांच्या आदर्शांचे अनुकरण करते. त्यांचे भाषणच ऐकले नाही तर समाजसुधारक कोण आणि त्यांचा आदर्श तरी काय आणि अनुकरण तरी काय करणार, हा प्रश्न उभा राहतो.

अध्यक्ष महोदय, त्यानंतर त्यांनी महत्त्वाचे म्हटले की, "माझ्या शासनाचा, महाराष्ट्राच्या सीमावर्ती क्षेत्रातील मराठी भाषिक जनतेच्या हक्कांसाठी उभे

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे...

राहण्याचा निर्धार आहे." आपण अनेकदा याबद्दल बोललो आणि आपण हे अनेकदा मान्यही केले आहे. आपण उभे राहू शकलो की नाही, त्यापेक्षा निदान हे ऐकले तरी पाहिजे होते. "छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या विटंबनेचा आणि बेळगावमधील मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीच्या अध्यक्षांवर शाई फेकल्याच्या कृत्याचा माझे शासन तीव्र निषेध करीत आहे." आता शासन म्हणजे केवळ या बाजूला बसलेत एवढेच नाहीत. त्यामध्ये आपले राज्य म्हणजे आपण सर्वजण आलोत. पण जो जो आपल्या छत्रपतींचा अपमान करेल त्याचा निषेधच नाही तर आणखी पुढे कायद्यानुसार जे काही करता येणे शक्य असेल ते करण्याची आवश्यकता आहे. आता पलिकडे शासन आपलं म्हणजे ज्यांनी हे भाषण होऊ दिलं नाही, त्यांचे असल्यामुळे हे बोलू दिलं नाही की काय, हाही एक प्रश्न महाराष्ट्राच्या शिवप्रेमी जनतेला पडलेलाच आहे.

अध्यक्ष महोदय, त्यानंतर त्यांनी असे सांगितले की, आपल्या सरकारने काय काय केले, कोविडच्या काळात कोणत्या उपाययोजना केल्या, वैद्यकीय उपचारासाठी ऑक्सिजनची कमतरता असताना राज्याने कसा ऑक्सिजन मिळविला, केंद्राने त्यांना तो कुठून आणण्यास परवानगी दिली. मी आपल्याला सांगू इच्छितो की, हजारो किलोमिटर लांबून ऑक्सिजन आणावा लागला होता. तेव्हा मी स्वत: माननीय पंतप्रधानांसमवेत व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे बोललो होतो की, हे अंतर फार जीवघेणे आहे. आधी मला काही माहिती नव्हते. कारण मी काही सर्वज्ञ नाही. मी त्यांना तिकडून ऑक्सिजन एअरलिफ्ट करुन आणता येतो काय, असे विचारले. त्यावर अभ्यास झाला आणि सांगितले गेले की, तो अत्यंत ज्वलंतशील असल्यामुळे तसा आणता येत नाही. निदान रिकामे टँकर्स आपण पाठवू शकतो. मग रिकामे टँकर्स तिकडे एअरलिफ्ट करुन पाठविले. तिकडून रस्त्याने आणि काही रेल्वेने ते टँकर्स आणले गेले. रात्रंदिवस आपल्या शासनाची यंत्रणा कार्यरत होती, तिचा मला मुख्यमंत्री म्हणून अभिमान आहे. अभिमान आहे. मुख्यमंत्री कोण, मंत्री कोण, हे कोणीही असले तरी यंत्रणा तीच असते. तीच यंत्रणा आपण त्यांना कसे वागवतो

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे...

त्याप्रमाणे काम करीत असते. इतर काही माहिती मी आता देत नाही. पण अनेक योजना ते अभिभाषणातून सांगणार होते. पण त्यांचे भाषण ऐकू दिले नाही.

अध्यक्ष महोदय, मग राज्याने काय केले, पर्यावरण, पर्यावरण सगळेच आपले जसे जेवणात आंबट वरण असते तसे तोंडी लावायला बोलायला पर्यावरण हा एक भाग ठीक आहे. पण काम कोण करते, पर्यावरणाबद्दल खरंच कोणी गांभीर्याने काम करते आहे काय, तर याही बाबतीत मला अभिमान वाटतो आणि आहेच. आणि तो अभिमान तुम्हालाही वाटायला काही हरकत नसावे. कारण की, "स्कॉटलंड येथे झालेल्या २६ व्या कॉप परिषदेमध्ये, हवामान बदलाचा सामना करण्याच्या महाराष्ट्राच्या प्रयत्नांची दखल घेतल्याने, अंडर २ कोअलिशन लीडरशिप अवॉर्ड, २०२१ चा भाग असलेला "प्रेरणादायी प्रादेशिक नेतृत्व" पुरस्कार माझ्या शासनाने जिंकला आहे. मला सांगायला अभिमान वाटतो की, हा पुरस्कार मिळविणारे महाराष्ट्र हे भारतातील एकमेव राज्य आहे.", असे माननीय राज्यपाल म्हणाले. माननीय राज्यपालांना राज्याचा अभिमान वाटतो.

अध्यक्ष महोदय, कोविडच्या काळापूर्वीच आपण "शिवभोजन थाळी" योजना सुरू केली होती. कोविडच्या काळात काही काळ आपण ही थाळी मोफतही दिली.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे....

पण १० रुपयात आपण पूर्ण जेवण देत आहोत, ही सुद्धा अभिमानाची बाब आहे. गोरगरिबांना परवडणाऱ्या दरात दोन घास मिळवून देण्याचे खूप मोठे काम आपण करीत आहोत. आजपर्यंत ८ कोटी पेक्षा जास्त थाळयांचे वितरण केलेले आहे. याचा अर्थ आपण जेवढी पोट भरत आहोत तेवढे आशीर्वाद आपल्याला मिळत आहेत.

अध्यक्ष महोदय, आता आझादीचा, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आहे. तो साजरा करण्यासाठी शासनाने ५० कोटी रुपये मंजूर केले आहेत. आता मी जे सांगत आहे ते आपण पहिले पासून लक्षात ठेवा कारण त्यानंतर आपल्याला त्यामध्ये सुद्धा भ्रष्टाचार दिसेल. काहीही झाले तरी भ्रष्टाचार असे म्हटले जाते. काही जणांची सवय असते की, आरसा बघितला तरी भ्रष्टाचार झाला, भ्रष्टाचार झाला असे वाटते. मग भ्रष्टाचार कशामध्ये झाला हे लोकांना कळत नाही की, तर त्यांना आरशाच्या मॅन्युफॅक्चरिंगमध्ये त्याला भ्रष्टाचार दिसलेला असतो. परंतु आरसा बघण्यासाठी स्वत:चा चेहरा बघितल्याशिवाय भ्रष्टाचार झाला आहे हे कसे कळणार आहे. असे काही जण बोलू शकतात म्हणून मी आधीपासून लक्ष ठेवण्यासाठी सांगितले आहे.

अध्यक्ष महोदय, हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचा उल्लेख काल माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केलेला होता. त्याचे ७७ टक्के बांधकाम पूर्ण झालेले आहे. रायगड जिल्ह्यातील रेवस्त रेड्डी सिंधुदुर्ग महामार्गाचे चौपदरीकरण, कॉन्क्रीटीकरण केले जात आहे. मुंबईतील सागरी किनारी मार्गाचे ५० टक्के काम झालेले आहे. पुण्यात रिंगरोड केला जात आहे. तसेच पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना दिक्षा ॲपद्वारे विषयनिहाय अभ्यास साहित्य प्रसारित करण्यात आले. अशी अनेक कामे करण्यात आलेली आहे. परंतु हे कोणी लक्षात घेत नाही. कारण आपण जर ऐकायचेच नाही असे ठरवले तर या सर्व बाबी कळणारच नाहीत. पण या सर्व बाबी ज्यांच्यासाठी केल्या जात आहेत ते फक्त ऐकत किंवा वाचतच नाही तर त्या योजनांचा लाभ घेत आहेत. आम्हाला जनतेचे जे आशीर्वाद पाहिजे ते दिले जात आहेत,याचे सुद्धा आम्हाला समाधान आहे. राज्याचे प्रमुख या नात्याने माझे सहकारी जे काम करीत आहेत आणि विशेषत: माझ्या शस्त्रक्रियेच्या

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे....

काळात सर्वांनीच सांभाळून घेतले पण सर्वच माननीय मंत्र्यांनी माझी उणीव न भासू देता उत्तम कार्य केले त्याबद्दलही मला समाधान व्यक्त करायचे आहे.

अध्यक्ष महोदय, आपण अनेक बाबी केलेल्या आहेत आणि त्यातील काही बाबींचा उल्लेख सभागृहामध्ये झालेला आहे. मी काही यावर जास्त बोलत नाही. पण जे झाले आहे ते नाकरण्याचा नाकर्तेपणा कोणी घेऊ नये, असे मला वाटते. आता साहजिकच आहे की, मध्ये मध्ये काही आरोप करण्यात आले. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार हे प्रत्येक वेळीच काहीतरी छान बोलतात मग मलाही काहीतरी छान उत्तर द्यावेच लागते. त्यांनी बेवडयांचे शासन आहे असे म्हटले. ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राला 'मद्यराष्ट्र' म्हणाले आहात. मद्य म्हणजे हे वाईन किराणा मालाच्या म्हणजे वाण्याच्या दुकानात मिळत नाही. तर ज्या ठिकाणी सुपर मार्केटमध्ये कुलुप बंद कपाटाची सोय आहे तिथेच मिळते. आपण विदर्भातून आलेला आहात आणि नेहमी चंद्रपूरचे मुद्दे मांडता. आपल्या शहराच्या बाजुलाच मध्यप्रदेश आहे. त्या ठिकाणची आकडेवारी मी वाचून दाखवतो मग आपण त्याला मद्यराष्ट्र म्हणणार काय ? याचा आणि आपला काही संबंध नाही. परंतु आपला तो बाब्या आणि दुसरा तो..... असे आपण करु नये.

अध्यक्ष महोदय, देशात १ लाख लोकसंख्येमागे मद्य विक्रीची दुकाने महाराष्ट्रात सर्वांत कमी आहेत. कर्नाटकमध्ये कोणाचे सरकार आहे तिथे ७.१० टक्के, मध्यप्रदेश येथे ५.०७ टक्के, आता आपण याचे उत्तर द्या उत्तरप्रदेश २.६० टक्के, तामिळनाडु ४.४३ टक्के, तेलंगणा ६.३० टक्के अशी आकडेवारी आहे. हे सर्व बघितल्यानंतर लगेच आपल्या राज्याची बदनामी करायची हे योग्य नाही. आपण आमच्यावर टीका करा. परंतु माननीय राज्यपाल हे महाराष्ट्राचा काय विकास झाला हे सांगत होते ते ही आपण लोकांसमोर येऊ देत नाही. अशी एक एक नावे देऊन आपण महाराष्ट्राला बदनाम करीत आहात. हे योग्य नाही. याची सर्व दखल नागरिक घेत असतात. आपण टीका करा यासाठी मी नाही म्हणालो नाही. कोणत्या टोकाला जायचे आणि काय टीका करायची हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे.

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे....

अध्यक्ष महोदय, राम-रावण युद्ध होताना रावणाचे एक एक मुंडक उडवल तरी चित्रपटात दाखवल्याप्रमाणे पुन्हा हा-हा-हा करुन रावण लढतो. मग नंतर कळले की, रावणाचा जीव हा बेंबीत होता. तसेच काही जणांना काहीही मिळाले म्हणजे केंद्रात सरकार मिळाले तरी त्यांचा जीव बेंबीत नाहीतर मुंबईत असतो. हे मी समजू शकतो कारण मुंबईसारखे कोणते शहर नाही. मी स्वत: पक्का मुंबईकर आहे आणि इथेच जन्मलेलो आहे. त्यामुळे मला माझ्या देशाचा आणि राज्याचा जसा अभिमान आहे तसाच मला माझ्या मुंबईचा अभिमान आहे. माझ्या मुंबईमध्ये आम्ही जे काही करणार ते जगातील सर्वोत्तम असलेच पाहिजे, हा माझा कटाक्ष असतो. मुंबईसाठी काय काय केले याची सर्व माझ्याकडे चवड आहे. पण ती वाचण्याची आवश्यकता नाही. येताजाता काहीजणांना काही दिसतच नसेल तर त्यांना हे लक्षात आणून देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, आता महानगरपालिकेच्या शाळा म्हटले तर हा तिथे काय शिकला आहे असे म्हणून त्याला असेच झिडकारले जाते. पण आज मी तुम्हाला अभिमानाने सांगतो की, महापालिकांच्या शाळांमध्ये सुद्धा आपल्या पाल्याला प्रवेश मिळावा म्हणून बाहेर रांग लागलेली असते. आठ भाषांतून शिक्षण देणारी ही देशातील एकमेव महापालिका असू शकते. ४८० शाळांमध्ये व्हर्च्युअल प्रशिक्षण दिले जाते. अद्ययावत अभ्यासक्रम असलेल्या टॅबचाही टेंडर काढून वापर केला जात आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापन केले जात आहे. मागील दोन वर्षात झोपडपट्यांमध्ये १५ हजार पेक्षा अधिक शौचालये बांधून पूर्ण केले आहे तर ८ हजारपेक्षा अधिक शौचकुपांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. कोणाची तयारी असेल तर आम्ही उद्घाटनासाठी आमंत्रण देऊ शकतो. शून्य कचरा निर्माण करणाऱ्या इमारतींना मालमत्ता करात ५ टक्के सूट तसेच आपल्याला हे देखील माहीत आहे की, ५०० स्क्वेअर फुटापर्यंत ज्यांची घरे आहेत त्यांना मालमत्ता करात पूर्वी दिलेली अर्धवट सूट काढून पूर्ण सूट दिलेली आहे.

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे....

अध्यक्ष महोदय, आरोग्यासाठी आता नवीन एक योजना सुरु केलेली आहे. अनेक जणांना आरोग्यासाठी काही केस करुन घ्यायच्या असतात पण त्या परवडत नाहीत. त्यामुळे आम्ही निवडक रुग्णालयांमध्ये हिंदु ह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे आरोग्य केंद्र सुरु केली आहेत. यामध्ये १३९ प्रकारच्या वैद्यकीय चाचण्या काही मोफत तर काही नाममात्र दरात उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. कर्करोगाच्या रुग्णांवर उपचारासाठी अद्ययावत प्रोटॉन थेरेपी उपचार अशी सुविधा उपलब्ध करुन देणारी ही देशातील पहिली महानगपालिका आहे. याची सुद्धा आपण दखल घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, कोविडच्या बाबतीत जे काही आरोप करण्यात आले त्याला मी पुढे उत्तर देणार आहे. मुंबई शहराने जे काम केले ते मुंबई मॉडेल म्हणून जगभरात प्रसिद्ध झाले. उच्च किंवा सर्वोच्च न्यायालय यांनी मुंबई आणि महाराष्ट्राने जे काम केले त्याची तारिफ केलेली आहे. कोविडमधून लोक बरे होतात पण द्वेषाची कावीळ कोणाला झाली असेल तर त्याचा उपचार आपल्याला कोणत्याही रुग्णालयात करता येत नाही. कावीळ बरा होतो पण द्वेषाची कावीळ असल्यामुळे ती बरी कशी होणार आहे. यासाठी आपण काही करु शकत नाही किंवा याला काही उत्तर ही नाही. कोविड काळात जे जम्बो सेंटर सुरु केले होते त्याबाबतही मला सांगायचे आहे की, माननीय पंतप्रधान मला स्वत: बोललो होते की, " उद्धव, देखों, इटली में ये क्या चल रहा है ? लोग रास्ते पर मर रहे है, उठाने के लिए कोई नही है." त्यांनी तेव्हाच ही धोक्याची घंटा माझ्या लक्षात आणून दिली होती. मग कोविडने जेव्हा आपल्या राज्यात पहिले पाऊल टाकले तेव्हा ही आपले अर्थसंकल्पिय अधिवेशन सुरु होते. त्याचवेळी आपण तातडीने एक निर्णय घेतला की, इकडे तिकडे करण्यापेक्षा जम्बो फिल्ड हॉस्पिटल उभारण्याची गरज आहे. यासाठी लागली तर लष्कराची मदत घ्या, असे सुद्धा मी सांगितले होते.त्यामध्ये काही कमीपणा वाटण्याचे कारण नाही. पण त्याही बाबतीत आपल्या यंत्रणेने स्वत:च्या ताकदीने स्वत:च्या हिंमतीने जम्बो कोविड सेंटर उभारले. देशात अजून कोणी अशा रुग्णालये उभारली असतील असे मला तर ते माहीत नाही.

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे....

आपण जर जम्बो कोविड सेंटर उभारली नसती तर काही ठिकाणी नदीमध्ये मृतदेह टाकण्यात आली तसे आपण होऊ दिले नाही. जे काही करता येणे शक्य होते ते सर्व आपण केले आणि यापुढे सुद्धा करु. कोविड येऊ नये अशी प्रार्थना आहे. पण जनतेच्या हितासाठी आम्ही वाटेल ते करु आणि आम्ही तसे केले आहे.

अध्यक्ष महोदय, काल मुंबईच्या विषयाबद्दल बोलताना मी सांगितले की, मुंबईतील बरेच विषय मार्गी लावले आहेत. माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे, माननीय मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांनी धोरणामध्ये काय बदल करायचा तो करुन ज्यांची घरे नव्हती त्यांच्या घरांचा प्रश्न आपण मार्गी लावला आहे. पत्रा चाळ पुनर्विकासाचे भुमिपूजन झालेले आहे. मराठी भाषा भवन दृष्टीक्षेपात नाही. हे बरोबर आहे परंतु येत्या २ तारखेला त्याचे त्याचे भुमिपूजन होत आहे. ते कुठे करायचे हे देखील निश्चित झालेले आहे येताना जाताना आपल्याला त्याचे होल्डिंग दिसत असतील.

यानंतर श्रीमती करंदीकर...

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे....

मराठी भाषा भवन दृष्टीक्षेपात येणार असून येत्या दोन तारखेला त्याचे भूमिपूजन होणार आहे. हे मराठी भाषा भवन गिरगाव येथे करण्याचे निश्चत झालेले आहे. या संबंधी आपल्याला येता जाता होर्डींग दिसत असतील. दिमाखदार असे मराठी भाषा भवन उभारण्याकरिता २ एप्रिलला कार्यवाही सुरु केली जात आहे. बीडीडी चाळींचा प्रश्न रखडला होता, तो आता मार्गी लावलेला आहे. डब्बेवाला भवन या करिता जागा दिलेली आहे. वरळी डेअरीच्या जागेवर आंतराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभे केले जाणार असून त्याची प्रक्रिया होत आली आहे. त्याची सुरुवात लवकरच होणार आहे. अशी अनेक कामे आहेत.

अध्यक्ष महोदय, मेट्रो १ चे काम केले जात आहे. यासाठी लागणारी आरेची जागा वादग्रस्त आहे. म्हणून कांजूर येथील पर्यायी जागा आम्ही मागितली असून केंद्र शासन ती अद्याप देण्यास तयार नाही. या करिता आपण पर्याय काढू. आपण मेट्रोचे काम बंद पडू दिले नाही. ते आणखी वाढवले जाणार आहे. कांजूर बद्दल मागे एकदा मी बोललो होतो. यामुळे आता त्याचा पुन्हा उल्लेख करण्याची गरज नाही. एक आक्षेप घेण्यात आला होता की, मेट्रोच्या कामात १० हजार २६९ कोटी रु वाढीचा प्रस्ताव देण्यात आला. हा प्रस्ताव माननीय विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्रजी फडणवीस, आपल्या काळातील सप्टेंबर,२०१८ मधील आहे. तो आमच्या काळातील नाही. तो कशासाठी वाढला आहे, याची माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे आपण चौकशी लावा. खरे असेल तर भाग वेगळा. मात्र नेमके अचानक १० हजार कोटी रुपये खर्च कसा वाढला, यामागे काय कारण आहे ? मुंबई जवळ समुद्र आहे, यामध्ये काही पाणी मुरले आहे काय, हे देखील बघून घ्या.

अध्यक्ष महोदय, आता सौरऊर्जा प्रकल्प केला जात आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने ईलेक्ट्रीक बसेस आणल्या जात आहेत. असे मानले जाते की, धुम्रपान करणाऱ्यांच्या आजुबाजूला बसलो तर जेवढा धूर जाईल त्यापेक्षा जास्त धूर रस्त्यावरील गाड्यांमुळे आपल्या शरीरात जातो. तो देखील धोकादायक असतो.

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे....

यामुळे आपली फुफ्फुसे निकामी होत जातात. यापेक्षा वेळेत जर सुधारणा केली तर शाश्वत विकास आपल्याला करता येईल. पर्यावरणाची हानी होऊ न देता व होणार असेल तर ती कमीत कमी कशी होईल, या दृष्टीने प्रकल्प राबवले जात आहेत. अशी खूप माहिती आहे. आपल्याला हवी असल्यास ही सर्व माहिती देण्यास मी तयार आहे.

अध्यक्ष महोदय, काही गोष्टींचा उल्लेख काल करण्यात आला. या गोष्टी अडल्या आहेत. धारावी येथील पुनर्विकास प्रकल्प आपल्याला करायचा आहे. त्यासाठी रेल्वेची ४५ एकर जमीन आवश्यक आहे. या साठी आपण केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत आहोत. मात्र अद्याप त्याला काही उत्तर येत नाही, प्रश्न सुटत नाही. अर्धे पैसे भरुन झाले आहेत. ते मिळाल्यानंतर दुसरे पैसे द्यायचे आहे. मात्र केंद्र शासन काही दाद देत नाही. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्याकरिता केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला जात आहे. मात्र अद्याप काही होत नाही. बाँम्बे उच्च न्यायालयाचे मुंबई उच्च न्यायालय असे नामकरण करण्याबाबत पाठपुरावा केला जात आहे.

अध्यक्ष महोदय, कर्नाटकव्याप्त महाराष्ट्र हा विषय आहे. तो सोडवण्याकरिता केंद्र शासन काही करत नाही. केंद्र शासन कोणाची बाजू घेत आहे हे न्यायालयातील कामकाज पाहिले तर स्पष्टपणे लक्षात येऊ शकते. केंद्र शासनाने पालक म्हणून नि:पक्ष भूमिका घ्यावयास पाहिजे. मात्र केंद्र शासन कोणाची बाजू घेत आहे हे कामकाज पाहल्यानंतर लक्षात येईल. असे का होत आहे, यासाठी कोण बोलणार आहे ?

अध्यक्ष महोदय, मी २-३ आरोपाबाबत बोलणार आहे. दहिसर येथील भूखंडाबाबत कोणी कसा पाठपुरावा केला होता, कोठून तो सुरु झाला. त्याचा पाठपुरावा सन २०११ पासून महापालिकेमध्ये सुरुवात झाली होती. माननीय देवेंद्रजी, आपल्याला कल्पना आहे. आपली एका पत्रावर सही आहे. आपण असे नमूद कले आहे की, "Examine and do the needfull". तेव्हाचे विधान परिषदेचे माननीय

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे....

विरोधी पक्षनेते माननीय श्री. धनंजय मुंडे. त्यांचा येथे उल्लेख केला तर चालेल ना ? अगदी केरळचे उत्तर तामिळनाडूला दिले असे तर होणार नाही ना, म्हणून मी हे विचारत आहे. त्यांनी हे पत्र दिले होते. त्यावर आपण उत्तर दिले होते. श्री. अजय महेता यांनी नाही म्हटले, असेही नाही. अजय महेता यांनी त्यावर टिप्पणी दिलेली आहे. त्याची किंमत कोण ठरवते याची माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील, आपल्याला कल्पना आहे. कारण आपल्याकडे पूर्वी महसूल विभाग होता. जमिनीची किंमत ठरवणारी यंत्रणा आपल्या विभागाकडे होती. त्यांनी ती किंमत ठरवली. ती दिल्यानंतर पुन्हा वाद झाला. आता ते कोर्टात आहे. तो ९०० कोटी रुपये मागत आहे. आपण त्यांना ३४९ कोटी रु. दिले. या पाठपुराव्याची सुरुवात सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी यांनी केली होती. दहिसरच्या रुग्णालयाबाबत आपण या बाबत फोटो देखील ट्वीट केला होता. आपल्याला हे रुग्णालय हवे आहे. (अडथळा) सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार सांगत आहेत की, बोलू नका मात्र आपल्या वॉर्डाचा प्रश्न आहे. लोक आपल्याला विचारणार आहेत त्यांना नाही. (अडथळा) मी आपला सन्मान करीत आहे. आपण चांगली सूचना मांडली होती. मी त्या बाजूचा आहे. आता हा वाद कोर्टात गेला आहे. तेथे रुग्णालय व्हावे ही तुमच्याप्रमाणे सर्वांची इच्छा आहे. म्हणून हा भूखंड ताब्यात घेण्याचा आग्रह आपल्या पक्षाने धरला होता त्याकरिता आम्ही देखील प्रयत्न केला. तेव्हा आम्ही देखील तुमच्या सोबत महापालिकेत एकत्र होतो. Improvement committee मध्ये भालचंद्र शिरसाट यांनी हा विषय आणला होता. असे करत ते येथपर्यंत आले आहे. यामध्ये कोठे भ्रष्टाचार झाला ? हे प्रकरण कोर्टात आहे. महापालिकेने आक्षेप घेतलेला आहे की, यास वाजवीपेक्षा जास्त पैसे दिले गेले आहेत. दर ठरविण्याचे काम महापालिका करत नाही तर महसूल विभागाची यंत्रणा आहे त्यांनी ते केलेले आहे. त्यानुसार पैसे दिलेले आहेत.

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे....

अध्यक्ष महोदय, कोव्हिड काळात भ्रष्टाचार झाला असा आरोप केला गेला. मला दु:ख वाटते. महापालिकेने अप्रतिम काम केले. साथरोग अधिनियम यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे. त्याची नोंद माझ्याकडे आहे. या काळात जे काम केले जाते, त्या बाबत कोणी आक्षेप घेण्याचे कारण नाही. मी थोडीशी माहिती घेतली. मला आपल्याकडून अधिक पुष्टी मिळाली किंवा ते खोडून काढले तर बरे होईल. मी प्रामाणिकपणे सांगतो. कोव्हिडशी लढताना माननीय पंतप्रधान यांनी पक्षभेद विसरुन सर्व राज्यांना सारखी मदत केली. हे मी उघडपणे सांगतो. यामध्ये मी काहीही कद्रुपणा करणार नाही. पीपीई कीट, एन ९५ ची किंमत जास्त होती. सुरुवातील ते मिळतच नव्हते. किंमत अधिक होती मात्र ते घेण्याशिवाय काही पर्यायच नव्हता. केंद्र शासनाने काही काळ आपल्याला मोफत दिले. केंद्र शासनाने सचिवांचा गट तयार केला Genral Financial rules (GFR) ते ओलांडून पलीकडे जाण्याची त्यांना मुभा दिली. या नंतर त्या गटाने जशी आवश्यकता असेल पीपीपी, औषधे कोणाकडून घ्यावे, व्हेंटीलेटर्स कोठून घ्यावेत या बाबत निर्णय केला. दुर्दैवाने व्हेंटीलेटर्स तेवढे चालले नाहीत. मात्र आपण काय करणार,जे उपलब्ध होते ते घेतले, घ्यावे लागले. त्यांच्याशी आपण वाटाघाटी केल्या. ज्यावेळी गरज होती तेव्हा या वस्तू पुरवल्या. टेंडर काढले होते काय, एचएलएल या एका कंपनीला जबाबदारी दिली. ही त्रिवेंद्रम येथील कंपनी आहे. या लोकांशी वाटाघाटी करुन किंमत ठरवली. समजा आपल्या समोर कोणीतरी बुडत आहे, आपल्याला पोहता येत नसेल तर त्याला वाचवण्यासाठी टायर किंवा लाकूड टाकले पाहिजे. टायरचे टेंडर काढत बसणार की, आजुबाजूला जो टायर आहे तो त्याच्याकडे फेकणार. त्याचा जीव वाचवणे ही प्राथमिकता आहे. तेच काम त्यावेळी महापालिकेने केले. महापालिकेने एकही काम टेंडर न करता केलेले नाही. या करिता शॉर्ट नोटीस टेंडर काढले. जो एल१ आला त्यांना काम दिलेले आहे. तरी देखील त्यांच्या मागे चौकशा. थोडक्यात काय की, मुंबईचे कौतुक सर्व ठिकाणी झाले.

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे....

अध्यक्ष महोदय, आपण धारावीमध्ये खूप काम केले. येथे सर्वात मोठी झोपडपट्टी आहे. एका खोलीत ८-१० लोक राहतात. काय सुरक्षित अंतर ठेवणार व मास्क तरी काय घालणार. आपण धारावी वाचवली हे केवढे मोठे काम झाले. केंद्र शासनाचे पथक यायचे तेव्हा थरथरलेले असायचे "साहब, कुछ भी करो. धारावी को बचाना पड़ेगा. कुछ भी करो, आपको जो करना है वह करो. क्वॉरन्टाईन कॅम्प करना है, तो वह करो." २-४ लाख द्यावे लागले तरी चालेल मात्र आपण काही तरी करा. मी अभिमानाने हे सांगतो की, महापालिकेची यंत्रणा आयुक्तांपासून तळागाळातील कर्मचाऱ्यांपर्यंत धारावीत उतरली व त्यांनी धारावी वाचवली. याचे कौतुक कोणालाच नाही. कौतुक करु नका.. आपल्याकडे एक म्हण आहे. घरच्या म्हातारीचा काळ .....ते तरी होण्याचा पाप करु नका. महापालिकेने काम केले. जेथे आपल्याला वाटते की, उणीव राहिली. ते आपण सांगा. यामध्ये कोठे भ्रष्टाचार आहे ?

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी एसटीपीचा मुद्दा काढला. तो शहराच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. तो झालाच पाहिजे. तो करणारच. आमचे सरकार येण्याआधी ८ ते ९ वेळा टेंडर काढून रद्द करण्यात आले. याची कारणे सर्वांना माहीत आहेत. महापालिकेत आम्ही बघत होतो. सत्तेत देखील आम्ही आपल्या सोबत होतो. एक संस्था असते त्यांच्याकडे अधिकार असतो ते त्यांचे नॉर्म्स, निकष बदलत होते.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे ...

...(अडथळा)... माझ्यापेक्षा आदित्यला जास्त माहिती आहे. त्यांनी ते निकष बदलले म्हणून आपल्याला टेंडर रद्द करावी लागली. हे सरकार आल्यानंतर पुन्हा टेंडर काढली. त्यांच्या सर्व बदललेल्या नियमानुसार अत्याधुनिक तंत्रज्ञानानुसार ही सर्व नवीन टेंडर काढली. ती उघडल्यानंतर असे लक्षात आले की, जेवढी किंमत प्रस्तावित होती की, एवढ्या किंमतीमध्ये व्हायला पाहिजे, त्या किंमतीच्या ६० ते ७५ टक्के अबाव्ह आली. मग काय केले, महानगरपालिकेने ते आय.आय.टी. कडे पाठवले व सांगितले की, आमचे चुकले आहे की त्यांचे चुकले आहे ते तुम्ही पहा. त्यांनी पूर्ण अभ्यास केला, त्या लोकांचे प्रेझेन्टेशन घेतले, मग त्यांचा अभिप्राय दिला की, महानगरपालिकेची चूक नाही. यांची चूक आहे.

अध्यक्ष महोदय, ती टेंडर पुन्हा रद्द केली. आता पुन्हा नव्याने टेंडर काढली आहेत. नव्याने टेंडर काढल्यानंतर मधल्या काळामध्ये याला जो विलंब झाला, तो कशामुळे झाला हा एक भाग झालाच परंतु, काही स्वयंसेवी संस्था कोर्टात गेल्या मग माननीय सर्वोच्च न्यायालयाने त्याची दखल घेतली व माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले की यापुढे ही संपूर्ण प्रोसेस आम्ही आमच्या निगराणीखाली करणार. मग त्यानुसार जे टेंडर आले आहेत, त्यातील टेक्नीकल बिड माझ्या माहितीप्रमाणे गेल्या सोमवारी उघडले गेले. कमर्शिअल बिड येत्या काही दिवसांमध्ये उघडणार आहे व माननीय सर्वोच्च न्यायालयात पाठवणार आहे. परंतु, जे अजून उघडले गेलेले नाही, त्यात एक पैसा खर्च झालेला नाही तर त्या पाकिटामध्ये भ्रष्टाचार झाला हे तुम्हाला कसे समजले, त्याचा पेन ड्राईव्ह तुम्हाला कोणी दिला? हा निराधार आरोप आहे. आरोप करा. परंतु, आरोप करताना त्याला काहीतरी आधार ठेवा. हीच जर का तुमची माहिती असेल व त्या माहितीच्या आधारे तुम्ही कागदपत्र देणार असाल व मंत्री महोदयांचे राजीनामे मागणार असाल तर मग हा अन्याय आहे.

अध्यक्ष महोदय, मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते. मी त्यावर नंतर थोडेसे बोलणारच आहे. या अधिवेशनाच्या सुरुवातीच्या दिवसामध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशन असल्यामुळे माननीय अर्थ मंत्री यांनी पंचसूत्रीच्या आधारे ज्या सर्व जीवनावश्यक गोष्टी आहेत म्हणजे आरोग्य, रोजगार व अन्य बाबींच्या अनुषंगाने एक

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे ...

अप्रतिम असा अर्थसंकल्प मांडलेला आहे. तो अर्थसंकल्प अप्रतिम आहे. चांगला आहे म्हणजे जे काही या कठीण काळात करता येणे शक्य आहे, त्या सर्वाची दखल घेऊन तो अर्थसंकल्प मांडलेला आहे. मी त्याचा पुनरुच्चार करणार नाही. कारण त्यावर व्यवस्थित चर्चा झालेली आहे व स्वत: अर्थ मंत्री महोदयांनी त्यावर उत्तर दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, एवढे सर्व झाल्यानंतर मला असे म्हणावयाचे आहे की, प्रतिमा व बदनामी ... टीका मी समजू शकतो. मी टीकेला अजिबात घाबरत नाही. बदनामीला देखील घाबरत नाही. कारण मी जो आहे, हा असा आहे. लोकांना माहीत आहे की, मी कसा आहे. त्यामुळे मी बदनामीला घाबरत नाही. परंतु, बदनामी करताना कोणत्या थराला जाऊन करायची?

अध्यक्ष महोदय, माननीय श्री. नवाब मलिक यांचा राजीनामा जर दोषी असतील, संबंध असतील तर काय करायचे ते पाहू. परंतु, तुम्ही आरोप करायचे. असे आरोप केले, तथ्यहीन आरोप करायचे आणि एवढ्या वेळ बोलायचे की, जणू काही ते सत्य वाटायला लागते. एका गोष्टीचे मला दु:ख किंवा आश्चर्य वाटते की, केंद्रीय संस्था एवढ्या पोकळ झाल्या आहेत काय की, माननीय श्री.नवाब मलिक हे दाऊदचे हस्तक, संपूर्ण देशात, मुंबईत सगळीकडे फिरत आहेत, ४-४, ५-५ वेळा निवडून येत आहेत. मंत्री बनत आहेत, तरी केंद्रातील यंत्रणेला माहितीच नाही?

अध्यक्ष महोदय, तसेच आहे. केंद्राच्या यंत्रणा मग करतात काय, नुसत्या थाळ्या वाजवा, दिवे पेटवा, दिवे घालवा हे करायचे? जे काही दिवे लागत आहेत, त्या दिव्यांच्या प्रकाशात तरी पहा ना दाऊदचे माणूस कोणकोण आहे ते. मी एक समजू शकतो की, तिरंदाज लक्ष्यवेध करतो. त्याचे ते कौशल्य असते. त्याचा बाण लक्ष्यवेध करणारा असला पाहिजे, लक्ष्यभेद करणारा असला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आता काय होत आहे तर बाण म्हणजे त्या एजन्सी आहेत त्यांना हातात पकडून लक्ष्यावर जाऊन खुपसले जात आहे की, हे तुझे लक्ष्य आणि हे तुझे शस्त्र. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस आपल्याला खरे तर केंद्राने घेतले पाहिजे रॉ,

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे ...

सी.बी.आय. आणखी काय काय आहेत तेथे, म्हणजे काम अधिक वेगाने होईल. कारण ती माहिती तुम्ही ईडीकडे दिली असे मी तुमचे कुठे तरी वक्तव्य वाचले.

अध्यक्ष महोदय, याचा अर्थ ईडीमध्ये एवढे बेकार लोक आहेत का, त्यांना काहीच माहिती नाही का? द्या माहिती द्या. कोणाला याला ठोकायचे आहे, ठोकतो. त्याला ठोकायचे आहे, ठोकतो. माहिती द्या, ठोकतो. माहिती देणारे तुम्हीच, आरोप करणारे तुम्हीच, चौकशी करणारे तुम्हीच. मग त्यांच्याप्रमाणे शिक्षा देखील हेच करतात. होणार काय, कारण अशा सर्व कडक केसेस करुन दिल्यानंतर न्यायालय तरी काय करणार? आमचा न्यायदेवतेवर विश्वास आहे परंतु, सर्व यंत्रणा अशा राबवणार मग ती ईडी आहे की घरगडी आहे, हेच माहिती नाही. हेच समजत नाही.

अध्यक्ष महोदय, मी यावेळेस अधिवेशनात मध्ये-मध्ये येऊन गेलो. माझी ऑफिसमध्ये बसून कामे सुरु होती. येताजाताना गंमत वाटेल परंतु, हा गंमतीचा विषय नाही. मी बोललो ना तेच ते आणि तेच ते. दाऊद व जुते. मला असे वाटले की, पूर्वी एक दाऊद शूज होते. तो देखील घोटाळ्यात गेला म्हणा परंतु, त्या दाऊद शूजची नवीन एजन्सी कोणी घेतली आहे काय, कारण दाऊद आणि जुते, दाऊद आणि जुते.

अध्यक्ष महोदय, हा दाऊद आहे कुठे हे कोणाला माहिती आहे का, निवडणुकीसाठी एखादा विषय तुम्ही किती काळ घेणार? जसा राम मंदिराचा विषय तुम्ही इतकी वर्षे घेतला तसा आता यापुढे दाऊदचा घेणार आहात काय? म्हणजे आधी रामाच्या नावाने मत, आता दाऊदच्या नावाने मत मागणार आहात काय, हे काय चाललेले आहे?

अध्यक्ष महोदय, हा जो दाऊद आहे तो कुठे आहे ते माहिती तरी आहे काय, ते कोणालाच माहिती नाही. असेल तर आणत का नाही? मागे मला आठवते आहे की, माननीय श्री.गोपीनाथ मुंडे आपले उप मुख्यमंत्री होते त्यांनी असे सांगितले होते की, आम्ही दाऊदला फरफटत आणू. आता आपण त्याच्या मागे फरफटत चाललो आहे आणि त्याचे हस्तक शोधत आहोत, कुठे आहेत हस्तक, तू हस्तक आहेस, तू हस्तक आहेस, तू हस्तक आहेस?

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे ...

अध्यक्ष महोदय, मला तरी आठवत नाही. तुमच्याकडे माहिती असेल तर सांगावी. ओबामाने ओसामाच्या नावाने मते मागितली होती का हो? त्यांनी निवडणुकीत त्याचा उल्लेख केला होता का हो? परंतु, ते जे टॉवर्स पाडले, देशावर हल्ला ... आम्ही बोलतो पण हल्लेखोराचे काय करतो? ओबामाने कोणाची वाट नाही पाहिली, पर्वा नाही केली, पाकिस्तान काय करेल, ढग आहेत तर त्याच्या आडून हेलीकॉप्टर पाठवायचे का, असा थिल्लरपणा नाही केला. थेट त्यांचे ते जवान पाठवले व घरात घुसून त्या लादेनला मारला, याला म्हणतात मर्दपणा. का नाही मारत दाऊदला, उडवा ना, मूळच उखडून टाका.

अध्यक्ष महोदय, अजूनही आम्ही पाहत आहोत कोण कोण कसे येत आहे, त्याचे अंडरवर्ल्डशी कसे संबंध आहेत, कोण त्याचा हस्तक आहे. जा, घुसा, दाऊदच्या घरात घुसून त्याला मारा जसे ओबामाने ओसामाला मारले तसे. याला म्हणतात मर्दपणा, याला म्हणतात हिंमत. परंतु, काही न करता तुम्ही केवळ आमच्यावर आरोप करीत आहात.

अध्यक्ष महोदय, मी पुन्हा प्रामाणिकपणाने सांगतो की, आम्ही देशद्रोह्यांच्या विरोधात आहोतच. त्याबद्दल कुठेही दुमत होण्याचे कारण नाही. परंतु, माननीय श्री.नवाब मलिक यांचा राजीनामा तुम्ही मागत आहात. त्याच्या आधी काश्मिरमध्ये जे काही घडले त्यावेळेस तुम्ही महबुबा मुफ्ती बरोबर बसला होता. मी ते माझ्या भाषणात देखील बोललो आहे, अनेकदा बोललो आहे, तेच ते आणि तेच ते, दुसरे आहे काय आपल्याकडे? परंतु, जेव्हा अफझल गुरुला फाशी देण्याचा जेव्हा प्रश्न आला तेव्हा या महबुबा मुफ्ती बाईंचे काय वक्तव्य होते, तर अफझल गुरुला फाशी देऊ नका. ज्यांनी लोकसभेवर हल्ला केला, देशाच्या लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरावर हल्ला केला, त्याचा हा मास्टर माईंड ब्रेन. त्याला फाशी देऊ नका व दिल्यानंतर त्याचे पार्थीव त्याच्या कुटुबीयांकडे द्या. मी विसरलो नसेन तर तेव्हा सत्तेमध्ये भाजपा सामील होता... होता नव्हता माहीत नाही. परंतु, त्यांच्या बरोबर तुम्ही सत्तेचा पाट मांडला होता. त्याच्या आधीसुध्दा त्यांची मते कशी होती, कारण एका रात्रीमध्ये ... (अडथळा).. नाही असेल किंवा नसेल मी आरोप करीत नाही. मी

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे ...

घटना सांगत आहे. माझे म्हणणे समजून घ्या. मी तुमच्यावर आरोप करीत नाही. तुम्ही तेव्हा सत्तेत असाल, असालही, तारखा काढल्या तर समजेल. परंतु, बुरहान वानी याला मारल्यानंतर ज्यांच्या घरी या महबुबा बाई गेल्या होत्या .. म्हणजे त्यांचे विचार एका रात्रीत नाही बदलले. या विचारांची ही माणसे आहेत हे माहिती असतानासुध्दा तुम्ही त्यांच्या सोबत सत्तेत बसला मग अफझल गुरु देशद्रोही नव्हता? मग ते काय अफझल सरकार होते की, बुरहान सरकार होते? कोणी कोणाचा राजीनामा घ्यायचा? किंवा सत्ता तुम्ही नंतर स्थापन केली असेल किंवा आधी केली असेल पण विचार तर तेच आहेत. जसे मी सांगतो की, मी कडवट हिंदूत्ववादी आहेच आणि तो राहणार. माझे विचार बदललेले नाहीत आणि बदलणार नाहीत, मी परत एकदा सांगतो तुम्हाला. परंतु, सत्तेसाठी आपण काय करायचे ते सोडून द्यायचे. आणखी एक म्हण आहे स्वत:चे ठेवायचे झाकून ... (हशा)...

अध्यक्ष महोदय, मला असे वाटते की, अजूनही तुम्ही पहा कारण तेव्हा भाजपा सत्तेत असेल कारण आम्हाला प्रश्न पडला होता की, या अफझल गुरुला फाशी देऊ नका असे सांगणाऱ्या महबुबा बाई भारतमाता की जय बोलायला लागल्या की काय, वंदे मातरम बोलायला लागल्या की काय? बोलल्या असत्या तर आम्हीसुध्दा सत्तेत नसतो आलो परंतु, त्यांचे दर्शन घ्यायला आलो असतो आम्ही की, त्या एकमेकांबरोबर आल्यानंतर वंदे मातरम बोलायला लागल्या, भारतमाता की जय बोलायला लागल्या.

अध्यक्ष महोदय, या सर्व गोष्टी पाहिल्यानंतर आणखी एक मुद्दा हा मुदस्सर लांबेचाच आहे. मुदस्सर लांबेबाबत तुम्ही सांगितले की, "दाऊद के लांबे हाथ". हे लांबे हात त्या माहिमच्या दर्ग्यामध्ये आपल्याला हार घालत असतानाचा फोटो आहे. तो एक ऐतिहासिक क्षण होता. त्या ऐतिहासिक क्षणाचे सर्व क्रांतिकारक ह्यांचे फोटो आहेत. मुदस्सर लांबे आणि सगळेजण. हे सर्व क्रांतिकारक, त्यांच्यावरच्या गुन्ह्याची यादी वाचा. कदाचित तेव्हा आपल्याला कल्पना नसेल. असे कधी तरी होते की, आपल्या सोबत कोणी तरी फोटो काढतो आणि ... (अडथळा)...

नंतर श्री.शिंदे ...

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे...

आपण परवा माझा कोणा सोबत तरी एक फोटो दाखविला. माझे तुमच्या सोबत, माननीय प्रधान मंत्री, माननीय केंद्रीय गृह मंत्री यांचे सोबतही फोटो आहेत. त्यामुळे काही होत नाही. एखाद्याने लग्न समारंभात फोटो काढला तर आपला त्या व्यक्तीशी संबंध जोडता येतो, असे नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री यांनी त्या निवडणुकीची सर्व प्रक्रिया सांगितली आहे. त्या नेमणूक पत्रावर तत्कालीन मंत्री महोदय व आताचे भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस श्री.विनोद तावडे यांनी हिरव्या शाईने स्वाक्षरी केली आहे. ती हिरवी शाई योगायोग असू शकेल. पण आपण काही गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. धर की ठोक, या वृत्तीमुळे कोणाचेच काही होणार नाही. केवळ आरोप करुन राज्य चालू शकत नाही. एखाद्याला व्यक्तीस तो वाईट आहे हे सांगण्यापूर्वी आपण स्वत: किती चांगले आहोत, हे लोकांना सांगावे लागते, दाखवून द्यावे लागते. त्यावेळी ऐकणारा व्यक्ती सांगू शकेल की कोण किती वाईट आहे. या सरकारने काही केले नाही, असे सांगण्यात येते. आपण स्वत: काय केले, हे अगोदर सांगितले पाहिजे. जर तुम्ही कळत नकळत तेच केले असेल तर आमचे सरकार कसे वाईट होऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, आता एक एक गोष्ट अगोदर सांगितली जाते व नंतर ती कृतीत आणली जाते. श्री.हर्षवर्धन पाटील यांना झोप लागत नव्हती, मग त्यांनी झोपेचे औषध घेतले म्हणजे पक्ष बदलला, आता त्यांना झोप लागते. हा अनुभव त्यांनी कानात सांगितला नाही तर एका सभेमध्ये सांगितला आहे. कधी कधी टीव्हीवर जाहिरात येते त्यामध्ये सांगण्यात येते की, "पहले मुझे नींद नहीं आती थीं". विरोधी पक्षाकडे कोणते झोपेचे औषध आहे, मला समजत नाही.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्ष सांगत आहे की, आम्ही सत्ताधारी बाजूचे सर्व भ्रष्टाचारी आहोत, दाऊदची माणसे आहोत. पण विरोधी पक्षाचा सकाळचा सत्तेचा प्रयोग यशस्वी झाला असता तर माननीय मंत्री श्री.नवाब मलिक व श्री.अनिल देशमुख

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे...

तुमच्या मांडीला मांडी लावून सत्तेत सोबत बसले असते की नाही ? आम्ही तुमचा गळ्यात पट्टा बांधला असता तर काय झाले असते ? विरोधी पक्ष आमच्या कुटुंबाची बदनामी करीत आहे, ही कृती अत्यंत नींदनीय, नीच व विकृत आहे. मर्द असाल तर मर्दासारखे अंगावर या मग तुम्ही आणि मी आहे, परंतु असे न करता सत्तेच्या माध्यमातून संस्थांचा दुरुपयोग करण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, महाभारतामध्ये श्रीखंडीचा उल्लेख आहे. श्रीखंडी कोण होता, हे मी सांगण्याची आवश्यकता नाही. लढण्याची ताकद नाही म्हणून श्रीखंडीला मधे टाकण्यात आले होते. श्रीखंडी कोण आहे आणि मर्द कोण आहे, कोण कोणाच्या आडून लढत आहे, हे आता समजत नाही. याला मर्दपणा म्हणत नाहीत, नामर्दपणा म्हणतात. हिम्मत असेल तर समोरासमोर या आणि लढा. यंत्रणांचा वापर करण्यात येतो, कुटुंबियांना बदनाम करण्यात येत आहे, धाडी टाकण्यात येत आहेत, हे काय सुरु आहे ?

अध्यक्ष महोदय, मागील वेळी केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी म्हणाले होते की, आमच्याकडे वाल्याचा वाल्मिकी होतो. ईडीचे काम मनी लाँड्रींग तपासायचे असते तसे विरोधी पक्षाचे ह्युमन लाँड्रींगचे काम आहे का ? बरबटलेला माणूस घेऊन त्याला म्हैसूर सॅण्डलने आंघोळ घालून, छान अत्तर लावून सुंदर करण्यात येते का ? विरोधी पक्षाने ह्युमन लाँड्रींगचे काम आहे काय ?

अध्यक्ष महोदय, आता जे काही सुरु आहे ते कोणी पाहत नाही, कोणाच्या लक्षात येत नाही, असे विरोधी पक्षाने समजू नये. आपल्या मुलांचे चाळे, थेरं पाहू न शकणारा त्यांचा पिता आंधळा धृतराष्ट्र होता, त्याच्या सारखे हे राज्य नाही. हा छत्रपतींचा लढणारा महाराष्ट्र आहे. आपण अशा वाटेला जाऊ नका. यातून कोणाचेच भले होणार नाही. हे सर्व काही सुरु आहे, त्यामुळे मी घाबरलो म्हणून सांगत नाही. त्यावर मी पुढे बोलणार आहे. अशा वृत्तीने काही होणार नाही.

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे...

अध्यक्ष महोदय, आपण लोकांना काय देणार आहोत, याचा विचार केला पाहिजे. या सभागृहामध्ये येण्याची अनेकांची स्वप्ने असतात. ही संधी प्रत्येकाला प्राप्त होत नाही. आपणाास ही संधी मिळाली आहे. तिचे सोनं करायचे की माती, हे आपण ठरवा. काही मतभेद, सूचना, नवीन कल्पना, आमच्यामध्ये कोणी गुन्हेगार असतील तर जरुर सांगावे. उगाच बदनामी करु नका.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाला सत्ता पाहिजे. त्यासाठी कुटुंबियांना तणावाखाली ठेवायचे, अटक करावयाची, जामीन मिळू द्यायची नाही, हे असे सर्व सुरु आहे. आपणास सत्ता पाहिजे म्हणून काहीही गोष्टी करु नका. पेन ड्राईव्ह जमा करण्यास जाऊ नका, त्याचा खप वाढल्याने ज्यांना गरज असते त्यांना तो मिळत नाही. पेन ड्राईव्हची आवश्यकता नाही. मी तुमच्या सोबत येतो. सत्तेसाठी येत नाही. तुम्ही माझ्या कुटुंबियांची बदनामी करण्याचे चाळे केले आहेत. उगाचच मालमत्तेवर, याच्यावर किंवा त्याच्यावर टाच आणली जात आहे. या टाचेला मी घाबरत नाही. शाळेमध्ये मला छत्रपती शिवाजी महाराजांची कविता होती की, "खबरदार, जर टाच मारुनी जाल पुढे, चिंधड्या उडवीण राई राई एवढ्या". त्यामुळे मी टाचेला घाबरत नाही. मी तुमच्या बरोबर येतो, मला तुरुंगात टाका. माझ्या कुटुंबाची बदनामी का करता ? आम्ही कधी तुमच्या कुटुंबियांची बदनामी केली नाही, त्यांच्या काही भानगडी असतील किंवा आहेत असे म्हणत नाही. त्या आम्ही काढण्याचा प्रयत्न केला नाही. मी तुमच्या बरोबर येतो, तुम्ही मला तुरुंगात टाका आणि त्यानंतर फुरसतीने आरोप जमा करा. त्याचीही आवश्यकता पडणार नाही. कारण खुलासे करुन उपयोग होत नाही, ते ऐकले जात नाही. काही गोष्टी सादर केल्या तरी त्या नाकारल्या जातात. याचे शेपूट त्याला जोडून सर्व पुरावे न्यायालयासमोर मांडण्यात येतात. न्यायालय जे समोर आहे त्यानुसार शिक्षा करते. तुमचा सत्तेसाठी एवढाच जीव जळत असेल तर मला तुरुंगात टाका, मी तयार आहे.

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे...

अध्यक्ष महोदय, आपण एक गोष्ट लक्षात घ्यावी. मी थोडेसे भावनिक बोलत असताना हिंदुत्ववादी बोलतो. मी आर्थर रोड, तिहार या तुरुंगाबाबत बोलत नाही. बाबरी मस्जिदीखाली राम जन्मभूमी होती. तसा कृष्ण जन्मभूमीचा शोध तुम्हाला लागला असेल तर त्या तुरुंगात मला टाका. मी कृष्णाचा अवतार नाही. परंतु कदाचित देवकीच्या पहिल्या ७ मुलांपैकी असेन पण त्या तुरुंगामध्ये मी कृष्ण जन्माची वाट पाहीन. मी जसे सांगतो मी कृष्ण नाही तसे तुम्हालाही सांगता आहे पाहिजे की तुम्ही कंस नाहीत.

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये बोलण्यात येते की, तुमच्या कुटुंबियांनी पापे केली, त्याचे स्व.बाळासाहेब ठाकरे यांना काय उत्तर देणार ? स्व.बाळासाहेबांनी हयातीत असताना तुमच्या नेत्यांना वाचविले होते ते त्यांना काय उत्तर देतील ? त्यावेळी देशातील सर्व जण सांगत असतानाही स्व.बाळासाहेब एकटे मागे उभे राहिले होते.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाने शिवसेनेशी सन २०१४ मध्ये युती तोडली त्यावेळीही मी हिंदू होतो. आज तुम्हाला वाटत असेल मी हिंदुत्वापासून फारकत घेतली. मी सांगू इच्छितो की, मी सन २०१४ मध्येही हिंदू होतो व आजही आहे. हे मी लपविलेले नाही. माझ्या सर्व सहकाऱ्यांना माहिती आहे. आपण मला तुरुंगात टाकणार असाल तर मी सर्व जबाबदारी घेतो. माझ्या शिवसैनिकांचीही जबाबदारी घेण्यास मी तयार आहे. सगळ्यांच्या वतीने मी पाप घेतो, मला तुरुंगात टाका.

अध्यक्ष महोदय, सन १९९२-१९९३ मध्ये ज्यावेळी सर्वांनी शेपट्या घातल्या होत्या त्यावेळी जीवावर उदार होऊन शिवसैनिकांनी मुंबई वाचविली त्यांना छळू नका. कोण कधी तुरुंगात जाणार हे सांगणारे यंत्रणेचे दलाल आहेत की प्रवक्ते आहेत, मला समजत नाही. श्री.अनिल देशमुख तुरुंगात जाणार सांगितले, ते तुरुंगात गेले. श्री.नवाब मलिक तुरुंगात जाणार सांगितले, ते तुरुंगात गेले. आता माननीय मंत्री

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे...

ॲड.अनिल परब तुरुंगात जाणार असे सांगितले आहे, ते ही तुरुंगात जातील. त्यानंतर श्रीमती किशोरी पेडणेकर यांना तुरुंगात टाकतील. हा कायदा व सुव्यवस्था, लोकशाहीचा खून आहे, या पलिकडे आणखी काही नाही.

अध्यक्ष महोदय, स्व.इंदिरा गांधी यांनी आणिबाणी घोषित केली होती. अघोषित आणिबाणी लावण्या एवढ्या त्या डरपोक नव्हत्या. त्यांनी आणिबाणीची घोषणा केली होती, ती चांगली की वाईट, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. पण आणिबाणी जाहीर करण्यासाठी एक धारिष्ट्य लागते ते त्यांच्यामध्ये होते.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री ॲड.अनिल परब सभागृहामध्ये उपस्थित आहेत. मी सर्वांना सांगतो की, ते सन १९९२-१९९३ मध्ये हिंदूंना वाचविण्यासाठी गेले होते त्यावेळी पोलिसांनी व मिलिटरीच्या लष्कराने त्यांना गुरा सारखे मारले होते. त्यांचे बांधकाम पाडण्यात येत आहे. आणखी काही पाडावयाचे असेल ते पाडावे. अनधिकृत बांधकामे पाडावयाची असतील तर सर्वांची पाडावी, कोणालाही पदराखाली घेता कामा नये.

अध्यक्ष महोदय, श्रीमती किशोरी पेडणेकर, महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका या चळवळीतील शिवसैनिक आहेत. एका व्यक्तीला स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी अशी घाण नको म्हणून सन २००५ मध्ये शिवसेनेतून काढून टाकले होते तेव्हा त्यांच्यासोबत काही जण गेले होते. त्यावेळी निदर्शने करीत असताना श्रीमती किशोरी पेडणेकर यांच्या डोक्यात विट मारण्यात आली होती त्यामुळे त्यांच्या डोक्याला कोच पडली होती. त्यावेळी त्या वाचल्या होत्या. त्यांना गुन्हेगार म्हटले जात आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये घोटाळा झाल्याचे सांगण्यात येते. पिंपरी-चिंचवडच्या स्थायी समितीच्या अध्यक्षाला घोटाळयामध्ये पकडण्यात आले आहे.

यानंतर श्री.तेलंग....

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे.....

म्हणून मी शेवटी एक कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची कविता वाचून दाखविणार आहे. काल विरोधी पक्षनेता यांनी वाचून दाखविलेली कविता वेगळी होती आणि मी वाचून दाखवित असलेली कविता वेगळी आहे. दुसरी बाब अशी की, ही कविता ना तुमच्यासाठी ना माझ्यासाठी ती सर्वांसाठी वाचून दाखवित आहे.

"माणूस माणूस बतलबी रे मानसा,

तूले फार हाव, तुझ्ी ह्ाकाकेल अशा,

माणसा माणसा तुझी नियत बेकार,

तुझ्याहून बरे गोठ्या्ंतंल जनावर,

माणसा माणसा तू कधी व्हशीन माणूस,

लोभासाठी झाला माणसाचे रे कानूस!"

आपण या कवयित्रीची शिकवण लक्षात ठेवली तर राज्यापाल महोदयांच्या भाषणावेळी जे झाले किंवा मागील काळात चिखलफेक करण्यात आली, ती निश्चितपणे होणार नाही, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, मला प्रसारमाध्यमांना देखील सांगावयाचे आहे की, आपण बातम्या दाखविता त्या जरुर दाखवा. परंतु कोणाचे तरी आयुष्य उद्धवस्त होईल, अशी बदनामी केली जाते, तेव्हा किमान आपण त्याला साथ देऊ नका. अशा आरोपांमुळे संबंधितांचे आयुष्य उद्धवस्त होते आणि कालातंराने समजून येते की, त्यांच्यामध्ये काहीही दोष नव्हता. सत्ताधारी किंवा विरोधातील कोणीही असो, आपण या देशाचे नागरिक आहोत असे वर्तन करावे, अशी मी विनंती करतो आणि मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद. जय हिंद, जय भारत.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तराने माननीय विरोधी पक्षनेता समाधानी असतील तर आम्ही कोणीही उत्तर देणार नाहीत. त्यामुळे त्यांनी तसे सांगावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाने मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर उत्तर येणे बाकी आहे. कारण मुख्यमंत्री महोदयांनी केलेले भाषण हे मिसलेनिअस आहे. या उत्तराच्या भाषणामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावातील एकाही मुद्याला स्पर्श केलेला नाही. त्यामुळे सदर सर्व मुद्यांचे उत्तर आपण दे ेणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेता श्री.देवेंद्र फडणवीस यांनी दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी या सभागृहामध्ये अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावावर काल आणि आज भारतीय जनता पार्टीच्या १४, शिवसेना पक्षाच्या ३ व समाजवादी पार्टी पक्षाच्या २ अशा एकूण १९ सन्माननीय सदस्यांनी आपापली मत व्यक्त केली आहेत.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावावर प्रथम माननीय विरोधी पक्षनेता श्री.देवेंद्र फडणवीस, त्यानंतर सर्वश्री रईस शेख, रविंद्र वायकर, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री सुनिल प्रभू, योगेश सागर, अमित साटम, अबु आजमी, नितेश राणे, आतुल भातखळकर, संजय केळकर, महेश बालदी व प्रशांत ठाकूर यांनी काल आपली भूमिका मांडली होती आणि आज सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, दिलीप लांडे, रविंद्र चव्हाण, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री कालीदास कोळंबकर, गणपत गायकवाड व कॅप्ट. आर.तमिल सेल्वन यांनी आपापली भूमिका मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेता यांनी भाषणाची सुरुवात करताना कवी वि.दा.करंदीकर यांच्या कवितेने सुरुवात की, मी देखील त्यांच्याच आणि त्याच कवितेने सुरुवात करीत आहे.

"शब्दांत भाव नाही, ना वेध अनुभवाचा;
रचना सुरेख झाली ! उपयोग काय त्याचा?
व्याहीच पत्रिकेचा, घालीत घोळ बसले;
नवरी पळून गेली ! उपयोग काय त्याचा?
सुगरण रांधणारी, सुग्रास अन्न झाले;
अरसिक जेवणारे, उपयोग काय त्याचा?
ऐश्वर्य प्राप्त झाले, झाली दिगंत कीर्ती;
केले गुरु अनेक, यात्रा कित्येक केल्या;
शांती न प्राप्त होता, उपयोग काय त्याचा?"

अध्यक्ष महोदय, काल माननीय विरोधी पक्षनेता यांनी वाईन धोरणाबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. मागील पाच वर्षे त्यांनी मुख्यमंत्री म्हणून तर अर्थ मंत्री

श्री.अजित पवार.....

म्हणून माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी काम केले आहे. त्यावेळी माननीय श्री.चंद्रशेखर बानवकुळे हे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मंत्री होते.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेता यांच्या एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ते मुख्यमंत्री असताना राज्य उत्पादन शुल्क मंत्री महोदयांनी घरपोच दारु पुरविण्याचे धोरण आणण्याचा विचार केला होता. परंतु तेव्हा प्रचंड टीका करण्यात आली होती. ही बाब मी देखील अनुभवलेली आहे. "आता दारु घरपोच मिळणार, खुशखबर दारुची होम डिलिव्हरी" अशा प्रकारच्या अनेक टीका करण्यात आल्या होत्या. त्यामुळे उक्त प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. आता मुख्यमंत्री महोदयांनी इतर राज्यांमध्ये काय सुरु आहे, हे सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु काही सन्माननीय सदस्यांना असे वाटत होते की, मुख्यमंत्री महोदयांनी इतर राज्यांबद्दल बोलण्यापेक्षा महाराष्ट्राबद्दल बोलावे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपण सर्वजण भारताचे नागरिक आहोत. महाराष्ट्रातील वाईप शॉपचा विचार केला तर एक लाख लोकसंख्येमागे दीड दुकाने आहेत. कर्नाटक राज्यामध्ये एक लाख लोकसंख्येमागे सात दुकाने आहेत. उत्तर प्रदेश राज्यामध्ये एक लाख लोकसंख्येमागे अडीच दुकाने आहेत. कोणत्या राज्यामध्ये किती दुकाने आहेत किंवा एक लाख लोकसंख्येमागे किती दुकाने असावीत, याच्या खोलामध्ये मी जाणार नाही. महाराष्ट्र हे सांधू-संताचे राज्य आहे, त्याच बरोबर हा महाराष्ट्र पुरोगामी देखील आहे. अध्यक्ष महोदय, माझ्याकडे राज्य उत्पादन शुल्क विभागाची जबाबदारी असली तरी मी जन्मलो तेव्हापासून आजपर्यंत एकदाही वाईनच्या थेंबाला स्पर्श देखील केलेला नाही. ही बाब अनेक सन्माननीय सदस्यांना माहिती आहे. पूर्वी हा विभाग माननीय श्री.दिलीपराव वळसे-पाटील यांच्याकडे होता. परंतु त्यांच्यावर गृह विभागाची जबाबदारी दिल्यामुळे राज्य उत्पादन विभागाची जबाबदारी माझ्यावर आलेली आहे. अर्थ मंत्री म्हणून मला राज्याच्या उत्पन्नाचा देखील विचारा करावा लागतो.

श्री.अजित पवार.....

अध्यक्ष महोदय, मध्य प्रदेश सरकारने वाईन किंवा दारु संदर्भात काय निर्णय घेतला याबाबतचा ओझरता उल्लेख मुख्यमंत्री महोदयांनी केलेला आहे. मध्य प्रदेश सरकारने सकाळी ९.३० ते रात्री ११.३० पर्यंत मद्यविक्रीस परवानगी दिलेली आहे. तसेच ज्या व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न एक कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांनी तसे आयकर विभागास मागील वर्षीचे विवरणपत्र सादर केले असल्यास त्यांच्याकडून वार्षिक ५० हजार रुपये घेऊन होम बार देण्याचा निर्णय घेण्यात आला. अशा प्रकारचे वेगवेगळे निर्णय मध्य प्रदेश सरकारने घेतलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेता यांनी सांगितले की, महाराष्ट्र सरकारने दारुचा कर ३०० टक्क्यांवरुन १५० टक्क्यापर्यंत कमी केला. म्हणजे ५० टक्के कर कमी केला. याबाबत राज्यामध्ये अनेक वेळा चर्चा करण्यात आली. परंतु कर कमी करण्याचा निर्णय का घेण्यात आला, याचे मी कारण सांगू इच्छितो. दिल्ली येथे दारुवर कर कमी आहे. त्यामुळे जे लोक दिल्ली येथे जात होते, तेव्हा ते परत येताना दारुच्या चार-चार, पाच-पाच बॉटल सोबत घेऊन येत होते. त्यामुळे राज्यातील मद्य विक्रीवर परिणाम होत होता. त्यानंतर या सर्व बाबींचा विचार करुन राज्य सरकारने १५० टक्के कर कमी केला. राज्य उत्पादन शुल्कातून पूर्वी राज्य सरकारला १०० कोटी रुपये प्राप्त होत होते. परंतु आता कर कमी केल्यानंतर ३०० कोटी रुपये प्राप्त होत आहेत.

अध्यक्ष महोदय, अनेकांनी प्रश्न विचारला आहे की, राज्य शासन सुपरमार्केटमध्ये का वाईन विक्रीस ठेवत आहे? मी त्यांना सांगू इच्छितो की, या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. या निर्णयावर राज्य सरकारने जनतेतून हरकती मागवलेल्या आहेत. तसेच राज्यातील सर्व सुपरमार्केटमध्ये वाईन विक्री करण्यास सक्ती किंवा बंधनकारक करण्यात आलेले नाही. राज्यातील जास्तीत जास्मत ४०० ते ५०० सुपरमार्केट व मॉलमध्ये त्यांच्या सहमतीने वाईन विक्री करण्यात येईल.

श्री.अजित पवार.....

ज्या सुपरमार्केटच्या मालकांनी नकार दर्शविल्यानंतर तेथे वाईन विक्रीसाठी ठेवली जाणार नाही. अजून या निर्णयाची अंमलबजावणी सुरु झालेली नाही.

अध्यक्ष महोदय, समाजसेवक माननीय श्री.अण्णा हजारे हे या निर्णयाविरोधात उपोषणास बसणार होते, तेव्हा काही वरिष्ठ अधिकाऱ्यांसह माननीय श्री.दिलीपराव वळसे-पाटील यांनी त्यांची भेट घेतली होती. तसेच इतर काही मंत्री महोदयांनी देखील त्यांची भेट घेतली होती.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

श्री. अजित पवार.....

मी प्रधान सचिव यांनाही तेथे चर्चा करण्यासाठी पाठविले होते. त्यांनी सांगितले की, लोकांचे काय मत आहे, हे देखील शासनाने जाणून घेतले पाहिजे. अशा प्रकारे मुभा दिली आहे. यासाठी हरकती मागविण्यात येणार आहेत. या हरकती आल्यानंतर पुढे कोणती भूमिका घ्यावयाची हे ठरणार आहे. यातून अनेक प्रकारची टीका करण्यात आली होती. कोरोना काळात मंदिरे बंद, दारुची दुकाने सुरु, दारुवरील कर माफ, पेट्रोल डिझेलवरचा भार, अशा प्रकारे अनेक घोषणा दिल्या आहेत. तसेच सस्ती दारु, महेंगा तेल, अशाही घोषणा दिल्या होत्या. अशा घोषणा दोन्ही बाजुने दिल्या जातात. परंतु जे सत्तेत असतात ते गप्प बसतात आणि जे विरोधी पक्षामध्ये असतात ते अशा घोषणा देतात. आम्ही देखील विरोधी पक्षात असताना अशा घोषणा देत होतो. हे प्रकार सुरुच असतात. या सर्व गोष्टी करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यात सन २०१५ साली लागू केलेली दारु बंदी उठविण्याबाबत शासनाने घेतलेला निर्णय याबाबत पोटतिडकीने सांगितले आहे. त्यावेळच्या मंत्रीमंडळामध्ये माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ही बैठक होती. त्यावेळेस सन्माननीय सदस्य हे याबाबत आग्रही होते. इतर काहींची मते वेगळी होती. परंतु सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार हे अर्थमंत्री आणि त्या जिल्ह्याचे पालकमंत्री असल्यामुळे तो निर्णय घेतला गेला. यासाठी काहींनी त्यांच्या मागणीला मान दिला आणि नंतर मग तेथे दारुबंदी झाली. परंतु मी सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांना सांगू इच्छितो की, अनेकदा त्या भागातील निवडून आलेल्या खासदारांनी निवडून आल्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी उठविली जाईल, असे भाषणे केली आहेत. त्या जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय श्री. विजय वडेट्टीवार हे नेहमी मागणी करीत असत की, तेथील दारुबंदी उठविली पाहिजे. त्या भागातील काही लोकप्रतिनिधी यांनीही अशी मागणी केली होती. या सर्वांचा विचार करुन चंद्रपूर जिल्ह्यात लागू असलेली दारुबंदी उठविण्याबाबत प्राप्त झालेल्या मागण्यांच्या अनुषंगाने सर्वंकष विचारविनिमय करुन पुढील निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासनाच्या श्री रमानाथ झा, सेवानिवृत्त प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२ जानेवारी, २०२१ रोजी समिती स्थापन केली. या

श्री. अजित पवार.....

समितीच्या अहवालातील चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदीपूर्वी आणि दारुबंदीनंतर झालेल्या आर्थिक, सामाजिक परिणामांचा तुलनात्मक अभ्यास, गुन्ह्यांमध्ये झालेली वाढ या अनुषंगाने समितीचे अभिप्राय, निष्कर्ष व शिफारशी आणि जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली समीक्षा समितीचा अहवाल तसेच या विषयासंदर्भात शासनास प्राप्त झालेली निवेदने विचारात घेऊन शासनाने चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी उठविण्याचा निर्णय दिनांक ८ जून, २०२१ रोजी निर्गमित केला आहे. या समितीनेही तशी शिफारस केली आहे. पोलीस विभागानेही सांगितले की, दारुबंदी झाल्यानंतर गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. याबाबतचा सर्वे करण्यात आला होता. या सर्व्हेमध्ये शाळेतील लहान मुले बाजुच्या जिल्ह्यात जाऊन तेथून दारु विकत आणून या जिल्ह्यात विकत असत. असेही प्रकार तेथे मोठ्या प्रमाणात होत होते. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी उठविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. असे निर्णय घेत असताना काही लोकांना ते निर्णय आवडत नाहीत. प्रत्येकाचे वेगवेगळे विचार असू शकतात. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांचा त्यांना विरोध होता. इतरांनी याबाबतची मागणी केली होती. ही गोष्टही आपण लक्षात घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, वाईनसंदर्भातही काहींनी चर्चा केली होती. वाईन पिल्यानंतर गाडी चालविली तर चालेल का, असेही काही प्रश्न उपस्थित केले गेले. परंतु मी सांगू इच्छितो की, यासाठीही पूर्वीचेच नियम लागू राहणार आहेत. त्यात कोणतेही बदल होणार नाहीत. वाईनसंदर्भात विधि व न्याय विभागाने सहमती दिल्यानंतर आवश्यकत्या सुधारणा करुन प्रारुप अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. प्रारुप नियमावर हरकती व सूचना कळविण्यासाठी नागरिकांना ९० दिवसांची मुदत देण्यात येणार आहे. प्रारुप अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर त्यास राज्यातील प्रमुख वर्तमानपत्र मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये व्यापक प्रसिद्धी दिली जाणार आहे. सदर हरकती व सूचना आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, २ रा मजला, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग यांच्याकडे मागविण्यात येणार आहेत. त्या हरकती व सूचनांचे कामकाज हाताळण्यासाठी

श्री. अजित पवार.....

आयुक्त कार्यालयातील एका जबाबदार अधिकाऱ्याची समन्वयक अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाणार आहे. सदर निर्णयास विरोध दर्शविणारी शासनास प्राप्त होणारी सर्व निवेदने हरकती व सूचना समजून विचारार्थ घेण्यासाठी आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे पाठविण्यात येतील. वरील प्राप्त होणाऱ्या नागरिकांच्या हरकती व सूचना विचारात घेऊन शासनाकडून यथायोग्य निर्णय घेण्यात येणार आहे. हे करीत असताना अनेकांनी सांगितले की, सुपर मार्केटमध्ये वाईन ठेवली आणि तेथे लोक गेले तर काय करतील ? मी सांगू इच्छितो की, आताही सुपर मार्केटमध्ये अंडी, मटण, चिकन, मासे विकाण्यास ठेवले जाते. जो ग्राहक शाकाहारी असतो तो त्या भागात जात नाही. त्यामुळे ज्याला कोणाला हा निर्णय अंमलात आणावयाचा असेल तर तेथे वाईन पिणारेच लोक जातील. वाईन न पिणाऱ्या लोकांनी तेथे जाण्याचे कारण नाही.

अध्यक्ष महोदय, मी अनेक वर्षापासून अनुभव घेतला आहे. एखादा अट्टल दारु पिणारा असेल तर तो कोणत्याही गावामध्ये गेला तरी त्या गावातील दारुचे दुकान शोधून काढत असतो. दारु पिणारा व्यक्ती बरोबर ते दुकान शोधून काढत असतो. ही बाब आपणासही माहित आहे. माननीय उपाध्यक्ष हे ज्या भागाचे प्रतिनिधीत्व करतात त्या भागामध्येही ही वस्तुस्थिती आहे. माझ्या म्हणण्याचा कृपया गैरसमज करु नये. जनतेला हा निर्णय नको असेल तर शासन यात जबरदस्ती करणार नाही. आम्ही याबाबत आग्रह धरणार नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस यांना मी सांगू इच्छितो की, शासनात महसूल वाढविण्यासाठी काही निर्णय घेतले जातात. परंतु त्यातून राज्यातील नागरिकांना चुकीच्या सवयी लागाव्यात, वेगळा समाज निर्माण व्हावा, अशी आपली भावना नसते. ही बाब या चर्चेच्या निमित्ताने सभागृहाने लक्षात घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, अनेकजण आपापल्या परिने भुमिका मांडण्याचे काम करीत असतात. परंतु ही भूमिका मांडत असताना काहीजण हावभाव, हातवारे करुन मोठ्या आवाजात बोलत असतात. यात वर्ष, महिने, आठवडे, दिवस, तास, मिनिट, सेकंद याचा उल्लेख करीत असतात. मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस

श्री. अजित पवार.....

यांच्याही भाषणात हे ऐकले नाही. असे भाषण करणाऱ्यांनी असाही विचार करावा की, असे भाषण करुन दिवसाला किती खर्च करतो आणि असे बोलून किती वेळ वाया जातो, याचा विचार त्या व्यक्तीने केला पाहिजे. मी कोणावरही आरोप करणार नाही. महत्त्वाच्या पदावर कोणीही काम करीत असताना तो राज्याचा मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, मंत्री म्हणून काम करीत असतो. कोणालाही वाटणार नाही की, आपण एकटेच पुढे जावे व राज्यातील जनतेने पुढे जाऊ नये. काही सन्माननीय सदस्यांच्या भाषणावरुन असे वाटले की, आम्ही सत्तेत असल्यामुळे आम्ही विदर्भाचे विरोधक आहोत, विदर्भासाठी आम्ही निधी न देणारे आहोत, अशी भावना तयार केली गेली. माननीय श्री. जयंत पाटील हे ८ ते ९ वर्षे अर्थमंत्री पदावर होते. स्व. विलासराव देशमुख राज्याचे मुख्यमंत्री असताना जायकवाडी धरणापासून बाभळी बॅरेजपर्यंत बांधण्याचे काम केले. त्यासंदर्भात मांजरा, गोदावरी, सिंधफणा या सर्व नद्यांवर बॅरेजेस काढले आहेत.

यानंतर श्री. चौधरी....

श्री.अजित पवार.....

मघाशी काही सन्माननीय सदस्य मराठवाडा वॉटर ग्रीडसंदर्भात बोलले. वास्तविक या प्रकल्पाला आमचा विरोध असण्याचे काहीही कारण नाही. मागील सरकारच्या काळात इस्त्राईलसारख्या अतिशय कमी पाऊस पडणाऱ्या देशामध्ये म्हणजे तेथे फक्त चार इंच पाऊस पडतो. परंतु त्यांनी पाईपलाईनद्वारे अनेक ठिकाणी पाणी नेलेले आहे. स्व.आप्पासाहेब पवार यांनी देखील सुरुवातीला तेथे जाऊन ड्रिप म्हणजे काय, मायक्रो स्प्रिंकलर म्हणजे काय, स्प्रिंकलर म्हणजे काय, मुळाला पाणी देणे म्हणजे काय, इत्यादी अनेक प्रयोग केले व आपल्या देशामध्ये सुधारणा झाल्याच्या आपण पाहिल्या आहेत. तशाच प्रकारे मागील सरकारच्या काळात मराठवाडा वॉटर ग्रीडच्या संदर्भात काम झाले. मराठवाडयातील लोकांना पाणी मिळाले पाहिजे ही आमची भावना नाही का ? परंतु यामध्ये आम्ही टप्प्याटप्प्याने पुढे जायचे ठरविले आहे. सुरुवातीला नाथसागरच्या जवळचे पैठण, वैजापूर हे तालुके कव्हर केले जाणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री.बबनराव लोणीकर आता या ठिकाणी उपस्थित नाहीत परंतु त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये असे काही भासवले की, या सरकारने मराठवाडयाला पूर्णपणे दुर्लक्षित केले आहे. माननीय मंत्री व माजी मुख्यमंत्री श्री.अशोकराव चव्हाण हे देखील मराठवाडयातीलच आहेत.

अध्यक्ष महोदय, मला मुख्यमंत्री पदावरुन आठवले म्हणून सांगतो. महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन ६२ वर्षे झाली आहेत. या ६२ वर्षांपैकी विदर्भ-मराठवाडयाकडे किती वर्षे मुख्यमंत्री पद होते हे मी पाहिले. मी सांगू इच्छितो की, ३२ वर्षे विदर्भ-मराठवाडयातील मुख्यमंत्र्यांनी राज्याचे नेतृत्व केले. ही नक्कीच चांगली गोष्ट आहे. मुंबई आणि कोकण मिळून १० वर्षे तर पश्चिम महाराष्ट्राने उर्वरित २० वर्षे नेतृत्व केले. दुर्दैवाने उत्तर महाराष्ट्रामधील कोणालाही राज्याचे नेतृत्व करण्याची संधी अद्याप मिळाली नाही. एका नेत्यांना ही संधी मिळण्याची शक्यता होती परंतु त्यांचीही संधी हुकली. दुसरे नेते तयार होत असताना... (अडथळा...) त्यांना तयार करण्याचे काम जोरात सुरु आहे. त्यांना संधी तेव्हाच मिळेल जेव्हा त्यांच्या समोरची व्यक्ती दिल्लीच्या राजकारणात जाईल.

श्री.अजित पवार.....

त्यावेळी त्यांना पुढच्या बाकावर बसण्याची संधी मिळेल. त्यानंतर ते विरोधी पक्षनेता म्हणून कसे बोलतात, कसे वागतात हे महाराष्ट्राला कळेल आणि त्यानंतर... उत्तर महाराष्ट्रातील मुख्यमंत्री होण्याची काहींना संधी मिळेल परंतु तसे होत असताना माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या डाव्या बाजूला बसलेल्यांना राग येईल. यातील गमतीचा भाग सोडा. माझे एवढेच म्हणणे आहे की, आम्ही विदर्भ-मराठवाडयाच्या संदर्भात भेदभाव करण्याचे काहीही कारण नाही. मी हे यापूर्वी देखील सांगितले होते व आतासुध्दा सांगत आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांचे भाषण सुरु असताना मी विधान परिषद सभागृहामध्ये होतो परंतु मी त्यांचे भाषण बारकाईने ऐकले आहे. ते अतिशय पोटतिडकीने बोलत होते. विदर्भातील मंत्र्यांकडे महत्त्वाची खाती का देत नाहीत, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. वास्तविक पाहता तसे काही नाही. आमच्या काही अडचणी आहेत. आम्हाला विदर्भामध्ये तुलनेत पाहिजे तेवढा पाठिंबा नाही. तरीही आम्ही काही लोकांना संधी दिली होती परंतु काही अडचणी आल्या हे संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. विदर्भाला प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे हे आम्हालाही मान्य आहे. ही गोष्ट खरी आहे की, मागील सरकारमध्ये माननीय श्री.देवेंद्र फडणवीस, माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार, माननीय श्री.चंद्रशेखर बावनकुळे, माननीय डॉ.संजय कुटे यांच्यासारखे विदर्भातील अनेक मोठे नेते होते. राष्ट्रवादी पक्षाची पश्चिम महाराष्ट्रामध्ये जास्त ताकद असल्यामुळे आमचा पक्ष सत्तेत येतो त्यावेळी पश्चिम महाराष्ट्राला बऱ्यापैकी प्रतिनिधीत्व मिळते. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना त्यांनीही केवळ विदर्भाला डोळयासमोर ठेऊन काम केले नाही. कोणालाही तसे वागून जमत नसते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, आज सरकारने येथून जाताना वैधानिक विकास मंडळांबाबत घोषणा करावी. दिनांक १ मे, १९९४ साली ही मंडळे अस्तित्त्वात आली. दिनांक २५.०७.२०२० रोजी मंत्रिमंडळाच्या निर्णयार्थ सादर केलेला प्रस्ताव अद्याप शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.अजित पवार.....

हा प्रस्ताव नाकारलेला देखील नाही. त्यामुळे गैरसमज करुन घेण्याचे काहीही कारण नाही. मी सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार विदर्भाला लोकसंख्येच्या प्रमाणात जो निधी मिळाला पाहिजे तो सन २०२१-२२ या वर्षात देण्यात आलेला आहे. मी या निमित्ताने सभागृहाच्या आणि मराठवाडा-विदर्भातील जनतेच्या एक गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो की, जोपर्यंत आम्हाला आपण संधी दिलेली आहे तोपर्यंत महाविकास आघाडी सरकार कुठल्याही परिस्थितीत मराठवाडा-विदर्भावर अन्याय होऊ देणार नाही. सन २०२२-२३ मध्ये राज्यपालांच्या सुत्रानुसार विदर्भाला २६ हजार कोटी रुपये द्यायला पाहिजे होता. प्रत्यक्षात आम्ही २९.५ हजार कोटी रुपये निधी दिला आहे. तसेच मराठवाडयाला २१ हजार कोटी रुपये निधी देणे आवश्यक होते त्याप्रमाणे तेवढेच देण्यात आले आहेत. उर्वरित महाराष्ट्र म्हणजे कोकण, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्राला ६६ हजार कोटी रुपये निधी देणे आवश्यक असताना त्यांना मात्र ६५ हजार कोटी रुपये देण्यात आले आहेत.

अध्यक्ष महोदय, सन २०२१-२२ मध्ये विदर्भाला २२ हजार कोटी रुपये देणे आवश्यक होते. प्रत्यक्षात सुमारे २५ हजार कोटी रुपये देण्यात आले. मराठवाडयाला १७.५ कोटी रुपये देणे आवश्यक होते त्याप्रमाणे तेवढे देण्यात आले आहेत. उर्वरित महाराष्ट्राला ५५.५ हजार कोटी रुपये देणे अपेक्षित असताना त्यांना मात्र ५३ हजार कोटी रुपये देण्यात आले आहेत. म्हणजे आम्ही वेळ पडल्यास उर्वरित महाराष्ट्राला थोडा कमी निधी दिला आहे, मराठवाडयाला आहे तेवढा दिला परंतु विदर्भाला मात्र झुकते माप देण्याचा प्रयत्न केला आहे.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाच्याकडून माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचे एक पत्र माझ्याकडे देण्यात आले आहे. परंतु या पत्रामध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस यांची स्वाक्षरीच नाही. इतर सर्वांच्या स्वाक्षऱ्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांची पहिली स्वाक्षरी, आमच्या बाजुतून तुमच्याकडे आलेले सन्माननीय सदस्य

श्री.अजित पवार.....

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांची दुसरी स्वाक्षरी, नंतर सन्माननीय सदस्य श्री.बबनराव पाचपुते व इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यातील दहा-पंधरा सन्माननीय सदस्य पूर्वी आमच्या बाजूचेच होते. मी या निवेदनासोबत जोडलेल्या स्वाक्षऱ्यांची एक गंमत दाखवितो. (माननीय उप मुख्यमंत्री स्वाक्षऱ्यांचे कागद माननीय विरोधी पक्षनेते यांच्या दिशेने दाखवून काही बाबी दर्शवितात.) सन्माननीय सदस्य श्री.गिरीश महाजन यांना मी सांगू इच्छितो की, या दोन प्रती नाहीत. मी हे फार बारकाईने पाहिले आहे... (अडथळा...) जे चुकले आहे ते चुकले आहे. आपण दोन-दोन वेळा स्वाक्षऱ्या करुन संख्या वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. हे कागद मी आपणास आता दाखवितो. यामध्ये खोटे बोलण्याचे काहीही कारण नाही. धानासाठी बोनस जाहीर करावा या मागणीचे हे निवेदन आहे. यावर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांची देखील स्वाक्षरी आहे.

अध्यक्ष महोदय, आम्ही वारंवार धानाच्या संदर्भात सांगत आहोत परंतु तरीही सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार सातत्याने आमच्यावर नाराज होत आहेत. बोनस देणार नाहीत, असे आपण सांगत आहात. आम्ही एकरी काढण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तुम्ही थोडासा धीर धरा. कधी-कधी आपण अजिबात पेशन्स ठेवत नाहीत. तुम्हाला काहींनी कसे सांभाळले असेल असा प्रश्न पडतो.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री डॉ.नितीन राऊत यांच्यासोबत आज सकाळीच माझी बैठक झाली आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना मराठवाडा-विदर्भातील विजेसाठी १२०० कोटी रुपये देण्याचे ठरले होते. याच्याशी संबंधित सर्व अधिकाऱ्यांना मी आज सकाळी बोलावून सूचना दिल्या की, दोन दिवसांच्या आत शिल्लक सर्व पैसे देऊन टाका. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्राचा देखील यामध्ये समावेश आहे. अर्थात, यामध्ये उत्तर महाराष्ट्राचा नंतर समावेश झाला होता. हा निर्णय मागील सरकारच्याच काळातील आहे. परंतु मी फाईल वाचली तेव्हा मला ही माहिती मिळाली. याकामी आम्हाला थोडा उशीर झाला आहे, हे मान्य आहे. परंतु कृपया कोणीही नाराज होऊ नये.

श्री.अजित पवार.....

ते हक्काचे व ठरलेले पैसे आहेत त्यामुळे दिले गेले पाहिजेत. वीज मंडळाचे वस्त्रोद्योगाचे, आपण आता सांगितलेले १२०० कोटी रुपये असतील किंवा ऊपसा सिंचन योजनेतील फरकाची रक्कम असेल असे सर्व पैसे देण्याचे आम्ही ठरविले आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. अजित पवार...

आम्ही तर निर्णय घेतला आहे, हे देखील मला सभागृहाच्या लक्षात आणून द्यायचे आहे. अध्यक्ष महोदय, काल माननीय विरोधी पक्षनेते यांनी आपल्या भाषणातून सारखा "घोटाळा, घोटाळा, घोटाळा,"... सारखा यावरच त्यांचा दणका चालू होता. त्या "घोटाळा" शब्दालाही वाटलं असेल की, आपलाच काही तरी घोटाळा झाला. मी देखील ते ऐकून चाट पडलो. खरं म्हणजे, आपण तसे बोलत नाही. परंतु काल मात्र तसे झाले आणि तीच री सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी ओढली. मी विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, ते फार आपल्या पावलावर पाऊल ठेऊन वागायला बघतात. आपण जसे करता तसंच, पण काही तरी वेगळ्या पध्दतीने करतात. मी सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांना सांगू इच्छितो की, आपण घोटाळा नाही तर, हे देणार नाही, हे होणार नाही, आणि तेच तुम्ही सारखे सांगत आहात.

अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, १२०० कोटी रुपये देण्याचे कबूल केले होते, ते दिले आहेत. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र ही मंडळे न करण्यामागील कारण थोडे वेगळे आहे. तो आमच्या विचाराधीन विषय आहे. अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी नोकर भरतीच्या बाबतीत एक मुद्दा सांगितला होता. तो मुद्दा मी तपासून घेतो. कारण आपण पुणे विभाग आणि विदर्भ विभागाचे उदाहरण दिले आहे. विदर्भात अधिकाऱ्यांची संख्या खूप कमी आहे. पंरतु चक्राकार पध्दतीने ते करु. आम्ही असे अजिबात होऊ देणार नाही. आधी मी सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून घेतो आणि त्यांना सांगतो की, पूर्वीची जी चक्राकार पध्दत होती, ती सुरू करावी. कारण त्यामधून विदर्भ आणि मराठवाड्यावर अन्याय होत नव्हता. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांना मी सांगू इच्छितो की, दुर्दैव असे आहे की, विदर्भ आणि मराठवाड्यातील अधिकारी या भागात आले तर ते इकडेच म्हणजे उर्वरित महाराष्ट्रात सामावून जातात. पुढे ते सेवानिवृत्तीनंतर पुण्याला किंवा मुंबईला प्राधान्य देतात. आता काही पुढाऱ्यांच्या बाबतीतही तसेच आहे. पण आपण चक्राकार पध्दतीने

श्री. अजित पवार...

करण्यासंबंधी मी स्वत: जातीने लक्ष घालीन. काल ठरल्याप्रमाणे आपल्यासमवेत नियोजन विभागाची बैठक घ्यायची ठरविले आहे. त्यावेळेस मी आपल्याला त्यासंबंधीची माहिती देईल आणि कुठल्याही परिस्थितीत विदर्भ आणि मराठवाड्यावर हे महाविकास आघाडीचे सरकार अन्याय करणार नाही. अध्यक्ष महोदय, आपण एकच गोष्ट १० वेळा सांगितली की.... म्हणजे खोटी असलेली गोष्ट १०० वेळा सांगितली की, मग ग्लोबेल्स नितीमुळे ती खरी वाटायला लागते. तसे होता कामा नये. आम्ही तुमचे वैयक्तिक काम केले आहे. चंद्रपूरच्या मेडिकल कॉलेजचे तुमचे २००-२५० कोटी रुपये देणे होते, ते सर्व पैसे दिले. तसेच दुसरे तुमच्या सैनिक स्कूलचेही पैसे दिले. तुमची कुठलीही फाईल शिल्लक ठेवलेली नाही. आपल्याकडे भेदभाव नाही. त्यामुळे तुमचे ते काम केले आहे. पण आपणही ते लक्षात ठेवावे की, पुढे कधी दिवस बदलले तर....

अध्यक्ष महोदय, माझ्यानंतर गृहमंत्री श्री. दिलीप वळसे पाटील हे देखील उत्तर देणार आहेत. परंतु जाता जाता विं. दा. करंदीकर यांची कविता परत म्हणतो.

"उंटावरचा एक शहाणा,

सोन्याच्या घालून वहाणा,

भीग मागतो दारोदारी,

म्हणतो, "सगळे कंजुष भारी"...

उंटावरचा एक शहाणा,

टावरुन शेळ्या हाकी,

आतेला म्हणतो मामी,

अन मामीला, म्हणतो काकी...

उंटावरचा एक शहाणा,

श्री. अजित पवार...

म्हणतो बांधीन, असाच वाडा...

दारामधून शिरे नं, कुत्रा...

खिडकीमधून येईल घोडा...

धन्यवाद.

असुधारित प्रत

श्री. जितेंद्र आव्हाड (गृहनिर्माण मंत्री) : अध्यक्ष महोदय, गृहमंत्र्यांचे उत्तर सुरू होण्याआधी मी गृहनिर्माण विभागाशी संबंधित काही निर्णय सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, ओनरशीप ॲक्ट ॲडॉप्ट करा, अशी आपण सूचना केली होती आणि तो करण्याचा निर्णय गृहनिर्माण विभागाने घेतला आहे. मुंबईतील कोळीवाडे आणि गावठाणांसाठी डीसीआर करण्यासाठीचा निर्णय कालच जाहीर केला आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी ठाणे येथील झोपडपट्टी व तेथील विकासाबद्दल काही सूचना केल्या होत्या. मी त्यांना सांगू इच्छितो की, तेथील सीईओची नेमणूक येत्या १५ दिवसात केली जाईल. पण आपल्या मतदार संघात असलेले पवारनगर व आजूबाजूचे सर्व कॉम्प्लेक्स जे म्हाडाचे आहेत व ते हिरानंदानी मेडोस समोर आहेत. हिरानंदानी मेडोसला शोभेल, असंच बांधकाम करुन त्याचा पुनर्विकास केला जाईल, जे आपल्या मतदार संघात आहेत. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू यांनी एक मजल्याच्या झोपड्यांचा उल्लेख केला. त्यांच्या सेन्सस घेत आणि त्यांच्या पॅचपावत्या तपासून तेथील फिजिबलीटी तपासून आणि अभ्यास करुन ती योजना अंमलात आणण्याचा आमचा विचार आहे आणि ती योजना आम्ही करु.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्य गिरणी कामगारांच्या घरांबद्दल बोलले. मला सभागृहाला सांगायचे आहे की, धानोरी, पुणे येथे गृहनिर्माण विभागाने १०० एकर जमीन विकत घेतली आहे आणि ती रेडीरेकनरच्या १० टक्के कमी दराने घेतली आहे. त्यामुळे आपण पुण्यामध्ये परवडणारी ८ हजार घरे लोकांना देऊ शकू. मी हे का बोलतो तर काल जो आमदारांच्या ३०० घरांचा निर्णय जाहीर झाला त्यावरुन पत्रकारांनी महाराष्ट्रात असे चित्र निर्माण केले की, ती घरे त्यांना फुकट दिली जातील. आतापर्यंत पत्रकारांना घरे दिली आहेत, कलावंतांना घरे दिली आहेत, मी आता इतर कोणाचे नाव घेत नाही. पण समाजाच्या सर्वच स्तरातील लोकांना घरे दिली आहेत. माथाडी कामगारांना ४० एकर जमीन जोगेश्वरीमध्ये दिली आहे. हातगाडी ओढणाऱ्या कापड दुकानांमध्ये मजुरी करणाऱ्या लोकांना, त्याला कापड

श्री. जितेंद्र आव्हाड...

बाजार म्हणतात. श्री.पवार साहेबांनी त्यांना २७ एकर जमीन दिली होती. तेथे आजही ९०० लोक राहतात. त्यांच्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव पास झालेला आहे. त्यामुळे मुंबईमध्ये जवळपास १२०० प्लॉट वाटले गेले आणि ते अगदी गरीबातल्या गरीबांपासून ते आयपीएस, आयएएस अधिकाऱ्यांपर्यंत आणि आमदारांपर्यंत दिले.

अध्यक्ष महोदय, विधान परिषदेमध्ये वरळी येथील सुखदा वगैरे ज्या ३ इमारती आहेत. त्यांचा आता पुनर्विकास करायची वेळ आली आहे. त्या इमारतींना ३५ वर्षे झाली आहेत. आता आपण त्या इमारतींच्या पुनर्विकासाला मान्यता देत आहोत. दुसरे म्हणजे एसआरएच्या परिशिष्ट-२ मध्ये प्रचंड भ्रष्टाचार होतो, असे कायम बोलले जाते. आता ते सर्व ॲटो करणार आहोत. त्यामध्ये आता आपण मानवी संपर्क ठेवणार नाही. म्हणजे ते जे ॲडज्यूडिकेशन करावे लागते आणि प्रत्येक ठिकाणी मग उपजिल्हाधिकारी आणि त्यानंतर अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे अपिल करत बसा आणि प्रत्येक ठिकाणी २-२, ४-४ लाख रुपये द्या, हे आता होणार नाही. ॲटो डीसीआर आणि ॲटो एनेक्शचर करुन आपण एसआरएमध्ये दाखल झालेली फाईल १ महिन्यात क्लीअर करु. कोणालाही तेथे आडकाठी येणार नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी कुलाबा येथील झोपडपट्टीबद्दल माहिती दिली. त्याबाबत मी आता जाहीर करतो की, कुलाबा येथील सर्व झोपडपट्ट्यांचे यापूर्वी दिलेले सर्व एल.ओ.आय. आम्ही आता रद्द करीत आहोत. त्या ठिकाणी गेली १५-१५ वर्षे कोणीही काहीच काम केलेले नाही. त्या झोपडपट्टीच्या योजना आता एसआरए आणि म्हाडा एकत्रित मिळून करेल. त्याचबरोबर ५ वर्षे म्हाडामध्ये आणि एसआरएमध्ये ज्यांनी फक्त एल.ओ.आय. घेऊन ठेवले आणि काहीही काम केले नाही त्या सर्व ५ वर्षांचे एल.ओ.आय. आम्ही आजपासून रद्द ठरवित आहोत.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. दीपक चव्हाण)

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कालीदास कोळंबकर यांनी असा विषय मांडला की, नायगाव येथील बीडीडी चाळीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर राहिले होते. आपण सुद्धा तिथे जाऊन आले आहेत. त्यामुळे त्या चाळीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे, असा विषय सन्माननीय सदस्य श्री. कालीदास कोळंबकर यांनी मांडला आहे. मला वाटते की,आपण याचा जरुर विचार करावा.

डॉ. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कालीदास कोळंबकर यांचा सन्मान करीत मी एवढेच सांगतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्व जीवन बीआयटी चाळीमध्ये गेले आणि ते खऱ्या अर्थाने तिथेच ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर झाले आहेत. तिथे त्यांना सयाजीराव गायकवाड तसेच शाहु महाराज भेटायला गेले. तिथूनच ते कोलंबिया, लंडन येथे गेले आणि तिथूनच त्यांनी प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र काढले. याच्या नंतर त्यांनी सन १९३४ साली हिंदू कॉलनीमध्ये घर घेतले आणि त्या घराचे नाव 'राजगुरु' होते. सन्माननीय सदस्य श्री. कालीदास कोळंबकर यांच्या व्यथा दु:ख मला कळलेले आहे. मी नक्की त्याचा विचार करेल.

श्री. कालीदास कोळंबकर : अध्यक्ष महोदय, माननीय श्री. शरद पवार यांच्या बाबतीत मी आदरातिथ्य आहे, त्यांच्याबाबत मला सहानुभूती आहे आणि महाराष्ट्राचे राजकीय व्यासपीठ माननीय श्री. शरद पवार आहेत. त्यांच्याबाबत आमचा काही विरोध नाही. पण हे ह्यात आहेत. जे ह्यात नाही त्यांची नावे या चाळीला देण्यात यावी या मताचा मी आहे. माझे हे वैयक्तिक मत आहे.

डॉ. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, या देशामध्ये कित्येक लोकांची मंदिरे झाले आहेत. एवढेच मी सांगतो. त्यामुळे ह्यात असणे किंवा नसणे असे काही नाही. त्या आमच्या भावना आहेत.

श्री. दिलीप वळसे-पाटील (गृह मंत्री) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा नियम २९२ अन्वये माननीय विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहामध्ये मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर मी उत्तर देण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्या सर्वांचा मी आभारी आहे. तसे पाहिले तर या अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये गृह विभागाचा भाग अतिशय छोटा आहे. या विषयामध्ये कायदा आणि सुव्यवस्था, बॉम्ब स्फोटातील आरोपींचा संबंध, श्री. सचिन वाझे आणि अँटेलिया इमारतीमुळे पोलिसांच्या प्रतिमेला गेलेला तडा, सोलापूर येथे उप निरिक्षकच वरिष्ठांतर्फे वसुली करीत असल्याची माहिती आणि स्टिंग ऑपरेशन असे तीन ते चार विषय आहेत. या व्यतिरिक्त या प्रस्तावामध्ये कशाचा उल्लेख नाही. परंतु अनेक सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात चर्चेमध्ये सहभाग घेतलेला आहे.

अध्यक्ष महोदय, कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात मी मागे देखील उल्लेख केला होता की, गेले दोन वर्ष कोविडची परिस्थिती, सतत कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षाकडून केली जाणारी आंदोलने त्याचबरोबर राज्यामध्ये होत असलेल्या वेगवेगळ्या प्रकरणातून पोलिसांची प्रतिमा बदनाम करण्याचा प्रयत्न आणि सरकारला देखील बदनाम करण्याचा प्रयत्न हे सर्व सुरु आहे. मी आपल्याला एवढेच सांगतो की, आपण देशाच्या पातळीवर पाहिले तर आपले राज्याचा दाखल गुन्ह्याच्या संदर्भात चौथा क्रमांक असला तरी लोकसंख्येच्या तुलनेत तेविसावा क्रमांक आहे. तसेच विनयभंगाच्या दाखल गुन्ह्यामध्ये महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक असला तरी देखील लोकसंख्येच्या तुलनेत दहावा क्रमांक आहे आणि सायबर गुन्ह्यामध्ये लोकसंख्येच्या तुलनेत तिसरा क्रमांक आहे.

अध्यक्ष महोदय, पोलीस नेहमीच आपले काम करीत असतात. कायदा आणि सुव्यवस्था राखत असताना प्रतिबंधक, एमपीडीएच्या, महाराष्ट्र पोलीस नियम आणि भारतीय हत्यार कायद्या या सर्वांच्या माध्यमातून केलेल्या सर्व कारवाया पोलिसांच्या माध्यमातून होत असतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या राज्यामध्ये एकूण गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण जास्त असून दोषसिद्धीचे प्रमाण सुद्धा जास्त आहे. पण दुर्दैवाने असे

श्री. दिलीप वळसे-पाटील....

होते की, आपण सर्वजण सातत्याने पोलिसांवर आरोप करुन मिडियाच्या किंवा सभागृहाच्या माध्यमातून सरकारला बदनाम करण्याच्या नादात आपणच पोलिसांना बदनाम करायला निघालो आहोत. आपणच सरकारसोबत राज्याला बदनाम करायला निघालो आहोत. माझी आपल्या सर्वांना विनंती आहे की, एखादा प्रश्न असेल तर त्या संदर्भात जरुर माहिती घ्या आणि त्याबाबत मग बोला.

अध्यक्ष महोदय, श्री. नवाब मलिक यांच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री बोलले. पण दाऊद इब्राहीम म्हणजेच सगळे असे एक वातावरण तयार करण्यात आले. त्यांना आपण मंत्रिमंडळामध्ये ठेवले म्हणजे फार मोठा गुन्हा केला. श्री. नवाब मलिक हे काय करीत होते तर ते केंद्र सरकारने घेतलेल्या चुकीच्या निर्णयाच्या संदर्भात ठामपणे बाजू मांडण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु आज त्यांच्या बदनामीचे षडयंत्र रचून त्यांच्यावर जी कारवाई करण्यात आलेली आहे. त्याबाबत उद्या न्यायालयात काय होईल हा वेगळा प्रश्न आहे. पण मागच्या वेळेला सुद्धा सांगितले होते की, जो माणूस महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये ५ वेळा निवडून आला. एवढे वर्ष झाले तुमचे सरकार केंद्रात आणि राज्या मध्येही होते परंतु त्या वेळेला आपल्याला दाऊदचा काही संबंध दिसला नाही. आता सारखे दाऊद, दाऊद करुन धोपटण्या घालायच्या. या पूर्व काळात सुद्धा आपण हाच कार्यक्रम केलेला आहे. या बदनामीच्या राजकारणातून निश्चितपणे आपल्याला काही लाभ मिळत आहे असे वाटत असेल. परंतु आपल्याला याचा काही फार फायदा होणार नाही. माझी १०० टक्के खात्री आहे की, या सर्व प्रकरणातून श्री. नवाब मलिक सुखरुपपणे आणि निर्दोषपणे बाहेर येतील. मग आपल्या सर्वांचे आरोप शिल्लक राहणार नाहीत.

अध्यक्ष महोदय, श्री. सचिन वाझे आणि अँटेलियाच्या प्रकरणामुळे पोलिसांच्या प्रतिमेला मोठया प्रमाणात गेलेला तडा हा एक पुढचा एक मुद्दा उपस्थित

श्री. दिलीप वळसे-पाटील....

करण्यात आला. पोलिसांच्या प्रतिमेला कसा तडा गेला, अँटेलियाची केस काय झाली याची चौकशी राज्याच्या एटीएसने सुरु केली. श्री. मनसुख हिरेन यांचा खून झाला. मग एटीएस खऱ्या आरोपीपर्यंत पोहोचत होती.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री.दिलीपराव वळसे –पाटील...

खरे आरोपी पुढे येत होते. त्याच वेळेला हा गुन्हा एनआयए यांनी हा गुन्हा तपासाकरिता आपल्या कउे घेतला. आज एनआयए काय तपास करीत आहे हे आम्ळाला माहीत नाही. या पूर्व काळात असे कधीही नव्हते. आता आयकर विभागाची धाडपडली तरी याि वभागाकडून प्रेस स्टेटमेंट काढली जाते. इडी विभागाची धाड पडली ती या विभागाकडून प्रेस स्टेटमेंट काढली जाते. या पूर्व काळात कोणी काही चुकीचे करीत असेल तर त्याच्यावर ज्या कारवाया होतात त्यावेळी एवढया मोठया प्रमाणात प्रसिध्दी केली जात नव्हती. मात्र आता काही ठराविक उद्देश ठेवून सत्तारुढ पक्षाच्या किंवा विरोधी पक्ष्ज्ञाच्या लोकांना बदनाम करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केला जात आहे असे माझे म्हणणे आहे. ज्यावेळी ही घटना घडली तेव्हा एटीएसने ताबडतोब पोलीस शिपाई श्री. विनायक शिंदे व नरेश गोर यांना अटक केली. या नंतर वाझे, हिरेन यांच्या ....हिरेन गेला. वाझेला संशय कोणाचा. आज तोच वाझे तुरुंगामधून राज्याच्या मंत्री महोदयांच्या विरोधात आरोप करतो. ज्यांनी या सर्व प्रकरणात लीड घेतला ते आज निर्धास्तपणे बाहेर फिरत आहेत. मी आपल्याला एवढेच सांगतो. अशा प्रकारच्या या प्रकरणामुळे जरुर पोलीस दलाची प्रतिमा बिघडण्यासाठी मदत होते. मात्र पोलीस दलाची प्रतिमा बिघडू नये या करिता मी विश्वास देऊ इच्छितो की, आपले नाव लौकिक वाढवण्याचा प्रयत्न आपण निश्चितपणे करु. या राज्यात जे चुकीचे असेल ते चुकीचे व खरे असेल ते खरे ठरवले जाईल.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्ष नेते महोदयांनी आपल्या भाषणात एका डीसीपीच्या वसुली प्रकरणासंबंधी सांगितले. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, राज्यातील पोलीस अधिकारी केंद्रीय यंत्रणांना बदनाम करण्यासाठी केंद्रीय यंत्रणांच्या माध्यमातून त्यांच्या नावाने पैसे उकळण्याचे काम करीत आहेत. मी आपल्याला एवढेच सांगतो. हे साधे सरळ प्रकरण आहे. परवा असं सांगितले. या बाबत मी थोडक्यात उत्तर दिले. त्याचा अर्थ असा नाही की, आपण जे म्हटले ते मी मान्य केले.जेव्हा ही घटना पुढे आली तेव्हा मुमंबई पोलिसांनीच पुढाकार घेतला व

ताबडतोबीने सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. नितीन कदम , पोलीस उपनिरीक्षक समाधान जमदाडे व पोलीस निरीक्षक श्री. ओंघाटे यांना १०.३.२२ रोजी अटक केली. तिन्ही आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. तसेच आरोपी क्र. ४, पप्पुकुमार प्यारेलाल गौण यास उत्तर प्रदेशमध्ये स्थानिक पोलिसांच्य मार्फत ताब्यात घेऊन दि. १७.३.२२ रोजी अटककरण्यात आली. सायंकाळी त्याचा **ट्रान्झिट रिमांड** मंजूर होऊन न्यायालयामध्ये हजर केले असता दि. २८.३.२२ पर्यंत कोठडी दिली आहे. ज्या एका आयपीएस अधिकाऱ्याचे नाव पुढे आले. सरकारने मागे पुढे पाहिले नाही. चुकीच्या पद्धतीने अंगडिया यांच्याकडून वसुली केली जात असेल तर वरिष्ठ अधिकारी असेल तरी त्यांची गय केली जाणार नाही. सौरभ त्रिपाठी यांना सरकारने निलंबित केले असून आज त्यांना फरार घोषित केले आहे. ते अजून उपलब्ध झालेले नाहीत. त्यांना शोधण्याचा प्रयत्न सरकार जरुर करीत आहेत.

अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष

अध्यक्ष महोदय, मला आपण सांगावे. केंद्रीय एजन्सीला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे असे सांगितले जाते. आता बदनामीसाठी आणखी काही शिल्लक राहिले आहे काय ? (अडथळा) आपण बसून बोलू नका. मी सर्वांचे ऐकतो. आता सोलापूरच्या संबंधी या ठिकाणी चर्चा झाली. पोलीस उपनिरीक्षकच वरिष्ठांतर्फे वसुली करीत असल्याचे माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी केलेल्या स्टींग ऑपरेशनमध्ये उघड झाले. या सर्वांमुळे पोलिसांच्या प्रतिमेला तडा गेला. या बाबत वस्तुस्थिती काय आहे. हवालदार अजय देवराम पाडवी, बक्कल क्र. ६३ यांच्याशी निगडित हे प्रकरण आहे. त्यांचे काही अवैध व्यवसायाशी निगडित असलेल्या लोकांशी संभाषण झाले. पोलीस हवालदार यांचे हे संभाषण पोलीस खात्याच्या शिस्तीशी विपरित असल्यामुळे त्यांच्या बेशिस्त वर्तनाबद्दल त्यांना २२.३.२२ पासून निलंबित करण्यात आले असून त्यांची चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. माननीय विरोधी पक्ष्ज्ञ नेते मी आपल्याला विनंती करेन. आपण या पुढील काळात अशी प्रकरणे मांडण्यापूर्वी खात्री करावी की, नक्की दुसऱ्या बाजुला कोण उभा आहे. मी आपल्याला सांगतो. या मधील स्टींग ऑपरेशन करणारा, माहितीचा अधिकार

कार्यकर्ता जो आहे,त्याच्यावर ५ गुन्हे दाखल आहेत. सन २००३,सन २००९, सन २०१२,सन २०१३, सन २०१५, सराईत ॲक्टीव्हिस्ट व सराईतपणे अशा गोष्टी करुन पोलीस दलाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये आणखी दोन नावे आहेत. रहुफ फजूल रेहमान भंडाले, राजकुमान पांडुरंग नरोटे यांच्या विरुध्द.. भंडाले यांच्या विरुध्द दोन गुन्हे आहेत. नरोटे यांच्या विरुध्द ४ गुन्हे आहेत. ३ व्यक्ती स्टींग ऑपरेशनमध्ये आली. बेकायदेशीर धंदे करायचे किंवा त्यास पाठिंबा द्या असे सांगायचे. यंत्रणा आपल्या बाजूने आली नाही की, मग लगेच स्टींग ऑपरेशन करायचे. ते आपल्यापर्यंत पोहचवायचे. आपण तरी खात्री केल्या शिवाय या पुढील काळात मांडण्याचा प्रयत्न करु नका.

अध्यक्ष महोदय, धुळ्याच्या संबंधी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला. धुळे येथे एक गुन्हा दाखल झाला. एका अधिकाऱ्याने खंडणी घेतली, दुसऱ्याने त्यातील वाटा मागितला व तो पकडला गेला. याची तक्रार दाखल आहे. आरोपीला अटक केलेली आहे. आपण जे प्रकरण सांगितले त्या प्रकरणाचा ट्रॅप पोलिसांनी लावला व पोलिसांनी त्याला पकडले. यामुळे एखादा व्यक्ती जर चुकला म्हणजे संपूर्ण पोलीस दल चुकले किंवा संपूर्ण पोलीस दलाची बदनामी केली पाहिजे असे होत नाही.

अध्यक्ष महोदय, बार्शीचे आमदार माननीय श्री. राजेंद्र राऊत यांना आपण सांगितले की, त्यांना टार्गेट केले जात आहे. आमदार हे या विधानसभा सदनाचे सदस्य आहेत. जनतेचे प्रतिनिधी आहेत. त्यांचा मान सन्मान राहिला पाहिजे, हे १०० टक्के सर्वांना मान्य आहे. परंतु या केसमध्ये माननीय राज्यमंत्री श्री. शंभूराजे देसाई यांनी बैठक घेतली. त्यावेळी या बैठकीत बहुतेक लोकप्रतिनिधी यांनी अवैध धंद्याच्या संदर्भात केलेल्या कारवाईच्या संबंधी प्रतिक्रिया नोंदवली. .

श्री.दिलीपराव वळसे-पाटील ...

आपण माहिती घ्या. आपण पोलीस विभाग सांभाळलेला आहे. सोलापूरच्या एस.पी. एक महिला आहेत व त्या धाडसाने त्या ठिकाणी काम करीत आहेत. परंतु, अशा प्रकारच्या सर्व गोष्टींचा सामना त्या अश्विनी सातपुते यांना करावा लागतो, मग त्यातून हे सर्व त्या ठिकाणी सुरु होते. मी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, बार्शी शहरामध्ये पोलीस स्टेशनने सन २०२१ मध्ये दारुबंदीच्या १६१, जुगाराच्या ६०, अवैध गुटखा विक्रीच्या ७ केसेस दाखल केलेल्या आहेत. गतवर्षीच्या तुलनेत सदर केसेसमध्ये वाढ झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, एका बाजूला आपण अधिकाऱ्यांना सांगायचे की, कायदा व सुव्यवस्था राहिली पाहिजे, अवैध धंदे बंद झाले पाहिजेत, वाळूची तस्करी बंद झाली पाहिजे. या सर्व गोष्टी झाल्या पाहिजेत आणि दुसऱ्या बाजूला जर आम्ही आमच्या मर्जीप्रमाणे त्या ठिकाणी सर्व करा असे म्हणायला लागलो तर, मला असे वाटते की, आपण सर्वांनी पुन्हा एकदा त्यावर विचार करण्याची वेळ आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, मी स्वत: यामध्ये लक्ष घालेन. आमदार महोदय व त्यांच्या कुटुंबीयांसमवेत बोलेन. त्यातून काय मार्ग काढायचा तो आपण काढू. परंतु, चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही. त्यांच्या पाठीशी मी राज्याचा गृह मंत्री म्हणून भक्कमपणाने उभा राहीन, एवढेच या निमित्ताने सांगतो.

अध्यक्ष महोदय, नाशिकच्या दादोजी कोंडदेव नगरमध्ये पोलीस स्टेशनमध्ये दारुची पार्टी करणारे फरार झाले असे आपण सांगितले. सदर प्रकरणाची संपूर्ण चौकशी पोलीस आयुक्त विभाग २, नाशिक यांनी केली असून कसूरदार चारही पोलीस अंमलदारांना तत्काळ निलंबित करण्यात आलेले आहे आणि त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी आदेशित करण्यात आलेली आहे. पोलीस अधिकारी शिस्त मोडून पोलीस स्टेशनमध्ये बसून पार्टी करणार असतील तर, पोलिसांनी देखील कोणालाही पाठीशी न घालता ताबडतोबीने कारवाई केलेली आहे.

श्री.दिलीपराव वळसे-पाटील ...

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.अजित पवार यांचा फोन नंबर फोर्ज करुन २० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याबाबत सांगितले गेले. हे एक नवीन ॲप आलेले आहे. त्याला फेक कॉल ॲप असे म्हणतात. ते डाऊनलोड केले की, येथून येथे जरी फोन केला तरी, तो फोन दुबईवरुन आला, दाऊदच्या नंबरवरुन आला, आणखी कोणाच्या नंबरवरुन आला असे सहज करता येते. आता जसजशी टेक्नॉलॉजी पुढे जाईल, जसजशा या गोष्टी पुढे जातील तसतसा या गोष्टींचा वापर करुन आपल्याला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जाईल. या संदर्भात देखील गुन्हा दाखल करुन त्याच दिवशी या प्रकरणातील सहाच्या सहा आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, पुण्यातील माथाडी कामगारांच्या बाबतीत आपण बोललात. ही वस्तुस्थिती आहे की, माथाडी कामगारांमध्ये थोडेसे वाद आहेत. काही फेक माथाडी कामगार आहेत. काही खरे माथाडी कामगार आहेत. शेवटी याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. ज्या क्षेत्रामध्ये माथाडी कायदा लागू आहे, तेथे माथाडी कामगारांनी जरुर काम करावे. परंतु, आज औद्योगिक क्षेत्रामध्ये देखील ज्यावेळेस असा सर्व प्रकार घडतो तेव्हा उद्योग क्षेत्रातील लोक आज अस्वस्थ झालेले आहेत. यातून आता मोठमोठ्या टोळ्या तयार होऊन त्या उद्योगांना अडचणीत आणण्याचे काम करीत आहेत.

अध्यक्ष महोदय, श्री. रघुनाथ कुचिक यांच्याबद्दल आपण बोललात. त्यांच्यावर बलात्काराचा आरोप झाला. मी ही घटना कधी घडली याबाबतची माहिती विचारली. जो गुन्हा दाखल आहे त्यामध्ये दि. ६.११.२०२० पासून ते दि.१०.२.२०२२ पर्यंत असे नमूद केलेले आहे. ही घटना कधी घडली, तर दि.६.११.२०२० पासून ते दि.१०.२.२०२२ पर्यंत. मला कोणाला दोष द्यायचा नाही परंतु, एवढा कालावधी तुम्ही एकत्र राहणार असाल, तुम्ही गोव्याला जाणार असाल, हॉटेलमध्ये राहणार असाल आणि मग एखाद्या दिवशी तुमचे काही बिघडले की, लगेच अशा प्रकारची तक्रार दिली जाते. परंतु, मी सांगतो की, त्या महिलेची तक्रार घेऊन श्री.कुचिक यांच्यावर गुन्हा देखील दाखल केला. त्यांना न्यायालयाने अटकपूर्व

श्री.दिलीपराव वळसे-पाटील ...

जामीन दिलेला आहे, त्यामुळे त्यांना आज अटक होऊ शकली नाही. विरारचा जितू खाडे महिलांना अश्लिल फोन करतो, त्याच्यावर देखील गुन्हा दाखल केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, साक्री, धुळे येथे डीजे लावून होळी साजरी केली. अजानच्या वेळेस डीजे बंद करण्यास सांगितले. दगडफेक सुरु झाली. तलवारीचा हल्ला झाला. पोलिसांनी दोघांच्या तक्रारी घेतल्या. हल्ला केलेल्याला तत्काळ सोडले. ज्याच्यावर हल्ला झाला त्याला अटक केली, असे सांगितले गेले. या घटनेकडे आपण एका वेगळ्या दृष्टीने पाहू. मी आपल्याला सांगू इच्छितो की, केवळ धुळे येथेच अशी घटना घडलेली नाही. आज गावागावांमध्ये याच पध्दतीने एका बाजूला नमाज, अजान सुरु झाला की, दुसऱ्या बाजूला आरती सुरु होते. डेसीबलचा आवाज किती वाढवायचा, पोलिसांनी घालून दिलेली कुठली बंधने पाळायची नाहीत. माझ्यासारख्याला चिंता याची आहे की, यातून समाजामध्ये खऱ्या अर्थाने जर विघटन होणार असेल व ध्रुवीकरणाच्या नादामध्ये जर अशा प्रकारे घटना घडणार असतील, तर आपल्याला अशा घटना दिवसेंदिवस आणखी ..... करायला पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, ॲड.प्रवीण चव्हाण यांचा विषय आपण उपस्थित केला. ॲड.प्रवीण चव्हाण यांना विशेष सरकारी वकील म्हणून नेमले. जवळजवळ २० केसेसमध्ये त्यांना सरकारी वकील म्हणून नेमलेले आहे. परंतु, मी आपल्याला सांगू इच्छितो की, २० केसेसमध्ये जरी त्यांना सरकारी वकील म्हणून नेमलेले असले तरी, यातील अनेक केसेस आपल्या काळातील असून तेव्हा त्यांना सरकारी वकील म्हणून नेमलेले आहे. .... जवळजवळ ५ ते ६ केसेस तुमच्या काळातील आहेत. आम्ही त्याबाबत विचार करीत आहेत. आम्ही त्यांचा राजीनामा घेतलेला नाही. त्यांनी एका केसमध्ये स्वत:हून राजीनामा पाठवलेला आहे. आपले असे म्हणणे आहे की, सी.आय.डी. त्याची चौकशी करीत असेल तर, त्याला सी.आय.डी. चा वकील म्हणून राहता येईल की नाही, याचा जरुर विचार करु.... चांगले वकील आहेत. मला असे वाटले की, आपण त्यांना पहिले नेमले मग आम्ही त्यांनाच कंटिन्यू केले.

श्री.दिलीपराव वळसे-पाटील ...

अध्यक्ष महोदय, सिम्बॉयसीसच्या ॲडमिशनच्या संदर्भामध्ये एक भूमिका आपण या ठिकाणी मांडली. त्यामध्ये आपण आरोप केला किंवा आपण आपले म्हणणे मांडताना हे कुठे तरी मोठे टेररशी संबंधित किंवा टेरर फंडशी संबंधित प्रकरण आहे, यामध्ये कोणी तरी सांगितले म्हणून दबाव टाकून तपास स्लो केलेला आहे, असे सांगितले. मी विश्वासाने सांगतो की, यामध्ये कोणी दबाव टाकण्याचा प्रश्न नाही. याबाबतची चौकशी सुरु आहे. परंतु, ए.टी.एस.ची स्थापना केल्यानंतर वर्षभरामध्ये जेव्हा हाती काही आले नाही तेव्हा या प्रकरणाची चौकशी आपल्याला चांगली करावी लागेल. आपण नेहमीप्रमाणे सांगितले की, ही चौकशी सी.बी.आय.कडे द्या. परंतु, सी.बी.आय. तरी किती केसेस घेणार, किती केसेसचे काम करणार व किती वर्षांनी त्याचा निर्णय लावणार?

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.दिलीप वळसे-पाटील...

या प्रकरणाचा तपास एटीएसकडे देण्याचा निर्णय मी घेत आहे. एटीएसच्या तपासाच्या माध्यमातून दहशतवाद किंवा अन्य काही बाबी समोर आल्यास त्यासंदर्भात कारवाई करण्यात येईल. माझ्याकडे या प्रकरणाची सर्व माहिती आहे. ती मी सांगणार नाही. कारण तपासातील काही गोष्टी उघड करणे उचित होणार नाही.

अध्यक्ष महोदय, श्री.इसाक बागवान यांच्या संदर्भात काल मुद्दा मांडण्यात आला होता. त्यासंदर्भातील एक पेन ड्राईव्ह मला देण्यात आला आहे. मी त्यामधील माहिती अद्याप पाहिली नाही. परंतु हा एक कौटुंबिक मामला आहे. यामध्ये सन २००९ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या अल्पसंख्यांक समाजातील पोलीस अधिकाऱ्याला सन २०२२ मध्ये आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यात येत आहे. त्याच्या संपत्ती हस्तांतरीत प्रकरणाची मी सविस्तर माहिती घेईन व योग्य तो निर्णय घेईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमित साटम यांनी काल-परवा आयपीएलच्या संदर्भात मुद्दा मांडला होता. कोणी तरी रेकी केली आहे व मुंबईत होणाऱ्या आयपीएल मॅचला धोका आहे, अशी बातमी सोशल मिडिया व अनेक वृत्तवाहिन्यांवर फिरत होती. या संदर्भात एका उप पोलीस अधीक्षक यांनी पत्रक काढले होते व त्यामध्ये काळजी घेण्याच्या दृष्टीकोनातून सूचना दिल्या होत्या. त्याचा अर्थ असा काढला की, कोणी तरी रेकी केली आहे व काही तरी धोका पोहोचवणार आहे. अशा प्रकारची कोणतीही घटना घडलेली नाही. मुंबईमध्ये सदरहू मॅचेस् व्यवस्थितपणे पार पाडल्या जातील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी श्रीमती स्वप्ना पाटकर यांच्या संदर्भात मुद्दा मांडला आहे. दिनांक २९ जून, २०१३ रोजी दोन अज्ञात इसमांनी फिर्यादीच्या घराजवळ लोखंडी रॉडने चार चाकी वाहनावर हल्ला केला. यासंदर्भात श्रीमती स्वप्ना पाटकर यांनी तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला होता. दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी या गुन्ह्याचे "अ" वर्गीकरण करण्यात आले. या गुन्ह्यात काही आढळून आले नाही. दिनांक १८ नोव्हेंबर, २०१८ रोजी माननीय न्यायालयाने अधिक तपास करण्याचे आदेश दिले. या गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील...

सन्माननीय सदस्य यांनी सांगितले आहे की, श्रीमती स्वप्ना पाटकर या महिलेच्या जीवाला धोका आहे, त्यांना आवश्यकता असेल तर संरक्षण देण्यात यावे. सदरहू महिलेस दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ पासून नमूद महिला यांना १+१ पोलीस संरक्षण होते. दरम्यान उक्त महिलेच्या विरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर माहे जुलै, २०२१ मध्ये महिला जामिनावर बाहेर आली. तेव्हापासून तिने पोलीस संरक्षण नाकारलेले आहे. आपण ज्यावेळी एखादी बाजू मांडतो त्यावेळी त्यास दुसरी बाजू असू शकते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अबु आझमी यांनी दोन मुद्दे मांडले आहेत. त्यामधील अंबानीच्या घराबाहेर जिलेटीनच्या मुद्याच्या संदर्भात राष्ट्रीय तपास यंत्रणा तपास करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मालेगाव ब्लास्ट संदर्भात चर्चा करण्यात आली आहे. माननीय विरोधी पक्ष नेता यांना मी सांगू इच्छितो की, सदरहू प्रकरण त्यावेळी राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपविण्यात आले आहे. यासंदर्भात आज न्यायालयामध्ये सुनावणी सुरु आहे. आजपर्यंत या प्रकरणातील १९ साक्षीदार होस्टाईल झाले आहेत. या प्रकरणाची चर्चा करावयाची झाल्यास खूप वेळ लागेल. मला एक सांगावयाचे आहे की, सदरहू प्रकरणातील साक्षीदार होस्टाईल होत असल्याने राज्याच्या एटीएसने वकील देण्याचा प्रयत्न केला पण त्यास राष्ट्रीय तपास यंत्रणेने नकार दिला. आता या प्रकरणातील एक एक साक्षीदार होस्टाईल होत असेल तर या प्रकरणाच्या न्यायाच्या संदर्भात काळजी वाटते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितेश राणे यांनी सांगितले की, नायब तहसिलदार, नांदेड यांनी एक निवेदन स्वीकारले आहे. त्यामधील मागणीनुसार रजा अकॅडमीवर बंदी का घालण्यात येत नाही ? असा मुद्दा उपस्थित केला आहे. रजा अकॅडमीच्या कारवायातून वेगवेगळ्या घटना घडल्या या मुद्याच्या संदर्भात अभ्यास करण्यात येत आहे, असे मी यापूर्वी सभागृहामध्ये सांगितले आहे. या प्रकरणाच्या

श्री.दिलीप वळसे-पाटील...

अभ्यासातून निष्कर्ष समोर आल्यानंतर केंद्र सरकारला उक्त संस्थेवर बंदी घालण्याचा प्रस्ताव पाठविण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितेश राणे यांनी मुद्दा मांडला की, दिशा सालियान प्रकरणात पत्रकार परिषद घेतली म्हणून आमच्या विरुध्द केस दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणात काय झाले, कसे झाले, याच्या खोलात मी जाणार नाही. मी एवढेच सांगू इच्छितो की, या प्रकरणात माननीय केंद्रीय मंत्री श्री.नारायण राणे यांचा जबाब झाल्यानंतर पोलिसांनी घरी जाण्यास सांगितले होते. परंतु त्यांनी सांगितले की, सर्व कार्यवाही झाल्याशिवाय मी घरी जाणार नाही. त्या कार्यवाहीस वेळ लागला. त्यानंतर त्यांना पोलीस स्टेशनमध्ये खूप वेळ थांबवून ठेवल्याचे सांगण्यात आले. आपण सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या जबाबदार लोकांनी वागताना, बोलताना काही भान पाळले पाहिजे. आपल्या मनाला येईल ते बोलायचे, राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांच्या कानफाडामध्ये मारण्याची भाषा करावयाची, यातून द्वेष निर्माण होईल, दुसरे काही निर्माण होणार नाही. माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य तरुण आहेत, त्यांना पुढे भविष्य आहे, त्यांनी या पुढील काळात विरोध करावयाचा असेल जरुर करावा, चुका असतील जरुर दाखवाव्यात परंतु सार्वजनिक जीवनात बोलताना भान ठेवावे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी ठाणे येथील हुक्का पार्लरच्या संदर्भातील पेन ड्राईव्ह दिला होता त्यासंदर्भात मी सूचना दिल्या आहेत. अजूनही बऱ्याच ठिकाणी असे प्रकार सुरु असतात. अशा प्रकरणी भूमिका घेण्याची वेळ आहे की, ज्या क्षेत्रामध्ये सदरहू प्रकारचे अवैध धंदे सुरु असतील त्या क्षेत्रातील घटक प्रमुखाला जबाबदार धरुन कारवाई केली पाहिजे. आपण अशा पद्धतीने कारवाई करु शकलो तर यासर्व गोष्टी आटोक्यात येतील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी ठाणे येथील एका ॲक्टीव्हीस्टची हत्या झाल्याचे सांगितले आहे. सदरहू हत्या सन २०२० मध्ये झाली होती व त्यासंदर्भात राबोडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर आहे. सदर गुन्ह्याचा

श्री.दिलीप वळसे-पाटील...

तपास गुन्हे शाखेमार्फत करण्यात येत आहे. यामध्ये दोन आरोपिंना अटक करण्यात आली आहे व एका आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी श्री.इक्बाल कासकरच्या संदर्भात मुद्दा मांडला आहे. सदरहू प्रकरणामध्ये कासारवडवली येथे एक व नगर पोलीस स्टेशन येथे एक असे एकूण दोन गुन्हे दाखल झाले आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी डान्स व हुक्का पार्लरच्या संदर्भात व उलवे येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन, याबाबत मुद्दे मांडले आहेत. उलवेचा होणारा विकास व भविष्य काळातील गरज लक्षात घेऊन पोलीस स्टेशनची आवश्यकता असेल तर जरुर मान्यता देण्यात येईल.

अध्यक्ष महोदय,सन्माननीय सदस्य श्री.कालिदास कोळंबकर यांनी पोलिसांच्या १ लाख घरांच्या संदर्भात मुद्दा मांडला आहे. पोलिसांकडून चांगली सेवा घेण्याच्या दृष्टीकोनातून पोलीस वेलफेअरमध्ये आवश्यक सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे मी प्रस्तावाच्या उत्तरात यापूर्वीच सांगितले आहे.

यानंतर श्री.तेलंग...

श्री.दिलीपराव वळसे-पाटील.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या प्रा.देवयानी फरांदे यांनी नाशिक येथील पीव्हीआर थिएटरमध्ये घडलेल्या घटनेबाबत माहिती दिलेली आहे. तसेच माननीय श्री.गणपत गायकवाड यांनी इमारतीसंदर्भात उल्लेख केलेला आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावर ज्या ज्या बाबी सभागृहामध्ये मांडलेल्या आहेत आणि.....

श्री.रविंद्र चव्हाण : अध्यक्ष महोदय, २५-३० दिवसांपूर्वी श्री.मनोज खटके या भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यावर प्राण घातक हल्ला करण्यात आला आहे. परंतु अद्याप आरोपींना अटक करण्यात आलेली नाही.

श्री.दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, ठीक आहे. याबाबतची माहिती देण्याचे माझ्याकडून चुकून राहून गेले आहे. आपण मला देखील भेटून ही माहिती दिली होती. या संदर्भात आजच पोलीस आयुक्त यांच्याशी चर्चा करुन योग्य त्या सूचना देण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी श्रीराम नवमी व गुढीपाडवा सण साजरा करण्यासंदर्भात केलेल्या सुचनांची नोंद घेतलेली आहे. अजून देखील कोरोनाचे संक्रमण सुरु आहे. याबाबतचा वेळोवेळी आढावा घेऊन महसूल व आपत्ती व्यवस्थापन विभाग आवश्यक सूचना निर्गमित करीत आहे. उक्त सूचना विचारात घेऊन त्यासंदर्भातील आदेश काढले जातील. कोरोनावरील निर्बंध केंद्र सरकारने शिथिल केले असले तरी आज जगामध्ये वाढत्या कोरोनाचा धोका लक्षात घेऊन याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल. शिवजयंती साजरी करण्यासाठी जशी सूट देण्यात आली होती, त्याच पद्धतीने सूट देण्याचा प्रयत्न केला जाईल. याबाबतचा निर्णय घोषित करण्याचा माझा अधिकार नाही. मदत व पुनर्वसन विभागाशी चर्चा करुन मुख्यमंत्री महोदय याबाबतचा निर्णय घेतील. एवढेच या निमित्ताने सांगतो आणि आपली रजा घेतो. धन्यवाद.

श्री.देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्ष नेता) अध्यक्ष महोदय, मी जे विषय मांडले होते त्यापैकी कोणत्याही विषयाचे उत्तर देण्यात आले नाही.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या फायनान्स मॅनेजमेंटमध्ये ४५ वा क्रमांक आला. या प्रश्नाचे उत्तर देण्यात आले नाही. प्राणवायू खरेदीमध्ये भ्रष्टाचार झाला, याबाबतचे उत्तर दिले नाही. माननीय श्री.यशवंत जाधव यांनी २४ महिन्यांत ३६ मालमत्ता कशा खरेदी केल्या, याचे देखील उत्तर आले नाही. २९ कोटी टॅब खरेदीचे उत्तर आले नाही. राणीच्या बागेसंदर्भात माननीय श्री.अस्लम शेख यांनीच आक्षेप घेतलेला आहे. याही प्रश्नाचे उत्तर नाही. जलशुद्धीकरण केंद्रामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराचे उत्तर मिळालेले नाही. भायखळा प्राणी संग्रालयाच्या टेंडरमध्ये १०६ कोटी रुपयांची वाढ का झाली, याचे देखील उत्तर देण्यात आले नाही. सॉल्टपॅनच्या जागेवर थीम पार्क करण्यात आले, याचे देखील उत्तर देण्यात आले नाही. विकासकाच्या लाभासाठी उद्यानाच्या आरक्षणात बदल केला, याचे उत्तर देण्यात आले नाही. २.५५ कोटी रुपयांच्या जमिनीसाठी ३५९ कोटी रुपये देण्यात आले. संबंधित व्यक्ती त्या जमिनीचे मूल्य देत असली तरी त्या जमिनीवर १०० टक्के झोपडपट्टी आहे हे आपल्या लक्षात आले नाही काय? सदर जागा शासनाच्या कामाची आहे ही बाब आपल्या लक्षात आली नाही काय? याचे देखील उत्तर देण्यात आले नाही. आरोग्य विभागातील सर्व बाबींची माहिती दिली, त्यासंदर्भात देखील काहीही उत्तर देण्यात आले नाही.

अध्यक्ष महोदय, सध्या युक्रेन आणि रशियाचे युद्ध सुरु आहे. युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की हे नाटो राष्ट्राशी मदत मागत आहेत. त्यांनी नाटो राष्ट्रांची मदत मागण्याऐवजी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांची मदत मागितली असती तर अधिक चांगले झाले असते. कारण मुख्यमंत्री महोदयांकडे एक असे शस्त्र आहे, एक असा बॉम्ब आहे की, तो सर्वांवर भारी पडेल. तो म्हणजे "टोमणे" बॉम्ब. टोमण्यांच्या व्यतिरिक्त भाषणामध्ये काय होते? हे फक्त अरण्यरुदन होते.

"राज पर पहरा है,

जख्म बहुत गहरा है,

श्री.देवेंद्र फडणवीस.....

लगता है बड़ी चोट खायी है,

दर्द बन के बातें जबान पर आयी है."

अध्यक्ष महोदय, मराठी शाळा बंद झाल्या आहेत, त्याबद्दल काहीही सांगण्यात आले नाही. बंद शाळेच्या सफाईवर ३८६ कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत, याबाबत देखील कोणतेही उत्तर देण्यात आलेले नाही. कोरोनामध्ये देशातील सर्वात जास्त रुग्ण महाराष्ट्रामध्ये होते व सर्वात जास्त मृत्यू देखील महाराष्ट्रामध्येच झाले, तरी देखील याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत कोणतेही उत्तर दिले नाही.

अध्यक्ष महोदय, अनेकांनी श्री.नवाब मलिक यांचे समर्थन केले आहे, त्याचे मला दु:ख नाही. परंतु माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांचे समर्थन केले, याचे मला अगदी मनापासून दु:ख होत आहे. सत्ता चालविण्यासाठी मनात नसताना देखील काही वेळा समर्थन करावे लागते. श्री.नवाब मलिक यांनी बॉम्ब स्फोटातील आरोपींकडून व दाऊदच्या माणसांकडून जमीन खरेदी केली, जे आरोपी बॉम्ब स्फोट प्रकरणांमध्ये कारागृहामध्ये शिक्षा भोगत आहेत, अशा आरोपींकडून खोट्या कागदपत्रांवर साक्षऱ्या केलेल्या आहेत, याचे समर्थन कसे केले जाऊ शकते ? मुंबईतील बॉम्ब स्फोटातील आरोपीसोबत ज्यांनी जमिनीचे व्यवहार केले आहेत, त्यांचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री समर्थन करीत आहेत, ही अतिशय गंभीर बाब आहे. या जमीन व्यवहारातील पैसे श्रीमती हसिना पारकर यांच्याकडे गेलेले आहेत. या सर्व बाबींचे अन्य कोणीही समर्थन करतील. परंतु याचे समर्थन मुख्यमंत्री महोदय करीत आहेत, याचे मला खरोखर दु:ख होत आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदय म्हणाले की, आपण काश्मीरमध्ये महेबूबा मुफ्तीसोबत सरकार स्थापन केले. हे खरे आहे की, ओसामा बीन लादेनला मारल्याच्या आधारावरच श्री.बराक ओबामा यांना दुसऱ्यांदा टर्म मिळाली. त्यावर मी

काही बोलणार नाही. अशा प्रकारच्या आरोपींना फाशी देऊ नका म्हणून पत्र लिहिणारे

श्री.देवेंद्र फडणवीस.....

आज आपल्यासोबत बसलेले आहेत. मेहबुबा मुफ्तींच्या संदर्भात ज्यावेळी सेपरेटीस्ट व आयएसआय यांनी काश्मीरमध्ये निवडणुका होऊ देणार नाही, असे सांगितले होते, तेव्हा केंद्र सरकारने निवडणुका घेऊन दाखविल्या. त्यावेळी ६० टक्के मतदान झाले होते. त्यानंतर पुन्हा सेपरेटीस्ट सांगितले की, निवडणुका झाल्या असतील परंतु आम्ही सरकार स्थापन होऊ देणार नाही, तेव्हा सरकार स्थापन करणे देशाची आवश्यकता होती म्हणून मेहबूबा मुफ्तीसोबत सरकार बनवून सेपरेटीस्ट व आयएसआय यांना दाखवून दिले. परंतु त्या सरकारमध्ये आम्ही राहिलो नाही. काश्मीरमध्ये निवडणुका होऊ शकतात हे आम्ही जगाला दाखवून दिल्यानंतर दुसऱ्या क्षणालाच आम्ही त्या सरकारला लाथ मारली. पारदर्शी कारभार केला म्हणून आम्ही आरशासमोर उभे राहू शकतो. आरशा समोर उभे राहण्यास आम्हाला अडचण नाही. आपल्या काही घरगड्यांना ईडी बोलावित आहे, म्हणून ईडी म्हणजे घरगडी, असे आपण म्हणत आहात काय? असे बोलणे बरोबर नाही. आम्ही देखील मुंबई पोलिसांना घरगडी म्हणावे काय? मुंबई पोलिसांना हाताशी धरुन आपण माननीय श्री.प्रवीण दरेकर यांच्यावर एफआयआर दाखल केलेला आहे. ही बाब खरी आहे की, उद्या कोण जेलमध्ये जाणार आहे, परवा कोण जेलमध्ये जाणार आहे, हे कोणीही सांगू नये. परंतु ही अक्कल आपण श्री.संजय राऊत यांना देणार आहात काय? बाप-बेटा जेलमध्ये जाणार, असे त्यांनी देखील घोषित केले आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

श्री. देवेंद्र फडणवीस.....

आता सांगण्यात आले की, समोरच्या बाजुने सांगण्यात आले की, आमच्यावर टीका करा. परंतु महाराष्ट्र राज्यावर टीका करु नका. महाराष्ट्रावर टीका कोणी करत आहे, हा संभ्रम मानातून सरकारने काढून टाकावा. तुम्ही म्हणजे महाराष्ट्र नाही, तुम्ही म्हणजे मराठी नाहीत, तुम्ही म्हणजे मुंबई नाही. ही बाब सरकारने डोक्यातून काढून टाकावी. याठिकाणी शिखंडीचाही उल्लेख केला गेला. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्यासोबत तुम्ही मते मागितली होती. असे असताना आता आपण सत्तेसाठी कोणत्या शकुनीच्या नादी लागला आहात. शिखंडी कोण आहे ? शिखंडीला पुढे करणारे आम्ही नाहीत. आम्ही समोरासमोर लढणारे आहोत. प्रभू श्रीरामाचे नाव सांगणारे आम्ही आहोत. कौरवांनी कपटाने राज्य घेतले होते. पांडवांनी ते घेतलेले नाही. कपटाने राज्य घेतल्यानंतर अर्जून घाबरला नव्हता. आम्हीदेखील घाबरत नाही. याचे कारण असे की,

"पथ का अंतिम लक्ष्य नहीं है,

सिंहासन चढ़ते जाना,

सब समाज को लिए साथ में,

आगे है बढ़ते जाना."

अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार हे ७२ तास आमच्यासोबत होते. त्यामुळे त्यांनी बरोबर मुख्यमंत्री महोदय बसल्यानंतर चांगली कविता म्हटली आहे.परंतु त्याचा उपयोग काय आहे ? म्हणजे मुख्यमंत्र्यांच्या भाषणाचे उत्तर आपणच दिलेले आहे. त्याचा उपयोग काय झाला ? आम्ही त्याच्यावर सांगू शकतो –

ऐश्वर्य प्राप्त झाले,

झाली दिगंत कीर्ती;

स्नेही न एक लाभे

श्री. देवेंद्र फडणवीस.....

उपयोग काय त्याचा?

सर्वांस स्वास्थ्य आले,

सगळीकडे सुबत्ता;

स्वातंत्र्य फक्त नुरले!

उपयोग काय त्याचा?

केले गुरु अनेक,

यात्रा कित्येक केल्या;

शांती न प्राप्त होता,

उपयोग काय त्याचा?

अध्यक्ष महोदय, आम्ही जे मुद्दे मांडले होते त्याचे उत्तर आम्हाला मिळाले नाही. खरे तर आम्ही मांडलेल्या गोष्टी पुराव्यासह मांडल्या आहेत. त्यावर कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यात आले नाही. खरे तर विधानसभेत भाषण करावयास हवे होते. परंतु ते शिवाजी पार्क मैदानावरील भाषणासारखे केले आहे. म्हणून या सरकारचा आम्ही निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य बर्हिगमन करतात.)

असुधारित प्रत

ॲड. अनिल परब : अध्यक्ष महोदय, सभागृहात कबूल केल्याप्रामणे एसटी संपाबाबत मी राज्य शासनाची भूमिका मांडणार आहे. मागील पाच महिन्यापासून सुरु असलेल्या संपाबाबत निवेदन करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२१ पासून बेमूदत संपावर जाण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यावेळेस १९ संघटनांसोबत चर्चा करुन त्याबाबत त्यांच्या ज्या प्रमुख तीन मागण्या होत्या त्या मागण्यांचा पूर्ण आर्थिक भार उचलून हे प्रकरण मिटविले होते. परंतु दिवाळी सणाच्या सुरुवातीला एका संघटनेने आम्हाला बेमूदत संपावर जाण्याबाबत सूचना दिली होती. त्यावेळेस दिवाळीच्या सणानिमित्ताने राज्यातील जनतेचे हाल होऊ नयेत, म्हणून शासनाने न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. माननीय न्यायालयाने संपाला मज्जाव केला होता. असे असतानाही न्यायालयाने सांगितले की, त्रिसदस्यीय समिती नेमून १२ आठवड्याच्या आत या प्रश्नावर आणि विलिनीकरणाच्या मुद्यावर अहवाल देण्यात यावा. या दरम्यान एसटी कर्मचाऱ्यांना मदतीचा हात म्हणून राज्य परिवहन मंडळाने त्यांच्या तत्कालीन नेत्यांसोबत चर्चा केली. एसटी कर्मचाऱ्यांना जी वाढ आजपर्यंतच्या इतिहासात कधीच मिळाली नाही अशी वाढ त्यावेळेस देऊ केली होती. ही वाढ १ ते १० वर्षाकरिता ५ हजार रुपये, १० ते २० वर्षासाठी ४ हजार रुपये आणि २० वर्षापेक्षा जास्त सेवा झालेल्यांसाठी अडीच हजार रुपये वाढ करण्यात आली होती. ज्यावेळेस मूळ पगारामध्ये ५ हजार रुपयांची वाढ होते तेव्हा ८ हजार रुपयांनी पगार वाढतो. ज्यावेळेस मूळ पगारामध्ये ४ हजार रुपयांची वाढ होते तेव्हा ६ हजार रुपयांनी पगार वाढत असतो आणि जेव्हा मूळ पगारात अडीच हजार रुपयांची वाढ होते तेव्हा ४ हजार ५०० रुपये पगार वाढत असतो. या सर्वांचा विचार करुन एसटी महामंडळाने जवळपास २७ कोटी रुपयांचा अतिरिक्त भार सहन केला. दिवाळी गोड व्हावी म्हणून एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेटही दिली आहे. त्यावेळेस विलिनीकरणाचे तीन मुद्दे होते. विलिनीकरणाची अपेक्षा अशासाठी असते की, पगार चांगले असावेत, पगारची हमी आणि नोकरीची हमी असावी. त्यामुळे राज्य शासनाने एसटी कर्मचाऱ्यांच्या पगाराची हमी घेतली. एसटी कर्मचाऱ्यांचा पगार १० तारखेच्या आत होईल, अशी ग्वाही राज्य सरकारने घेतली आहे. कोणाही कर्मचाऱ्यांना कामावरुन काढण्याचा हेतू

ॲड. अनिल परब .....

नव्हता आणि पगारामध्ये ४१ टक्क्यांची वाढ करण्यात आली. हे सर्व केल्यानंतरही एसटी महामंडळाचे काही कामगार काही विचित्र मागण्यांसाठी अडून बसले होते. १२ आठवड्यानंतर त्रिसदस्यीय समितीने शासनाला अहवाल दिला. हा अहवाल राज्य शासनाने मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये सादर करुन तो मंजूर केला. त्या अहवालात विलिनीकरणाची मागणी त्रिसदस्यीय समितीने नाकारली. विलिनीकरण शक्य नाही, त्याच्या आर्थिक बाबी, प्रशासकीय बाबी, कायदेशीरबाबींचा सविस्तर उल्लेख त्या अहवालामध्ये करण्यात आला आहे. परंतु त्यामध्ये आर्थिक बोजा असल्यामुळे याला मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यात यावी, असे जेव्हा माननीय न्यायालयाने म्हटले तेव्हा मंत्रीमंडळाची मंजुरी घेऊन हा अहवाल मान्य केला. एसटी कर्मचाऱ्यांना जे देणे शक्य होते त्याच्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने राज्य परिवहन मंडळाने आणि राज्य सरकारने दिले आहे. म्हणून यानिमित्ताने मी पुन्हा एकदा एसटी कर्मचाऱ्यांना विनंती करतो, की ३० तारखेपर्यंत एसटी कर्मचाऱ्यांनी कामावर रुजू व्हावे.

अध्यक्ष महोदय, यात वारंवार आत्महत्येबाबतचा उल्लेख केला जात आहे. मी सांगू इच्छितो की, अजून एसटी कर्मचाऱ्यांना कामावरुन काढलेले नाही. त्यांची रोजीरोटी आम्ही काढून घेतली नाही. त्यामुळे आत्महत्या करु नये. जो व्यक्ती आत्महत्या करतो त्यांच्या कुटुंबाची वाताहत होत असते. हा मार्ग कोणीही स्वीकारु नये. तसेच यात शेकडो आत्महत्या झाल्याचे सांगण्यात येते. परंतु या वस्तुस्थिती अशी आहे की, केवळ ४८ कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यापैकी वेतन नियमित नसल्यामुळे ३, कर्जाला कंटाळून १ आत्महत्या झाल्या आहेत. इतर सर्व आत्महत्या वैयक्तीक कारणास्तव झाल्या आहेत. त्यामुळे या सर्व गोष्टींचा उल्लेख करुन कामगारांना भडकविले जात आहे. त्यातून ते वेगळ्या दिशेला जात आहेत. मी या माध्यमातून सर्व कामगारांना विनंती करतो की, त्यांनी पुन्हा कामावर हजर व्हावे. ज्याप्रमाणे कामगारांबाबत शासनाचे दायित्व आहे त्याचप्रमाणे राज्यातील जनतेबाबतही शासनाचे दायित्व आहे. आता शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु आहेत. त्यामुळे या सर्वांना एसटीची आवश्यकता आहे. या

ॲड. अनिल परब .....

सर्व गोष्टींचा विचार करुन मी आपल्यामार्फत विनंती करतो की, त्यांनी कामावर रुजू व्हावे.

उपाध्यक्ष : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे. आजच्या कामकाजात दाखविलेल्या अर्धा-तास चर्चा, अशासकीय विधेयके तसेच अशासकीय ठराव पुढे ढकलण्यात येत आहेत.

सन २०२२ मधील अर्थसंकल्पीय अधिवेशन दिनांक ३ ते २५ मार्च, २०२२ या कालावधीत मुंबई येथे घेण्यात आले. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे. आजच्या दिवसाचे कामकाज संपलेले आहे. मी या सत्र काळातील कामकाजाचा आढावा सदनासमोर ठेवतो :-

एकूण बैठकींची संख्या	:	**१५**
प्रत्यक्षात झालेले कामकाज	:	**१०६ तास ३० मिनिटे**
अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ	:	**६ तास ५० मिनिटे**
रोजचे सरासरी कामकाज	:	**७ तास १० मिनिटे**

<u>तारांकित प्रश्न :</u>

एकूण प्राप्त प्रश्न : ६६९८ स्वीकृत प्रश्न : **६९६** सभागृहात उत्तरित झालेले प्रश्न : **६४**

अल्प सूचना : प्राप्त : ३ स्वीकृत : १ उत्तरित : १

लक्षवेधी सूचना :

एकूण प्राप्त सूचना : १७८७ स्वीकृत सूचना : २७४ चर्चा झालेल्या सूचना : ८०

नियम ९७ च्या सूचना :

उपाध्यक्ष.....

प्राप्त सूचना : **६८**

अनुमती नाकारलेल्या सूचना : **निरंक**

चर्चा झालेल्या सूचना : **निरंक**

शासकीय विधेयके :

विधानसभा विधेयक : पुर:स्थापित : **१३**

संमत करण्यात आलेली विधेयके : **१५**

विधान परिषद विधेयक : संमत करण्यात आलेली विधेयके : **१**

अशासकीय विधेयके : पुरस्थापित : **निरंक**

संमत करण्यात आलेली विधेयके : **निरंक**

शासकीय ठराव : निरंक

नियम २९३ अन्वये प्रस्ताव :

प्राप्त सूचना : **१** मान्य सूचना : **१** चर्चा झाली : **१**

अर्धा तास चर्चा :

प्रश्नाच्या उत्तरातून उद्भवलेल्या प्राप्त सूचना : **७३**

स्वीकृत सूचना : **६३** चर्चा झाली : **निरंक**

सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर प्राप्त सूचना : **१८८**

स्वीकृत सूचना : **३२** चर्चा झाली : **६**

उपाध्यक्ष.....

असुधारित प्रत

सन्माननीय सदस्यांची उपस्थिती : जास्तीत जास्त उपस्थिती ९१.५३ टक्के

कमीत कमी उपस्थिती ६३.३० टक्के,

एकूण सरासरी उपस्थिती ८४.३८ टक्के

या अधिवेशनाचा समारोप करताना मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, सर्व मंत्री महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय तालिका सभाध्यक्ष, सर्व सन्माननीय सदस्य, तसेच, विधानमंडळाचे, सुरक्षा विभागाचे, मंत्रालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे मी आभार मानतो. या बरोबरच कोरोना चाचणीशी निगडीत वैद्यकीय सेवा देणारे सर्व डॉक्टर्स व स्टाफ यांचेही मी आभार मानतो.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

पृ.शी./मु.शी.: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा.

उपाध्यक्ष : मी जाहीर करतो की, महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक १८ जुलै, २०२२ पासून मुंबई येथील विधान भवनात बोलवावे, अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे.

असुधारित प्रत

पृ.शी./मु.शी.: सत्र समाप्तीसंबंधी घोषणा.

उपाध्यक्ष : सभागृहापुढील कामकाज संपले आहे. आता मी सत्र-समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा आदेश वाचून दाखवितो.

"भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२) उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी भगतसिंह कोश्यारी, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ रोजीच्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्ती बरोबरच महाराष्ट्र विधानसभेचे सत्र संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

(यानंतर राष्ट्रगीत झाले.)

(सायंकाळी ०६.०२ वाजता सत्र संस्थगित झाले.)

असुधारित प्रत